
हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद
जागतिक संकटस्थिती आणि शांतीचे पथदर्शन



# जागतिक संकटस्थिती

## आणि

# शांतीचे पथदर्शन

हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद

# जागतिक संकटस्थिती
# आणि
# शांतीचे पथदर्शन

अधिक माहितीसाठी संपर्कः

www.alislam.org

www.ahmadiyyamuslimjamaat.in

www.mta.tv

www.lightofislam.in

Noor-ul-Islam Toll free Assistance:

1800-103-2131

www.ahmadiyyamuslimjamaat.in/feedback

# जागतिक संकटस्थिती
# आणि
# शांतीचे पथदर्शन

---

**हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद**

विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअतचे सर्वोच्च नेते

आणि अपेक्षित मसीहाचे पाचवे उत्तराधिकारी, (अल्लाह त्यांचा सहाय्यक होवो).

यांच्या

***भाषणांचे व पत्रांचे संकलन***

ISLAM INTERNATIONAL PUBLICATIONS LTD.

# जागतिक संकटस्थिती आणि  शांतीचे  पथदर्शन

## हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद

विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअतचे सर्वोच्च नेते
आणि अपेक्षित मसीहाचे पाचवे उत्तराधिकारी,
(अल्लाह त्यांचा सहाय्यक होवो)
यांच्या भाषणांचे व पत्रांचे संकलन

First Published in the UK in English: 2012[ISBN: 978-1-84880-079-3]
First Marathi Edition Published in India: 2021

अनुवादकः डॉ. बशारत अहमद
खान मामून अहमद

© ISLAM INTERNATION PUBLICATION Ltd.

प्रकाशक
नूर उल इस्लाम, विभाग,
सदर अंजुमन अहमदिया,
कादियान-१४३५१६,
जिल्हा गुरदासपूर,पंजाब, भारत.
मुद्रकः फज्ले उमर प्रिंटींग प्रेस, कादियान.
प्रथम आवृत्तीः (मराठी) २०२१

*या प्रकाशनाचा कुठलाही अंश किंवा भाग कोणत्याही प्रकारे अर्थात तांत्रिक किंवा यांत्रिक पद्धतीने, ज्यात छायांकन, ध्वनीमुद्रन किंवा कोणतेही माहिती संग्रहण आणि पूर्वस्थिती प्राप्त करण्याच्या अन्य कोणत्याही मार्गांचा अवलंब, प्रकाशकांच्या पूर्व परवानगीशिवाय पुनर्मुद्रिक किंवा प्रवाहित करण्यात येवू नये.*

ISBN [paperback]: 978-81-7912-280-8

# अनुक्रमणिका

लेखकाचा परिचय........................................................................ix

विषय परिचय..........................................................................xiii

भाषणे

जागतिक संकटाविषयी इस्लामचा दृष्टिकोन..................................................३

स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम आणि निष्ठेबाबत इस्लामची शिकवण..........................२३

परमाणु युद्धाचे विनाशकारी परिणाम आणि संपूर्ण न्यायाची अत्याधिक आवश्यकता..........................................................................४१

शांतीचा मार्ग- राष्ट्रांमध्ये न्यायोचित संबंध...............................................६७

शांततेची गुरूकिल्ली- जागतिक ऐक्य.....................................................९७

पाश्चात्य समाजाशी मुस्लिम एकात्म होऊ शकतात काय?............................११९

इस्लाम- शांती आणि करुणेचा धर्म.......................................................१४१

जागतिक शांती- काळाची गंभीर आवश्यकता............................................१५९


जागतिक शांती आणि सुरक्षा- सद्यःकालीन गंभीर मुद्दे.................................१७५

जागतिक अस्थिरतेच्या काळात शांतता प्रस्थापनेची गुरु किल्ली......................१९३

## जागतिक नेत्यांना लिहिलेले पत्र

पोप बेनिडीक्ट यांना लिहिलेले पत्र........................................................२१३
इस्त्राईलच्या प्रधानमंत्री यांना लिहिलेले पत्र...............................................२२१
इस्लामी प्रजासत्ताक ईरान च्या राष्ट्रपती यांना लिहिलेले पत्र...........................२२७
संयुक्त राज्य अमेरिकेच्या राष्ट्रपती यांना लिहिलेले पत्र.................................२३३
कॅनेडा च्या प्रधानमंत्री यांना लिहिलेले पत्र...............................................२३९
दोन्ही पवित्र स्थळांचे संरक्षक, सौऊदी अरब राज्याचे राजे यांना लिहिलेले पत्र.................................................................................२४५
स्टेट कौंनसील ऑफ पीपल्स रिपब्लिक ऑफ चाईना चे प्रधान यांना लिहिलेले पत्र.................................................................................२५१
युनाईटेड किंग्डंम च्या प्रधानमंत्री यांना लिहिलेले पत्र.................................................................................२५७
जर्मनीच्या चांसलर ला लिहिलेले पत्र......................................................२६३
प्रजासत्ताक फ्रेंच च्या प्रधानमंत्री यांना लिहिलेले पत्र....................................२६९
आदरणीय महारानी युनाईटेड किंग्डंम आणि कॉमनवेल्थ च्या समराज्ञी यांना लिहिलेले पत्र .........................................................................२७७
इस्लामिक प्रजासत्ताक ईरानचे सर्वोच्च नेते यांना लिहिलेले पत्र .....................२८५
रशिया महासंघाचे राष्ट्रपती यांना लिहिलेले पत्र .........................................२९१

महत्त्वपूर्ण सूचना.........................................................................................२९६




**हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद**

मसीहाचे पाचवे ख़लीफा

## लेखकाचा परिचय

आदरणीय मिर्ज़ा मसरुर अहमद हे मसीहाचे पाचवे ख़लीफा आणि अहमदिया मुस्लिम जमाअत चे वैश्विक सर्वोच्च प्रमुख आहेत. ते अपेक्षित मसीहा आणि सुधारक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी (अ.स.) यांचे पाचवे उत्तराधिकारी आणि त्यांच्या मुलाचे नातू आहेत.

त्यांचा जन्म १५ सेप्टेंबर १९५० रोजी, पाकिस्तानातील रब्वाह या शहरात मिर्ज़ा मन्सूर अहमद आणि श्री. नासीरा बेगम अहमद यांच्या घरी झाला. १९७७ साली फैसलाबाद, पाकिस्तान येथील कृषी विद्यापीठातून कृषी अर्थशास्त्रात पद्व्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी आपले जीवन रीतसरपणे इस्लाम आणि मानवतेच्या सेवेसाठी समर्पित केले. त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे ते १९७७ साली घाणा (आफ्रिका) देशात गेले आणि तेथे अनेक वर्ष वेगवेगळ्या अहमदिया मुस्लिम प्रशालांमध्ये प्राचार्य म्हणून कार्यरत राहिले. त्यांनी सलागा येथील अहमदिया माध्यमिक प्रशाला स्थापनेमध्ये मोलाचे सहकार्य केले आणि प्रारंभीच्या दोन वर्षासाठी प्रशाळेचे प्राचार्य म्हणून त्यांनी सेवा केली.

२२ एप्रिल २००३ रोजी अहमदिया मुस्लिम जमाअतचे ख़लीफा, या आजीवन पदासाठी त्यांची निवड झाल्यापासून जागतिक पातळीवर २०० हून अधिक देशांत पसरलेल्या कोट्यावधी संख्येत असलेल्या

आंतरराष्ट्रीय समुदायाचे आध्यात्मिक आणि व्यवस्थापकीय प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

खलीफा पदासाठी निवड झाल्यापासून आदरणीय महोदय, जागतिक पातळीवर इस्लाम धर्माचा शांती संदेश पोहोचविण्यासाठी सर्व उपलब्ध, मुद्रित आणि तांत्रिक माध्यमांचा वापर करुन, चालवण्यात येत असलेल्या मोहिमांचे नेतृत्व करत आहेत. त्यांच्या नेतृत्वात अहमदिया मुस्लिम जमाअतच्या राष्ट्रीय शाखा, इस्लाम धर्माच्या सत्य आणि शांतीपूर्ण संदेशास प्रतिबिंबित करणाऱ्या मोहिमांचे आयोजन करत आहेत. अहमदी मुस्लिम, जगभर शांती संदेशाची हस्तपत्रके लाखोंच्या संख्येने मुस्लिम आणि बिगर मुस्लिम लोकांमध्ये वितरित करणे, आंतरधर्मीय शांती चर्चासत्रांचे प्रायोजन करणे, पवित्र कुरआनच्या प्रदर्शनांचे आयोजनाद्वारे त्याचा सत्य आणि महत्त्वपूर्ण संदेश प्रसारित करण्यासारख्या मूलभूत स्वरुपाच्या कार्यात प्रयत्न करत आहेत. या सर्व मोहिमांना जागतिक पातळीवर माध्यम प्रसिद्धी मिळत आहे, आणि इस्लाम धर्म, शांतीचा पुरस्कार, स्वदेशा प्रति निष्ठा आणि मानवतेच्या सेवेसाठीच आहे, हे सिद्ध होत आहे.

इ.स. २००४ मध्ये माननीय महोदयांनी वार्षिक राष्ट्रीय शांती चर्चा सत्राचा आरंभ केला, ज्यात सर्व विचारधारांचे पाहूणे एकत्र येऊन शांती आणि एकात्मतेच्या सवंर्धनासंबंधी विचारांची देवाण-घेवाण करतात. दर वर्षी हे चर्चासत्र, विद्यमान मंत्रीगण, संसद सदस्य, राजकारणी, धर्म प्रमुख आणि अन्य मान्यवरांना आकर्षित करत आहे.

माननीय महोदयांनी मानवतेच्या सेवाकार्याच्या संवर्धन आणि सुलभीकरणासाठी जगभर प्रवास केला आहे. अहमदिया मुस्लिम जमाअतने माननीय महोदयांच्या नेतृत्वात, जगभरातील उपेक्षित प्रदेशांमध्ये अनेक शाळा,

रूग्णालये बांधली आहेत. ज्यामधून उच्च दर्जाच्या सोयी आणि सुविधा पूरविल्या जातात.

माननीय महोदयांनी जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक पातळीवर अतोनात प्रयत्न करत आहेत. ते जमाअत च्या सदस्यांना जिहाद (किंवा संघर्ष) स्वतः मध्ये सुधारणा करण्यात प्रयत्नांची शिकस्त करण्याचा उपदेश करतात, जो की जिहाद चा अस्सल अर्थ आहे, जेणे करून सर्वप्रथम वयैक्तिक पातळीवर शांती निर्माण करू शकू आणि मग पुढे समाजाच्या सर्व पातळीवर शांती प्रस्थापित होऊ शकते.

माननीय महोदय हाच संदेश इतरांना देखील देतात. मेलबर्न च्या एका सभेत शांती प्रस्थापित करण्याबद्दल जेव्हा एका बिगर मुस्लिम व्यक्तिने प्रश्न विचारला तेव्हा माननीय महोदय उत्तरात म्हणाले, ''जर तुमच्यात शांतता असेल तर याचा अर्थ असा की तुम्ही शांतता प्रस्थापित करीत आहात. आणि जर आपल्या प्रत्येकास शांतता लाभली तर याचा अर्थ असा आहे की आम्ही शांती प्रस्थापित करीत आहोत.''

स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर, वयैक्तिक आणि सामूहिक स्तरावर इस्लामच्या खऱ्याखुऱ्या शिकवणुकींच्या आधारे इतर सर्वांना शांतता प्रस्थापित करण्याच्या सल्ला देण्याचा प्रयत्न करीत आहे.

आदरणीय मिर्ज़ा मसरूर अहमद सध्या इंग्लंड च्या लंडन शहरात राहतात. जगभरातील अहमदी मुसलमानांचे आध्यात्मिक प्रमुख या नात्याने ते अतिशय तळमळीने इस्लामच्या शांती आणि सौहार्दाच्या शिकवणी साठी कार्यरत असता

## विषय परिचय

जगाची वाटचाल अराजकसम स्थितीकडे आहे. जागतिक अर्थ आणीबाणी जवळपास प्रत्येक आठवडयाला नवनवीन आणि अधिक गंभीर स्वरुपाच्या संकटस्थितीकडे जात आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या स्थितीशी, सद्यःस्थितीची तुलना केली जात आहे. आणि हे स्पष्ट दिसत आहे की, घटनाक्रम जगाला अभूतपूर्ण गतीने भयानक अशा तिसऱ्या महायुद्धाकडे लोटत आहे. ही जाणीव अतितीव्रतेने होत आहे की, परिस्थिती खूपच शिघ्रगतीने नियंत्रणाबाहेर जात आहेत आणि जन सामान्य, प्रतिक्षेत आहेत की, कोणीतरी पुढे येऊन दृढतेने खंबीर मार्गदर्शन करावे, ज्याने त्यांना विश्वास द्यावा आणि ते त्यांच्या हृदयाशी आणि मनाशी एकरुप असावे आणि त्यांच्यामध्ये आशा निर्माण व्हावी की, होय एक मार्ग आहे जो शांतीकडे घेवून जावू शकतो. अणु युद्धाचे परिणाम एवढे भयंकर आहेत की, त्याबद्दल विचार करण्याचे धाडसदेखील कोणी करु शकत नाही.

या ग्रंथामध्ये आम्ही ते मार्गदर्शन, जे विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअत चे प्रमुख हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी केले आहे, ते संकलित केले आहे. मागील काही वर्षांपासून घटना, ज्या पद्धतीने घटना घडत आहेत, ते पाहून अत्यंत निर्भिडपणे घोषणा करीत आहेत, आणि ते हिनविण्यासाठी नव्हे तर त्यावर विचार करण्यास त्यांना प्रवृत्त करण्यासाठी की, जग कशा पद्धतीने या स्थितीपर्यंत पोहोचले आहे आणि ही भयंकर

आपत्ती कशी टाळली जाऊ शकते आणि या जागतिक खेडयातील सर्व लोकांना सुरक्षा आणि शांती प्रदान करण्याची कोणती कार्यप्रणाली अंगीकारावी लागेल. त्यांनी परखडपणे जाहीर केले आहे की, जगात शांती प्रस्थापनेचा एकच मार्ग उपलब्ध आहे; तो म्हणजे विनम्रता आणि न्याय आणि विनयशील आणि समर्पित भावनेने परमेश्वरापुढे लीन होणे. मनुष्याला मानव होण्यासाठी, सबळांनी दुर्बलांशी आदर आणि सन्मान आणि न्यायपूर्व व्यवहार करण्यासाठी, तसचे दुर्बल आणि रंकांनी देखील कृतज्ञता दाखवावी आणि सत्य आणि सदाचरणाचा मार्ग धारण करावा आणि सर्वांनीच आपल्या निर्मिका प्रती अतिशय लीनतेने आणि निष्ठेने समर्पित व्हावे.

त्यांनी पुन्हा पुन्हा लक्षात आणून दिले आहे की, या विनाशाच्या गर्ते वरून परत फिरण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे राष्ट्रांनी आपसातील व्यवहारात न्यायाने वागण्याची गरज आहे. जरी त्यांच्यात आपसात वैर असेल तरी त्यांनी न्यायाची कास सोडली नाही पाहिजे. कारण इतिहासाने आम्हाला हा धडा दिला आहे की, भविष्यातील घृणा आणि तिरस्काराचे लवलेश संपवून शाश्वत शांततेसाठी हाच एकमेव मार्ग आहे.

ख़लीफा साहेब यांनी अनेक मोठ मोठया ठिकाणी जाऊन सांघिक व वयैक्तिक पातळीवर त्या त्या महान देशांच्या लोकांना शांतीची आवश्यकता व गरज समजावून सांगितली आहे. त्यांनी वॉशिंग्टन डी.सी. येथील कॅपीटॉल हिल मध्ये, तसेच लंडनच्या संसद मध्ये, यूरोपियन संसद मध्ये, न्युझीलंडच्या राष्ट्रीय संसद मध्ये आणि जर्मनीच्या सैन्यदलाच्या मुख्यालयात जाऊन त्यांनी शांतीबद्दल ऐतिहासिक भाषणे दिले आहेत. या सर्व भाषणामध्ये त्या त्या प्रदेशाचे नेते, सांसद, राजदूत, एन.जी.ओ. कार्यकर्ते, धार्मिक नेते, प्राध्यापक, धोरण सल्लागार व पत्रकार उपस्थित होते. ख़लीफा साहेबांनी सर्व ठिकाणी जाऊन स्पष्टपणे सांगितले की, न्याय तेव्हाच प्रस्थापित होईल, जेव्हा प्रत्येक क्षेत्रात व समाजातील सर्व गटांमधील लोकांशी समान व्यवहार ठेवला

जाईल. पुढे ते म्हणाले की, जर या समान व्यवहाराचा अवलंब केला गेला नाही तर अमानवी आर्थिक व राजकीय धोरणे जगातील लोकांमध्ये तणाव उद्युक्त करेल आणि परिणामस्वरूप जागतिक संकट निर्माण होईल.
पवित्र कुरआनाच्या याच शिकवणीवर त्यांनी जागतिक नेत्यांना लिहलेल्या पत्रात प्रामुख्याने भर दिला आहे.

**लोकांनी तुम्हाला पवित्र मशिदीत जाण्यास प्रतिबंध केला होता, हे त्यांचे वैमनस्य तुम्हाला अनाचार करण्यास प्रवृत्त न करो, आणि तुम्ही सदाचरण आणि धर्मपरायणता याबाबतीत एकमेकांना सहाय्य करा; परंतु पाप आणि अनाचार याबाबतीत एकमेकांना सहाय्य करु नका. आणि अल्लाहचे भय बाळगा, (कारण) अल्लाह शिक्षेच्याबाबतीत फारच कठोर आहे.(५ः३)**

राष्ट्रपती ओबामा यांना उद्देशून ते म्हणतातः

''जसे की आपण सर्व जाणतो की, दुसऱ्या महायुद्धास लीग ऑफ नेशन्स चे अपयश आणि १९३२ साली सुरू झालेले आर्थिक संकट हेच कारणीभूत होते. आज सगळे प्रमुख अर्थशास्त्रज्ञ असे म्हणत आहेत की, आजची आर्थिक परिस्थिती १९३२ च्या आर्थिक परिस्थितीशी अनेक बाबतीत समान दिसून येत आहे. आपण पाहत आहोत की, राजकीय आणि आर्थिक समस्यांमुळे काहीं छोटया देशांमध्ये पुन्हा एकदा युद्ध छेडली जात आहेत. तसेच अशा देशांत अंतर्गत असंतोष आणि असमाधान वाढत जात आहे. या परिस्थितीचा परिणाम म्हणून काहीं महाशक्ती या सरकारांच्या कार्यात हस्तक्षेप करत आहेत, ज्यामुळे आपण महायुद्धाकडे लोटले जात आहोत. जर का या छोटया देशांमधील संघर्षाचे समाधान राजकारण किंवा मुतसद्देगिरीच्या माध्यमातून शोधले गेले नाही तर हे जग पुन्हा एकदा नवीन गटांमध्ये विभागले जाईल. आणि ही तिसऱ्या महायुद्धाच्या विस्फोटासाठी पूर्व संकेत ठरेल. मला असे वाटते की, जगाच्या विकासाकडे अधिक लक्ष देण्यापेक्षा

जगाला विध्वंसापासून वाचवण्यासाठी तातडीने प्रयत्न करणे अधिक महत्त्वाचे आहे. आज मानवजातीला एक ईश्वर, जो आपला निर्मिक आहे, त्यास ओळखणे तातडीची गरज आहे. आणि हीच मानवतेच्या सुरक्षिततेची हमी आहे. अन्यथा हे जग अतिशय वेगाने स्वविध्वंसाकडे लोटले जाईल.''

राष्ट्रपती पुतीन ला त्यांनी लिहिले की,

''सध्या सिरीयामध्ये जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे मी आपणास हे पत्र लिहण्यासाठी प्रवृत्त झालो आहे. आणि तुमच्या सर्व जागतिक नेत्यांना युद्धभूमि ऐवजी एका चर्चेच्या टेबलवर बोलावण्याचे जे प्रयत्न आहे, त्याबद्दल तुमचे अभिनंदन करण्यासाठी लिहीत आहे. या विभागामध्ये होणारा एखादा हल्ला त्या विभागापूर्ताच राहणार नसून तो जागतिक युद्धास कारणीभूत ठरण्याचा धोका आहे आणि म्हणून मी एका प्रमुख पाश्चात्य वृत्तपत्रामध्ये नुक्ताच प्रसिद्ध झालेला तुमचा लेख वाचून प्रसन्न झालो आहे, ज्या लेखात तुम्ही अशा कृतींचा परिणाम अतिशय भयानक आणि युद्ध पसरविण्यास कारणीभूत होईल, हे अधोरेखित केले आहे. तुमच्या या भूमिकेमुळे जगातील महत्त्वाच्या महाशक्तींनी आवरते घेऊन समंजस्याची भूमिका स्वीकारलेली दिसून येत आहे. आणि ते मुतसद्देगिरीच्या माध्यमातून ही समस्या सोडविण्यासाठी तयार होत असलेले दिसत आहेत. माझा विश्वास आहे की, निश्चितच यामुळे हे जग महाभयंकर विनशापासून सुरक्षित झाले आहे. मी तुमच्या या मताशी पूर्णपणे सहमत आहे की, जर सर्व देशांनी स्वतंत्रपणे कृती करण्याचे आणि एकतर्फी निर्णय घेण्याचे ठरविल्यास संयुक्त राष्ट्रसंघाचाही अंत लीग ऑफ नेशन्स सारखाच होऊन ते अपयशी ठरेल.''

२०१३ मध्ये सीरिया आणि ईरान मधील संकट बऱ्यापैकी थंड झाले. ब्रिटीश संसदेने सिरिया मधील लष्करी हस्तक्षेपाविरूद्ध मतदान केले.

रशिया आणि अमेरिकेने सीरियाच्या रासायनिक शस्त्रास्त्रे सोडण्याच्या योजनेवर सहमती दर्शविली. अमेरिकेने सिरियावर हल्ले करणे टाळले आणि ईरान बरोबर परस्पर परमाणु करारही मोठ्या सामर्थ्याने पार पाडला. ख़लीफा साहेबांच्या दिशेनुसार सर्व स्वागतार्ह घडामोडी होत असून शांततेसाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी अजून बरेच काही करावे लागेल.

आमची ही विनम्र प्रार्थना आहे की, या पुस्तकात एकत्रित केलेले मार्गदर्शन मानवजातीसाठी, या धोकाच्या काळामध्ये मार्गदर्शकाचे स्त्रोत ठरो, जेणे करुन न्याय आणि नम्रतेच्या तत्त्वांवर कार्य केल्याने आणि देवाकडे वळल्यास मनुष्याला चिरस्थायी शांती मिळू शकेल. (आमीन)

**प्रकाशक.**

# भाषणे




# जागतिक संकटाविषयी
# इस्लामचा दृष्टिकोन

---

ब्रिटीश संसद, हॉऊज़ ऑफ कॉमन्स
लंडन, यु.के, २००८







Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba] delivering the keynote address at the House of Commons






Official tour of the House of Commons, courtesy of Justine Greening MP






Seated: Lord Avebury (Liberal Democrats Spokesman for Foreign Affairs), Rt. Hon. Hazel Blears MP (Secretary of State for Communities and Local Government); Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba]; Justine Greening MP (Shadow Treasury Minister); Gillian Merron MP (Foreign Office Minister); Councillor Louise Hyams (the Lord Mayor of Westminster). Standing: Jeremy Hunt MP (Shadow Culture Minister); Rafiq Hayat (National Amir AMA UK); Virendra Sharma MP, Rt. Hon. Malcolm Wicks MP (Former Minister at Department for Business, Enterprise and Regulatory Reform); Rob Marris MP, Simon Hughes MP (President of the Liberal Democrats Party); Martin Linton MP; Alan Keen MP.

## प्रस्तावना

२२ ऑक्टोबर २००८ रोजी, ब्रिटीश संसदेच्या हॉऊज़ ऑफ कॉमन्स, मध्ये वैश्विक अहमदिया जमाअतचे सर्वोच्च प्रमुख मसीहाचे पाचवे ख़लीफा, हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांचे ऐतिहासिक भाषण.

खीलाफत-ए-अहमदिया शतकपूर्तीच्या निमित्ताने पुटनी, ज्या प्रभागात अहमदिया मुस्लिम जमाअत चे मुख्यालय फज़ल मस्जिद स्थित आहे, चे सांसद जस्टीन ग्रीनींग यांनी एक स्वागत समारंभ आयोजित केला होता. या स्वागत समारंभामध्ये सांसद गिलीयन मेरॉन, सांसद मा. हॅजल ब्लीयर्स, सांसद एलेन कीन, सांसद डोमिनीक ग्रीव, सांसद सायमन ह्युज्स, लॉर्ड एरिक ऐवबेरी आणि याशिवाय अनेक पत्रकार, राजनीतीज्ञ आणि व्यवसायिक हजर होते.

# जागतिक संकटाविषयी इस्लामचा दृष्टिकोन

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम - अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू व असीम कृपाळू आहे.

सर्व प्रथम, मी सर्व माननीय अतिथी सांसद आणि आदरणीय उपस्थित पाहूण्यांचे आभार मानतो, ज्यांनी एका धार्मिक संघटनेच्या नेत्यास आपले विचार मांडण्याची संधी दिली आहे. मी आमच्या प्रभागाचे अतिशय आदरणीय सांसद जस्टीन ग्रीनिंग यांचा खूपच ऋणी आहे. ज्यांनी आपल्या प्रभागातील एका छोटया समुदायाच्या ख़ीलाफतची शतकपूर्तीस समारंभाच्या अयोजनात खूप कष्ट घेतले आहे. हे त्यांच्या प्रगल्भतेचे आणि उदारमतवादाचे तसेच त्यांच्या प्रभागात राहणाऱ्या लोकांच्या आणि समुदायांच्या भावनांबद्दल आदर असल्याचे निदर्शक आहे.

अहमदिया मुस्लिम जमाअत, जरी एक लहान समुदाय असले तरी इस्लाम धर्माच्या खऱ्या खुऱ्या शिकवणींचे तोच मानक आणि प्रतिनिधित्व करते. मी खात्रीपूर्वक नमूद करु इच्छितो की, प्रत्येक अहमदी जो ग्रेट ब्रिटेन मध्ये राहतो, तो या देशाचा निष्ठावंत नागरिक आहे आणि तो या देशावर मनापासून प्रेम करतो आणि त्याचे कारण आमच्या प्रेषिताची (स.) शिकवण आहे, ज्यांनी आदेशित केले की, आपल्या देशावर प्रेम करणे हे आपल्या श्रद्धेचा अनिवार्य घटक आहे. * अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापक, ज्यांना आम्ही अपेक्षित मसीहा आणि या युगाचे सुधारक मानतो, यांनी इस्लामची शिकवण अधिक विस्ताराने आणि सुस्पष्टपणे मांडली आहे.

ते म्हणतात की, त्यांच्या (स्थानाची) घोषणा करुन सर्वशक्तिमान अल्लाहने त्यांच्यावर दोन जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. एक म्हणजे

अल्लाहचे अधिकार आणि दुसरे म्हणजे अल्लाहच्या निर्मिकांचे (जीवांचे) अधिकार. ते पुढे म्हणतात की, अल्लाहने निर्मित जीवांच्या अधिकारांची परिपूर्ती करणे हे अतिशय कठीण आणि संवेदनशील आव्हान आहे.**

ख़ीलाफत संबंधी बोलायचे तर कदाचित तुम्हाला भय वाटेल की अशी वेळ येऊ शकेल, जेव्हा इतिहासाची पुनरावृत्ती होऊन अशा प्रकाराच्या नेतृत्वामुळे पुन्हा युद्धांचा आरंभ होईल. परंतु मी तुम्हाला खात्री देवू इच्छितो की, जरी इस्लाम वर अशा स्वरूपाचा आरोप केला जातो, तरी अहमदिया ख़ीलाफत नेहमीच जगामध्ये शांती आणि सौहार्दाच्या मानकाच्या स्वरुपात ओळखली जाईल. तसेच त्याचे सदस्य, ज्या देशात राहतात त्या देशाशी नेहमीच एकनिष्ठ राहतील. अहमदिया ख़ीलाफत चा उद्देश मसीहा आणि इमाम महदी यांच्या विशेष प्रबोधन कार्यास अखंड चालू ठेवून त्यास चिरस्थायीत्व देणे आहे, म्हणून ख़ीलाफत चे भय बाळगण्याचे अजिबात कारण नाही. ही ख़ीलाफत जमाअतच्या सदस्यांचे ध्यान त्या दोन उद्दिष्टांच्या परिपूर्तीकडे आकर्षित करत असते, ज्यासाठी अभिवचनातील मसीहांचे आगमन झाले, आणि परिणामस्वरूप जगामध्ये शांती आणि सौहार्द निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असते.

आता वेळेची भान ठेवून मी मूळ विषयाकडे येतो. जर आपण मागच्या काही शतकांचा निरपेक्षपणे आढावा घेतला तर, आपल्या लक्षात येईल की, या काळात जी युद्धे झाली ती वास्तविक धर्मयुद्धे नव्हतीच. ती बहुतेक भौगोलिक(भूप्रदेशीय) स्वरूपाची होती, जर राष्ट्र-राष्ट्रातील

---

* तफ़सीर ए हक़्क़ानी, सुरह अल् क़सस आयत ८६ तसेच फ़त्हुलबारी फ़ी शरह सहीह बुख़ारी, प्रकरण क़ौल्लिलाह तआला वातुल बुयुता आणि तोहफ़ातुल अहवादी, शरह जामि तिरमिजी बाब मा यकूल.

**मल्फ़ूज़ात खंड १ पृ-३२६

आजचे संघर्ष आणि लढायाकडे पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की, ही सुद्धा राजकीय भूप्रदेशीय आणि आर्थिक हिसंबंधासाठीच चालू आहेत.

ज्या दिशेने घटनांचा प्रवास चालू आहे ते पाहून मला भय वाटते की, जगातील देशांच्या राजकीय आणि आर्थिक हिसंबंधी शक्तींच्या प्रभावाने महायुद्धाकडे वाटचाल होत आहे, ज्यामुळे फक्त गरीब आणि अविकसित देशच नव्हे तर श्रीमंत आणि विकसित देश देखील प्रभावित होत आहेत. म्हणूनच महाशक्तींचे हे कर्तव्य ठरते की त्यांनी मानवतेला विनाशाच्या गर्तेपासून सुरक्षित ठेवण्यासाठी एकत्र बसून उपाय शोधावेत.

ब्रिटेन सुद्धा विकसित आणि विकसनशील देशांवर प्रभाव असलेल्या देशांपैकी एक देश आहे. तुम्ही इच्छिले तर, समता आणि न्यायाच्या परिपूर्तीच्या मार्गाने, जगाला मार्गदर्शन करु शकता. आपण जर जवळच्या भूतकाळात पाहिले तर अनेक देशांवर विशेषतः भारतीय उपखंडातील देशांवर ब्रिटीशांची सत्ता गाजवलेली आहे. आणि तेथे न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्याचे अत्योच्च मानदंड सोडले आहे. अहमदिया मुस्लिम जमाअत ने हे स्वतः अनुभवले आहे आणि अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक यांनी स्वतः ब्रिटीश राज्याचे न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या धोरणांची प्रशंसा केली आहे. अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक यांनी महारानी विक्टोरिया यांच्या हिरक महोत्सवाच्या शुभेच्छा देताना, त्यांना जो इस्लाम चा संदेश पाठवला, त्यात त्यांनी प्रामुख्याने प्रार्थना केली की, ज्या पद्धतीने ब्रिटीश सरकार सर्वांना समान न्याय देण्याच्या भूमिकेतून वागत आहे, सर्वशक्तिमान अल्लाह त्यांना त्याचा योग्य मोबदला देवो.

म्हणून आमचा इतिहास दर्शवतो की, आम्ही नेहमीच ब्रिटेन ने दर्शविलेल्या न्यायपूर्तीच्या धोरणाची दखल घेतली आहे. आणि आम्हाला आशा आहे की, भविष्यात सुद्धा न्याय हाच ब्रिटीश सरकारच्या धोरणांचा, फक्त धार्मिक बाबतीतच नव्हे तर सर्वच बाबतीत प्रमुख भाग असेल. कारण

तुम्ही तुमच्या भूतकाळातील सत्कृत्यांना कधीच विसरत नाहीत.

आज जगामध्ये अतिशय मोठया प्रमाणात अस्वस्थता आणि अशांतता पसरत आहे. आज आपण पाहत आहोत की, काहीं भागांमध्ये छोटी छोटी युद्धे सुरू झाली आहेत आणि काहीं अन्य भागांमध्ये काहीं महाशक्तीं शांतता प्रस्थापनेचा प्रयत्न करत असल्याचा दावा करत आहेत. जर का यामध्ये न्यायाची परिपूर्ती करण्याकडे दुर्लक्ष्य केले तर या ज्वाला, ज्या सध्या स्थानिक युद्धाच्या स्वरुपात दिसून येत आहे, त्या लवकरच संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतील. म्हणून माझी अतिशय नम्रतापूर्वक विनंती आहे की, तुम्ही जगाला विध्वंसापासून वाचवण्याचा प्रयत्न करावा.

आता मी थोडक्यात जगात शांतता प्रस्थापनेच्या दृष्टीने इस्लाम ने काय शिकवण दिली आहे किंवा इस्लामच्या शिकवणीच्या प्रकाशात जगात शांतता कशी निर्माण केली जाऊ शकते, त्याचा ऊहापोह करतो. माझी अशी प्रार्थना आहे की, ही शिकवण ज्यांना प्रथमतः अनुलक्षून देण्यात आली आहे अर्थात मुसलमान, यांनी त्यावर अमंलबजावणी करावी. परंतु आता हे सर्वच जगभरातील देशाचे कर्तव्य आहे, सर्व महाशक्ती आणि सर्व सरकारांनी या संबंधी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

आजच्या दिवशी आणि या युगात हे जग अक्षरशः एका वैश्विक खेडयात रूपांतरीत झाले आहे, ज्याची आपण पूर्वी कल्पना करु शकत नव्हतो. म्हणून आपण मनुष्य मात्र म्हणून आपली जबाबदारी समजून घेतली पाहिजे आणि मानवीय हक्कांचे सर्व समस्या सोडवण्याकडे लक्ष केंद्रीत करायला पाहिजे, जेणे करुन जगात शांतता प्रस्थापित होईल. हे सुस्पष्ट आहे की, असे सर्व प्रयत्न हे प्रामाणिपणा आणि न्यायपूर्तीच्या माध्यमातून व्हायाला पाहिजे.

आजच्या समस्यांमध्ये एक समस्या प्रत्यक्षपणे नसली तरी अप्रत्यक्षपणे का असे ना धर्मामुळे निर्माण झाली आहे. मुसलमानांतील काहीं गट अवैधपणे

आणि आत्मघातकी बॉम्ब बनून धर्माच्या नावाने बिगर मुस्लिमांना, मग ते सैनिक असोत किंवा सामान्य नागरिक, ठार मारण्याचा किंवा अपाय करण्याचा प्रयत्न करतात. त्याच वेळी, ते निरपराध मुसलमानांना आणि लहान बालकांना देखील ठार करतात. हे क्रूर कर्म इस्लामला अजिबात मान्य नाही.

काहीं मुसलमानांच्या विकृत वागणूकीमुळे, बिगर मुस्लिम देशांमध्ये इस्लामची अतिशय चूकीची प्रतिमा निर्माण झाली असून, समाजातील काहीं घटक उघडपणे इस्लाम विरूद्ध बोलतात, तसेच अन्य घटक उघडपणे जरी बोलत नसले तरी त्यांच्या मनामध्ये इस्लामबद्दल चांगले मत नाही. यामुळे पाश्चात्य आणि बिगर मुस्लिम देशांमध्ये मुसलमानांबद्दल अविश्वास निर्माण झाला आहे. आणि काहीं मुसलमानांच्या अशा गैर वर्तनामुळे परिस्थिती सुधारण्याऐवजी बिगर मुस्लिमांची प्रतिक्रिया दिवसेंदिवस वाईट होत आहे.

याचे एक प्रारंभिक उदाहरण म्हणजे पैगंबर (स.) यांच्या चरित्र्यावर आणि मुसलामानांचा पवित्र ग्रंथ पवित्र कुरआन विरूद्ध होणाऱ्या हल्ल्यांच्या स्वरुपात व्यक्त होणारी अतिशय चूकीची प्रतिक्रिया होय. याबाबतीत ब्रिटीश राज्यकारणी, मग ते कोणत्याही राजकीय पक्षाचे असो, आणि ब्रिटीश विचारवंतांचे वर्तन अन्य देशांतील राजकारण्यांच्या वर्तनापेक्षा क्वचित भिन्न आहे, आणि त्या बाबतीत मी आपला आभारी आहे. अशा पद्धतीने भावना दुखावून, घृणा आणि तिरस्कार वाढविण्याशिवाय काय साध्य होणार आहे? ही द्वेषभावना काहीं अतिरेकीवृत्तीच्या मुसलमांनांकडून इस्लाम विरोधी कृत्यांच्या रूपात व्यक्त होते, ज्यामुळे बिगर मुस्लिमांना त्यांचा इस्लाम विरोध व्यक्त करण्यास संधी मिळते.

जे अतिरेकी नाहीत आणि जे पवित्र पैगंबरावर (स.) अतिशय प्रेम करतात, ज्यात अहमदिया मुस्लिम जमाअत सर्वात पुढे आहे, त्यांना अशा स्वरूपाच्या हल्ल्यामुळे खूप वेदना होतात. आमचे सर्वात मोठे आणि एकमेव कार्य हेच आहे की, आम्ही हज़रत मुहम्मद पैगंबर(स.) यांचे शुद्ध

आणि परिपूर्ण चरित्र आणि इस्लामची सुंदर शिकवण जगापुढे मांडावी. आम्ही, जे सर्वच प्रेषितांचा (अल्लाहची सर्वांवर कृपा होवो) आदर करतो, त्यांच्यावर श्रद्धा ठेवतो, त्यांना अल्लाहचे संदेष्टे मानतो, त्यांचा अनादर होईल असा एकही शब्द त्यांच्या विरूद्ध बोलू शकत नाही; परंतु जेव्हा आमच्या प्रेषिता विरूद्ध (स.) बिनबुडाचे खोटे नाटे आरोप केले जातात तेव्हा आम्ही खूप दुखी होतो, आहत होतो.

आजच्या स्थितीमध्ये, जेव्हा जग वेगवेगळया गटांमध्ये विभागला जात आहे, अतिरेकवाद फोफावत आहे आणि आर्थिक आणि सांपत्तिक स्थिती ढासळत आहे, सर्व प्रकारचे वैर आणि द्वेष भावना संपवून स्थायी शांततेचा पाया रचन्याची तातडीची गरज निर्माण झाली आहे. हे एकमेकांच्या भावनांचा आदर करुन साध्य केले जाऊ शकते. जर का हे प्रामाणिकपणे आणि सद्भावनेने केले गेले नाही, तर परिस्थिती नियंत्रणाबाहेर जायला वेळ लागणार नाही. आर्थिक दृष्टया भक्कम स्थितीमध्ये असलेल्या पाश्चात्य देशांमध्ये, गरीब आणि अविकसित देशातील लोकांना, ज्यात मुसलमान देखील आहेत, स्थायिक होण्याची पनवानगी दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

खऱ्या अर्थाने न्यायपूर्ती करण्यासाठी लोकांच्या धार्मिक भावनांचा आणि परंपरांचा आदर करणे आवश्यक आहे. याच मार्गाने मानसिक स्वास्थ्य कायम ठेवणे शक्य आहे. आपणास ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, जर एका व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य बिगडले तर संपूर्ण समाजाच्या मानसिक स्वास्थ्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

जसे की, मी पूर्वीच म्हटले आहे की, मी ब्रिटीश विधीकर्त्यांचा आणि राजकारण्यांचा अत्यंत आभारी आहे कारण ते न्यायाची परिपूर्ती करण्यामध्ये आणि या मार्गात हस्तक्षेप न करण्याच्या धोरणांमुळे प्रशंसेस पात्र आहेत. खरे पाहिल्यास ही इस्लामची आणि पवित्र कुरआनाची शिकवण

आहे. पवित्र कुरआनात म्हटले आहे की,

**धर्माच्या बाबतीत कोणतीही बळजबरी नाही (२ः२५७)**

हा आदेश या आरोपाला की, इस्लाम तलवारीच्या जोरावर प्रसारित झाला आहे, अतिशय समर्पक प्रतिउत्तर आहे, तसेच तो मुस्लिमांसाठी एक सूचना आहे की, श्रद्धा धारण करणे हा मानव आणि ईश्वर यांच्यातील एक दुवा आहे त्यात तुम्ही कोणत्याही पद्धतीने हस्तक्षेप करु शकत नाही. प्रत्येकाला आपल्या मर्जीने श्रद्धा धारण करुन जगण्याचा आणि आपले धार्मिक कर्तव्ये पूर्ण करण्याचा अधिकार आहे; परंतु जर का एखाद्याच्या धर्म पालनामध्ये इतरांना त्रास होत असेल आणि ते जर त्या देशातील कायद्याच्याविरूद्ध असेल तर त्या देशातील कायद्याचे रक्षण करणाऱ्यांना हस्तक्षेप करणे अनिवार्य ठरते. कारण जर एखादी धार्मिक प्रथा क्रूर पद्धतीने अंमलात आणण्याची परंपरा असेल तर ती एखाद्या ईश्वरीय प्रेषिताची शिकवण असूच शकत नाही.

हेच स्थानिक पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता प्रस्थापनेसाठी मूलभूत तत्त्व आहे.

यापुढे जाऊन, आम्हाला इस्लाम अशी शिकवण देतो की, तुम्ही धर्मांतर केल्यामुळे जर एखादा समाज, एखादा गट किंवा एखादी सरकार तुमच्या धार्मिक कर्तव्य पूर्तीत अडथळा आणत असेल आणि जर पुढे जाऊन ही परिस्थिती तुमच्या बाजूने अनुकूल होत असेल तर हे कायमचे ध्यानात ठेवा की तुम्ही कुठल्याही बाबतीत मनामध्ये आकस किंवा दुष्ट भावना ठेवू नये. तुम्ही कधीही बदला घेण्याचा विचार सुद्धा करु नये. उलट तुम्ही न्याय आणि समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा. पवित्र कुरआनात म्हटले आहे,

**हे श्रद्धावंत लोकहो! तुम्ही न्यायपूर्वक साक्ष देत असताना, अल्लाहच्या कार्यात मन स्थिर करा, आणि लोकांचे वैमनस्य, न्यायपूर्वक असेल त्याव्यतिरिक्त अन्य कृत्य करण्यास तुम्हाला प्रवृत्त न करो, सदैव**

**न्यायपूर्ण व्यवहार करा, ती गोष्ट सदाचरणाच्या निकटतम आहे, आणि अल्लाहचे भय बाळगा, तुम्ही जे काही करता ते अल्लाह निश्चितच जाणतो. (५:९)**

ही समाजामध्ये शांती ठेवण्याची शिकवण आहे. कधीही न्यायापासून ढळू नका जरी तो तुमच्या शत्रूसाठी असेल. इस्लाम चा सुरुवातीचा इतिहास आम्हाला दर्शवतो की, या शिकवणूकीची काटेकोरपणे परिपूर्ती करण्यात आली होती आणि न्याय स्थापनेच्या सर्व गरजां पूर्ण केल्या गेल्या होत्या. मी याबाबतीत खूप उदाहरणे देऊ इच्छित नाही; परंतु इतिहास आम्हाला ग्वाही देतो की, मक्का विजयानंतर पवित्र पैगंबरांनी त्यांचा छळ करणाऱ्यांवर सूड उगवला नव्हता तर त्या सर्वांना क्षमा करुन त्यांना श्रद्धेनुसार वागण्याची परवानगी दिली होती. आजच्या संदर्भात बोलायचे तर शांतीची प्रस्थापना तेव्हाच होऊ शकते, जेव्हा शत्रूशी देखील न्यायपूर्ण व्यवहारच केला जाईल, फक्त धार्मिक अतिरेकींच्या विरुद्धच्या युद्धातच नव्हे तर सर्वच प्रकारच्या युद्धात आणि अशा प्रकारे स्थापित झालेली शांतीच चिरस्थायी असेल.

मागच्या शतकात दोन महायुद्धे लढली गेली. त्यांची काहीही कारणे सांगितली जात असोत, परंतु खोलात जाऊन पाहिल्यास एकच कारण स्पष्ट दिसते आणि ते म्हणजे अगदी आरंभीच संपूर्ण न्याय प्रस्थापित करण्यात झालेली गफलत हे होय. परिणामस्वरुप, जो अग्नि विझविण्यात आला होता तो हळूहळू धुसत राहणारा अर्धवट जळालेला कोळसा ठरला, जो अचानक भडकून मोठा आगडोंब झाला व त्याने संपूर्ण जगाला दुसऱ्यांदा वेढा घातला. आज अस्वस्थता वाढत आहे आणि युद्ध आणि शांती प्रस्थापनेच्या तसेच सद्यःस्थितीतील आर्थिक आणि सामाजिक समस्या ह्या परिस्थितीला चिघळविणाऱ्या ठरत आहेत.

पवित्र कुरआन ने वैश्विक शांतता प्रस्थापनेच्या दृष्टीने काहीं स्वर्णीम तत्त्वे विशद केली आहेत. हे एक प्रस्थापित तथ्य आहे, की लोभ हेच शत्रूत्व

निर्माण करण्याचे कारण ठरते. काही वेळा ही प्रादेशिक विस्तारवाद किंवा नैसर्गिक संसाधनावर कब्जा करणे किंवा एखाद्याने आपले वर्चस्व दुसऱ्यावर लादण्याच्या स्वरुपात प्रकट होते. ह्यातुन क्रौर्याकडे वाटचाल सुरू होते. मग ती कधी स्वतःच्या स्वार्थाहित संबंधासाठी जनतेच्या अधिकार हडप करुन स्वतःचे वर्चस्व स्थापन करणाऱ्या निर्दयी अत्याचारी शासनकर्त्याकडून, तर कधी अमुक तमुक शक्तींच्या हस्ते हे घडते. कधी अत्याचार पिडीत जनतेचा आक्रोशच बाह्य जगाला हस्तक्षेप करण्यास कारणीभूत ठरतो.

कारण काही असेना, पण आम्हाला पवित्र पैगंबरांनी हे स्वर्णीम तत्त्व शिकविले आहे की, अत्याचार पिडीत आणि अत्याचारी, दोघांना सहाय्य करा.

पैगंबरांच्या सहकाऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला की, अत्याचार पिडीताला सहाय्य करणे समजू शकतो, अत्याचारी व्यक्तीला ते कसे सहाय्य करु शकतात? पैगंबरानी (स.) उत्तर दिले की, 'त्याला अत्याचार करण्यापासून परावृत्त करुन. कारण त्याच्या निर्दयीपणात होत गेलेली वाढ, त्याला परमेश्वराच्या शिक्षेस पात्र ठरविते' म्हणून त्याच्यावर दया दाखवून तुम्ही त्याला या शिक्षेपासून वाचवू शकता. हेच तत्त्व छोटयातील छोटया समाज घटकांपासून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत वाढविले जाऊ शकते. या संदर्भात पवित्र कुरआन म्हणतोः

**आणि जर श्रद्धावंतांचे दोन गट आपसात लढू लागले, तर त्यांच्यामध्ये समझोता करा; मग त्यानंतर जर त्यांच्यापैकी एकाने दुसऱ्यावर आक्रमण केले तर त्या आक्रमक गटाविरूद्ध तो अल्लाहच्या आदेशाप्रत परत येईपर्यंत लढा. मग जर तो असा परत आला तर न्यायपूर्वक त्यांच्यामध्ये समझोता करा, आणि न्याय्यपणे कृती करा. अल्लाहला खरोखर न्यायी लोक आवडतात. (४९:१०)**

जरी ही शिकवण मुस्लिमांसाठी असली तरी या तत्त्वाला चिटकून राहिल्यास

जागतिक पातळीवर शांतता प्रस्थापनेचा पाया रचला जाऊ शकतो.

शांतता कायम राख्याण्यासाठी सुरूवातीलाच हे सुस्पष्ट करण्यात आले आहे की, न्यायाची परिपूर्ती करणे सर्वात महत्त्वाची आहे. आणि जर न्यायाच्या तत्त्वाला धरुन देखील शांती प्रस्थापनेचे प्रयत्न असफल होत असतील, तर सर्वांनी एकत्रीत येऊन आक्रमक पक्षाच्या विरोधात लढले पाहिजे, जोपर्यंत आक्रमक पक्ष माघार घेऊन शांतता स्थापनेस तयार होत नाही. एकदा का आक्रमक पक्ष शांती स्थापनेस तयार झाला तर न्याय प्रस्थापनेची गरज म्हणून त्याच्याशी बदल्याच्या भावनेने वागू नका आणि त्याच्यावर निर्बंध आणि व्यापारबंदीचे हुकूम लादू नका. सर्व मार्गांनी आक्रमक पक्षावर लक्ष देऊन रहा; परंतु त्याचवेळी त्याची परिस्थिती सुद्धा सुधारण्याचा प्रयत्न करत रहा.

आजच्या जगातील काहीं देशांतील असलेली अस्वस्थता संपवण्याच्या दृष्टीने आणि दुर्दैवाने त्यांच्यामध्ये मोठया प्रमाणात मुस्लिम देशच प्रमुख आहेत - त्याचे विश्लेषण विशेषतः ज्या देशांना नकराधिकार आहे, त्यांनी केले पाहिजे की खरोखरच न्याय खऱ्या अर्थाने स्थापला गेला आहे का? जेव्हा जेव्हा गरज पडेल शक्तीशाली देशांनी आपला हात पुढे करणे आवश्यक आहे.

मी यापूर्वीच म्हटले आहे की, हे सत्य नकारता येत नाही की ब्रिटीश सरकारने नेहमीच न्यायची बाजू उचलून धरली आहे. त्यामुळे मी आणखीन काहीं गोष्टी नमूद करण्यासाठी प्रोत्साहित झालो आहे.

दुसरे महत्त्वाचे तत्त्व जे आम्हाला शिकवले आहे की, शांती प्रस्थापनेसाठी इतरांच्या संपत्तीकडे लालसेने पाहू नका. पवित्र कुरआनात म्हटले आहेः

**आणि त्यांच्यापैकी काही लोकांना आम्ही ऐहिक जीवनाच्या ऐश्वर्याची जी काही साधने (क्षणिक उपभोगासाठी) बहाल केली आहेत त्याकडे तू आपले डोळे विस्फारून पाहू नकोस, कारण (ती आम्ही त्यांना अशासाठी बहाल**

**केली आहेत) की त्यांच्याद्वारे आम्हाला त्यांची कसोटी पाहता यावी.....(२०:१३२)**

लालसा आणि इतरांची संपत्ती बळकावण्याच्या वृत्तीमुळे जगात अस्वस्थता वाढत जात आहे. वयैक्तिक पातळीवर मी असे म्हणू शकतो की, सुप्रसिद्ध म्हण आहे की, अमर्याद लालसा ही सामाजिक शांतता भंग करण्यास कारणीभूत ठरते. राष्ट्रीय पातळीवर लालसेची स्पर्धा सुरू झाल्याने ती जागतिक शांततेस मारक ठरत आहे. हे अगदी ऐतिहासिक दृष्टयास सिद्ध झालेली गोष्ट आणि प्रत्येक व्यक्ति समजू शकते की, इतरांची संपत्ती बळकावण्याची इच्छा बाळगणे, शत्रुत्व आणि वाढत जाणाऱ्या लालसेस कारणीभूत ठरते. आणि ते अतिशय घातक आहे.

म्हणूनच सर्वशक्तिमान अल्लाहने म्हटले आहे की, प्रत्येकाने आपल्या उपलब्ध संसाधनावरच डोळा ठेवून त्याच्यातूनच शक्य तेवढे लाभ उचलण्यावर लक्ष केंद्रीत करावे. एखाद्या प्रदेशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा लाभ उठवण्यासाठी तो प्रदेश बळकावणे समर्थनीय नाही. राष्ट्रांचे गट बनवणे आणि शक्ती केंद्र स्थापन करणे, जेणे करुन काहीं देशांच्या नैसर्गिक संसाधण्याचा लाभ उठवता यावा सध्या चालू आहे. या संदर्भात अनेक लेखकांनी, ज्यांनी पूर्वी सरकारांचे सल्लागार म्हणून कार्य केले आहे, ग्रंथ लिहले आहेत, ज्यात त्यांनी विस्ताराने नमूद केले आहे, की काहीं देशांनी अन्य देशांच्या साधन-संपत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी काय काय क्लृप्त्या केल्या आहेत. हे लेखक किती सत्यवादी आहेत हे त्यांनाच किंवा परमेश्वरालाच माहित, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, अशा ग्रंथातील तपशील वाचल्यानंतर जे लोक आपल्या गरीब देशाशी एकनिष्ठ आहेत, त्यांच्या मनाला खूप यातना होतात. आणि दहशतवाद आणि बहुविनाशकारी शस्त्रास्त्र प्राप्त करण्याची स्पर्धा निर्माण होण्याचे हेच कारण आहे.

आजचे जग स्वतःला पूर्वीपेक्षा खूपच सभ्य, समंजस्य आणि शिक्षीत

समजते. अगदी गरीब देशांमध्ये सुद्धा काहीं बुद्धीमान लोक असे आहेत, ज्यांनी आपल्या क्षेत्रात खूप शैक्षणिक प्रगती केली आहे. अतितीव्र ईश्वरदत्त बुद्धीमत्ता असलेले लोक जगातील मोठमोठया संशोधन केंद्रामध्ये एकत्रितपणे काम करत आहेत. अशा परिस्थितीमध्ये आम्ही असा विचार करायला हवा की, लोकांनी एकत्रित यायला हवे आणि चूकीच्या विचारसरणीला आणि भूतकाळातील चुका, ज्यांच्यामुळे शत्रुत्व वाढले आणि त्यातून मोठी विनाशकारी युद्धे झाली, त्यांना संपविण्यासाठी संघटितपणे प्रयत्न करायला हवे. ईश्वरदत्त बुद्धीमत्ता आणि वैज्ञानिक प्रगतीचा उपयोग मानवतेच्या हितासाठी आणि एकमेकाच्या साधनांचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे सर्वसंमत मार्ग शोधण्यासाठी करायला हवा होता.

परमेश्वराने प्रत्येक देशाला भरभरून नैसर्गिक साधनसंपत्ती दिली आहे, ज्याचा पुरेपूर उपयोग करुन जगाला शांतीच्या स्वर्गात परिवर्तीत करता आले असते. परमेश्वराने अनेक देशांना वेगवेगळया पिकांच्या वाढीसाठी अतिशय उपयुक्त असे ऋतुमान आणि पर्यावरण बहाल केले आहे. जर का योग्य नियोजन करुन, आधुनिक तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रामध्ये योग्य वापर करण्यात आला असता, तर आर्थिक संपन्नता देखील प्राप्त करता आली असती आणि जगाच्या पाठीवरून भुकेचा नाश करता आला असता.

ज्या देशांना खनिज संपत्तीचे वरदान मिळालेले आहे त्यांना विकसित होण्याची, त्या खनिजांचा योग्य किंमतीत व्यापार करण्याची परवानगी द्यायला हवी. ज्यामुळे एका देशाच्या खनिज संपदेचा लाभ अन्य देशांना देखील मिळेल. आणि हाच मार्ग योग्य असेल, जो मार्ग परमशक्तिमान परमेश्वराच्याही पसंतीचा असेल.

सर्वशक्तिमान परमेश्वर आपले संदेष्टे, लोकांना परमेश्वराचे सानिध्य प्राप्त करण्याचे मार्गदर्शन करण्यासाठी पाठवत असतो. त्याचवेळी परमेश्वर हे देखील अधोरेखित करतो, की श्रद्धा गृहण करण्याच्या बाबतीत सर्वांना

संपूर्ण स्वातंत्र्य आहे. आमच्या श्रद्धे प्रमाणे मरणोपरांत पुण्यफळ आणि (पापांची) शिक्षा तर मिळेलच; परंतु परेमश्वराने जी व्यवस्था निर्माण केली आहे, त्यानुसार त्याची सृष्टी वा कार्याचा अवलंब केला गेला, न्याय आणि योग्य मार्गाकडे दुर्लक्ष करण्यात आले, तर मग निसर्ग नियमाप्रमाणे त्याचे दुष्परिणाम देखील इहलोकातच दिसून येतील. अशा प्रकारच्या अन्यायाविरूद्ध गंभीर प्रतिक्रिया उमटतील, मग त्या प्रतिक्रिया योग्य का अयोग्य असतील, याची हमी देता येणार नाही.

खऱ्या अर्थाने जग जिंकणे म्हणजे प्रत्येक मार्गाने प्रयत्न करुन गरीब देशांना त्यांचे योग्य स्थान देणे हेच आहे.

आजची दुसरी मोठी समस्या म्हणजे आर्थिक संकट ज्याला पतसंकट असे नाव देण्यात आले आहे, हे जरी विचित्र वाटत असले तरी एका वास्तवाकडे हे ध्यान आकर्षित करते. पवित्र कुरआन आम्हाला मार्गदर्शन करतो की, व्याज घेऊ नका कारण हे एक असे शाप आहे की जे कौटुंबिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय शांततेसाठी धोक्याया घंटा आहे. आम्हाला अशी चेतावणी देण्यात आली आहे की, जो व्याज स्वीकारतो तो एके दिवशी सैतानाच्या स्पर्शाने अविवेकी होतो. म्हणून आम्हां मुस्लिमानांना अशी चेतावणी देण्यात आली आहे की, अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी व्याजाचे व्यवहार बंद करा, कारण जे धन तुम्ही व्याजाच्या मार्गाने मिळवता ते तुमची संपत्ती वाढवत नाही, जरी तुम्हाला ते वाढत असलेली दिसून येत असेल. सरते शेवटी अशी एक वेळ येईल जेव्हा त्याचे दुष्परिणाम दिसून येतील. त्यापुढे जाऊन आम्हाला खबरदार करण्यात आले आहे की, आम्हाला व्याजावर आधारित व्यापारात उतरण्याची परवानगी नाही. आणि अशी चेतावणी देण्यात आली आहे की, जर तुम्ही असे केले तर ते ईश्वराविरूद्ध छेडलेले युद्ध असेल.

ही गोष्ट आजच्या पतसंकटाच्या बाबतीत अपरिहार्य दिसून येते.

सुरुवातीच्या काळात काहीं व्यक्तींनी कर्ज घेतले आणि मालमत्ता विकत घेतली; परंतु त्या संपत्तीची मालकी मिळविण्यापूर्वीच कर्जाच्या ओझ्याखाली ते दबून गेले परंतु आता सरकारच कर्जाच्या ओझ्याखाली आली आहे आणि अविवेकीपणे वागत आहे. मोठया कंपन्यांचे दिवाळे निघाले आहे, काहीं बँका आणि आर्थिक संस्था बंद करण्यात आले आहे; किंवा त्यांची जबाबदारी सरकारने घेतली आहे आणि ही परिस्थिती प्रत्येक देशात आहे, मग ते श्रीमंत देश असोत की गरीब. या संकटाबद्दल माझ्या पेक्षा तुम्ही अधिक जाणता. जमा कर्त्याच्या रकमा बुडायला आहे आता ही सरकारावर जबाबदारी आहे की, ते त्यांना कसे संरक्षण देते. परंतु काहीं काळासाठी का असेना कुटुंबाची, व्यापाऱ्यांची आणि सरकारच्या नेत्यांची मानसिक स्वस्थता बिगडली आहे आणि ही जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये घडले आहे.

ही परिस्थिती आम्हाला असा विचार करण्यास प्रवृत्त करत नाही का की, हे जग आता आपल्या तार्किक अंताकडे जात आहे, ज्याची आम्हाला पूर्वीच चेतावणी देण्यात आली होती? आता या परिस्थितीचे आणखीन काय दुष्परिणाम होणार हे ईश्वरच जाणतो.

सर्व शक्तिमान अल्लाह म्हणतो कीः शांतीकडे या ज्याची हमी फक्त तेव्हाच देता येईल जेव्हा शुद्ध आणि सचोटीने व्यापार केला जाईल आणि संसाधनांचा वापर योग्य आणि प्रामाणिक पद्धतीने केला जाईल.

आता शेवटी मी माझ्या मुद्दांची, जी शिकवण आम्हाला देण्यात आली आहे, थोडक्यात आठवण करुन देऊ इच्छितो की खऱ्या अर्थाने जागतिक शांती तेव्हाच प्रस्थापित होऊ शकते. जेव्हा आम्ही ईश्वरापुढे नतमस्तक होतो. अल्लाह ही गोष्ट जगाला समजून घेण्याची शक्ती देवो, तेव्हाच ते त्यांच्या इतरांप्रती असलेल्या कर्तव्यांचे पालन करण्यास समर्थ होतील.

शेवटी परत एकदा मी आपण येथे आलात आणि मला ऐकून घेतले याबद्दल मी आभार मानतो. **धन्यवाद.**





# स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम आणि निष्ठेबाबत इस्लामची शिकवण

सैन्य मुख्यालय,
कोबलेंझ, जर्मनी,२०१२





Brigadier General Alois Bach of
the German Federal Army
with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]




Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] addressing
the German Federal Army





1.



2.



3.



4.

1. Colonel Ulrich, 2. Brigadier General Bach, 3. Colonel Trautvetter, and 4. Colonel I.G. Janke, meeting Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba]



## प्रस्तावना

"Zentrum Innere Fuhrung" जेन्ट्रम इन्नेरे फयूहरंग, हा जर्मनी सैनिकदलामधील एक अंतर्गत नेतृत्व केंद्र आहे जो की जर्मन सैनिकदलाला विशेष करुन उच्च पदावर नियुक्त अधिकारीयांना, ज्ञान चे विविध क्षेत्र व जीवनातील वेगवेगळया पैलू च्या संदर्भात त्यांना सुशिक्षित करण्यासाठी आणि अंतर्गत संघटना आणि सुरक्षेच्या दृष्टीकोनातून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी उभारला गेला आहे. या प्रतिष्ठानाचे प्रमुख उद्देश असे आहेतः

- जर्मन सशस्त्र दलांना नैतिक, राजनीतिक आणि न्यायायाविषयी शिक्षा आणि प्रशिक्षण प्रदान करणे.
- जर्मन सशस्त्र दलांचा राज्य व समाजामध्ये एकीकरण करणे.
- जर्मन संविधानासोबत जर्मन सशस्त्र दलांना आंतरिक संरचना आणि संघटनांना संरेखित करणे.
- जसे की हे जर्मन सशस्त्र दल आंतरराष्ट्रीय मिशन मध्ये सुद्धा सामील होतात म्हणून त्यांना वेगवेगळया संस्कृती, विविध राष्ट्रे आणि विभिन्न धर्मांचा परिचय प्रदान करणे आणि त्याविषयी शिक्षित करणे.
- जर्मन सशस्त्र दलांना वेगवेगळया व विभिन्न विभागांविषयी सुशिक्षित करणे.

या उद्देशाला अनुसरुन विशिष्ट विभागातील प्रमुखांना भाषण देण्यासाठी येथे आमंत्रित केले जाते. उदाहरणार्थ जर्मनीचे राष्ट्रीय अटॉर्नी जनरल, जर्मनीमधील यहूदी संघटनाचे प्रमुख मा. नोबलोच, जर्मनीतील मुस्लिम समाजाचे प्रमुख मा. ऐमान माजिक इत्यादि, यांना या मुख्यालयामध्ये आमंत्रित केले गेले आहे. ३० मे २०१२ रोजी अहमदिया मुस्लिम जमाअत

चे जागतिक प्रमुख, हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा, (अल्लाह त्यांचा सदैव सहाय्यक असो) यांना देखील इस्लाम या शिर्षकावर भाषण देण्यासाठी आमंत्रित केले गेले होते. यावेळी उपस्थित प्रमुख लोकांमध्ये जर्मनी केंद्र शासनाचे मुख्य कमांडर ब्रिगेडियर जनरल बैच, करनल आई. जी. जानके, नौदल कमांडर मा. लीईडके, वायुसेना कमांडर टाऊवेटर, जर्मन सशस्त्र दलाचे एक पादरी आणि कोबलेज़ चे महापौर प्रो. डॉ. हॉफमेन गोंटिंग उपस्थित होते.

# स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम आणि निष्ठेबाबत
# इस्लामची शिकवण

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम - अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू व असीम कृपाळू आहे.
अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहु - अल्लाहची कृपा व आशीर्वाद आपणा सर्वांवर होवो.

सर्वप्रथम मी आपणा सर्वांचा, मला येथे तुमच्या मुख्यालयात निमंत्रित करुन आणि मला आपणाशी संवाद साधण्याची संधी दिल्याबद्दल, आभार व्यक्त करतो. अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख या नात्याने मी आपणासमोर इस्लामच्या शिकवणीबद्दल बोलणार आहे. तसे पाहता हा फारच विस्तृत विषय असून एकच कार्यक्रमात किंवा थोडया वेळात संपूर्ण विषयाची मांडणी करणे अशक्य आहे. त्यामुळे मी इस्लामच्या एकाच मुद्यावर लक्षकेंद्रीत करुन त्याबद्दल बोलणे माझ्यासाठी संयुक्तीक ठरेल.

जेव्हा मी, इस्लामच्या कोणत्या स्वरूपाबद्दल संबोधन करावे असा विचार करत होतो, तेव्हा मला आमच्या जर्मन जमाअतचे राष्ट्रीय अध्यक्ष अब्दुल्लाह वॅगिश्हॉज़र यांनी विनंती केली की, मी या ठिकाणी स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम आणि निष्ठा या विषयी इस्लाम ची शिकवण काय आहे, याबद्दल बोलावे. त्यामुळे मला निर्णय घेणे सोपे झाले. म्हणून आता मी तुमच्या समोर या संदर्भात इस्लामची शिकवण काय आहे, हे थोडक्यात नमूद करेन.

तसे पाहता स्वतःच्या राष्ट्राबद्दल निष्ठा आणि प्रेम असे बोलणे आणि ऐकणे खूपच सोपे आहे. परंतु वास्तवात हे काही शब्द अतिशय व्यापक, सुंदर आणि अतिशय सखोल अशा अर्थाने व्यापून आहेत. खरे पाहता या शब्दांचा खरा अर्थ काय आहे आणि त्यातून काय अभिप्रेत आहे हे संक्षेपात मांडणे खूपच कठीण आहे. तरीपण मला उपलब्ध असलेल्या अल्पशा वेळात मी स्वतःच्या राष्ट्राबद्दल प्रेम आणि निष्ठा याबाबतीत इस्लामची संकल्पना काय आहे हे मांडण्याचा प्रयत्न करेन.

सर्वप्रथम आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे इस्लामच्या मूलभूत सिद्धांतानुसार मनुष्याच्या कथनी आणि करणीमध्ये कोणत्याही प्रकारचा विरोधाभास आणि दांभिकता नसावी. खरी निष्ठा असण्यासाठी प्रामाणिक आणि सचोटीपूर्ण संबंध निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी एक मनुष्य जे प्रदर्शित करतो तेच त्याच्या अंतरंगात असणे आवश्यक आहे. राष्ट्रीयत्वाच्या बाबतीत हे सिद्धांत खूप महत्त्वाचे आहे. म्हणून कोणत्याही देशाच्या नागरिकासाठी अतिशय प्रामाणिक आणि विश्वासपूर्ण संबंध आपल्या राष्ट्राशी स्थापित करणे अत्यावश्यक आहे. हे महत्त्वाचे नाही की, तो त्या देशात जन्मल्यामुळे तिथला नागरिक आहे की नंतर त्याला त्या देशाचे नागरिकत्व मिळाले आहे. मग ते स्थलांतरामुळे मिळाले असो किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे.

निष्ठा हा एक मोठा सद्गुण आहे आणि ज्या लोकांनी या सद्गुणांचे अतिशय उच्च पातळीवर आणि अत्योच्च स्तरापर्यंत प्रदर्शन केले ते लोक परमेश्वराचे प्रेषीत होते. त्यांचे परमेश्वराप्रती प्रेम आणि अनुबंध इतके दृढ होते की, त्यांनी प्रत्येक बाबतीत ईश्वराचा काय आदेश आहे यावर लक्ष केंद्रित करुन त्या आदेशाचे परिपूर्ण पालन करण्याचा प्रयत्न केला, मग ते कोणतेही आदेश असोत. ही त्यांची त्यांच्याप्रती असलेली बांधिलकी आणि त्यांची आदर्श एकनिष्ठा प्रदर्शित करते. म्हणून त्यांची ही उच्च दर्जाची एकनिष्ठा हेच

आपल्यासाठी आदर्श नमूना म्हणून आपण आचरणात आणली पाहिजे. तथापि पुढे जाण्यापूर्वी एकनिष्ठा म्हणजे खऱ्या अर्थाने काय अभिप्रेत आहे हे समजून घेणे अत्यावश्यक आहे.

इस्लामच्या शिकवणीनुसार एकनिष्ठेची जी व्याख्या आणि खरा अर्थ हा आहे की, स्वतःच्या वचनांची आणि करारांची प्रत्येक पातळीवर आणि सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये, मग ती कितीही कठीण असो, असंदिग्ध परिपूर्ती करणे हे आहे. इस्लामला अभिप्रेत असलेल्या विश्वास पात्रतेचा हा खरा आदर्श आहे. पवित्र कुरआनामध्ये अनेक ठिकाणी अल्लाहने मुसलमानांना निर्देश दिले आहे की, त्यांनी आपल्या प्रतिज्ञांच्या आणि करारांचे पालन केलेच पाहिजे, कारण अल्लाह त्यांना त्यांनी घेतलेल्या जबाबदाऱ्यांबद्दल जाब विचारणार आहे. मुसलमानांना निर्देशित करण्यात आले आहे की, त्यांनी सर्व करारांचे पालन करावे, त्यात सर्वशक्तिमान अल्लाहबरोबर केलेले करार तसेच त्यांच्या अन्य प्रतिज्ञा, ज्या त्यांनी इतरांशी केलेले असो त्यांच्या महत्त्वानुक्रमानुसार.

या संदर्भात लोकांच्या मनामध्ये एक प्रश्न निर्माण होऊ शकतो की, मुसलमान असा दावा करतात की, अल्लाह आणि त्याचा धर्म हेच त्यांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाचे आहेत. म्हणून त्यांनी अल्लाहशी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा पूर्ण करणे हेच त्यांच्यासाठी प्राधान्याचे आहे आणि त्यांचे अल्लाहशी केलेले करार इतर अन्य गोष्टींपेक्षा जास्त मौल्यवान आहेत. म्हणून त्यांची पूर्ततः करणे त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यामुळे असा समज निर्माण होऊ शकतो की, मुसलमानांसाठी त्याच्या राष्ट्राप्रती असलेली निष्ठा आणि त्यांनी देशाच्या कायद्यांचे पालन करण्याची केलेली प्रतिज्ञा या दुय्यम महत्त्वाच्या ठरतात. म्हणून तो काहीं प्रसंगी त्यांनी केलेली प्रतिज्ञा मोडण्यास तयार होऊ शकतो.

या प्रश्नाचे उत्तर देताना मी सर्वप्रथम आपल्या निर्दशनास आणू

इच्छितो की, पवित्र पैगंबर (स.) यांनी स्वतः अशी शिकवण दिली आहे की, आपल्या देशाप्रती प्रेम बाळगणे हा श्रद्धेचाच भाग आहे. म्हणून खरेखुरे देशप्रेम हे इस्लाम साठी आवश्यक आहे. अल्लाह प्रती आणि इस्लाम प्रती खरेखुरे प्रेम असण्यासाठी आपल्या देशावर प्रेम असणे आवश्यक आहे. म्हणून हे अतिशय स्पष्ट आहे की, एखाद्या व्यक्तीसाठी अल्लाहशी प्रेम आणि देशावर प्रेम यात कुठलाही लक्ष्य संघर्ष असू शकत नाही. ज्या अर्थी एखाद्या व्यक्तीचे त्याच्या देशा प्रती प्रेम असणे हा इस्लामचाच भाग आहे, त्या अर्थी हे स्पष्टच आहे की, मुसलमानांसाठी त्यांनी निवडलेल्या देशाशी अत्योच्च प्रतीची निष्ठा बाळगणे अनिवार्य आहे, कारण त्याच मार्गाने तो अल्लाह पर्यंत पोहचू शकतो आणि त्याचे सन्निध्य प्राप्त करु शकतो. म्हणून खरा मुसलमान अल्लाह प्रती जे प्रेम बाळगतो, ते त्याला त्याच्या देशाप्रती खरेखुरे प्रेम आणि एकनिष्ठा व्यक्त करण्याच्या मार्गात अडसर करणे अशक्य आहे. दुर्दैवाने आपण पाहतो की, काहीं देशामध्ये धार्मिक अधिकारांचा संकोप केला जातो किंवा काहीं वेळा ते पूर्णपणे नकारले जातात, त्यामुळे दुसरा असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की, असे लोक ज्यांचा त्यांच्या सरकाराद्वारे छळ केला जातो, त्यांनी सुद्धा आपल्या देशा आणि राष्ट्राप्रती प्रेम आणि निष्ठा बाळगावी का? मी अतिशय खेदाने नमूद करु इच्छितो की, अशी परिस्थिती पाकिस्तान मध्ये अस्तित्वात आहे. तेथे तिथल्या सरकार ने आमच्या समुदाया विरूद्ध असा कायदाच केला आहे आणि हे अहमदिया विरोधी कायदे प्रत्यक्षात अमंलात आणले जातात; अशाप्रकारे पाकिस्तान मध्ये सर्व अहमदी मुसलमानांना अधिकृतपणे बिगर मुस्लिम जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे ते स्वतःला मुस्लिम घोषीत करण्यापासून रोखले गेले आहेत. पाकिस्तानातील अहमदींना मुस्लिमांप्रमाणे उपासना करण्यासाठी देखील तसेच प्रचलित इस्लामी पद्धतीने आचरण करण्यास मनाई करण्यात आली आहे. अशाप्रकारे पाकिस्तान सरकारनेच आमच्या समुदायाला त्यांच्या

उपासना करण्याच्या मौलिक मानवी अधिकारांपासून देखील वंचित केले आहे.

ही परिस्थिती लक्षात घेता स्वाभाविकपणेच आश्चर्य वाटू शकते की, अशा परिस्थितीत अहमदी मुस्लिम आपल्या देशाच्या कायद्यांचे पालन करु शकतात का? ते आपल्या राष्ट्राप्रती निष्ठा कशी व्यक्त करु शकतात? येथे मी स्पष्ट करु इच्छितो की, ज्या ठिकाणी अशी टोकाची स्थिती अस्तित्वात आहे, तेथे कायदा आणि देशाप्रती निष्ठा या दोन वेगवेगळया बाबी ठरतात. आम्ही अहमदी मुस्लिम असे मानतो की, प्रत्येक व्यक्तिसाठी त्याचा धर्म, त्याची व्यक्तीगतपणे ठरवण्याची बाब असल्यामुळे, श्रद्धेच्या बाबतीत कोणाची बळजबरी असता कामा नये. अशाप्रकारे जेव्हा कायदा त्याच्या अधिकारात हस्तक्षेप करतो, तेव्हा निःसंदिग्धपणे ती कृती अतिशय क्रूर आणि अत्याचारी ठरते. वास्तविक पाहता सरकार मान्य अत्याचार, ज्या ज्या वेळी अस्तित्वात असते त्या त्या वेळी बहुसंख्य लोक त्याचा धिक्कारच करत आले आहेत.

जर आपण युरोपच्या इतिहासाकडे पाहिलात तर आपणास दिसेल की, या खंडातील लोक देखील धार्मिक अत्याचाराचे बळी ठरलेले आहेत आणि परिणामस्वरुप हज्जारो लोकांना एका देशातून दुसऱ्या देशाला स्थलांतरित व्हावे लागले आहे. सर्व न्याय प्रीय इतिहासतज्ञ, सर्व शासक आणि जनसामन्यांनी या छळ आणि कमालीचे क्रौर्य मानले आहे. अशा परिस्थितीमध्ये इस्लाम असा सल्ला देतो की, जेथे छळवणूक सर्व मर्यादांचे उल्लंघण करते आणि असहाय्य होते, तेव्हा लोकांनी त्या शहराचा किंवा देशाचा त्याग करावा आणि अशा ठिकाणी स्थलांतरित व्हावे जेथे त्यांना शांतीपूर्ण पद्धतीने धर्माचरण करण्याचे स्वातंत्र्य आहे. अशा मार्गदर्शनाबरोबरच इस्लाम अशी शिकवण देतो की, कुठल्याही परिस्थितीत कोणत्याही व्यक्तीने कायदा आपल्या हातात घेऊ नये आणि अशा कुठल्याही देशविघातक षंडयंत्रात किंवा योजनेत सहभागी होऊ नये. अशी सुस्पष्ट आणि निःसंदिग्ध आदेश

इस्लामने दिलेला आहे.

अतिशय कमालीचा छळ सहन करताना देखील लक्षावधी अहमदी पाकिस्तानमध्ये राहत आहेत. अशाप्रकारे जीवनाच्या सर्वक्षेत्रामध्ये कमालीचा पक्षपात आणि निर्दयता सहन करत असताना देखील त्यांनी आपल्या देशाप्रती संपूर्ण निष्ठापूर्ण संबंध आणि खरी एकनिष्ठा कायम ठेवली आहे. कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असो किंवा कोठेही ते राहत असोत. ते कायमपणे आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी आणि यशासाठी प्रयत्नशील आहेत. अनेक दशकांपासून अहमदिया जमाअतचे विरोधक अहमदी देशाशी एकनिष्ठ नाहीत असा आरोप करत आलेले आहेत; परंतु ते आजपर्यंत हे सिद्ध करु शकले नाहीत किंवा त्यांच्या आरोपाच्या समर्थनात एकसुद्धा पुरावा देऊ शकले नाहीत. त्या उलट सत्य परिस्थिती अशी आहे की, जेव्हा जेव्हा पाकिस्तानासाठी बलीदान करण्यासाठी गरज पडली, आपल्या देशासाठी नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले आणि नेहमीच आपल्या देशासाठी सर्व प्रकारचे बलीदान करण्यासाठी तत्पर राहिले आहेत.

जरी अहमदी मुस्लिम कायद्याचे बळी आणि लक्ष्य असताना देखील, तेच इतरांपेक्षा देशाच्या कायद्यांचे काटेकोरपणे पालन करतात. कारण ते खरे मुस्लिम आहेत जे खऱ्या इस्लामचे अनुसरण करतात. पवित्र कुरआनाद्वारे दिलेली दुसरी शिकवण जी एकनिष्ठे संबंधी आहे ती अशी की, जनतेने सर्व प्रकारच्या अवांच्छणीय, अप्रीय अशा कृत्यांपासून, की ज्याद्वारे बंडाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, अलिप्त रहावे. इस्लामचे अतिशय सुंदर आणि सुप्रसिद्ध वैशिष्ट्य आहे की, तो फक्त आमचे लक्ष्य अशा चरम बिंदुकडे वळवतो, ज्या भविष्यात उद्भवणाऱ्या गंभीर घटणांच्या सोपांशीला ठरु शकतात. अशा प्रकारे जर इस्लामच्या मार्गदर्शन योग्य प्रकारे अवलंब केल्यास कोणतीही समस्या हाता बाहेर जाण्यापूर्वीच सोडवली जाऊ शकते.

उदाहरणार्थ एखाद्या व्यक्ती विशेषाची आर्थिक हाव देखील त्या

देशासाठी हानीकारक ठरु शकते. अनेक वेळा लोक आपल्या भौतिक आकांक्षांच्या मायाजाळामध्ये अशा पद्धतीने अडकतात की, त्यांच्या या आकांक्षाच त्या लोकांना अप्रामाणिकपणांची कृत्ये करण्यास प्रवृत्त करतात. त्यामुळे अशा गोष्टी सरतेशेवटी स्वतःच्या देशाविरूद्ध विश्वासघात ठरु शकतात. मी आणखीन थोडे स्पष्ट करुन सांगतो, अरबी भाषे मध्ये त्या लोकांबद्दल किंवा त्या लोकांच्या अशा कृत्याबद्दल जे ज्यांच्या देशासाठी हानीकारक ठरु शकते, 'बगा' असा शब्द वापरला जातो. हा शब्द त्यांच्या संदर्भात वापरला जातो, जे अनिष्ठ आचरण करतात किंवा जे इतरांना हानी पोहोचवतात त्याच्या अंतर्गत अशा लोक सुद्धा येतात जे भ्रष्टाचार करुन बेकायदेशीर आणि अयोग्य मार्गाने आपले इप्सित साध्य करु इच्छितात. हा शब्द अशा लोकांच्या संदर्भात देखील वापरला जातो जे सर्व मर्यादाचे उल्लंघन करतात आणि त्यामुळे हानी आणि नुकसान पोहोचवतात. इस्लाम अशी शिकवण देतो की, अशा पद्धतींचा अवलंब करणाऱ्या लोकांकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा करता येत नाही, कारण प्रामाणिकपणा हा अत्योच्च कोटीच्या नैतिक मूल्यांशी प्रतिबद्ध आहे. उच्च नैतिक मूल्यांशिवाय प्रामाणिकपणाची कल्पनाच केली जाऊ शकत नाही आणि प्रामाणिकपणाशिवाय उच्च नैतिक मूल्यांबद्दल वेगवेगळया दृष्टीकोन असू शकतो तरी इस्लाम धर्माने या बाबतीत अल्लाहची मर्जी संपादन करणे या भवतीच आपला दृष्टीकोन ठेवला म्हणून मुसलमानांना असा आदेश केले आहे की, त्यांनी नेहमीच त्याची मर्जी संपादन करण्यासाठीच कार्यरत असाव्यात. थोडक्यात, इस्लामी शिकवणूकीनुसार सर्वशक्तिमान अल्लाहने दगलबाजी किंवा बंडखोरीच्या सर्व प्रकारांना निषिध ठरविले आहे. मग ते स्वतःच्या देशाविरूद्ध असो किंवा स्वतःच्या प्रशासकाविरूद्ध असो. हे अशा साठी आहे, कारण बंडखोरी किंवा आपल्या राज्याविरूद्ध कुठलीही कृत्य करणे हे राष्ट्राच्या शांतते आणि सुरक्षिततेसाठी दुःखदायक आहे. वास्तविक पाहता जेथे अंतर्गत बंडाळी किंवा विद्रोह निर्माण होतो,

तेव्हा ते बाहेरील विरोधाची आग भडकवण्याचे काम करते आणि बाह्य शक्तींना अंतर्गत अव्यवस्थेचा गैरफायदा घेण्यास प्रवृत्त करते. म्हणून तुमच्या देशाशी एकनिष्ठ नसण्याचे दुष्परिणाम अतिशय गंभीर आणि दूरगामी ठरु शकतात. अशा प्रकारे कुठलीही गोष्ट, जी राष्ट्रासाठी हानीकारक ठरु शकते ती मी स्पष्ट केल्याप्रमाणे 'बगा' या संज्ञे अंतर्गत येते. हे सर्व ध्यानात ठेवल्यानंतर स्वतःच्या राष्ट्राशी एकनिष्ठ राहण्यासाठी कोणत्याही व्यक्तीने संयम बाळगणे, नैतिक मूल्यांचे पालन करणे आणि देशांच्या कायद्यांचा आदर राखणे आवश्यक आहे.

सामान्यतः आधुनिक काळामध्ये बहुतेक देशांचा राज्यकारभार लोकशाही पद्धतीने चालवला जात आहे, म्हणून जर एखादी व्यक्ती किंवा एखादा गट, राज्यशासन बदलू इच्छित असेल तर त्यानी ते योग्य त्या लोकशाही पद्धतीचा अवलंब करुनच बदलावे. त्यांनी स्वतःचे म्हणने मत पेटीद्वारे व्यक्त होईल, अशा पद्धतीने कार्यकरावे. मतदान करताना वयैक्तिक पसंती किंवा वयैक्तिक स्वार्थासाठी मतदान करु नये, तर वास्तविक पाहता इस्लाम अशी शिकवण देतो की, प्रत्येक व्यक्तीने त्याच्या देशाप्रती असलेल्या निष्ठा आणि प्रेमाच्या भावनेनेच मतदान करावे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या राष्ट्राचे हित लक्षात ठेऊनच मतदान करावे. म्हणून स्वतःच्या अग्रक्रमांकडे न पाहता आणि कोणता उम्मेदवार किंवा पक्ष त्याला वैयक्तिक फायदा पोहोचू शकतो हे देखील न पाहता, प्रत्येक व्यक्तीने त्याचा निर्णय अतिशय संतुलित पद्धतीने, कोणता उम्मेदवार किंवा कोणता पक्ष संपूर्ण राष्ट्राच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरेल, अशा पद्धतीने मूल्यमापन करावे. शासन व्यवस्था ही एक महान विश्वस्त व्यवस्था आहे आणि त्या करिताही व्यवस्था अशाच पक्षाकडे सुपूर्द करावे, ज्याबद्दल मतदाराचा विश्वास आहे की, तोच पक्ष सर्वात योग्य आणि सर्वाधिक पात्र आहे, हाच खरा इस्लाम आहे आणि हीच खरी निष्ठा आहे.

निश्चितच अल्लाहने पवित्र कुरआनाच्या चौथ्या अध्यायातील ५९ आयतीत आदेश दिला आहे की, प्रत्येक व्यक्तीने यथा योग्य व्यक्तीस विश्वस्त संस्था हस्तांतरीत कराव्यात आणि अशा लोकांचे मूल्यमापन करताना, त्यांनी न्याय आणि प्रामाणिकपणे निर्णय घ्यावे. म्हणून स्वतःच्या राष्ट्राशी निष्ठा असण्यासाठी राज्य व्यवस्थेची धुरा अशाच लोकांच्याकडे सोपवावी की, जे त्यासाठी खरोखर लायक आहेत, जेणे करुन राष्ट्राचा विकास होईल आणि तो जगातील अन्य राष्ट्रांच्या पुढे जाईल.

जगाच्या अनेक भागामध्ये आपण पाहतो की, जनता शासनाच्या धोरणाविरूद्ध निषेध व्यक्त करण्यासाठी संप आणि निदर्शनामध्ये भाग घेतात. यापुढे जाऊन काही तिसऱ्या जगातील देशांमध्ये निदर्शक विध्वंस देखील करतात किंवा सरकारी आणि खाजगी मालमत्तेचा नाश देखील करतात. जरी ते असा दावा करत असेल की, ते अशी कृत्ये देशाप्रेमापोटी करत आहेत, वस्तुतः अशा कृत्यांचा राष्ट्राप्रती प्रेम किंवा एकनिष्ठेशी काहीही संबंध नसतो. हे सुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की, जे संप आणि निदर्शने, कुठल्याही गुन्हेगारी, विध्वंसक किंवा हिंसक मार्गाने न करता शांततापूर्ण निदर्शनात देखील राष्ट्राचे कोटयावधीचे आर्थिक नुकसान होत असते. कुठल्याही परिस्थितीत असल्या वर्तनाला राष्ट्रापती निष्ठेचे प्रतीक मानले जाऊ नये. अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक यांनी एक स्वर्णीम सिद्धांत शिकविला आहे की, सर्व परिस्थितीमध्ये आम्ही अल्लाहच्या प्रेषितांचे आणि राष्ट्राच्या शासकांचे आज्ञाकारी असायला हवे, ही तीच शिकवण आहे जी पवित्र कुरआनात दिली आहे. म्हणून ज्या देशांमध्ये संप आणि निदर्शन करण्याची परवानगी देण्यात आली आहे तेथे देखील देशाला किंवा अर्थ व्यवस्थेला कुठलीही हानी होणार नाही या मर्यादे पर्यंतच निदर्शने केली पाहिजेत.

आणखीन एक प्रश्न उपस्थित केला जातो की, मुसलमान, पाश्चात्य देशांच्या सैन्दलांमध्ये, जर त्यांना भर्ती होण्याची परवानगी मिळल्यास, भर्ती

व्हावे का? आणि मुस्लिम देशांच्या विरोधात सैनकीय आक्रमणात भाग घ्यावा का? इस्लामचा एक अतिशय महत्त्वाचा सिद्धांत आहे की, कोणत्याही व्यक्तीने कुठल्याही क्रूर कृतीला सहाय्य करु नये. हा मूळभूत आदेश मुसलमांनांच्या मनात नेहमीच अग्रस्थानी असायला हवा. ज्यावेळी एखाद्या मुस्लिम देशावर हल्ला केला जातो, कारण त्या देशाने स्वतःच क्रूर आणि अन्यायपूर्वक कृती करुन आक्रमाणाला सुरुवात केली असेल, तर अशा परिस्थितीमध्ये पवित्र कुरआनाने अन्य मुस्लिम देशांना निर्देश दिला आहे की, त्यांनी अत्याचार करणाऱ्याचा हात धरला पाहिजे. याचा अर्थ असा होतो की, त्यांनी क्रौर्याला प्रतीबंध करुन शांतता स्थापन करण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. त्यामुळे अशा परिस्थिती मध्ये क्रूर कृत्यांना प्रतिबंधित करण्यासाठी अशा कार्यामध्ये भाग घेण्याची परवानगी दिली आहे. तथापि ज्या वेळेस आक्रमक राष्ट्र परावृत्त होतो आणि शांतीकर्म करतो, तेव्हा त्या देश आणि त्या देशातील जनतेविरूद्ध कुठल्याही खोटया सबबी आणि कारणे सांगून परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्याला परास्त करण्याचा प्रयत्न केला जाऊ नये. त्या ऐवजी त्यांना पूर्णतः सामान्यस्थितीमध्ये येण्याची आणि संपूर्ण स्वातंत्र्य बहाल करण्याची पुन्हा संधी देण्यात यावी. म्हणून कुठल्याही सैनकीय कृतीमध्ये स्वार्थी हेतू साध्य करण्याऐवजी शांतता प्रस्थापित करणे हाच हेतू सर्वांसमोर असायला हवा.

याच पद्धतीने इस्लाम, मुस्लिम किंवा बिगर मुस्लिम, सर्व देशांना क्रूर कृत्ये आणि दडपशाही थांबवण्याचा अधिकार देतो. म्हणून गरज पडल्यास बिगर मुस्लिम देश देखील या यथार्थ उद्देशाच्या पूर्तीसाठी मुस्लिम देशांवर हल्ला करु शकतात, त्या बिगर मुस्लिम देशातील मुसलमानांना देखील त्या बिगर मुस्लिम देशाच्या सैन्य दलात भर्ती होण्याची परवानगी देण्यात येते. आणि दुसऱ्या देशाच्या क्रूर कृत्यांना प्रतिबंध करता येते. ज्या ठिकाणी अशी परिस्थिती खरोखरच अस्तित्वात असेल, तर मुस्लिम सैनिकांनी, मग ते

कुठल्याही पाश्चात्य सैन्याचा भाग असोत, शांतता प्रस्थापित करिता आपल्या अधिकाऱ्यांच्या आज्ञांचे पालन करत युद्धामध्ये भाग घेणे आवश्यक आहे. परंतु जर का एखादे सैन्य अन्य राष्ट्रावर अन्यायपूर्वक हल्ला करण्याचा निर्णय घेत असेल आणि स्वतः दडपशाही करत असेल तर मुस्लिम सैनिकाला ते सैन्यदल त्याग करण्याचा पर्याय उपलब्ध आहे, कारण तसे न केल्यास तो क्रूर कृत्यांना सहाय्यभूत ठरेल. असा निर्णय घेण्याचा अर्थ असा होत नाही की, तो आपल्या देशाप्रती निष्ठावान नाही. खरे पाहिल्यास अशा परिस्थितीमध्ये त्याची त्याच्या देशाप्रती असलेली निष्ठा त्याच्याकडून अशी अपेक्षा करते की, त्याने अशी पाऊले उचलावी आणि आपल्या शासन व्यवस्थेला मार्गदर्शन करावे की त्यांनी स्वतःच अशा गर्तेत पडू नये, जसे अन्य शासनकृत्ये आणि राष्ट्रे अन्यायपूर्वक क्रूर कृत्यांचा मार्ग धारण करुन पडली आहेत. तथापि जर का सैन्यदलात भर्ती होणे अनिवार्य असेल आणि सैन्य दलाचा त्याग करण्याचा मार्ग उपलब्ध नसेल; परंतु त्याच्या अंतर आत्म्यास हे पटत नसेल तर त्या मुसलमानाने तो देश सोडून द्यावा; पण त्या देशाच्या कायद्याला विरोध करु नये. त्याने त्या देशाचा त्याग करावा, कारण कोणत्याही मुसलमानाला एखाद्या देशाचा नागरिक असताना त्या देशाविरूद्ध कोणतेही कृत करण्याची किंवा देश विरोधी शक्तींची बाजू घेण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

म्हणून हे काहीं इस्लामी शिकवणूकीचे पैलू आहेत, जे खऱ्या मुसलमानाला खऱ्या खोटया देशनिष्ठे आणि स्वतःच्या देशाप्रती प्रेम बाळगण्याबाबत मार्गदर्शन करतात. जो काही थोडा वेळ मला मिळाला त्यात मी थोडक्यात या विषयाला स्पर्श करु शकलो आहे.

समारोप करताना मी एवढेच सांगू इच्छितो की, आज आम्ही पाहात आहोत की, हे जग एक जागतिक खेडे झाले आहे. मानवप्राणी अतिशय घट्टपणे एकमेकाशी जोडले गेले आहेत, सर्व राष्ट्रांचे, सर्व धर्मांचे आणि सर्व संस्कृतीचे लोक सर्वच देशात वास्तव करत आहेत. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राच्या

नेतृत्वाने याची दखल घेऊन लोकांच्या भावनांचा आणि मतांचा आदर करायला हवा. प्रत्येक शासन व्यवस्थेच्या नेत्यांसाठी हे आवश्यक आहे की, त्यांनी असे कायदे करु नयेत की, ज्यामुळे जनतेमध्ये अस्वस्थता आणि नैराश्य निर्माण होईल. त्या ऐवजी असे कायदे करावेत की, ज्यामुळे विश्वास आणि न्याय भावनेचे वातावरण निर्माण होईल. अन्याय आणि निर्दयता नष्ट केली पाहिजे आणि त्या ऐवजी खराखुरा न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न व्हायला पाहिजे. यासाठी सर्वात उत्तम मार्ग म्हणजे या जगाने आपल्या निर्मात्याला ओळखले पाहिजे. सर्व प्रकारची निष्ठा ईश्वराप्रती निष्ठेशी जोडली गेली पाहिजे. जर असे झाले, तर आपण आपल्या डोळयाने पाहू शकू की, सर्व देशांच्या जनतेमध्ये उच्च प्रतिची निष्ठा स्थापन झाली आहे आणि शांतीकडे जाणारे नवीन मार्ग आमच्या दृष्टोत्पत्तीस येत आहेत आणि सर्व जगात सुव्यवस्था निर्माण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

माझे वक्तव्य संपवन्यापूर्वी, आज आपण मला या ठिकाणी आमंत्रित केले आणि मला शांततेने ऐकून घेतले, त्याबद्दल आपल्या सर्वांचे परत एकदा आभार व्यक्त करतो. अल्लाह तुम्हा सर्वांवर कृपा करो आणि अल्लाह जर्मनीवर कृपा करो. आमीन.

**धन्यवाद.**




# परमाणु युद्धाचे विनाशकारी परिणाम
# आणि
# संपूर्ण न्यायाची अत्याधिक आवश्यकता

---

नव्वा वार्षिक शांती चर्चासत्र,

लंडन, यु.के. २०१२






Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba]
addressing the 9th Annual Peace Symposium




Mayor of London Boris Johnson presenting
His Holiness with a London bus souvenir



Dame Mary Richardson DBE, UK President
of SOS Children's Villages, accepting
the 'Ahmadiyya Muslim Prize for the
Advancement of Peace' from His Holiness






Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba]
talking to the overseas Pakistani press regarding world affairs



## प्रस्तावना

24 मार्च 2012 रोजी बैतूल फुतूह मशिद मॉर्डन - पश्चिमी युरोप मधील सर्वात मोठी मशिद, येथे अहमदिया मुस्लिम जमाअत यु.के द्वारा 'नवव्या वार्षिक शांती चर्चासत्रा' चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा मध्ये १००० पेक्षा अधिक लोकांनी सहभाग नोंदवला, ज्यामध्ये सरकारचे मंत्री, विभिन्न देशांचे राजदूत, हॉऊज़ ऑफ कॉमन्स आणि हॉऊज़ ऑफ लॅर्डज़ चे सदस्य, लंदन चे महापौर विभिन्न विचारवंत, व्यवसायिक, शेजारी आणि विविध क्षेत्रातील पाहूणे सामील होते. या वर्षीच्या चर्चासत्राचा विषय 'आंतरराष्ट्रीय शांती' असा होता. या कार्यक्रमा मध्ये तिसरे वार्षिक अहमदिया मुस्लिम शांती प्रस्थापनेसाठी चे पारितोषिक 'आयसोयस चिल्ड्रन्स विलेज्स यु.के' या संस्थेस हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांच्या हस्ते, या संस्थेद्वारा जगभरातील अनाथ आणि परित्यक्त मुलांची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांची दुःखे कमी करण्यासाठी जे अविरत प्रयत्न केले जात आहेत आणि ज्याचा उद्देश ''प्रत्येक मुलाला प्रेमळ घर,'' पूर्ण करण्यासाठी, देण्यात येत आहे.

**प्रमुख पाहूणे खालील प्रमाणेः**

- सन्माननीय जस्टिन ग्रीनींग- एम. पी. सेकरेट्री ऑफ स्टेट फॉर ट्रांस्पोर्ट.
- सन्माननीय जेन इल्लीसन - एम. पी. (बट्टेरसिया)
- सन्माननीय सिमा मल्होत्रा - एम. पी. (फेल्थम ॲण्ड हेस्टोन)
- सन्माननीय टॉम ब्रेक - एम.पी. (चारशॉलटन ॲण्ड बेलिंघटन)

- सन्माननीय विरेंद्र शर्मा - एम. पी (ईलीग ॲण्ड सौथहॉल)
- सन्माननीय लॉर्ड तारीख अहमद - (विंबल्डन)
- सन्माननीय वेस्ले मोामो जॉनसन (लाइबेरिया चे राजदूत)
- सन्माननीय अब्दुल्लाह अल-राजी-यमनचे राजदूत
- सन्माननीय मीगुल सोलानो लोपेज - पराग्वे चे राजदूत
- सन्माननीय मार्टिन ॲर्थटन - नवदल विभागीय कमाँडर
- कौंस्लर जेन कुपर - वर्षीपफुल मेयर ऑफ वॉडर्स्थ
- कौंस्लर मिल्टन मॅक्नजी - एम. बी.ई. वर्षीपफुल मेयर ऑफ बाकिंग ॲण्ड डेजेनहॅन.
- कौंस्लर अम्रीतमान - वर्षीपफुल मेयर ऑफ हॅन्सलो.
- सियोभन बेनीटा - महापौर पदाच्या अपक्ष उम्मेद्वार.
- भारत - कॅनेडा - इंडोनेशिया आणि गिनीया तसेच अन्य देशांचे राजनितीज्ज्ञ.

# परमाणु युद्धाचे विनाशकारी परिणाम
# आणि
# संपूर्ण न्यायाची अत्याधिक आवश्यकता

परमेश्वराचे स्तवन आणि नामस्मरण केल्यानंतर मसीहाचे पंचम ख़लीफा म्हणालेः

सर्व पाहूण्यांना अस्सलामू अलैकूम व रहमतुल्लाही व बरकातहू- तुम्हा सर्वांवर अल्लाहची सलामती आणि कृपा होवो.

आज परत एका वर्षानंतर मी तुम्हां सर्व आदरणीय पाहूण्यांचे स्वागत करण्याची संधी घेत आहे. तुम्ही सर्वांनी आपला बहुमूल्य वेळ खर्च करुन या कार्यक्रमासाठी हजेरी लावली याबद्दल मी तुम्हा सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.

तसे पाहिल्यास तुमच्यापैकी बहुतेक जण या कार्यक्रमाबद्दल ज्याला ''शांती चर्चासत्र,'' म्हटले जाते, परिचित आहात. या कार्यक्रमाचे आयोजन दर वर्षी अहमदिया मुस्लिम जमाअत तर्फे केले जाते आणि हा कार्यक्रम संपूर्ण जगामध्ये शांती प्रस्थापनेच्या आमच्या अनेक कार्यक्रमांपैकी एक आहे. या कार्यक्रमामध्ये काहीं नवीन पाहूणेही उपस्थित आहेत, जे पहिल्यांदा या कार्यक्रमासाठी आले आहेत, त्याचबरोबर आमचे अनेक जूणे मित्रही आहेत, जे आमच्या प्रयत्नांचा अनेक वर्षापासून सहकार्य करत आहेत. आपण सर्वजण उच्च शिक्षित आहात आणि जगात शांती प्रस्थापनेची जी मनोकामना आहे त्याशी सहमत आहात आणि म्हणूनच तुम्ही सर्वजण या कार्यक्रमात उपस्थित आहात.

तुम्ही सर्वजण, हे जग प्रेमाने आपुलकी आणि मैत्रीच्या भावनेने व्यापून जावे, या हार्दिक इच्छेपोटीच या ठिकाणी आलात. जगातील बहुसंख्य लोक याच प्रकारच्या दृष्टीकोन आणि याच मूल्यांसाठी प्रयत्नशील आहेत आणि ती त्यांची गरजही आहे. आणि हाच दृष्टीकोन घेऊन आणि याच कारणांसाठी तुम्ही सर्वजण, ज्यांची पार्श्वभूमी ज्यांचे राष्ट्रे, आणि ज्यांचे धर्म भिन्न भिन्न आहेत, आज माझ्यासमोर बसले आहात.

जसे मी म्हटले आहे की, आम्ही या कार्यक्रमाचे आयोजन दर वर्षी करतो आणि प्रत्येक वेळी त्याच भावना आणि अपेक्षा आम्हां सर्वांद्वारे व्यक्त केल्या जातात; त्या म्हणजे आमच्या जगामध्ये शांतता प्रस्थापित व्हावी, आणि म्हणून प्रत्येक वर्षी मी आपणा सर्वांना अशी विनंती करत असतो की, ज्या ज्या ठिकाणी तुम्हाला संधी मिळेल आणि ज्यांच्या ज्यांच्या तुम्ही संपर्कात याल त्या सर्वांना आपले जे शांतता प्रस्थापनेचे प्रयत्न आहेत, त्यासाठी प्रवृत्त करावे. त्या पुढे जाऊन त्या सर्व लोकांना, जे कोणत्याही राजकीय पक्षाशी किंवा सरकाराशी संबंधीत आहेत, त्यांनी सुद्धा आपापल्या प्रभावक्षेत्रांमध्ये शांतीचा संदेश पोहोचविण्याचे कार्य करावे, अशी विनंती करतो. जागतिक शांतीच्या प्रस्थापनेसाठी अतिशय उच्च कोटीच्या नैतिक मूल्यांची आवश्यकता, पूर्वी कधी नव्हती तेवढी आज आहे, ही गोष्ट सर्व लोकांना अवगत करुन देणे अत्यावश्यक आहे.

अहमदिया मुस्लिम जमाअत च्या संदर्भात बोलायचे, तर जेथे जेथे आणि जेव्हा जेव्हा आम्हाला संधी मिळते तेव्हा आम्ही उघडपणे आमचा दृष्टीकोन स्पष्टपणे व्यक्त करतो की, या जगाला ज्या विनाश आणि उध्वस्तेकडे ते वाटचाल करत आहे, त्यापासून वाचवण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे प्रेम, आपुलकी आणि सामाजिकतेचा प्रचार आणि प्रसार; हीच आम्हां सर्वांची प्राथमिकता असायला हवी. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या जगाने आपल्या निर्मात्याला, जो की एकमेव ईश्वर आहे, ओळखणे

आवश्यक आहे कारण, आपल्या निर्मात्याला ओळखणेच आम्हाला त्याच्या निर्मितीबद्दल प्रेम आणि सहानुभूतीसाठी प्रवृत्त करेल आणि जेव्हा हे आमच्या स्वाभावाचा भाग बनेल तेव्हाच आम्ही ईश्वराच्या प्रेमास पात्र ठरु.

आम्ही सतत जगात शांती प्रस्थापनेसाठी आमचा आवाज उंचावत असतो आणि मानवजातीच्या दुःखा प्रती आमच्या हृदयात जी संवेदना आणि शूल आहे तेच आम्हाला या जगाला जगण्यासाठी एक उत्तम स्थान बनवण्याचा प्रयत्नासाठी प्रवृत्त करत असते. आणि वास्तविक पाहता हा कार्यक्रम हे लक्ष्य साधण्यासाठी, जे आमचे अनेक प्रयत्न चालू आहेत, त्याचा फक्त एक भाग आहे.

जसे मी पूर्वी म्हटले आहे, आपण सगळे जण देखील याच आशा आणि कामना बाळगूण आहात; यापुढे जाऊन मी वारंवार राजनीतीतज्ज्ञ आणि धर्ममार्तंडांना आवाहन करत आलो आहे की, त्यांनी शांतीसाठी भरपूर प्रयत्न करावे. परंतु या सर्व प्रयत्नानंतर देखील आपण पाहतो की, जगामध्ये तनाव आणि अस्वस्थता व्यापून राहिली आहे. आजच्या जगामध्ये आपण पाहतो की अस्वस्थता, कलह आणि अव्यवस्था वाढत चालली आहे, काहीं देशांमध्ये जनतेतील काहीं घटक आपसातच युद्ध करत आहेत, काहीं राष्ट्रांमध्ये जनताही सरकारशी लढत आहे किंवा या उलट आपल्या जनतेवर हल्ले करत आहेत, हदशतवाद्यांचे गट, त्यांच्या दुष्ट स्वार्थ साधण्यासाठी अराजकता आणि अव्यवस्थेची आग भडकवत आहेत आणि त्यासाठी ते निष्पाप महिला, लहान मुले, वैयवृद्ध व्यक्तींची अमानुषपणे हत्या करत आहेत. काहीं देशांमध्ये राजकीय पक्ष एकत्र येऊन राष्ट्राच्या उन्नतीसाठी झटण्याऐवजी एकमेकांविरूद्ध भांडत आहेत. आपण हे सुद्धा पाहत आहोत की, अनेक शासनकर्ते आणि देश सतत दुसऱ्या राष्ट्रांच्या संपत्तीला गीळंकृत करण्यासाठी टपून बसलेले आहेत. जगातील महाशक्ती जगावर त्यांचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी कोणत्याही थराला जायला तयार

दिसतात.

हे सर्व ध्यानात घेता आपल्या लक्षात येईल की, अहमदिया मुस्लिम जमाअत च्या किंवा सामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करणारे तुमच्यातले बहुसंख्य लोकांची देखील ही परिस्थिती बदलण्यासाठी, सकारात्मक बदल घडविण्याचे धोरण ठरविण्याची क्षमता नाही, कारण आपल्यापैकी कोणीही राजकीय प्रभूसत्तेच्या पदावर नाही. वास्तविक पाहता, मी असे देखील म्हणून शकतो की, जे राजनीतीतज्ज्ञ आमच्याबरोबर मित्रत्वाचे संबंध प्रस्थापित करुन आहेत आणि नेहमीच आमच्या मतांशी सहमत असतात ते देखील उघडपणे आपले मत व्यक्त करु शकत नाही. त्या ऐवजी त्यांचा आवाज देखील दाबला जात आहे आणि त्यांना उघडपणे मत प्रदर्शन करण्यापासून रोखले जात आहे. याचे कारण असे असू शकते की, त्यांना आपल्या पक्षाच्या धोरणाला बांधील रहावे लागत आहे किंवा कदाचित जगातील बाह्य शक्तींच्या दबावाखाली ते आहेत किंवा त्यांचे राजकीय मित्र त्यांच्यावर दबाव टाकून त्यांना मागे ओढत आहेत.

तरी देखील आम्ही दर वर्षी या शांती चर्चासत्रात भाग घेत असतो आणि निःसंदिग्धपणे शांती प्रस्थापनेची इच्छा व्यक्त करत असतो आणि सर्व धर्मांमध्ये, सर्व राष्ट्रांमध्ये, सर्व वंशामध्ये आणि खरे पाहिल्यास सर्व लोकांमध्ये प्रेम, सलोखा आणि बंधुभाव प्रस्थापित व्हावे, अशी भावनां आणि मते निःसंकोचपणे व्यक्त करत असतो. परंतु दुर्दैवाने हे दृष्टीकोन अंमलात आणावा याचा अधिकार आमच्याकडे नाही, आणि आमच्याकडे हे लक्ष्य साध्य करण्यासाठी सत्ताही नाही आणि साधनेही नाहीत.

मी या गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छितो की, याच सभागृहात आणि याच शांती चर्चासत्रात दोन वर्षांपूर्वी मी जे भाषण दिले होते, त्यामध्ये मी जगामध्ये शांती प्रस्थापित करण्यासाठी काहीं उपाय सुचविले होते आणि संयुक्त राष्ट्रांनी या संदर्भात कसे कार्य करावे हे देखील सांगितले होते. माझ्या

भाषणानंतर आमच्या आदरणीय मित्र लॉर्ड एरिक एवबरी म्हणाले होते की, हे भाषण संयुक्त राष्ट्रसंघातच व्हायला हवे होते. तथापि हे त्यांचे मोठेपणा आणि सद्‌भाव होते, जे त्यांनी अशा पद्धतीने व्यक्त केले होते. म्हणूनच मी हे सांगू इच्छितो की, नुसती भाषणे देणे किंवा ती ऐकणे शांती प्रस्थापणेसाठी पर्याप्त नाहीत. खरे पाहिल्यास हे प्रारंभिक लक्ष्य साध्य करण्यासाठी संपूर्ण न्याय आणि प्रत्येक बाबतीत निष्पक्ष असणे आवश्यक आहे. पवित्र कुरआनाच्या अध्याय ४ मधील आयत १३६ मध्ये एक स्वर्णीम सिद्धांत आणि शिकवण या संदर्भात मार्गदर्शनासाठी दिलेली आहे. त्यात म्हटले आहे की, न्याय प्रस्थापित करण्यासाठी गरज पडल्यास तुम्ही स्वतः विरूद्ध किंवा आपल्या माता-पिता विरूद्ध किंवा आपल्या जवळच्या नातेवाईकांविरूद्ध आणि मित्रांविरूद्ध साक्षी द्यावी लागल्यास द्यालाच हवी हाच खरा न्याय आहे, ज्यात वयैक्तिक स्वार्थ सार्वजनिक हितासाठी बाजूला ठेवला जातो.

जर आपण या सिद्धांतावर सामूहिक स्तरावर विचार केल्यास आम्हाला कळून येईल की, संपत्ती आणि राजकीय प्रभावाचा वापर करुन अनुचित प्रकारच्या गटबाजीच्या तंत्रांचा अवलंब केला जाणार नाही, त्या ऐवजी सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधी आणि राजदूत या निष्पक्षतेच्या आणि समतेच्या तत्त्वाच्या पाठिंबा देण्यासाठी प्रामाणिकपणे पुढे यायला हवेत. आपण पाहत असतो की, संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्वसाधारण सभे मध्ये किंवा सुरक्षा परिषदे मध्ये जी विधाने किंवा भाषणे केली जातात त्यांची खूप प्रशंसा आणि स्वागत केली जाते. परंतु हे कौतुक यासाठी निरर्थक ठरतो की खरे निर्णय आधीच घेतले गेलेले असतात.

म्हणून जेथे निर्णय घेताना योग्य आणि खऱ्याखुऱ्या लोकशाही मार्गांचा अवलंब करण्याऐवजी प्रमुख महाशक्तिंच्या गटबंधनाचा दबावतंत्राचा अवलंब केला जातो, त्यावेळी अशी भाषणे पोकळ, निरर्थक ठरतात आणि ते फक्त बाह्य जगाला फसविण्याच्या देखावा ठरतात; असे असले तरी

याचा अर्थ असा होत नाही की, आपण पुढे निराश होऊन बसावे आणि आपले सर्व प्रयत्न सोडून द्यावेत. त्या ऐवजी सर्व कायदेशीर मार्गांचा अवलंब करुन सत्ताधाऱ्यांना काळाची गरज काय आहे याची सतत जाणीव करुन देत राहणे हेच आपले उद्दिष्ट ठेवायला हवे. त्याचप्रमाणे जागतिक पातळीवर न्याय प्रस्थापित व्हावा, यासाठी जे हितसंबंधी गट आहेत, त्यांना योग्य प्रकारे सल्ला देण्याचे कार्यही आपण करत रहायला हवे. त्याच वेळी हे जग शांती आणि सद्भावनेचे स्वर्ग झालेले पाहण्याची आपली इच्छा पूर्ण झालेली आपल्याला पहायला मिळेल.

त्यामुळे आपण आपले प्रयत्न सोडून देऊ शकत नाही आणि ते आपण सोडून द्यायलाही नकोत. जर का आपण निर्दयता आणि अन्यायाविरुद्ध आपला आवाज उंचावण्याचे सोडून दिले तर आपण देखील त्यांच्यात सामील होऊ, ज्यांना कुठल्याही नैतिक मूल्यांची किंवा मान्यतांची कदर नाही. जरी आपला आवाज ऐकला जातो किंवा त्याचा प्रभाव पडतो किंवा नाही, हे महत्त्वाचे नाही. आपण इतरांना शांती च्या संदर्भात समुपदेशन करणे कायम ठेवायला पाहिजे. मला नेहमीच अतिशय आनंद होतो, जेव्हा मी पाहतो की, धर्म आणि राष्ट्रीय भिन्नता असताना देखील मानवी मूल्यांची धारणा करण्यासाठी इतक्या मोठया संख्येने लोक या कार्यक्रमात सहभागी होतात आणि जगामध्ये शांती आणि सद्भावना स्थापित करण्या संदर्भात मार्ग शोधण्यासाठी ऐकतात, शिकतात आणि बोलतात; म्हणून मी आपणा सर्वांना विनंती करतो की, आपल्या सर्व क्षमतांचा वापर करुन शांती प्रस्थापने च्या प्रयत्नांची ज्योत सतत तेवत ठेवावी, त्यामुळे कदाचित कधी तरी अशी वेळ येईल ज्यावेळी जगाच्या सर्व भागांमध्ये शांती आणि न्याय प्रस्थापित होईल.

आम्ही हे लक्षात ठेवायला हवे की, जेव्हा मानवी प्रयत्न अयशस्वी होतात, तेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह मानवजातीचे भवितव्य ठरविण्यासाठी

आपली आज्ञा जारी करतो. ईश्वरीय आज्ञेद्वारे मानवाला विवश्तेने त्याच्या प्रती जाऊ लागण्यापूर्वीच जगातील सर्व मानवांना या अतिशय महत्त्वाच्या गोष्टीकडे स्वतःच ध्यान दिले आणि मानवीय अधिकारांची जपवणूक केलेलीच जास्त बरी, कारण जेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह आपला आदेश जारी करतो त्या वेळेस तो अतिशय कठोर पद्धतीने मानवांवर आपला कोप प्रकट करतो.

आजच्या जगामध्ये ईश्वराच्या प्रकोपाची प्रचिती आणखीन एक जागतिक महायुद्धाच्या स्वरुपात येण्याची शक्यता आहे. वस्तुतः यात कुठलीच शंका नाही की, असे युद्ध आणि त्यामुळे होणारा विध्वंस तो युद्धा पुर्ताच किंवा या पिढी पुर्ताच मर्यादित राहणार नाही. खरे पाहिल्यास त्याचे भयंकर परिणाम येणाऱ्या अनेक पिढयांना भोगावे लागतील. जर अशा युद्धाचे एकच अतिशय दुर्दैवी परिणामाचे उदाहरण द्याचे झाल्यास त्याचे नवजात बालकावर होणारा परिणाम आता आणि भविष्यात पहावे लागेल. आज जी शस्त्रास्त्रे उपलब्ध आहेत ते अतिशय विनाशकारी आहेत. त्यांचे परिणाम पिढी दर पिढी जन्मणाऱ्या मुलांवर अनुवांशिक आणि शारीरिक व्यंगाच्या स्वरुपात दिसून येतील.

जापान हा एक असा देश आहे ज्याने अणुयुद्धाचे भयानक परिणाम दुसऱ्या महायुद्धात अणुबॉम्ब हल्ल्यानंतर भोगलेले आहे. जर तुम्ही जापान ला गेलात आणि तिथल्या लोकांना भेटलात तर आज देखील युद्धाबद्दल भयंकर भय आणि घृणा त्यांच्या डोळयातून आणि बोलण्यातून व्यक्त होताना दिसेल. शिवाय त्या वेळेस वापरण्यात आलेले अणुबॉम्ब, ज्यांनी मोठया प्रमाणात विध्वंस घडवून आणला होता ते बॉम्ब आज एखाद्या छोटया राष्ट्राकडे अस्तित्वात असलेल्या अणवस्त्रच्या तुलनेत खूपच कमीच प्रतीचे होते.

जरी सात दशके होऊन गेले तरी असे म्हटले जाते की, जापान मध्ये

आज देखील त्या अणुबॉम्ब चे दुष्परिणाम नवजात बालकांमध्ये अविरत दिसून येत आहे. जर एखाद्या व्यक्तीला बंदूकीची गोळी लागली तर वैद्यकीय उपचाराने त्याला जीवंत ठेवणे शक्य होऊ शकते; परंतु जर अणुयुद्ध छेडले गेले तर जे त्या बॉम्ब च्या प्रभावक्षेत्रात येतील त्यांना असे भाग्य लाभणार नाही. त्या ऐवजी आपल्याला एका क्षणात मरणारे लोक किंवा थिजून पुतळे झालेले लोक पहायला मिळतील. आणि त्यांची त्वचा वितळत असलेले पहायला मिळतील. पिण्याचे पाणी, अन्न आणि वनस्पती, सर्व काहीं किरणोत्सर्गाच्या दुष्परिणामाने दूषित झालेले असतील. या दुषिततेच्या परिणामस्वरुप कोण कोणत्या प्रकारच्या व्याधी निर्माण होतील त्याची आपण फक्त कल्पनाच करु शकतो. ज्या ठिकाणी सरळ हल्ला झालेला नसेल आणि त्यांच्यावर किरणोत्सर्गाचा परिणाम तुलनेने कमी झालेला असेल त्या ठिकाणी देखील रोगराय आणि व्याधी उत्पन्न होण्याचा धोका मोठया प्रमाणात असेल आणि पुढच्या पिढयांना देखील याचे दुष्परिणाम भोगावे लागतील.

त्या मुळेच माझे म्हणने असे आहे की, अशा युद्धांचे विनाशकारी आणि विध्वंसक परिणाम युद्ध काळापूर्ते किंवा त्या नंतरचे थोडया कालावधीसाठी मर्यादित राहणारे नसून हे परिणाम पिढयां-पिढया दिसून येतील. अशा युद्धांचे हे खरे दुष्परिणाम असताना देखील काहीं स्वार्थी आणि मूर्ख लोक आपल्या संशोधन कार्याचा खूपच अभिमान बाळगतात आणि त्यांचे वर्णन असे करतात जणू काहीं त्यांनी जगाला एखादा मोठा उपहार दिला आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, अणुशक्ती आणि अणुतंत्रज्ञानाचे जे काहीं तथाकथित फायदे सांगितले जातात ते सुद्धा अतिशय भयंकर आणि विस्तृत अशा विनाशाला, जर का थोडासा निष्काळजीपणा झाला किंवा अपघात झाला तर, कारणीभूत ठरु शकतात. अशा स्वरुपाचे आपत्तींचा अनुभव आपण यापूर्वी १९८६ मध्ये चेरनोबिल येथे झालेल्या आणि नुक्ताच

युक्रेन मध्ये झालेल्या आणि गेल्या वर्षी भूंकप आणि सुनामी च्या परिणामस्वरूप झालेल्या अणु अपघाताच्या वेळी घेतलाच आहे. आपण त्या वेळीस बघितले आहेत की, त्या वेळी ते देश किती धोकादायक परिस्थितीमध्ये आले होते आणि भयग्रस्त झाले होते. जेव्हा अशा घटना घटतात तेव्हा त्या प्रदेशात मानवी वसती पुनर्स्थापित करणे देखील कठीण असते. अशा स्वरूपाच्या अतिशय भयानक आणि अद्वितीय अनुभवामुळे जापानी लोक अतिशय सावध झाले आहेत आणि त्यांचे भयग्रस्त आणि दहशतग्रस्त होणे योग्यच आहे.

हे विधान तर स्पष्टच आहे की, युद्धा मध्ये माणसे मारली जातात आणि जेव्हा जापान ने दुसऱ्या महायुद्धात भाग घेतला तेव्हा तिथल्या सरकाराला आणि जनतेला हे माहितच होते की, काहीं लोक नक्कीच मारले जाणार आहेत, असे म्हटले जाते की, जवळपास अंदाजे ३० लाख जापानी या युद्धात मारले गेले. आणि ही संख्या त्या देशाच्या लोकसंख्येच्या ४ टक्के होती. जरी अन्य काहीं देशांमध्ये यापेक्षा अधिक संख्येने लोक मारले गेले असतील, तरी जापानी लोकांच्या मनामध्ये जी युद्धाबद्दल घृणा आणि आक्रोश आहे ती अन्य लोकांपेक्षा कितीतरी जास्त आहे, त्याचे साधे आणि सरळ कारण जापान वर दुसऱ्या महायुद्धात टाकलेले ते दोन अणुबॉम्ब आहेत आणि ज्याचे दुष्परिणाम आतापर्यंत त्या देशाला भोगावे लागत आहे. जापानी लोक त्यांच्या शहरांना अतिशय वेगाने पुनर्वसित आणि पुनर्स्थापित करण्याच्या बाबतीत खूपच महान आणि संवेदनक्षम ठरले आहेत. परंतु ही गोष्ट अतिशय स्पष्ट व्हायला हवी की, जर आज परत एकदा अण्वस्त्रांचा वापर झाल्यास जगाच्या नकाशावरून काहीं देश पूर्णपणे पुसले जाण्याची शक्यता नकारता येत नाही, त्यांचे अस्तित्वच नष्ट होईल.

अतिशय सावध अनुमानानुसार दुसऱ्या महायुद्धात मृत्यु पावणाऱ्या लोकांची संख्या ६ कोटी २० लाख सांगितली जाते आणि त्यातील जवळपास

४ कोटी लोक हे सामान्य नागरिक होते. दुसऱ्या शब्दात बोलायचे तर लष्करी सैनिकांपेक्षा सामान्य नागरिक जास्त मृत्यमुखी पडले होते. आणि हा विनाश जापान सोडून अन्य भागांमध्ये परंपरागत पद्धतीने आणि पारंपारिक शास्त्रास्त्राने युद्ध झालेले असताना देखील घडला होता.

ब्रिटनला देखील जवळपास ५ लाख लोकांच्या मृत्युची हानी सोसावी लागली होती. खरे पाहिल्यास त्यावेळी ब्रिटन हे वसाहती सत्ता होती, आणि त्याच्या वसाहतींनी देखील त्याच्या बाजूने युद्धात भाग घेतला होता. जर त्यांची युद्धात झालेली हानी आणि मृत्यु संख्या सामील केली तर ती १० लाखांवर जाते. फक्त भारतामध्ये १६ लाख लोक मृत्युमुखी पडले होते.

परंतु आता परिस्थिती बदल्ली आहे; जे देश पूर्वी ब्रिटीशांच्या वसाहती होते आणि त्यांनी ब्रिटीशांसाठी युद्धात भाग घेतला होता ते आता युद्ध झाल्यास ग्रेट ब्रिटनविरूद्ध सुद्धा लढू शकतात. यावर जसे मी पूर्वी म्हटले आहे की, काहीं लहान देशांकडे देखील आण्विक शस्त्रे आहेत.

जी गोष्ट सर्वात भीतीदायक आहे ती ही की, आपल्याला या गोष्टीची जाणीव आहे की, अशी आण्विक शस्त्रे अशा लोकांच्या हातात देखील जाऊ शकतात ज्यांच्यामध्ये हाताळण्याची ती लायकी नाही किंवा ज्यांना त्यांच्या भयानक परिणामाची तमा नाही. खरे पाहिल्यास हे असे लोक त्या गंभीर परिणामाची काळजी देखील करत नाहीत आणि ते फक्त युद्धखोर उरतीचे आहेत.

म्हणून जर का महाशक्तिंनी न्यायपूर्ण कृती नाही केली, लहान राष्ट्र ांच्या मनातील निराशा दूर नाही केली आणि जर का मोठे आणि विवेकपूर्ण राजकीय निर्णय नाही घेतले तर परिस्थिती नियंत्रणाबाहेर जायला वेळ लागणार नाही आणि जो विनाश समोर येईल तो आपल्या कल्पनेच्या बाहेर आणि खूप व्यापक असेल. आणि जगातील बहुसंख्य लोक जे शांतीने राहू इच्छितात ते देखील या विध्वंसाचे बळी ठरतील.

म्हणून माझी अतिशय उत्कट इच्छा आणि अपेक्षा आहे की, सर्व प्रमुख राष्ट्रांच्या नेत्यांनी हे भयानक वास्तव समजून घ्यायला हवे आणि आपले हेतू आणि उद्देश साध्य करण्यासाठी बळाचा वापर करण्याचे आक्रमक धोरण स्वीकारण्या ऐवजी त्यांनी अशी धोरणे स्वीकारावी जी शांती प्रस्थापनेला प्रोत्साहित करतील.

नुक्तेच एका वरिष्ठ रशीयन मिलीट्री कमाँडर ने अणुयुद्धाच्या अपेक्षित धोक्याची अतिशय गंभीर चेतावणी दिली आहे. त्याच्या मताप्रमाणे हे युद्ध आशिया खंडात किंवा इतरत्र खेळले जाणार नाही, तर ते युरोपच्या सरहदीवर लढले जाईल आणि हा धोका पूर्व युरोपियन देशातून आरंभ होईल आणि पेटवलाही जाईल. जरी काहीं असे म्हणत असेल की, हे त्याचे वयैक्तिक मत आहे; पण मी त्याचे मत दुलर्क्षित करण्यायोग्य मानत नाही तर यापुढे जाऊन मला अशी भीती आहे की, जर असे युद्ध झाले तर आशियाचे देश देखील त्यात गुरफटले जातील.

आणखीन एक बातमी नुक्तीच माध्यमातून मोठया प्रमाणात प्रसारित करण्यात आली, ती इस्त्राईलची गुप्तचर संस्था मोसाचे नेतृत्व प्रमुख यांचे मत प्रदर्शित होते. अमेरिकेच्या एका सुप्रसिद्ध दुरदर्शन वाहिणी सी.डी. एस. ला दिलेल्या एका मुलाखतीमध्ये ते म्हणाले होते की, असे वाटते की इस्त्राईली सरकार ईरान विरूद्ध युद्ध छेडू इच्छित आहे आणि ते म्हणाले, की जर का असा हल्ला झाला किंवा असे युद्ध छेडले गेले तर ते कुठे जाऊन संपेल हे सांगणे अशक्य आहे. म्हणून त्यांनी अतिशय जोरदारपणे अशा हल्लांविरूद्ध सल्ला दिला आहे. या संदर्भात माझे मत असे आहे की, अशा युद्धाचा अंत आण्विक विनाशामध्ये होईल.

अलीकडेच मी एक लेख देखील पाहिला आहे ज्यात त्या लेखकाने असे म्हटले आहे की, जगाची आजची परिस्थिती आर्थिक निकषावर आणि राजकीय दृष्टीत १९३२ च्या परिस्थिती सारखीच झाली आहे. त्यांनी असेही

लिहिले आहे की, काहीं देशातील जनतेला त्यांच्या राजनितीतज्ज्ञावर किंवा त्यांच्या तथाकथित लोकशाहीवर देखील विश्वास राहिलेला नाही. त्यांनी असेही म्हटले आहे की, जी परिस्थिती दुसरे महायुद्धाचा उद्रेक होण्यापूर्वी निर्माण झाली होती तशाच प्रकारच्या आणि त्यांच्याशी साधर्म्य असलेल्या अनेक घटना आज त्यापेक्षा मोठया प्रमाणात घडले आहात.

अनेक जण त्याच्या या विश्लेषणाशी सहमत होणार नाही परंतु याउलट मी त्याच्याशी पूर्णपणे सहमत आहे आणि म्हणूनच मी असे मानतो की, जगातील सर्व शासकर्त्यांनी सध्या घडत असलेल्या घटनांचे गांभीर्य ओळखून त्याची योग्य ती दखल घ्यायला हवी. त्याचप्रमाणे काहीं मुस्लिम देशातील अन्यायी नेते, ज्याचे एकमेव उद्देश कोणत्याही प्रकारे आणि कोणतीही किंमत मोजून फक्त सत्तेला चिटकून राहणे हाच आहे. त्यांनी संवेदनशील व्हायला हवे नसता त्यांच्या कृती आणि मुर्खपणा त्यांच्या विनाशाला कारणीभूत ठरतील. आणि ते त्यांच्या देशांना अतिशय भयानक अशा कठीण परिस्थितीकडे लोटण्यास कारणीभूत ठरतील.

आम्ही, जे अहमदिया मुस्लिम जमाअतचे सदस्य आहेत, आमचा या जगाला आणि मानवतेला विनाशापासून वाचविण्याचा निकराचा प्रयत्न चालू आहे, कारण या काळाच्या इमाम चा आम्ही स्वीकार केलेला आहे, ज्यास अल्लाहने अपेक्षित मसीह म्हणून धाडले होते आणि जे पवित्र पैगंबर मुहम्मद (स.), जे सर्व मानवतेप्रती दयाघ्न म्हणून पाठवले गेले होते, त्यांचे दास आहेत.

आम्ही पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीचे अनुयायी असल्यामुळे आमच्या हृदयाला या जगाची परिस्थिती पाहून अतिशय दुःख आणि पीडा होते आणि हीच पीडा आम्हाला मानवतेला विनाशापासून आणि दुःखापासून सुरक्षित ठेवण्याचे उपाय आणि प्रयत्न करण्यासाठी प्रवृत्त करते. म्हणून मी आणि सर्व अहमदी मुस्लिम, जगात शांतता प्रस्थापित

करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याची आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी काटेकोर प्रयत्न करत आहेत.

याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून शांती प्रस्थापनेच्या हेतूने काहीं जागतिक नेत्यांना पत्रे लिहण्याची मालिका मी सुरु केली आहे. काहीं महिण्यापूर्वी मी पोप बेनीडीक्ट यांना एक पत्र, माझ्या एका अहमदी प्रतिनिधी मार्फत पोहोचविले होते, त्या पत्रामध्ये मी त्यांना असे म्हटले की, जगातील सर्वात मोठया धर्माचे सर्वोच्च नेते असल्यामुळे त्यांनी देखील शांती प्रस्थापनेसाठी प्रयत्न करायला हवे.

अशाच मनस्थिती मध्ये ईरान आणि इस्त्राईल यांना एक दुसऱ्याविरूद्ध अत्याचार आणि अन्यायाची परिसीमा गाठत असल्याचे पाहिल्यानंतर अलीकडेच मी एक पत्र इस्त्राईली प्रधानमंत्री बेनजामीन नेतनयाहू आणि ईरान चे अध्यक्ष मेहमूद अहमदीनिजाद, या दोघांना देखील पाठविले, ज्यात मी त्यांना आग्रह केला आहे की, त्यांनी कुठलाही निर्णय घेण्यासाठी सर्व प्रकारची घाई आणि बेजबाबदारपणा मानवतेच्या हितासाठी सोडून घ्यायला हवा.

अलीकडेच मी अध्यक्ष बराक ओबामा आणि कॅनेडाचे प्रधानमंत्री यांना देखील लिहले आहे. आणि त्या दोघांना जगामध्ये शांती आणि सद्भाव निर्माण करण्याप्रती त्यांची जी जबाबदारी आणि भूमिका आहे ती परिपूर्ण करण्यासाठी आवाहन केले आहे.

मी अन्य देशांच्या प्रमुखांना आणि नेत्यांना देखील निकट भविष्यात पत्रे लिहण्याची योजना केली आहे.

मला हे माहित नाही की माझ्या पत्रांना, जी मी वेगवेगळया नेत्यांना लिहली आहेत ते किती महत्त्व देतात किंवा किती गांभीर्याने घेतात; परंतु त्यांची प्रतिक्रिया काहीही असो मी जगातील लक्षावधी अहमदी मुस्लिमांचा आध्यात्मिक नेता आणि ख़लीफा असल्यामुळे मी माझ्या परीने प्रयत्न केला

आहे आणि जगाच्या अतिशय संकटमय परिस्थितीबद्दल त्यांच्या भावना आणि संवेदना पोहोचविण्याचे कार्य केले आहे.

ही गोष्ट अतिशय सुस्पष्ट असली पाहिजे की, मी माझ्या कुठल्याही वयैक्तिक भीतीपोटी नव्हे तर मानवतेप्रती असलेल्या खऱ्याखुऱ्या प्रेमापोटी माझ्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

मानवतेप्रती हे प्रेम सर्व मुस्लिमांच्या हृदयात पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या शिकवणीमुळे प्रत्येक मुसलमानाच्या हृदयामध्ये निर्माण आणि स्थापित झाले आहे. जसे की मी पूर्वी स्पष्ट केले आहे की, ते प्रेषित मुहम्मद (स.) सर्व मानवतेप्रती दया आणि कृपा याचे स्रोत म्हणून अवतरले होते. कदाचित तुम्हाला फार आश्चर्य वाटेल किंवा धक्का सुद्धा बसेल जेव्हा तुम्ही ऐकाल की, मानवतेप्रती आमचे प्रेम हे पवित्र पैगंबरांच्या शिकवणुकीचा थेट परिणाम आहे. तुमच्या मनामध्ये हा प्रश्न देखील उत्पन्न होईल की मग अनेक मुस्लिम दहशतवादी गट निष्पाप लोकांची कत्तल का करत आहेत किंवा काहीं मुस्लिम शासनकर्ते त्यांची सत्ता सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांच्याच नागरिकांची सामूदायिक हत्या करण्याचे आदेश कसे काय देत आहेत.

ही गोष्ट अतिशय सुस्पष्ट करावी लागेल की, वास्तविक पाहता ही सर्व दुष्कृत्ये इस्लामच्या खऱ्याखुऱ्या शिकवणुकीच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. पवित्र कुरआन कोणत्याही परिस्थितीमध्ये अतिरेकवाद किंवा दहशतवाद पसरविण्याची अजिबात परवानगी देत नाही.

आजच्या काळात आमच्या श्रद्धेप्रमाणे सर्वशक्तिमान अल्लाह ने अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी (अ.स.) यांना पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशी संपूर्ण समर्पित राहून अपेक्षित मसीह आणि इमाम महदी म्हणून अवतरविण्यात आले आहे. अपेक्षित मसीह यांना इस्लाम आणि पवित्र कुरआनाची रास्त आणि खरी शिकवण प्रसारित करण्याच्या हेतूने धाडण्यात आले आहे.

त्यांना सर्वशक्तिमान अल्लाह आणि मानव यामध्ये अतिशय घट्ट असा संबंध निर्माण करण्याच्या हेतूने पाठविण्यात आले आहे. त्यांना सर्व प्रकारच्या धार्मिक युद्धांचा अंत करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. त्यांना सर्व धर्मांच्या प्रेषितांचे आणि संस्थापकांचा आदर, सम्मान आणि गौरव प्रस्थापित करण्यासाठी पाठविण्यात आले आहे. त्यांना अत्योच्च दर्जाची नैतिक मूल्ये धारण करण्याच्यासाठी, प्रवृत्त करण्यासाठी तसेच शांती, प्रेम, सद्भाव आणि बंधुतेची संपूर्ण जगात प्रस्थापन करण्याच्या कार्यासाठी पाठविण्यात आले आहे.

जर तुम्ही जगाच्या पाठीवर कोणत्याही भागात गेलात तर तिथल्या प्रत्येक खऱ्या अहमदी मुसलमानास या सर्व गुणांनी संपन्न असलेले पाहू शकतात. आमच्यासाठी दहशतवादी किंवा अतिरेकी आदर्श नाही. तसेच कोणतीही क्रूर हुकूमशाह आदर्श नाही किंवा कोणत्याही पाश्चिमात्य महासत्ता आदर्श नाहीत. आम्ही इस्लामच्या संस्थापक हज़रत मुहम्मद पैगंबर (स.) यांनाच आदर्श मानतो आणि त्यांचेच अनुकरण करतो आणि आमच्यासाठी आदर्श आचार संहिता पवित्र कुरआन हाच आहे.

म्हणून या शांती चर्चासत्राच्या माध्यमातून मी संपूर्ण जगभर हा संदेश पाठवू इच्छितो की, इस्लामची शिकवण आणि संदेश फक्त प्रेम, सद्भाव, सहिष्णूता आणि शांती हाच आहे.

दुर्दैवाने आम्ही पाहतो की, मुसलमानांचा एक छोटासा गट इस्लामची अतिशय विकृत प्रतिमा जगापुढे मांडतो आणि त्यांच्या दिशाभूल करणाऱ्या अवधारण्यानुसार कार्य करत आहे. म्हणून माझे तुम्हाला सांगणे आहे की, हाच खरा इस्लाम आहे, यावर तुम्ही विश्वास ठेवू नका आणि अशा पथभ्रष्ट लोकांच्या कृतींना निमित्त ठरवून जगभरातील शांती प्रीय बहुसंख्य मुसलमांनाच्या भावना दुःखावू नये किंवा त्यांना आपल्या क्रौर्याचे लक्ष्य ठरवू नये.

पवित्र कुरआन हा जगभरातील सर्व मुसलमानांसाठी अतिशय आदरणीय आणि सन्माननीय ग्रंथ आहे. आणि त्याच्या संदर्भात घाणेरडी आणि अपमानजनक भाषा वापरणे किंवा त्याला जाळून टाकणे; यामुळे नक्कीच मुसलमांच्या भावना अतिशय दुःखावले जातील, यात शंकाच नाही. आपण पाहत असतो की, ज्या वेळेस अशा घटना घडतात त्यावेळी अतिरेकी मुसलमांकडून अनुचित आणि संपूर्णतः चूकीचे प्रतिक्रिया समोर येतात.

थोडयाच दिवसापूर्वी आपण अफगानीस्तान मधील दोन घटनांबद्दल ऐकल्या आहेत तेथे काहीं अमेरिकन सैनिकांनी पवित्र कुरआन चा अपमान केला आणि निष्पाप महिला आणि मुलांना त्यांच्या घरात घुसून ठार केले तसेच एका निर्दय व्यक्तीने दक्षिण फ्रान्समध्ये काहीं फ्रेंच सैनिकांना विनाकारण गोळया घालून ठार केले आणि काहीं दिवसानंतर तो एका शाळेत घुसला आणि तेथे तीन निष्पाप ज्यू मुलांना आणि त्यांच्या शिक्षकाला ठार केले.

अशाप्रकारचे सर्व वर्तन अत्यंत चूकीचे असून त्याद्वारे कधीच शांतता निर्माण होणार नाही; हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपण हे देखील पाहत आहोत की, पाकिस्तान मध्ये आणि इतर ही ठिकाणी सातत्याने अतिशय निर्दयपणे अत्याचार केले जात आहे. आणि या त्यांच्या कृती इस्लाम विरोधी शक्तींना इंधन पुरवत असून त्यामुळे इस्लामप्रती त्यांची घृणा वाढत आहे आणि इस्लामला बदनाम करण्याचे त्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांना मोठा बहाणा मिळत आहे. अशा स्वरुपाच्या बरबरतापूर्ण कृती अतिशय छोटया प्रमाणात जरी केल्या जात असल्या तरी त्या व्यक्तीगत शत्रुत्वामुळे किंवा आकसामुळे घडत नसून त्या काहीं सरकारांनी धारण केलेल्या अन्यायपूर्ण धोरणांचा परिपाक असता, मग ते स्थानिक पातळीवर असो किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर असो.

म्हणून जागतिक शांततेच्या प्रस्थापनेसाठी जगातील प्रत्येक देशामध्ये

आणि प्रेत्येक स्तरावर न्यायाची योग्य मानके निर्माण होणे अत्यावश्यक आणि पवित्र कुरआनाने, अकारण एखाद्या निष्पाप व्यक्तीची केली गेलेली हत्या ही संपूर्ण मानवजातीची हत्या ठरविली आहे.

म्हणून परत एकदा एक मुसलामन म्हणून मी अतिशय सुस्पष्टपणे नमूद करु इच्छितो की, इस्लाम दडपशाही आणि अत्याचाराचे अजिबात समर्थन करत नाही मग ते कुठल्याही मार्गाने कुठल्याही पद्धतीने किंवा कुठल्याही स्वरुपात केले जात असोत. ही मनाई आदेश निःसंदिग्ध आणि अंतिम स्वरुपाचा आणि कुठल्याही अपवादाशिवाय आहे. यापुढे जाऊन पवित्र कुरआन असेही म्हणतो की, जर एखादा देश किंवा लोक तुमच्याशी शत्रुत्व ठेवून असतील तरी देखील त्यांच्याशी व्यवहार करताना कोणत्याही बाबतीत तुम्ही संपूर्ण न्याय आणि योग्य असे वर्तन ठेवण्यापसून परावृत्त होऊ नये. कोणाचेही शत्रुत्व किंवा प्रतिस्पर्धा तुमच्यामध्ये त्यांच्याप्रती बदला घेण्याची भावना किंवा असंतुलित अतिरेक करण्यास कारणीभूत ठरु नये. पवित्र कुरआनाचा आणखीन एक महत्त्वाचा मनाई आदेश असा आहे की, कोणाचीही संपत्ती आणि संसाधनांकडे लालसेने किंवा ईर्षेने पाहू नये.

मी फक्त काहीं मुद्दे मांडलेले आहेत; परंतु हे मुद्दे अतिशय महत्त्वपूर्ण आहेत, कारण ते समाजात आणि संपूर्ण जगात न्याय आणि शांतीचा पाया रचण्यासाठी कारणीभूत ठरणारे आहेत. मी अशी प्रार्थना करतो की, जगाने या मूलभूत मुद्दाकडे अतिशय गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे की, जेणे करुन जे लोक अन्यायपूर्ण आणि असत्याच्या मार्गाकडे जगाला घेऊन जात असून जगाच्या विनाशास कारणीभूत ठरत आहेत त्यापासून आपण स्वतःला सुरक्षित ठेवू शकू.

मी तुम्हां सर्वांचा थोडासा अधिक वेळ घेतला त्या बद्दल तुम्हा सर्वांशी क्षमा मागतो; परंतु जगात शांती प्रस्थापित करण्याचा विषय खरोखरच अतिशय महत्त्वाचा आहे. हे वास्तव देखील नकारता येणार नाही.

वेळ अतिशय वेगाने निघून जात आहे. खूप उशीर होण्यापूर्वी आपण सर्वांनी या काळाची गरज अतिशय गांभीऱ्याने ध्यानात घेणे आवश्यक आहे. माझे भाषण संपवण्यापूर्वी मी आणखीन एक महत्त्वाच्या गोष्टीकडे आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. जसे की आपण सर्वजण जाणतो की, महारानी ऐलिजाबेत द्वितीय यांचा हिरक महोत्सव सध्या साजरा केला जात आहे. जर आपण घडयाळाचे काटे ११५ वर्षे मागे १८९७ पर्यंत घेऊन गेलोत तर त्या वेळी महारानी विक्टोरिया यांचा हिरक महोत्सव साजरा केला गेला होता. त्या वेळी अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक यांनी महारानी विक्टोरिया यांना शुभेच्छा संदेश पाठवला होता.

त्यांच्या संदेशामध्ये त्यांनी इस्लामच्या शिकवणीबरोबरच ब्रिटीश सरकारच्या स्थैर्यासाठी आणि महारानीच्या दीर्घायुसाठी प्रार्थना देखील केली होती. त्यांच्या संदेशामध्ये अपेक्षित मसीहाने महारानीच्या सरकारच्या ज्या सद्‌गुणांचा आवर्जून उल्लेख केला होता की त्यांच्या सरकाराच्या अधिपत्याखाली सर्व जनतेला संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते.

खरोखरच आजच्या संध्याकाळी या ठिकाणी देखील आपण सर्वजण या स्वातंत्र्याचे अतिश सुंदर उदाहरण अनुभवत आहोत. आज या ठिकाणी विविध आणि वेगवेगळया श्रद्धेचे धर्मांचे आणि निष्ठांचे लोक जगात शांतता प्रस्थापित व्हावी, या एका समान उद्देशाने एकत्रित आले आहेत.
म्हणून अपेक्षित मसीहनी ज्या शब्दात शुभेच्छा दिल्या होत्या, त्यांच्याच शब्दात महारानी ऐलिजाबेथ यांचेही हार्दिक अभिनंदन करत शुभेच्छा देत आहे. त्यांनी म्हटले होते,

आमच्या शुभेच्छा ज्या आनंदाने आणि कृतज्ञतेने भरलेले आहेत, महारानीपर्यंत पोहोचाव्यात आणि आदरणीय महारानी नेहमीसाठी आनंदीत आणि समाधानी राहव्यात.

अपेक्षित मसीह यांनी पुढे महारानी विक्टोरिया साठी आशीर्वाद देतांना ज्या शब्दांचा वापर केला होता त्याच शब्दात महारानी ऐलिजाबेथ यांच्यासाठी प्रार्थना करत आहे.

''**हे शक्मिान आणि महान परमेश्वरा ज्या प्रमाणे आम्ही तिच्या मेहरबानी आणि कृपेने आनंदी जीवन जगत आहोत त्याचप्रमाणे तुझ्या कृपेने आणि आशीर्वादाने महारानीला देखील सुखी ठेव आणि ज्या प्रमाणे आम्ही तिच्या उदार आणि न्यायपूर्ण सत्तेत शांती आणि समृद्धीने जगत आहोत तू देखील तिच्यावर प्रेमाचा आणि कृपेचा वर्षाव कर.**''

अशा प्रकारे सर्वच अहमदी मुस्लिमांच्या, जे ब्रिटीश नागरिक आहेत, कृतज्ञतेचे भावना आहेत. शेवटी मी परत एकदा आपण सर्वजण येथे आलात आणि तुमचे प्रेम, सद्भावना आणि बंधुत्वाचे प्रदर्शन केले त्याबद्दल तुम्हां सर्वांचे अंतःकरणापासून आभार मानतो.

**धन्यवाद.**



# शांती चा मार्ग-
# राष्ट्रांमध्ये न्यायोचित संबंध

कॅपिटॉल हिल,

वॉशिंग्टन डी.सी. यु.एस.ए., २०१२.





The first Muslim Congressman, Keith Ellison meeting Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]




Brad Sherman (Democratic member of the United States House of Representatives) presenting American flag to Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]




Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba] delivers his keynote address at U.S. Capitol Hill




Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba] leading silent prayer at U.S. Capitol Hill



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] during his official tour of U.S. Capitol Hill



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] in U.S. Capitol Hill after his historic address to the US Statesmen and Bureaucrats

## प्रस्तावना

२७ जून २०१२ रोजी कॅपिटॉल हिल वॉशिंग्टन डी.सी. येथे एक ऐतिहासिक घटना घडली. हज़रत अपेक्षित मसीहाचे पाचवे उत्तराधिकारी आणि अहमदिया मुस्लिम जमाअत चे सर्वोच्च नेते आहेत, यांनी एक व्याख्यान दिले, जे ऐकण्यासाठी काँग्रेस चे सदस्य, सिनेट्स, राजदूत, वाईट हाऊज़ आणि स्टेट डिपार्टमेंट चे कर्मचारी, सामाजिक संघटनाचे पदाधिकारी, धार्मिक नेते, प्राध्यापके, राजकीय सल्लागार, शास्कीय कर्मचारी, डिप्लोमॅटिक कोर्पस चे सदस्य, पेन्टागन येथील विचारवंतांचे प्रतिनिधी आणि वेगवेगळया माध्यमांचे पत्रकार हजर होते. या सभे मुळे अमेरिकेच्या काहीं अति प्रभावशाली नेत्यांना, ज्यात आदरणीय नैन्सी पिलोसील, ज्या हाऊज़ ऑफ रिप्रेसेंटेटिवज़ च्या डेमोक्रेटिक पक्षाच्या नेता देखील सामील होते, यांना प्रथमच इस्लामचा जागतिक शांतीबद्दल संदेश ऐकण्याची संधी मिळाली. या उपक्रमानंतर हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांना हॉऊज़ ऑफ रिप्रेसेंटेटिव येथे घेऊन जाण्यापूर्वी, जेथे त्यांनी अमिरेकेला भेट दिल्याबद्दल त्यांच्या सन्मानात एक प्रस्ताव पारीत केला जाणार होता, संपूर्ण कॅपिटॉल हिल ही ईमारत दाखविण्यात आली.

त्या प्रस्तावाच्या प्रास्ताविकातील पहिला परिच्छेद असा आहेः

आदरणीय धर्मगुरू हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद, अहमदिया मुस्लिम समुदायाचे जागतिक आध्यात्मिक आणि व्यवस्थापकीय प्रमुख यांचे वाशिंग्टन डी.सी. येथे स्वागत करताना त्यांची जागतिक शांती, न्याय, अहिंसा, मानवी

अधिकार, धार्मिक स्वतंत्रता आणि लोकशाही, यासाठी त्यांची असलेल्या बांधिलकीबद्दल सम्मान केला जात आहे.

कॅपिटल हिल येथील समारंभात सामील झालेल्या सर्व महाप्रमुख लोकांची यादी.

- यु.एस. सिनेटर रॉबर्ट के.सी पेनसिलवेनिया चे डेमोक्रेटिक सदस्य
- यु.एस. जार्ज कॉर्नीन (रिपब्लिकन टेकसास)
- डेमोक्रेटिक नेत्या नैन्सी पेलोसील (डेमोक्रॅट कॅलीफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस मेन कीथ ईलीसन (डेमोक्रॅट मिन्नेसोटा)
- यु.एस. कॉंग्रेस मेन ब्राडले शेरमन (डेमोक्रॅट कॅलिफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस मेन फ्रेंक वॉल्फ (रिपब्लिकन वर्जिनिया)
- यु.एस. कॉंग्रेस मेन माईकल हौंडा (डेमोक्रॅट केलिफार्निया)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन जेनिट स्मिथ (रिपब्लिकन ओ.ही.ओ)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन जेनिस हान (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन जेनिस शाकोवस्की (डेमोक्रॅट ईल्लीनॉस)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन जैकी स्पीअर (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन जोय लॉग्रेन (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस वुमन शीला जॅक्सन ली (डेमोक्रॅट टेक्सास)
- यु.एस. कॉंग्रेस मेन गॅरी पीटर्स (डेमोक्रॅट मिशीगन)
- यु.एस. कॉंग्रेस मेन थॉमस पेटरी (रिपब्लिकन विराकॉन्सीन)
- यु.एस. कॉंग्रेस मेन एडम स्चिफ (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस. कॉंग्रेस मेन माईकल कॅपवानो (डेमोक्रॅट मेसैचु सेंट्स)
- यु.एस. कॉंग्रेस मेन होवार्ट बरमन (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस कॉंग्रेस वुमन जुडीच (डेमोक्रॅट केलिफोर्निया)
- यु.एस कॉंग्रेस मेन आंद्रे कार्सन (डेमोक्रॅट इंडीयाना)
- यु.एस कॉंग्रेस वुमन लौरा रिचर्डसन (डेमोक्रॅट केलियु.एस कॉंग्रेस

मेन (डेमोक्रॅट केलिफोर्निया)

- यु.एस काँग्रेस मेन लॉईड पो (रिपब्लिकन टेक्सास)
- यु.एस काँग्रेस मेन बर्नि फ्रेंक (डेमोक्रॅट मैसेचुसेट्स)
- यु.एस काँग्रेस मेन ब्रुय ब्रॅली (डेमोक्रॅट आईओवा)
- यु.एस काँग्रेस मेन डेनिस कुसिनीया (डेमोक्रॅट ओहियो)
- यु.एस काँग्रेस मेन ट्रेंट फ्रँक्सा (रिपब्लिकन ऐरिजोना)
- यु.एस काँग्रेस मेन क्रिस मर्फी (डेमोक्रॅट कनेक्टीकट)
- यु.एस काँग्रेस मेन हॉक जॉनसन (डेमोक्रॅट जॉर्जिया)
- यु.एस काँग्रेस मेन जॅम्स सिलीवर्न (डेमोक्रॅट सॉऊथ रोलीना)
- हीज ऐक्सीलन्सी बोकारी कोर्ट स्टीवेन्ज, सीरा लीयोन चे अमेरिकेतील राजदूत
- डॉ. कैटरीना लैंटोस स्वैट अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय धमृ स्वातंत्र आयोगाच्या सभापति
- आदरणीय कीम केने (वर्जिनिया ची माजी राज्यपाल)
- राजदूत सुसान बक्र (अध्यक्ष बराक ओबाम यांचे आण्विक प्रसार नियंत्रण संस्थेचे विशेष प्रतिनिधी)
- राजदूत सुझान जॉनसन (अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र चे विशेष राजदूत)
- आदरणीय खाली अल जलाहिया (अमेरिकेती बहरैन राजवटीच्या वकीलातीचे उपप्रमुख)
- मा. मॉन्सीग्नर जीन फ्राँकौस लान थ्युमी (दी अपॉस्टोलीक नंसीएचर ऑफ दी होली सी टु द युनाईटेस स्टेस्स चे प्रथम उपप्रमुख)
- मिस साराह अल ओजाईली (अमेरिकेतील सलतनत ऑफ ओमानच्या वकीलातीचे पब्लिक अफेर्स व लाईसन्स ऑफिसर)
- मा. सलीम अल किन्दी (अमेरिकेतील सलतनत ऑफ ओमानाच्या

वकीलातीचे प्रथम सचीव)

- मिस फौजिया फयाज (अमेरिकेतील पाकिस्तान वकीलातीचे प्रतिनिधी)
- आदरणीय सईदा जैद (अमेरिकेतील मौरोक्को वकीलातीचे कौंसलर)
- आदरणीय नबील मुनीर (सुरक्षा परिषदेचे चौथे मंत्री, संयुक्त राष्ट्र संघाच्या पाकिस्तान चे कायम मिशन)
- मा. जोसेफ रेगली (अमेरिकेतील स्वीझरलैंड वकीलातीचे मंत्री)
- मा. अलीसा ऐरेस (डेप्युटी अस्टिंट फॉर सॉऊथ ॲण्ड सेन्ट्रल आशिया यु.एस. डिपार्टमेंट ऑफ स्टेट)
- राजदूत कार्ल ईन्डरफरद (सिनियर ॲडवाईजर ॲण्ड वाधवानी चेयर यु.एस.-इंडीया पोलीस स्डीज सेंटर फॉर स्ट्रॉटिजीक अण्ड इंटरनॅशलन स्डीज)
- मा. डोनाल्ड ए कॅम्प (सिनियर असोसियेट सेंटर फॉर स्ट्रॉटिजीक अण्ड इंटरनॅशलन स्डीज)
- राजदूत जॅकी वॉलकॉट (ऐक्जीक्युटीव डॉयरेक्टर यु.एस. कमिशन अण्ड इंटरनॅशनल रिलिज्यस फ्रीडम)
- डॉ. अजीजा अल हिबरी (कमिशनर यु.एस. कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिज्यस फ्रीडम)
- मा. एसीया लॅगेट कौन्टी (ऐक्जीक्युटीव मोन्टेगो मेरी कौन्ट, मेरी लैंड)
- मिस- विक्टोरिया अलबाराडो (डायरेक्टर ऑफिस ऑफ इंटरनॅशनल रिलिज्यस फ्रीडम, यु.एस. डीपार्टमेंट ऑफ स्टेट)
- डॉ. इमामुद्दीन अहमद (डायरेक्टर मीनारत ऑफ फ्रीडम इंस्टीट्युट
- डॉ. जैनब अलवानी (अस्सिटंट प्रोफ. ऑफ इस्लामिक स्डीज होवार्ड विद्यापीठ)

- मिस डेबोरा बेनेडिक्ट (असासियेट कौन्सील यु.एस. सिटीझनशीप अण्ड ईमीग्रेशन सर्विसेस डिपार्टमेंट ऑफ होम लॉण्ड सेक्युरिटी)
- मिस लोरा बर्ज (सिनियर एडवाईजर टु स्पेशल रिप्रसेन्टेटीव टु मुस्लिम कम्युनिटीज, यु.एस डिपार्टमेंट ऑफ स्टेट)
- डॉ. चालर्स बट्टरस्वर्थ प्रो. (ईमेरीटस ऑफ गवरमेंट अण्ड पोलिटीक्स युनिवर्सिटी ऑफ मेरी लैण्ड कॉलेज पार्क)
- फादर जॉन क्रोसीन (एक्जीक्युटीव डाम्यरेक्टर फॉर इंटररिलिज्यस अफैर्स)
- मेजर (निवृत्त) फ्रांझ गेल (सिनियर साईन्स एडवाईजर यु.एस. मरीन कोपर्स)
- डॉ. सुई गुरा वादेना वॉघ (डॉयरेक्टर ऑफ इंटरनॅशनल फ्रिडम अण्ड सॉऊथ ईस्ट एशिया प्रोगाम्स हाऊज)
- मिस्टर फांक झंन्नुझी (हेड ऑफ वॉशिंग्टन ऑफिस एमनेस्टी इंटरनॅशलन यु.एस.ए)
- मिस्टर टी. कुमार (इंटरनॅशनल ऑडवोकेसी हेमनेसटी)
- मा. जॉर्ज लेनवनथल (मेम्बर ऑफ मोंटेगो मेरी कौन्टी कौन्सील)
- मा. आमीर लतीफ (विझीटींग फेलो वादवानी चेयर इन यु.एस. ए इंडीया पोलीसी स्टीजस सेंटर फॉर स्ट्राटिजिक अण्ड इंटरनॅशनल स्डीज)
- मा. टीम लेन्डर किंग (डायरेक्टर ऑफ पाकिस्तान डेरक ऑफिस यु.एस. स्टेट डिपार्टमेंट
- मा. जलाल मलक (इंटरनॅशनल अफैर्स आफिसर यु.एस. आर्मी नॅशनल)
- मा. नवीद मलीक (फॉरीन सर्विस ऑफिसर यु. एस.डिपार्टमेंट ऑफिस)

- मिस. डालीया मोगाहेड (सिनियर अनैलिस्ट ॲण्ड एक्जिक्युटिव डॉयरेक्टर गालेप सेंटर फॉर मुस्लिम स्डीज)
- मा. पॉल मोनटेरियो (असोसियेट डॉयरेक्टर वाईट हाऊज ऑफिस ऑफ पब्लिक इंकरेजमेंट)
- मेजर जनरल डेविड कॅन टॉक (युनाईटेड स्टेसस आर्मी प्रोवोस्ट जनरल)
- मिस. टीना रामीरेम (डायरेक्टर ऑफ इंटरनॅशनल ॲण्ड गव्हरमेंट रिलेश्न्स, द बिकेड फंड)
- मा. रब्बी डेविड सॅपरस्टेन (डायरेक्टर ॲण्ड कौन्सील , रिलीजीयस ऑक्शन सेंटर फॉर रिफार्म जूडाईझम)
- मा.चॅपलिन (ब्रिगेडर जनरल अल्फोन्स स्टेफिनसन)
- मा. कनोझ थेम्स, (डायरेक्टर ऑफ पॉलीसी अण्ड रिसर्च, यु. एस.)
- मा. एरिक ट्रीन, (स्पेशल कौन्सील फॉर रिलिजियस डिस्क्रीमीनेशन)
- डॉ. हसन अब्बास (प्रोफ रिजनल ॲण्ड एनैलाटिकल स्टीज डिपार्टमेंट)
- मा. मलीस सिराज अकबर (नॅशनल एन्डोमेंट ऑफ डोमोक्रेसी)
- मा. मैथ्यु असाडा (कॉंग्रेशियल फेलो)
- मिस. स्टॉकी बरडेट (डायरेक्टर ऑफ गव्हरमेंट आणि नॅशनल आर्फर्स)
- मिस. एलिजाबेथ कासीडी (डेप्युटी डायरेक्टर फॉर पॉलीसी ॲण्ड रिसर्च, यु.एस)
- मिस. ऐमी च्यू (डायरेकटर ऑफ मिडीया, अमेरिकन इस्लामिक कॉंग्रेस)
- मा. कार्नेलियस क्रेमीन (डिपार्टमेंट ऑफ स्टेट, फॉरिन अर्फर्स फार

पाकिस्तान)

- मा. सदानंद धुमे (अमेरिकन एन्टरप्राईसेज इंस्टीट्यूट)
- मा. रिचार्ड गाथरो, (डीन ऑफ न्याक कॉलेज)
- मा. जोई ग्रीबोस्की (चेयरमेन, इंस्टीट्यूट ऑन रिलिजन ॲण्ड पब्लिक पोलीसी)
- मिस. साराह ग्रीबोस्की (इंस्टीट्यूट ऑन रिलिजन ॲण्ड पब्लिक पॉलीसी)
- डॉ. मॅक्स (ॲडजंक्ट प्रोफेसर)
- डॉ. रियार हैदर (क्लिनीकल प्रोफेसर ऑफ मेडिसीन)
- मिस. हुमा हक्क (अस्सिटंट डायरेक्टर, साऊथ एशिया सेंटर)
- मा. जय कनसारा (हिंदु अमेरिकन फाउंडेशन)
- मा. हमीद खान (यु.एस. इंस्टीट्यूट ऑफ पीस)
- मिस. वेलीरे (असोसियेट फॉर रेफयूजीस)
- मा. अलेक्स क्रेनोम (युनीटी प्रोडक्शन्स)
- मा. पॉल लिबेन (एक्जीकेटिव रायटर, यु.एस)
- मिस. ऐमी लिलीस (फॅारीन अफॅर्स ऑफिसर, यु.एस)
- मा. ग्राहम मेसन (लेजिस्लेटीव अस्सिटंट)
- मिस. लॅरेन मारकोई (रिलिजन न्यूज सेर्वीस)
- मा. डान मेरीका (सि.एन.एन. कॉम)
- मा. जोसेफ मोंटवेली (सिनियर असोसियेट, मेरीमेक)
- मा. एरोन मायर्स (प्रोग्राम ऑफिसर फ्रीडम हाऊज)
- मि. अतिया नसर (कोआरडिनेटींग ऑफिसर, यु.एस)
- मि. मॅक्लेन नेजर (यु.एस पोलीसी व ॲडवोकेसी)
- डॉ. एलीयट पॅरीस (बोवी स्टेट विद्यापीठ)
- मा. जोन पीना (डायरेक्टर ऑफ गव्हरमेंट, अमेरिकन इस्लामिक

काँग्रेस)

- मा. आरीफ रफीक (मिडल ईस्ट इंस्टीट्यूट)
- मि. माया राजारत्नाम (अमेनेसटी इंटरनॅशनल)
- मिस. रेचल सौर (डीन ऑफ कॉलेज)
- डॉ. जेरोम स्कीली (डीन ऑफ कॉलेज)
- मिस. समानता स्कीटनाईझर (यु.एस. कमिशन स्टाफ)
- डॉ. मेरी होप (सिनियर प्रोग्राम ऑफिसर, इंस्टिट्यूट फॉर पीस)
- मिस. साराह (द बँकेट फंड)
- डॉ. फ्रांक सेलीन (किर्गीस्तान डेरक ऑफिसर)
- मिस. अना ली (ख्रिस्चन सोलीडॅरिटी)
- मिस. कालिंदा स्टेफिनसन (प्रोफेशनस स्टाफ)
- मा. जार्डन तामा (लीड डेमोक्रॅटीक स्टाफर)
- मा. शान टंडन (ए.एफ. पी)
- मा. विलह्युमस (प्रोफेसर ऑफ रिलिजन, कॅथेलिक विद्यापीठ)
- मा. ॲनथनी वान्स (डायरेक्टर, बहाई ऑफ यु.एस)
- मा. जिहाद सालेह विलियम्स (इस्लामिक रिलिफ, यु.एस.)
- मिस. एमेला वांग (चीफ स्टाफ टु काँग्रेसवुमन)
- मिस. मोह शर्मा (लेजिस्लेटिव फॅलो टु काँग्रेसवुमन)

यु.एस.- काँग्रेस हाऊज़ रेज़्यूलेशन ७०९

AUTHENTICATED
U.S. GOVERNMENT
INFORMATION
GPO



112TH CONGRESS
2D SESSION

# H. RES. 709

Welcoming His Holiness, Hadhrat Mirza Masroor Ahmad, the worldwide spiritual and administrative head of the Ahmadiyya Muslim Community, to Washington, DC, and recognizing his commitment to world peace, justice, nonviolence, human rights, religious freedom, and democracy.

---

IN THE HOUSE OF REPRESENTATIVES

JUNE 27, 2012

Ms. ZOE LOFGREN of California (for herself, Mr. SHERMAN, Mr. CONNOLLY of Virginia, Mr. HINCHEY, Ms. ESHOO, Ms. SPEIER, Ms. RICHARDSON, Mr. SCHIFF, Ms. SCHAKOWSKY, Mr. HONDA, Mr. WOLF, Mr. PETERS, Mr. DENT, Ms. CHU, Mr. BERMAN, Mr. FRANKS of Arizona, Ms. JACKSON LEE of Texas, Ms. SCHWARTZ, Mr. BRALEY of Iowa, and Mr. MCGOVERN) submitted the following resolution; which was referred to the Committee on Foreign Affairs

---

# RESOLUTION

Welcoming His Holiness, Hadhrat Mirza Masroor Ahmad, the worldwide spiritual and administrative head of the Ahmadiyya Muslim Community, to Washington, DC, and recognizing his commitment to world peace, justice, nonviolence, human rights, religious freedom, and democracy.

Whereas, from June 16, 2012, to July 2, 2012, His Holiness, Hadhrat Mirza Masroor Ahmad, the worldwide spiritual and administrative head of the Ahmadiyya Muslim Community, an international religious organization with mil-

lions of members across the globe, is making a historic visit to the United States;

Whereas His Holiness was elected to become fifth Khalifa to Mirza Ghulam Ahmad, a lifelong position, on April 22, 2003;

Whereas His Holiness is a leading Muslim figure promoting peace, who in his sermons, lectures, books, and personal meetings has continually advocated the Ahmadiyya values of service to humanity, universal human rights, and a peaceful and just society;

Whereas the Ahmadiyya Muslim Community has suffered repeated hardships, including discrimination, persecution, and violence;

Whereas, on May 28, 2010, 86 Ahmadi Muslims were killed in Lahore, Pakistan, when two mosques belonging to the Ahmadiyya Muslim Community were attacked by anti-Ahmadiyya terrorists;

Whereas despite the continued sectarian persecution that Ahmadi Muslims are subjected to, His Holiness continues to forbid violence;

Whereas His Holiness has traveled globally to promote and facilitate service to humanity, meeting with presidents, prime ministers, parliamentarians, and ambassadors of state;

Whereas during his visit to the United States, His Holiness will meet thousands of American Muslims in addition to significant United States Government leaders in order to strengthen relationships and find means of establishing peace and justice for all people; and

Whereas, on the morning of June 27, 2012, His Holiness will deliver the keynote address at a special bipartisan recep-

tion at the Rayburn House Office Building on Capitol Hill, "The Path to Peace: Just Relations Between Nations": Now, therefore, be it

*Resolved,* That the House of Representatives—

(1) welcomes His Holiness, Mirza Masroor Ahmad to Washington, DC;

(2) commends His Holiness for promoting individual and world peace, as well as individual and world justice; and

(3) commends His Holiness for his perseverance in counseling Ahmadi Muslims to eschew any form of violence, even in the face of severe persecution.

○

## ११२ काँग्रेस दुसरे सत्र **हाऊज़ रेज़्यूलेशन** - ७०९

परम आदरणीय हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद, जागतिक अहमदिया मुस्लिम समुदायाचे आध्यात्मिक व व्यवस्थापकीय प्रमुख यांचे वाशिंग्टन डी.सी. मध्ये स्वागत आणि त्यांच्या जागतिक शांती, न्याय, अहिंसा, मानवी अधिकार, धार्मिक स्वातंत्र आणि लोकशाही बद्दल असलेल्या बांधिलकीचा गौरव.

प्रतिनिधी गृहामध्ये २७ जून २०१२, मिस झोय ग्रेन ऑफ केलिफोर्निया (स्वतः) मिस्टर शेरमन, मिस्टर पोन्नोली ऑफ वर्जिनिया, मिस्टर हीनचे, मिस. इरिश्यू, मिस. स्पीयर, मिस रिचर्डसन, मिस्टर स्चीफ, मिस. शारकोवस्की, मिसटर होंडा, मिस्टर वॉल्फ, मिस्टर पीटर्स, मिस्टर डेन्ट, मिस चू, मिस्टर बरमन, मिस्टर फांक्स, मिस. जॅक्सन ली ऑफ टेक्सास, मिस. श्वार्डस, मिस्टर ब्रेली ऑफ आइ. ओ.वा आणि मिस्टर मॅक गवर्न, यांनी विदेश व्यवहार समितीला खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला.

**प्रस्ताव**

परम आदरणीय हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांचा वाशिंगटन, डी.सी. मध्ये स्वागत आहे आणि जगभरात शांती, न्याय, अहिंसा, मानवाधिकार, धार्मिक स्वातंत्र्य आणि लोकशाही धोरणाबद्दल त्यांचे प्रयत्न व बांधिलकी प्रशंसनीय आहे.

ज्या अर्थी हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद,जागतिक अहमदिया मुस्लिम समुदाय, जे एक आंतरराष्ट्रीय धार्मिक संघटना आहे, ज्याचे जगभर लक्षावधी सदस्य आहेत, चे आध्यात्मिक आणि व्यवस्थापकीय प्रमुख हे १६ जून २०१२ पासून २ जूलै २०१२ पर्यंत अमेरिकेच्या ऐतिहासिक दौरा करत आहे.

ज्या अर्थी परम आदरणीय हे २२ अप्रैल २००३ रोजी मिर्ज़ा गुलाम अहमद यांचे आजीवन पाचवे ख़लीफा म्हणून निवडले गेले.

ज्या अर्थी परम आदरणीय हे मुस्लिम समुदायाचे अग्रगण्य नेते असून, ते

त्यांच्या प्रवचनात, व्याख्यानात, ग्रंथात आणि व्यक्तिगत भेटीत सतत मानवतेची सेवा, जागतिक मानवाधिकार आणि एक शांतीपूर्ण आणि न्यायपूर्ण समाजाप्रती अहमदिया मूल्याचे प्रसार करत असतात.

ज्या अर्थी अहमदिया मुस्लिम समुदाय हा वारंवार कठीण परिस्थितीशी सामना करत असतो, ज्यात पक्षपात, अत्याचार आणि हिंसा सामील आहे;

ज्या अर्थी २८ मे २०१२ रोजी ८६ अहमदी मुसलमानांना लाहोर, पाकिस्तान येथे मारले गेले होते, जेव्हा अहमदिया मुस्लिम समुदायाच्या दोन मशिदींवर अहमदिया विरोधीं दहशतवाद्यांनी हल्ला केला होता;

ज्या अर्थी अहमदिया मुस्लिमांना वारंवार सांप्रदायिक अत्याचाराचे बळी ठरविले जाते; तरी देखील परम आदरणीय आपल्या समुदायाला हिंसेस मनाई करत आल्या आहेत;

ज्या अर्थी परम आदरणीय जगभर फिरून राष्ट्राध्यक्षांची, प्रधानमंत्री, संसद सदस्यांशी आणि वेगवेगळया राज्यांच्या राजदूतांशी भेटून मानवतेच्या सेवेला प्रवृत्त करण्यासाठी प्रयत्नशील आहेत;

ज्या अर्थी त्यांच्या अमेरिकेच्या भेटीत ते अमेरिकन सरकारच्या प्रमुख नेत्याशिवाय हज्जारो अमेरिकन मुस्लिमांना भेटून आपसातील संबंधांना मजबूत करण्यासाठी आणि सर्व जनतेसाठी शांती आणि न्याय प्रस्थापित करण्याचे मार्ग शोधत आहेत; आणि

ज्या अर्थी २७ जून २०१२ च्या सकाळी परम आदरणीय हे कॅपिटल हिल च्या रेबर्न हॉऊज़ ऑफिस बिल्डींग मध्ये एका विशेष स्वागत समारंभा मध्ये शांती चा मार्ग - राष्ट्रांमध्ये न्यायोचित संबंध, या विषयावर बीजभाषण देणार आहेत;

म्हणून खालील प्रमाणेः

१)हे प्रतिनिधी गृह प्रस्ताव पारीत करत आहे की-

१. परम आदरणीय मिर्ज़ा मसरुर अहमद यांचे वाशिंग्टन डी.सी मध्ये

स्वागत करण्यात येते;

२. परम आदरणीय यांच्या वयैक्तिक व जागतिक शांती तसेच वयैक्तिक आणि जागतिक न्याय प्रोत्साहित करण्याबद्दल गौरव करत आहे; आणि

३. परम आदरणीय यांच्या, अहमदी मुस्लिमांना अत्याधिक उत्पीडणाचा सामना असतानाही हिंसेपासून परावृत्त करण्यासाठी चिकाटीने मार्गदर्शन करण्याच्या कार्याबद्दल गौरव करत आहे.

# शांती चा मार्ग-
# राष्ट्रांमध्ये न्यायोचित संबंध

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम - अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू आणि असीम कृपाळू आहे.

सर्व मान्यवर पाहूणांना अस्सलामू अलैकूम व रहमतुल्लाह व बरकातहू.(शांती आणि कृपा होवो अल्लाहची आपणा सर्वांवर)

सुरू करण्यापूर्वी मी आपण सर्वजण, आपला अमूल्य वेळ खर्च करुन माझे विचार ऐकण्यासाठी या ठिकाणी आलात, त्याबद्दल आपणा सर्वांचे आभर मानतो. मला अशा विषयावर बोलण्याची सूचना करणात आली आहे जो अतिशय विस्तृत आणि व्यापक आहे. त्याचे अनेक वेगवेगळे पैलू आहेत, त्याचा सर्वांचा परामर्श घेणे उपलब्ध असलेल्या थोडया वेळामध्ये मला शक्य नाही. मला देण्यात आलेला विषय जागतिक शांती प्रस्थापना असा आहे. निश्चितच हा विषय अतिशय महत्त्वपूर्ण आणि आजच्या जगाला प्रभावित करणारा आहे; तरी पण नियोजित वेळेमध्ये मी थोडक्यात प्रयत्न करुन न्यायपूर्ण आणि समानतेवर आधारित वेगवेगळया राष्ट्रांच्या आपसातील संबंधांच्या माध्यमातून शांती प्रस्थापनेचा ईस्लामी दृष्टीकोन आपल्या समोर ठेवीन.

हे वास्तव आहे की, शांती आणि न्याय एकमेकापासून वेगळे करताच येत नाही. तुम्ही एकाला वगळून दुसऱ्याला प्राप्त करु शकत नाहीत. हा सिद्धांत असा आहे की, सर्वच ज्ञानी आणि बुद्धीमानी लोक निश्चितच समजू शकतात, असे लोक ज्यांनी जगामध्ये अराजकता निर्माण करण्याचा निर्धारच केला आहे, त्यांना सोडल्यास कोणतीही व्यक्ति असे म्हणू शकत

नाही की, कोणत्याही समाजात, देशात किंवा संपूर्ण जगात सुद्धा, जर न्याय आणि निष्पक्ष व्यवहार केला जात असेल तेथे अशांती किंवा अराजक निर्माण होऊ शकते. तथापि आपण पाहतो की, जगाच्या अनेक भागांमध्ये अराजकता आहे आणि अशांती पसरलेली आहे. अशी अराजकता देशाच्या अंतर्गत भागामध्ये सुद्धा तसेच बाह्य स्वरुपात वेगवेगळया राष्ट्रांच्या आपसातील संबंधातून स्पष्टपणे दिसून येते. अशी अराजकता आणि संघर्षमय स्थिती, जरी सर्वच शासन व्यवस्था न्यायावर आधारित धोरणे ठरविण्याचा दावा करत असल्या तरी, अस्तित्वात आहेत. सगळेच असा दावा करतात की, शांती प्रस्थापित करणे ही त्यांची पहिली प्राथमिकता आहे. तरी देखील सामान्यतः जगामध्ये अस्वस्थता आणि तनावपूर्ण स्थिती वाढतच चालली आहे याबद्दल अजिबात शंका नाही आणि त्यामुळे अराजकता पसरत चालली आहे. यावरून स्पष्टपणे सिद्ध होते की, न्यायाची गरज कोणत्या तरी पातळीवर पूर्ण केली जात नाही. म्हणून ही तातडीची गरज आहे की, जेथे आणि ज्या स्वरुपात विषमता आढळून येते ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे. म्हणून अहमदिया मुस्लिम समुदायाचा जागतिक पातळीवरील प्रमुख या नात्याने, मी न्यायावर आधारित शांती प्रस्थापित करण्याची गरज आणि मार्ग याबद्दल काहीं विचार मांडण्याचा प्रयत्न करेन.

अहमदिया मुस्लिम समुदाय हा शुद्ध धार्मिक समुदाय आहे. आमचा असा दृढ विश्वास आहे की तो मसीहा आणि सुधारक, जो इस्लामच्या खऱ्या शिकवणुकींच्या आधारावर या जगाला प्रकाशमान करण्याच्या हेतूने या काळासाठी अवतरीत होणे निर्धारित होता, तो निश्चितच अवतरीत झाला आहे. आमची अशी श्रद्धा आहे की, आमच्या पंथाचे संस्थापक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी हेच ते अपेक्षित मसीहा आणि सुधारक होते आणि म्हणून आम्ही त्यांना कबूल केले आहे. त्यांनी पवित्र कुरआनावर आधारित इस्लामची खरी आणि वास्तविक शिकवण जगभर

पसरविणे, आपल्या अनुयायींवर बंधनकारक ठरविले. म्हणून मी जे काहीं शांती प्रस्थापनेच्या संदर्भात बोलेन आणि आंतरराष्ट्रीय न्यायोच्चित संबंधांच्या संदर्भात बोलेन, ते सर्व पवित्र कुरआनाच्या शिकवणीवर आधारलेले असेल. जागतिक शांती प्रस्थापनेच्या संदर्भात तुम्ही सर्वजण तुमचे विचार सातत्याने मांडत असतात आणि त्यासाठी खूप प्रयत्न देखील करत असतात. तुमची रचनात्मक आणि प्रगल्भ बुद्धिमत्ता तुम्हाला, महान विचार योजना आणि शांतीचा खराखुरा दृष्टीकोन मांडण्यात प्रवृत्त करत असते. म्हणून या विषयावर भौतिक किंवा राजकीय दृष्टीकोनातून बोलण्याची मला गरज वाटत नाही; परंतु त्या ऐवजी धर्माच्या माध्यमातून शांती कशी प्रस्थापित केली जाऊ शकते यावरच माझा संपूर्ण भर असेल. यासाठी, मी जसे सुरूवातीलाच म्हटले, त्याप्रमाणे पवित्र कुरआनाच्या शिकवणूकीतील काहीं अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे आपणासमोर नमूद करेन.

ही गोष्ट नेहमीच लक्षात ठेवायला हवी की, मानवी ज्ञान आणि बुद्धिमत्ता परिपूर्ण नाही, तर सत्य हे आहे की, ती मर्यादित आहे. म्हणून जेव्हा काहीं निर्णय घेण्याची वेळ येते किंवा काहीं विचार व्यक्त करण्याचा प्रसंग येतो, तेव्हा अनेक वेळा काहीं गोष्टी मानवी मनामध्ये प्रवेश करतात, जे न्यायाला प्रभावित करु शकतात आणि व्यक्तीला स्वतःचेच अधिकार मिळविण्याचा प्रयत्न करण्यास प्रवृत्त करतात. परिणामस्वरूप हे अयोग्य निर्णय, अयोग्य परिणाम निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. ईश्वरीय नियम हा सर्वार्थाने परिपूर्ण असल्यामुळे कुठलेही हितसंबंध आणि अन्याय तडजोडीचा प्रश्नच उद्भवत नाही. याचे कारण असे की, परमेश्वर नेहमीच आपल्या निर्मितीच्या भल्याचा आणि उन्नतीचीच इच्छा बाळगतो. आणि म्हणून त्याचा कायदा हा नेहमीच संपूर्ण न्यायावर आधारित असतो. ज्या दिवशी जगभरातील लोक हा महत्त्वपूर्ण मुद्दा मान्य करतील आणि समजून घेतील तो दिवस खऱ्या अर्थानी शाश्वत शांतीचा पाया रचन्याचा दिवस ठरेल. अन्यथा आपण

जागतिक शांती प्रस्थापनेचे अर्थ प्रयत्न करत राहिलो तरी त्याचे योग्य ते परिणाम दिसून येणार नाही.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर काहीं देशांचे नेते भविष्यामध्ये सर्व राष्ट्रांमध्ये चांगले आणि शांतीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचे इच्छूक होते, त्यामुळे जागतिक शांती स्थापनेचा प्रयत्न म्हणून लीग ऑफ नेशन्स ची स्थापना करण्यात आली. तिचा मूळ उद्देश जगात शांतता कायम राखणे आणि भविष्यात युद्धाचा प्रसंग उद्भवणार नाही याची काळजी घेणे हा होता. दुर्दैवाने लीग चे नियम आणि पारीत केलेले ठरावांमध्ये काहीं दोष आणि कमकुव्वत दुवे होते. म्हणून त्यांच्या माध्यामातून सर्व लोकांच्या आणि सर्व राष्ट्रांच्या अधिकारांचे रक्षण समान पातळीवर आणि योग्य पद्धतीने होऊ शकले नाही. परिणामस्वरूप असमानता ज्या आढळून आल्या त्यांच्या परिणाम दीर्घकालीन शांती टिकू शकली नाही. लीग चे सर्व प्रयत्न फसले आणि त्याचा सरळ परिणाम दुसऱ्या महायुद्धच्या स्वरुपात समोर आला.

आपण सर्वच अवगत आहोत की, जो अभूतपूर्व विध्वंस आणि विनाश झाला, ज्यामध्ये संपूर्ण जगात ७५ दशलक्ष लोक मृत्युमुखी पडले, ज्यातील बहुसंख्य निष्पाप नागरिक होते ते युद्ध जगाचे डोळे उघण्यासाठी पुरेसे होते. जगात सर्वांचे योग्य ते अधिकार बहाल करण्याचे शहाणपणाचे निर्णय, जे न्यायावर आधारित असायाला हवे होते, त्या दृष्टीने हे युद्ध कारणीभूत ठरले असते, तर ते योग्य झाले असते. जगातील सर्व शासनांनी काहीं प्रमाणात त्या दृष्टीने जरुर प्रयत्न केले आणि शांतता प्रस्थापित करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना केली; परंतु थोडयाच कालावधीमध्ये हे दिसून आले की संयुक्त राष्ट्रसंघ स्थापनाचा जो महान उद्देश होता तो पूर्ण होऊ शकला नाही. खरे पाहिल्यास आज काहीं शासनकर्ते अशी विधान करतात की ज्यामुळे त्याचे अपयश सिद्ध होते.

आंतरराष्ट्रीय संबंध जे न्यायावर आधारित आणि शांती प्रस्थापना

करण्यास उपयोगी होऊ शकतात या संदर्भात इस्लाम काय म्हणतो? पवित्र कुरआना मध्ये सर्वशक्तिमान अल्लाहने अतिशय स्पष्ट केले आहे की, आपले राष्ट्रीयत्व किंवा वांशिक पार्श्वभूमी फक्त आपल्या परिचयाचेच साधन आहे आणि ते कुठल्याही प्रकारच्या श्रेष्ठत्वाचे कारण ठरत नाही.

पवित्र कुरआन हे स्पष्ट करतो की, सर्व लोक एक समान जनमले आहेत. या पुढे जाऊन पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी त्यांच्या शेवटच्या प्रवचनात सर्व मुस्लिमांना सूचित केले की, हे नेहमी लक्षात असूद्या की, एक अरब व्यक्ति बिगर अरब व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ नाही. आणि एक बिगर अरब व्यक्ति अरब व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ नाही. त्यांनी शिकवण दिली की, गोरा व्यक्ती काळी व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ नाही तसेच काळी व्यक्ती गोऱ्यापेक्षा श्रेष्ठ नाही. म्हणून इस्लामची ही स्पष्ट शिकवण आहे की, सर्व राष्ट्रीयत्वाचे आणि सर्व वंशाचे लोक समान आहेत आणि हे सुद्धा स्पष्ट करण्यात आले आहे की, सर्व लोकांना कुठल्याही पक्षपाताविना किंवा पूर्वग्रहाविना समान अधिकार बहाल केले पाहिजेत. हाच विभिन्न गटांमध्ये आणि विभिन्न राष्ट्र ांमध्ये समंजस निर्माण करण्याचा आणि शांतता प्रस्थापन्याचा पाया रचन्याचा स्वर्णीम सिद्धांत आणि गुरूकिल्ली आहे. तथापि आज आपण पाहतो की, शक्तिशाली आणि दुर्बल राष्ट्रांमध्ये स्पष्ट विभाजन झालेले आहेत. उदाहरणार्थ संयुक्त राष्ट्रसंघामध्ये उघडपणे काहीं देशांना विशिष्ट दर्जा प्राप्त आहे. म्हणून सुरक्षा परिषदेमध्ये काहीं सदस्य स्थायी तर, काहीं सदस्य अस्थायी आहेत. हे विभाजन अंतर्गत तनाव आणि नैराश्य निर्माण करण्यास कारणीभूत ठरत असून आपण सतत असे अहवाल ऐकत असतो की, काहीं देश या असमानते विरूद्ध निषेध व्यक्त करत असतात. इस्लाम सर्व बाबतीत संपूर्ण न्याय आणि पूर्ण समतेची शिकवण देतो आणि म्हणून मी पवित्र कुरआना च्या अध्याय ५ आयत ३ मध्ये अतिशय महत्त्वपूर्ण मार्गदर्शन तत्त्व पाहू शकतो. या आयती मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, न्यायाच्या गरजां परिपूर्ण

करण्यासाठी सर्व लोकांना समान वागणूक देणे आवश्यक आहे, जरी ते त्यांच्या घृणेत आणि शत्रुत्त्वात सर्व मर्यादा पार करत असले तरी त्यांच्या समतापूर्ण आणि यथायोग्य व्यवहारच केला पाहिजे. पवित्र कुरआन अशी शिकवण देतो की, जेथे कोठे आणि जो कोणी तुम्हाला चांगूलपणा आणि नैतिकतेचा सल्ला देत असेल तर तो स्वीकारा आणि जेथे कोठे आणि जो कोणी तुम्हाला वाईट गोष्टीचा आणि अयोग्य सल्ला देत असेल तर तो तुम्ही नकारा.

आता असा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो की, इस्लामनुसार न्यायाचा मानक काय आहे. पवित्र कुरआनाच्या अध्याय ४ आयत १३६ मध्ये नमूद केले आहे की, तुम्ही स्वतःविरूद्ध किंवा तुमच्या आई-वडीलां विरूद्ध किंवा तुमच्या अतिशय प्रीय व्यक्ती विरूद्ध सुद्धा न्याय आणि सत्य स्थापित करण्यासाठी गरज पडेल तेव्हा साक्ष द्यायला हवी. शक्तिशाली आणि श्रीमंत राष्ट्रांनी गरीब आणि अविकसित देशांचे अधिकार स्वतःच्या अधिकारांच्या संरक्षणासाठी हिरावून घेऊ नयेत. आणि गरीब राष्ट्रांशी व्यवहार करताना त्यांनी अन्यायपूर्ण मार्गांचा अवलंब करु नयेत. दुसऱ्या बाजूला गरीब आणि अशक्त राष्ट्रांनी देखील त्यांना संधी मिळेल तेव्हा शक्तिशाली किंवा श्रीमंत राष्ट्रांना हानी पोहोविण्याचा प्रयत्न करु नये. त्याऐवजी दोन्ही बाजूंनी न्यायाच्या सिद्धांताला पूर्णपणे बांधील रहावे. वास्तविक पाहता ही गोष्ट विविध देशांमध्ये आपसातील शांतीपूर्ण संबंध कायम ठेवण्यासाठी अतिशय महत्त्वाची आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट जी न्यायावर आधारित राष्ट्र-राष्ट्रांतील संबंध कायम ठेवण्यासाठी पवित्र कुरआनाच्या अध्याय १५ मधील ८९ व्या आयतीत दिली आहे ती अशी की, कोणत्याही पक्षाने दुसऱ्यांच्या संसाधनांना आणि संपत्तीला लालसेने पाहू नये. त्याचप्रमाणे कोणत्याही देशाने अन्य देशाच्या संसाधनांवर त्यांना मदत करत असल्याचा खोटा बाहाणा करु नये. अतिक्रमण

करु नये. म्हणून कोणत्याही सरकारने तांत्रिक विशेषज्ञ पुरविण्याच्या नावावर दुसऱ्या राष्ट्रांच्या, अन्यायपूर्ण व्यापारी करार आणि निविदा प्राप्त करण्याच्या मार्गाने गैर फायदा घेऊ नये. त्याचप्रमाणे कुशल विशेषज्ञ किंवा सहकार्य पुरवण्याच्या नावावर सरकारांनी विकसनशील देशांच्या नैसर्गिक संसाधनांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करु नये. ज्या ठिकाणी अल्प शिक्षित लोकांना किंवा सरकारांना त्यांच्या नैसर्गिक संसाधनाचा योग्य पद्धतीने वापर करण्याचे प्रशिक्षण देण्याचे गरज असेल तेव्हा ते अवश्य देण्यात यावे.

तेव्हा राष्ट्रांनी आणि सरकारांनी नेहमीच जे कम नशीबी आहेत त्यांना सहकार्य आणि सेवा पुरवावी तथापि अशी सेवा कोणत्याही राष्ट्रीय किंवा राजकीय फायदा उठवण्याच्या किंवा स्वार्थी हितसंबंध पूर्ण करण्याच्या हेतूने केली जाऊ नये. आपण पाहिले आहे की, मागच्या सहा सात दशकात संयुक्त राष्ट्र संघाने गरीब देशांच्या मदतीच्या उद्देशात अनेक कार्यक्रम किंवा प्रतिष्ठान आरंभिले आहेत, ते प्रयत्न करताना त्यांनी विकसनशील देशांच्या नैसर्गिक साधन संपत्तीचा शोध घेतला आहे. तथापि हे सर्व प्रयत्न केल्यानंतरही कोणताही गरीब देश विकसीत देशाच्या पातळीपर्यंत पोहोचू शकलेला नाही. याचे एक महत्त्वाचे कारण निश्चितच अशा कमी विकसीत देशामधील सरकारांमध्ये असलेला मोठया प्रमाणातील भ्रष्टाचार आहे. मी अतिशय खेदाने हे अधोरेखित करु इच्छितो की याशिवाय देखील विकसीत राष्ट्रांनी अशा भ्रष्ट सरकारांशी आपल्या स्वतःच्या हितसंबंधांना पूर्ण करण्यासाठी, व्यवहार चालूच ठेवला आहे. व्यापारी करारमदार, आंतरराष्ट्रीय मदत आणि व्यवसायिक करार करणे चालूच ठेवले आहे, परिणामस्वरूप समाजातील गरीब आणि वंचित घटकांमध्ये नैराश्य आणि अस्वस्थता वाढत जात असून, त्यांच्या परिणामी अशा देशांमध्ये बंडखोरी आणि अंतर्गत अराजक निर्माण होत आहे. अविकसीत देशांमधील गरीब जनता इतकी निराश झाली आहे की, ते फक्त आपल्याच नेत्यांविरूद्ध उठाव करत नसून महाशक्तींच्या

विरूद्ध सुद्धा उठाव करत आहेत. ही परिस्थिती आता अतिरेकी गटांच्या हातात जात असून ते गट या नैराश्याचा गैर फायदा घेत आहेत आणि अशा लोकांना त्यांच्या गटात सामील होण्यासाठी प्रवृत्त करुन त्यांच्या घृणेवर आधारित विचारधारेला सहाय्य करण्यासाठी उद्युक्त करत आहेत. याचा अंतिम परिणाम जागतिक शांतता भंग होण्याच्या स्वरुपात दिसत आहे.

म्हणून इस्लामने शांतता प्रस्थापनेच्या अनेक मार्गाकडे आमचे ध्यान आकर्षित केले आहे. त्यासाठी संपूर्ण न्याय अत्यावश्यक आहे. त्यासाठी नेहमीच सत्याची साक्ष देणे आवश्यक आहे, त्यासाठी दुसऱ्यांच्या संपत्तीकडे लालसेने पाहू नये, त्यासाठी विकसीत राष्ट्रांनी स्वतःचे स्वार्थी हितसंबंध बाजूला ठेवून अविकसीत आणि गरीब राष्ट्रांना खऱ्या निःस्वार्थ भावनेने आणि वृत्तीने मदत आणि सहकार्य करायला पाहिजे. जर का या सर्व घटकांचे पालन केले गेले तरच खरी शांती प्रस्थापित होऊ शकते.

जर का हे सर्व वर नमूद केलेले मार्ग अवलंबल्यानंतर देखील एखादा देश आपल्या सर्व मर्यादांचा भंग करुन अन्य देशावर हल्ला करत असेल आणि अन्यायपूर्ण मार्गाने त्याच्या साधन संपत्तीवर ताबा मिळवू इच्छित असेल, तर इतर देशांनी हा अत्याचार रोखण्याचे प्रयत्न करण्यासाठी सर्व मार्गांचा अवलंब निश्चितच करायला पाहिजे; परंतु असे करताना त्याने नेहमीच न्यायपूर्ण कृती करायला हवी.

इस्लामी शिकवणुकीनुसार ज्या परिस्थिती मध्ये अशी कृती करणे आवश्यक ठरते त्याचे सविस्तर वर्णन पवित्र कुरआनाच्या ४९ व्या अध्याय च्या १० आयतीत दिले आहे. त्यात म्हटले आहे की, जेव्हा दोन राष्ट्रे आपसातील मतभेदामुळे युद्धप्रवण होतात तेव्हा अन्य देशांनी त्यांना परखडपणे वाटाघाटी आणि राजनीतिक चर्चा करण्यासाठी प्रवृत्त करावे, जेणे करुन ते मध्यस्था मार्फत समेट घडवून आपसातील मतभेद संपुष्टात आणण्यासाठी करारबद्ध व्हावेत. जर दोघांपैकी एक पक्ष कराराच्या अटी मान्य करत नसेल

आणि युद्ध छेडत असेल तेव्हा दुसऱ्या देशांनी संयुक्तपणे एकत्रित येऊन आक्रमकाला रोखण्यासाठी त्याच्याशी युद्ध करावे. जेव्हा आक्रमक राष्ट्राचा पराजय होईल तेव्हा सर्व पक्षांनी करार करण्यासाठी प्रयत्न करावे, ज्याद्वारे चिर आणि स्थायी शांतता आणि समझोता घडून येईल. कठोर आणि अन्यायी अटी लादून एखादा राष्ट्रांचे हात बांधण्याचा प्रयत्न होऊ नयेत. कारण त्यामुळे पुढे जाऊन अस्वस्थता निर्माण होऊन ती पुढे पुढे वाढत जाऊ शकते.

जेव्हा एखादा तिसरा देश दोन देशांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करत असेल तेव्हा त्याने अतिशय प्रामाणिकपणे आणि संपूर्णतः निःपक्षपातीपणे वागायला हवे. जरी एखादा पक्ष त्याच्या विरोधात बोलत असेल तरी हा निःपक्षपातीपणा कायम रहायला हवा. म्हणून अशा परिस्थिती मध्ये तिसऱ्या पक्षाने मध्यस्थाने राग प्रदर्शित न करता, त्याने बदला घेऊ नये तसेच अन्याय पद्धतीने वागू नये. सर्व पक्षांना त्यांचे योग्य ते अधिकार बहाल करायला हवे.

म्हणून न्याय प्रस्थापित करण्यासाठी हे अतिशय आवश्यक आहे की, जे देश मध्यस्थीद्वारे समेट घडवून आणू इच्छितात त्याने स्वतःचे हितसंबंध साधण्याचा प्रयत्न करु नये, तसेच दोन्हीपैकी कुठल्याही देशाकडून स्वतःचा फायदा करुन घेण्याचा प्रयत्न करु नये. त्यांनी अयोग्य पद्धतीने हस्तक्षेप करु नये किंवा दौन्हीपैकी कोणत्याही पक्षावर अयोग्य पद्धतीने दबाव टाकू नये. त्यांच्यापैकी कोणत्याही देशाच्या नैसर्गिक साधन-संपत्तीचा गैरफायदा घेऊ नये, अनावश्यक आणि अयोग्य पद्धतीचे निर्बंध अशा देशांवर लादण्यात येऊ नयेत, कारण हे न्याय देखील नाही अणि त्या देशांमधील संबंध सुधारण्यासाठी हे उपयुक्तही ठरणार नाही.

वेळेच्या बंधनांमुळे मी अतिशय थोडक्यात काही बाबी नमूद केल्या आहेत. थोडक्यात सांगायचे तर, जर आमची इच्छा जगात शांतता प्रस्थापित करावयाची असेल तेव्हा आम्ही आपले वैयक्तिक आणि राष्ट्रीय हितसंबंध

बाजूला ठेवून त्या ऐवजी मोठया भलाईच्या दृष्टीने आपसातील संबंध संपूर्ण न्यायाच्या तत्त्वावर प्रस्थापित करावेत. तसे तर तुमच्यापैकी काहीं जण माझ्याशी सहमत व्हाल की युती स्थापित करुन भविष्यामध्ये काहीं गट तयार होतील किंबहुना होत आहेत. आणि त्यामुळे जगामध्ये अराजकता वाढत जाण्याची शक्यता नकारता येत नाही. ज्यामुळे अंतिमतः मोठा विनाश होऊ शकेल. अशा विध्वंसाचा आणि युद्धांचा परिणाम पुढच्या अनेक पिढयांना भोगावा लागेल. म्हणून संयुक्त राष्ट्र संघ, जी की जगातील सर्वात मोठी शक्ती आहे, त्यांनी आपली भूमिका बजावताना ती संपूर्ण न्यायाने आणि अतिशय सद्‌हेतूने जसे की, मी वर्णन केले आहे प्रेरित ठेवावी. जर का त्यांनी असे केले, तर हे जग नेहमीच त्यांच्या प्रयत्नांची खूप प्रशंसा करत राहील. माझी प्रार्थना आहे की हे वास्तव ठरो.

**धन्यवाद.**

**पुनश्च एकदा धन्यवाद.**

आमच्या प्रथे प्रमाणे कोणत्याही कार्यक्रमाची सांगता आम्ही शांत प्रार्थनेने करतो, म्हणून मी आता मौन प्रार्थना करणार आहे आणि सर्व अहमदी माझे अनुकरण करतील. आपण सर्वजण जे आमचे अतिथी आहात, ते सुद्धा आपापल्या पद्धतीने प्रार्थना करु शकतात.



# शांततेची गुरु किल्ली-
# जागतिक ऐक्य.

---

युरोपियन पार्लिमेंट
ब्रुसेल्स बेलजियम.





Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] being welcomed by Martin Schulz, President of European Parliament




His Holiness leading silent prayer at conclusion of the European Parliament event.
Seated to his right: Dr. Charles Tannock (MEP-UK), left: Rafiq Hayat (National Amir AMA UK)




Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba] delivers the keynote address at the European Parliament event





Press Conference with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] at European Parliament. Seated with His Holiness is Dr. Charles Tannock (MEP-UK and Chair of European Parliament Friends of Ahmadiyya Muslims Group)



Tunne Kelam (MEP Estonia & Vice-Chair of European Parliament Friends of Ahmadiyya Muslims Group) meeting with His Holiness



Phil Bennion (MEP West Midlands and member of European Parliament's South Asia Delegation) meeting with His Holiness



## प्रस्तावना

डिसेंबर ३ आणि ४, २०१९ रोजी अपेक्षित मसीहाचे पाचवे उत्तराधिकारी हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद मसीहाचे पाचवे आणि जागतिक अहमदिया मुस्लिम समुदायाचे प्रमुख यांनी ब्रुसेल मधील युरोपियन पार्लिमेंट मध्ये पहिल्यांदा भेट दिली आणि तेथे ३० देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ३५० अतिथिंनी भरलेल्या सभागृहासमोर ऐतिहासिक बीजभाषण केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. चार्लस टॅन्नोक, (MEP-U.K) यांच्या अध्यक्षतेखाली नवीनच स्थापन झालेल्या ''फ्रेंडज ऑफ अहमदिया मुस्लिम'' या सर्व पक्षीय युरोपियन पार्लिमेंटच्या गटाने केले होते. हा एक सर्वपक्षीय आणि संपूर्ण युरोप मधील युरोपीय संसदेच्या सदस्यांचा गट आहे, ज्याची स्थापना युरोपियन संसदेमध्ये अहमदिया मुस्लिम समुदायाला प्रोत्साहित करण्यासाठी आणि युरोप तसेच संपूर्ण जगामध्ये त्याच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्यासाठी झाली आहे. या भेटी दरम्यान हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी अनेक संसद सदस्य आणि महत्त्वांच्या व्यक्तींबरोबर अनेक बैठकां घेतल्या ज्यांनी ज्यांनी त्यांची भेट घेतली त्यांची नावे खालील प्रमाणे आहे.

१. डॉ. चार्लस टॅन्नोक (MEP-U.K) सांसद परराष्ट्र संबंध समिती सदस्य मानव अधिकार उपसमिती, उपसभापती नॅटो संसदीय सभेशी संबंधित संसदीय प्रतिनिधी मंडळ आणि अध्यक्ष. युरोपियन संसद फ्रेंडस ऑफ अहमदिया मुस्लिम ग्रुप.

२. टुन्ने केलाम (MEP-U.K) युरोपियन संसद परराष्ट्र व्यवहार समितीचे सदस्य सुरक्षा आणि संरक्षण उपसमितीचे सदस्य आणि युरोपियन संसद फ्रेंडस ऑफ अहमदिया मुस्लिम ग्रुपचे उपाध्यक्ष.

३. क्लॉडे मोरीस, (MEP-U.K) अरब द्वीपकल्पशी संबंधासाठी असलेल्या

प्रतिनिधी मंडळाचे उप सभापती नागरी स्वातंत्र्य न्याय आणि गृह व्यवहार समितीचे सदस्य युरोपियन संसद लेबर पार्टीचे उप नेता आणि युरोपियन संसद फ्रेंडस ऑफ अहमदिया गटाचे उप सभापती.

४. बारबारा लॉच बिहिल्लर, (MEP-U.K) युरोपियन संसदेच्या मानव अधिकार उप समितीच्या सभापती.

५. जीन लँबर्ट, (MEP-U.K) दक्षिण युरोपियन संसद दक्षिण एशिया प्रतिनिधी मंडळांचे सभापती.

६. फिल बेनऑन, (MEP-U.K) युरोपियन संसदेच्या दक्षिण आशिया प्रतिनिधी मंडळाचे सदस्य आणि युरोपियन गटाचे सभापती.

४ डिसेंबर रोजी मुख्य कार्यक्रम आणि माननीय खलीफतुल मसीह यांच्या मुख्य भाषणापूर्वी युरोपियन संसदेच्या प्रेस रुममध्ये एक आंतरराष्ट्रीय पत्रकार परिषद घेण्यात आली. ४० मिन्टापर्यंत चाललेल्या या पत्रकार परिषदेमध्ये, ज्यामध्ये इंग्लंड, स्पेन, फ्रांस, बेलजियम, पाकिस्तान आणि अन्य देशांचे माध्यम प्रतिनिधी आणि पत्रकार हजर होते. माननीय खलीफतुल मसीह यांनी प्रश्नांची उत्तरे दिली. (B.B.C) च्या प्रतिनिधी ने विचारलेला प्रश्न जगामध्ये इस्लामची भूमिका च्या उत्तरात ते म्हणाले की, ''इस्लामचा शांती संदेश हा वैश्विक आहे, म्हणूनच आमचे बोधवाक्य प्रेम सर्वांसाठी घृणा कोणाचीही नाही'' LOVE FOR ALL HATRED FOR NONE हे आहे. स्पॅनिश माध्यमाच्या प्रतिनिधिच्या प्रश्नाच्या उत्तरात माननीय महोदय म्हणाले की, जगातील सर्वप्रमुख धर्मांनी शांतीचा संदेशच दिलेला आहे आणि खरा मुस्लिम सर्वच प्रेषितांवर निष्ठा ठेवतो त्यांनी सांगितले की, प्रत्येक प्रेषिताने एकच संदेश दिला की, ईश्वर एक आहे. मालटाच्या माध्यम प्रतिनिधीच्या प्रश्नाच्या उत्तरात माननीय महोदय म्हणाले की, अहमदिया मुस्लिमांचे कर्तव्य सर्व मानवतेला ईश्वराच्या समीप आणने आणि जगभरातील लोकांना एकमेकांच्या अधिकारांचे रक्षण करण्याचे त्यांचे कर्तव्याची जाणीव

करुन देणे हे आहे.

मुख्य कार्यक्रम एका भरगच्च सभागृहात पार पडला. युरोपियन संसदेच्या ''फ्रेंडस ऑफ अहमदिया मुस्लिम'' ग्रुपचे सभापती आणि उप सभापती यांनी अहमदिया मुस्लिम समुदायाचे जागतिक प्रमुख हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांचे स्वागत करुन त्यांना विचार मंचापर्यंत पोहोचविले. मार्टिन शुलुज, जे युरोपियन संसदेचे अध्यक्ष आहेत, यांनी सुद्धा माननीय महोदयांची भेट घेण्यासाठी विशेषत्त्वाने हजेरी लावली. माननीय महोदयांच्या मुख्य भाषणापूर्वी युरोपियन संसदेच्या अनेक सदस्यांची आपले विचार श्रोत्यांपुढे मांडले आणि अहमदिया मुस्लिम जमाअत, जी शांतीपूर्ण इस्लामचा प्रसार करते, त्याची खूप प्रशंसा केली. युरोपियन संसदेच्या ''फ्रेंडस ऑफ अहमदिया मुस्लिमस'' ग्रुप चे सभापती डॉ. चार्लस टॅन्नोक म्हणाले की, ''अहमदी मुस्लिम हेच जगामध्ये सहिष्णूतेचे आदर्श उदाहरण आहे.''

खाली आम्ही हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद आणि अहमदिया मुस्लिम समुदायाचे जागतिक प्रमुख यांनी दिलेल्या मुख्य ऐतिहासिक भाषणाचा सारांश देत आहोत.

# शांतीची गुरु किल्ली-जागतिक ऐक्य.

बिस्मिल्लाहीर्रहमानीर्रहीम -अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू आणि असीम कृपाळू आहे.

सर्व प्रमुख अतिथींना अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहु.- तुम्हा सर्वांवर अल्लाहची कृपा आणि आशीर्वाद असोत. सर्व प्रथम मी या कार्यक्रमाचे आयोजक, ज्यांनी युरोपियन संसदे मध्ये तुम्हां सर्वांसमोर माझे विचार मांडण्याची मला संधी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. त्याचप्रमाणे मी सर्व प्रतिनिधिंचे, जे वेगवेगळे देशांचे प्रतिनिधित्व करत आहेत आणि इतर अतिथींचे, ज्यांनी महत प्रयासाने या कार्यक्रमात हजेरी लावलेली आहे, त्यांचेही आभार मानतो. जे लोक अहमदिया मुस्लिम जमाअतशी बऱ्यापैकी परिचित आहेत किंवा असे लोक सुद्धा, जे कमी परिचित आहेत आणि ते वयैक्तिक रित्या एखाद्या अहमदी व्यक्तिशी संबंध ठेवून आहेत, त्यांना पूर्णपणे माहित आहे की हा समुदाय जगामध्ये शांती आणि सुरक्षितता प्रस्थापित व्हावी यासाठी सतत प्रयत्नशील आहे. आम्ही नक्कीच हे लक्ष्य साध्य करण्यासाठी आपल्या क्षमतेप्रमाणे सर्व प्रकारचे प्रयत्न करत असतो.

मी अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख या नात्याने, जेव्हा संधी मिळेल, तेव्हा या विषयावर सातत्याने बोलत असतो. वास्तविक पाहता मी शांतीची गरज आणि आपसातील प्रेम संबंधाबद्दल यासाठी बोलत नाही की, ही नवीन शिकवण अहमदिया मुस्लिम समुदायाने दिली आहे, जरी हे सत्य असेल की अहमदिया मुस्लिम समुदायाचे संस्थापक यांच्या आगमनाचे

मुख्य उद्दिष्ट शांती आणि सलोखा निर्माण करणे हे जरी होते, तरी वस्तुस्थिती अशी आहे की आमच्या सर्व कृतीकार्यक्रमाचे कारण इस्लामचे संस्थापक पवित्र पैगंबर हज़रत मुहम्मद (स.) यांच्यावर जी शिकवण प्रकट झाली हेच आहे.

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) नंतरच्या १४०० वर्षाच्या कालावधी मध्ये दुर्दैवाने बहुसंख्य मुस्लिमांना त्यांच्या शुद्ध शिकवणूकीचा विसर पडत गेला होता. म्हणून खऱ्या इस्लामला पुनर्जीवित करण्यासाठी सर्वशक्तीमान अल्लाहने अहमदिया मुस्लिम समुदायाचे संस्थापक हज़रत मिर्ज़ा ग़ुलाम अहमद कादियानी यांना पवित्र पैगंबर हज़रत मुहम्मद (स.) यांच्या भविष्यवाणीनुसार अवतरविले. आपण सर्वांनी, ही गोष्ट ज्या ज्या वेळी मी इस्लामच्या जगामध्ये शांती आणि सलोखा निर्माण करण्याच्या शिकवणूकीबद्दल बोलेन त्या त्या वेळी कायम ध्यानात असू द्यावी.

मी हे सुद्धा नमूद करु इच्छितो की, 'शांती' आणि 'सुरक्षेचे' अनेक पैलू आहेत. ज्याप्रमाणे प्रत्येक पैलू स्वतंत्रपणे महत्त्वाचा आहे. त्याचवेळी प्रत्येक पैलू आपसात एकमेकाशी गुंतलेला सुद्धा आहे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ समाजामध्ये शांती निर्माण होण्यासाठी पायाभूत गरज, कुटुबांमध्ये सुशांतता आणि समंजस असणेही आहे. घरातील परिस्थिती घरापूर्ती मर्यादित नसते, तर तिचा परिणाम परिसराच्या शांतीवर देखील होत असतो. परिणामस्वरुप व्यापकपणे गाव किंवा शहराच्या शांतीवर देखील त्याचा प्रभाव पडतो. जर घरामध्ये अस्वस्थता असेल तर त्याचा स्थानिक परिसरावर नकारात्मक परिणाम होत असतो आणि पुढे त्याचा परिणाम गाव किंवा शहरावर होत असतो. त्याच पद्धतिने गाव किंवा शहराची परिस्थिती संपूर्ण देशाच्या शांतीला प्रभावित करत असते आणि सौहार्दाला प्रभावित करत असते. म्हणून हे स्पष्ट असावे की, जर तुमची इच्छा शांतीच्या एखाद्या पैलूची चर्चा कराव्याची असेल तर तुमच्या हे लक्षात येईल की ती चर्चा

त्यापूर्तीच मर्यादित न राहता ती सतत विस्तारित जाईल. त्याचप्रमाणे, ज्या वेळेच आपण शांततेचा भंग झालेला पाहतो त्यावेळी शांती आणि सुरक्षेला बाधा निर्माण करण्यास कारणीभूत ठरलेल्या विवक्षित गोष्टीला ध्यानात ठेवून या समस्येचे समाधान शोधण्यासाठी अनेक मार्गांचा अवलंब करावा लागेल. जेव्हा आपण ही गोष्ट ध्यानात घेऊ, तेव्हा हे स्पष्ट व्हायला हवे की या समस्येवर सविस्तरपणे चर्चा करण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी जो वेळ सध्या उपलब्ध आहे त्यापेक्षा किती तरी अधिक वेळेची गरज आहे. तथापि मी इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीच्या कमीत कमी काहीं पैलूवर तरी प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करणार आहे.

आधुनिक जगामध्ये इस्लाम विरुद्ध अनेक तक्रार केल्या जात असलेल्या आपण पाहतो आणि जगातील बहुतेक समस्या आणि उपद्रवांसाठी याच धर्माला जबाबदार धरले जाते. जरी इस्लाम या शब्दाचा अर्थ शांती आणि सुरक्षा असला तरी असे आरोप केले जातात. या पुढे जाऊन इस्लाम तर असा धर्म आहे ज्याने शांती प्रस्थापित करण्याच्या संदर्भात निश्चित स्वरुपाची मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. इस्लामच्या खऱ्या आणि शांतीपूर्ण शिकवणीचे चित्र तुमच्या पुढे मांडण्यापूर्वी मी थोडक्यात जगाच्या सद्यःस्थिती बद्दल चर्चा करु इच्छितो. मला खात्री आहे की, या परिस्थितीची बऱ्यापैकी जाणीव आपणास आहे, तरी पण मी या गोष्टीचा उल्लेख यासाठी करु इच्छितो की जेव्हा मी इस्लामच्या शांती आणि सौहार्दाच्या शिकवणीबद्दल काही बोलेन त्यावेळी या गोष्टी तुमच्यासमोर असाव्यात. आपण सर्व जाणतो आणि मानतो की, आजचे जग हे एक वैश्विक खेडे झाले आहे. आपण सर्वजण वेगवेगळया माध्यमातून एकमेकाशी संपर्कात आहोत, मग ते आधुनिक दळण वळणाच्या सोई असोत किंवा माध्यमे आणि इंटरनेट किंवा इतर विविध साधनांद्वारे या सर्व घटकांच्या परिणामी जगातील राष्ट्रे कधी नव्हती ऐवढी एकमेकाच्या जवळ आली आहेत. आपण पाहतो की, सर्व प्रमुख

देशांमध्ये वेगवेगळया वंशाचे, वेगवेगळया धर्माचे आणि वेगवेगळया राष्ट्रांचे लोक स्थायिक झाले असून एकत्रित राहिले आहे. खरे पाहिल्यास अनेक देशांमध्ये परदेशी स्थलांतरीतांची बऱ्यापैकी संख्या दिसून येते. हे स्थलांतरीत इतक्या चांगल्या प्रकारे मिसळून गेलेले आहेत की, आता तिथल्या सरकाराला किंवा स्थानिक जनतेला त्यांना काढून टाकणे कठीण नव्हे, तर अशक्यच झाले आहे. जरी या स्थलांतरीतांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्याचे किंवा काहीं बंधने लादण्याचे प्रयत्न झाले असले तरी, एका देशाचा नागरिक दुसऱ्या देशात घुसण्याचे मार्ग उपलब्ध आहे. वास्तविक पाहता बेकायदेशीर स्थालांतर जरी बाजूला ठेवले, तरी असे काहीं आंतरराष्ट्रीय कायदे अस्तित्वात आहेत की, ज्यांच्या आधारे असे लोक, जे योग्य कारणांसाठी स्थलांतरीत होण्यासाठी विवश झालेले आहेत, त्यांना सहाय्यभूत ठरतात.

आपण हे देखील पाहतो की, अशा झुंडीने होणाऱ्या स्थलांतरामुळे काहीं देशांमध्ये अस्वस्थता आणि तणावग्रस्त परिस्थिती निर्माण होत आहे. याची जबाबदारी स्थलांतरीत आणि स्थानिक जनता या दोघांवर येते. एका बाजूला काहीं स्थलांतरीत लोक स्थानिक जनतेबरोबर कुठल्याही प्रकारची एकात्मता स्थापित करण्यास नकार देऊन त्यांना उत्तेजित करतात तर, दुसऱ्या बाजूला काहीं स्थानिक लोक असहनशीलतेचे आणि उघडउघड तिरस्कारचे प्रदर्शन करत असतात. अधुन मधुन हा तिरस्कार अतिशय धोकादायक मर्यादेपर्यंत उफाळूण येत असतो. विशेष करुन काहीं मुस्लिमांच्या विशेषतः स्थलांतरीत मुस्लिमांच्या, चूकीच्या वर्तनामुळे पाश्चात्य देशामधील जनतेतील काहीं घटकात घृणा आणि शत्रुत्व, अनेक वेळा इस्लाम विरुद्ध व्यक्त होत असते. हा राग आणि प्रतिक्रिया अल्प प्रमाणात न राहता चरम सीमा गाठत असते. त्यामुळेच पाश्चात्य नेते या समस्येबद्दल सातत्याने बोलत असतात; म्हणूनच आपण पाहतो की, काहीं वेळा मर्जन चांसलर, मुसलमान हे जर्मनाचे अविभाज्ये घटक आहे, असे बोलत असतात तर,

ब्रिटेनचे प्रधानमंत्री मुसलमानांनी देशाशी एकरुप व्हावे, असे बोलत असतात आणि काहीं देशातील नेते मुसलमानांना चेतावणी देत असतात. हा अंतर्गत संघर्ष जरी खूपच बिघडला नसला तरी त्याची दखल घेणे आवश्यक झाले आहे. ही परिस्थिती तापत जाऊन शांती भंग करण्यास कारणीभूत ठरु शकते. हा संघर्ष पाश्चात्य जगापुर्ता मर्यादित न राहता, त्याचा परिणाम संपूर्ण जगावर विशेषतः मुस्लिम देशांवर मोठा प्रभाव टाकेल या बद्दल शंकाच नाही. त्यामुळे पाश्चात्य आणि पौर्वात्य जगाचे आपसातील संबंध मोठया प्रमाणात बिघडतील. म्हणून ही परिस्थिती सुधारण्यासाठी आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासन कर्त्यांनी अशी धोरणे आखायला हवीत की, ज्यामुळे दुसऱ्यांच्या भावनांना दुखावणाऱ्या गोष्टींना बेकायदेशीर ठरवून एकमेकांचा आदर राखली जाईल याची व्यवस्था करावी.

स्थलांतरीतांनी स्थानिक जनतेशी एकरुप होणाच्या इच्छेनेच त्या देशात दाखल व्हायला पाहिजे आणि स्थानिक जनतेने देखील खुल्या मनाने त्यांचा स्वीकार करुन सहनशीलतेचे प्रदर्शन करण्यास तयार असली पाहिजे. त्यापुढे जाऊन हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे की, फक्त मुसलमांच्या विरुद्धच काहीं बंधने लादून शांतता स्थापित करता येणार नाही कारण ते एकटेच लोकांची मानसिकता आणि विचार बदलू शकत नाहीत. फक्त मुस्लिमच नव्हेत तर कोणत्याही व्यक्तीला त्याच्या धर्मामुळे किंवा श्रद्धांमुळे बळजबरीने दाबण्याचा प्रयत्न झाल्यास त्याची नकारात्मक प्रतिक्रिया उद्भवने अपरिहार्य ठरते, ज्यामुळे शांती मोठया प्रमाणात भंग होऊ शकते. जसे की मी आधीच म्हटले आहे की, अनेक देशांमध्ये स्थानिक जनतेमध्ये आणि मुस्लिम स्थालांतरीत लोकांमध्ये संघर्षाची परिस्थिती वाढत चाललेली दिसून येत आहे. दोन्ही बाजूचे लोक असहनशील होत असून एकमेकाला समजून घेण्यासाठी तयार नसल्याचे दिसून येत आहे. युरोपिय नेतृत्वाला हे मान्यच

करावे लागेल की ही वस्तूस्थिती आहे आणि आपसात धार्मिक आदर आणि सहनशीलता प्रस्थापित करणे ही त्यांची जबाबदारी आहे. प्रत्येक युरोपियन देशांमध्ये आणि युरोपिय आणि मुस्लिम देशांमध्ये सदिच्छापूर्ण वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक आहे जेणे करुन जागतिक शांतता भंग पावणार नाही.

मला विश्वास आहे की, या संघर्षाचे आणि मतभेदाचे मूळ कारण फक्त धर्म आणि श्रद्धाच नाही आणि हा फक्त पाश्चात्य आणि मुस्लिम राज्यातील मतभेदाचाच प्रश्न नाही तर, वास्तविक पाहता या संघर्षाचे मुख्य कारण जागतिक आर्थिक संकट हे आहे. ज्यावेळी आर्थिक मंदी किंवा पतखालावली नव्हती तेव्हा कोणीही स्थलांतरीतांच्या घूसखोरीमुळे चिंतित नव्हते, मग ते मुस्लिम असोत किंवा बिगर मुस्लिम असोत किंवा अफ्रिकन्स असोत. तथापि आता परिस्थिती वेगळी असल्यामुळे हे सर्व घडत आहे. याचा परिणाम युरोपियन देशांच्या आपसातील संबंधांवर देखील झाला आहे. आणि म्हणून काहीं युरोपियन राष्ट्रांच्या लोकांमध्ये आणि इतर युरोपियन देशांमध्ये राग आणि संताप दिवसेंदिवस वाढत आहे. आणि ही निराशाजनक परिस्थिती सर्वत्र उघडउघड दिसत आहे.

युरोपियन युनियन ची स्थापना या खंडाला एकत्रित आणण्याच्या दृष्टीने युरापियन देशाच्या संदर्भात एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे म्हणून तुम्ही कोणत्याही परिस्थितीत ही एकता टिकून राहील यासाठी एकमेकांच्या अधिकारांचा आदर करत प्रयत्नशील रहायला हवे. सर्व सामान्य लोकांच्या मनामधील भय आणि चिंता दूर करायला हवी. एकमेकांच्या समाज जीवनाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही एकमेकांच्या योग्य आणि न्यायपूर्ण मागण्यांचा आदर करायला हवा. आणि निश्चितच अशा मागण्या योग्य आणि न्यायपूर्ण असायला हव्यात.

हे लक्षात असुद्या की, युरोपची शक्ती एकत्रित आणि संघटीत

राहण्यातच आहे. हे संघटन फक्त येथे युरोपमध्ये तुम्हालाच फायदेशीर ठरणार नसून जागतिक पातळीवर देखील या उपखंडाची शक्ती आणि प्रभाव निर्माण करण्याच्या दृष्टीने देखील महत्त्वपूर्ण आहे. खरे पाहता इस्लामच्या दृष्टीकोनाने पाहिल्यास, आम्हाला संपूर्ण जगाच्या ऐक्यासाठी प्रयत्न करायला हवा. चलनाच्या बाबतीत संपूर्ण जग एकसंघ पाहिजे. मुक्त व्यापार आणि व्यवसायाच्या दृष्टीने देखील संपूर्ण जग एकसंघ पाहिजे. आणि मुक्त संचार आणि स्थलांतराच्या संदर्भात वस्तुनिष्ठ आणि सुसमान धोरणे आखली गेली पाहिजेत. ज्यामुळे संपूर्ण एकसंघ होऊ शकेल. सारांश म्हणून सांगायचे झाल्यास सर्वदेशांनी आपसात सहकार्य करायला पाहिजे ज्यामुळे मतभेदांचे रुपांतर ऐक्यात होईल. जर अशी पाऊले उचलली गेल्यास थोडयाच कालावधीत हे सर्व संघर्ष संपलेले आणि शांती व आपसातील आदरभावात रुपांतरीत झालेले दिसून येतील. परंतु त्यासाठी खराखुरा न्याय प्रस्थापित करणे आणि प्रत्येक देशाने आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. अतिशय खेदाने नमूद करावे लागते की, जरी ही इस्लामची शिकवण असली तरी मुस्लिम देश आपसात सुद्धा एकसंघ होण्यात अयशस्वी ठरले आहेत. जर ते आपसात सहकार्य करत राहिले असते आणि एकसंघ झाले असते तर या मुस्लिम देशांना आपली अंतर्गत संकटे आणि गरजांचे उपशमन करण्यासाठी पाश्चात्यांची सतत मदत आणि सहकार्य घेण्याची गरज भासली नसती.

या प्रस्ताविकेनंतर इस्लामच्या जगामध्ये चिरस्थायी शांती स्थापने संदर्भातील शिकवणीचा मी उल्लेख करणार आहे. सर्वप्रथम इस्लामची मूलभूत आणि मूळ शिकवण अशी आहे की, एका खऱ्या मुस्लिम व्यक्तीच्या जिभे आणि हातापासून इतर सर्व शांतीपूर्ण जगणारे लोक सुरक्षित असले पाहिजेत. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुस्लिमांची ही व्याख्या दिली आहे. हे मूलभूत आणि सुंदर तत्त्व ऐकल्यानंतर इस्लाम विरुद्ध एखादा आरोप किंवा तक्रार करण्यास जागा आहे काय? निश्तिच नाही. इस्लाम

अशी शिकवण देतो की, फक्त तेच लोक जे आपल्या वाणीने आणि हाताने अन्याय आणि तिरस्कार पसरवतात त्यांनाच शिक्षा दिली गेली पाहिजे. म्हणून जर स्थानिक पातळीपासून जागतिक पातळीपर्यंत सर्वच जण या स्वर्णीम तत्त्वाला चिटकून राहिल्यास आपल्याला धार्मिक संघर्ष उद्भवल्याचे कधीच दिसून येणार नाही. तसेच राजकीय संघर्ष आणि लोभ व सत्ता संपादन यांच्या अभिलाषेने संघर्ष होताना कधीच दिसून येणार नाही. जर या खऱ्या इस्लामी तत्त्वांचे अनुसरण केले गेले तर देशांतर्गत सर्वसामान्य लोक एकमेकांच्या हक्कांचे आणि भावनांचे रक्षण करतील आणि तेथील सरकारे सर्व नागरीकांच्या संरक्षणाची त्यांची जबाबदारी चोखपूर्ण पार पाडतील. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांबरोबर खऱ्या सहानुभूती आणि प्रेमाने एकमेकाशी सहकार्य करताना दिसतील.

इस्लामचे दुसरे मूलभूत तत्त्व असे आहे की, शांती प्रस्थापनेचा प्रयत्न म्हणून प्रत्येकाने कधीही अहंकार आणि उर्मटपणाचे प्रदर्शन करता कामा नये. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पवित्र पैगंबरांनी (स.) त्यांच्या सुप्रसिद्ध वचनांमध्ये सांगितले आहे की, काळामनुष्य गोऱ्यामुनष्यापेक्षा श्रेष्ठ नाही आणि गोऱ्यामनुष्य काळयामनुष्यापेक्षा श्रेष्ठ नाही. युरोपिन व्यक्ती सुद्धा इतर कुठल्याही राष्ट्रांतील व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ किंवा मोठा नाही तसेच अफ्रिकन, आशियाई किंवा जगातील इतर कुठल्याही भागातील लोक एकमेकांपेक्षा श्रेष्ठ किंवा वरचढ नाहीत. राष्ट्रीयत्व वर्ण किंवा वंशावर आधारित भेद, हे फक्त एकमेकाची ओळख पटवीण्यासाठीच असतात.

वास्तविक पाहता आधुनिक जगामध्ये आपण सर्वजण एकमेकांवर विसंबून आहोत. आज युरोप आणि अमेरिका सारख्या महाशक्तीदेखील इतर सर्वांपासून पूर्णपणे अलिप्त राहून जगू शकत नाहीत. अफ्रिकन देशसुद्धा पूर्णपणे अलिप्त राहून विकसीत होण्याचा विचार करु शकत नाहीत, तसेच आशियाई देश किंवा जगातील कोणत्याही भागातील देश सुद्धा अलिप्त

राहून प्रगती करु शकत नाहीत. उदाहरणार्थ, जर तुम्हाला आपली अर्थ व्यवस्था सुधारायची असेल तर तुम्हाला आंतरराष्ट्रीय पातळीवरील व्यापार धोरणे अंगीकारणे आवश्यक आहे. जग आता एकमेकाशी कसे प्रतिबद्धित आहे याचे उत्तम उदाहरण म्हणजे युरोप किंवा जागतिक आर्थिक संकट, जे मागच्या काहीं वर्षात उद्भवले आहे, त्याचा थोडाफार परिणाम जगातील प्रत्येक देशाला भोगावा लागला आहे. यापुढे जाऊन असे ही पाहण्यात येते की, वैज्ञानिक प्रगतीसाठी किंवा इतर तांत्रिक बाबीमध्ये सर्व देशांना एकमेकाची मदत आणि सहकार्य घेणे आवश्यक ठरत आहे.

ही गोष्ट आम्हाला कायमस्वरुपी लक्षात ठेवायला पाहिजे की, जगातील सर्व लोकांना मग ते अफ्रिकन असोत, युरोपियन असोत, आशियन असोत किंवा इतर कोणत्याही भागातील असोत, सर्वशक्तीमान अल्लाहने प्रचंड बौधिक क्षमता दिलेल्या आहेत. जर सर्व लोकांनी या ईश्वरदत्त क्षमतांचा मानवतेच्या कल्याणासाठी परिपूर्ण वापर केल्यास हे जग शांतीचे स्वर्ग झाल्याचे आपणास पहायला मिळेल. परंतु जर का विकसीत देशांनी, अल्प विकसीत किंवा विकसनशील देशांच्या प्रगतीला दाबण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या उपजत आणि तेजस्वी बुद्धीमत्तेला प्रफुल्लीत होण्याची संधी नाकारली, तर तणाव निर्माण होणे अपरिहार्य ठरेल, यात शंकाच नाही. आणि ही वाढत जाणारी अस्वस्थता आंतरराष्ट्रीय शांती आणि सुरक्षेला मारक ठरेल.

शांती निर्माण करण्यासाठी इस्लामने आणखीन एक तत्त्व मांडले आहे, ते म्हणजे, आपण कधीही इतरांवर होत असलेला अन्याय किंवा त्यांच्या अधिकारांचे हनन होताना सहन करु नये. जसे की, आपण आपल्या अधिकारांचे हनन सहन करणार नाही, त्याचप्रमाणे इतरांच्या बाबतीतही आपण ते सहन करायला नको. इस्लाम असे शिकवतो की, जेव्हा बदला घेण्याची वेळ येते, तेव्हा तो तितकाच घेतला जावा जेवढा अन्याय झाला

आहे. परंतु जर क्षमा केल्याने सुधारणा होण्याची शक्यता असेल तर क्षमा करण्याचाच पर्याय स्वीकारला जावा. खरा आणि मोठा उद्देश नेहमीच सुधारणा घडविणे आणि सौहार्द निर्माण करणे हाच असावा, जेणे करुन चिरस्थायी शांती निर्माण होईल. तथापि आज वस्तुस्थिती काय आहे, जर कोणी एखादी चूक करत असेल किंवा अन्याय करत असेल, तर जी बळी ठरलेली व्यक्ती आहे, ती मर्यादेबाहेर जाऊन बदला घेऊ इच्छिते आणि स्वतःवर झालेल्या अन्यायापेक्षा अधिक प्रमाणात अन्याय करते.

आज आपण इस्त्राईल आणि पॅलेस्टीन मध्ये जो संघर्ष वाढत जात आहे त्यात हेच घडताना पाहत आहोत. प्रमुख महाशक्तिंनी सिरीया, लिबीया आणि इजिप्त मधल्या परिस्थितीवर आपला राग आणि चिंता उघडउघड व्यक्त केली आहे. तसे पाहिल्यास ही परिस्थिती त्या त्या देशातील अंतर्गत घटना आहेत; परंतु ते अशीच चिंता किंवा अशीच काळजी पॅलेस्टीनी जनतेबद्दल व्यक्त करताना दिसत नाहीत. हा उघडउघड दुटप्पीपणा, मुस्लिम देशातील जनतेच्या मनामध्ये जगातील प्रमुख महाशक्तिंच्या विरोधात तिरस्कार आणि द्वेष निर्माण करण्यास कारणीभूत ठरत आहे. हा राग आणि ही शत्रुत्वाची भावना अतिशय घातक असूनही अशीच वाढत गेल्यास त्याचा केव्हाही विस्फोट होऊ शकतो. त्याचा परिणाम काय होईल? या प्रश्नांची उत्तरे फक्त परमेश्वरच जाणतो. मी किंवा कोणीही याचे उत्तर देऊ शकत नाही. आपण फक्त एवढेच निश्चितपणे सांगू शकतो की जगाची शांतता पूर्णतः नष्ट होईल.

हे स्पष्टपणे समजून घ्या की, मी कोणत्याही विशिष्ट अशा देशाची बाजू घेत नाही किंवा त्याचे समर्थन करत नाही, फक्त मी जे सांगू इच्छितो ते एवढेच आहे की सर्व प्रकारचे क्रौर्य जेथे कोठे असेल ते पूर्णपणे संपायला पाहिजे, मग ते पॅलेस्टेनी जनतेकडून होत असेल किंवा इस्त्राईली जनतेकडून होत असेल किंवा इतर कोणत्याही देशांच्या जनतेकडून होत असेल तरी ते

संपवायलाच हवे. सर्व प्रकारच्या क्रौर्याला संपवायलाच पाहिजे, कारण जर त्यांना असेच वाढत जायला परवानगी दिली, तर द्वेषच्या ज्वाला संपूर्ण जगाला अशा पध्दतिने वेढून टाकतील की आज जे आर्थिक संकट उभे आहे आणि त्याचा जो त्रास होत आहे त्याला लोक पार विसरुन जातील. त्याच्या ऐवजी त्यांचा सामना यापेक्षा फार भयानक परिस्थितीशी होईल. त्यामुळे इतकी जीवितहानी होईल की आपण त्याची कल्पना सुद्धा करु शकणार नाही.

म्हणून युरोपियन देशाचे, ज्यांनी दुसऱ्या महायुद्धात प्रचंड नुकसान भोगले आहे, कर्तव्य आहे की त्यांनी आपल्या भुतकाळापासून धडा घ्यावा आणि जगाला विनाशापासून वाचवावे. यासाठी त्यांना न्याय प्रस्थापित करण्याची आवश्यकता समजून घ्यावी लागेल आणि याबाबतीत आपली जबाबदारी स्वीकारावी लागेल. इस्लाम अतिशय जोरदारपणे योग्य आणि न्यायपूर्ण व्यवहार करण्याची गरज व्यक्त करतो, त्याची शिकवण अशी आहे की, कोणत्याही पक्षाला विशिष्ट आणि पक्षपाती वागणूक दिली जाऊ नये किंवा त्याच्यावर अतिरिक्त अनुग्रह करु नये. प्रत्येक चूकीच्या वागणाऱ्याला ही जाणीव करुन द्यायला पाहिजे की, जर तो एखाद्या देशाशी, मग तो लहान असो किंवा मोठा, अन्यायपूर्ण वागत असेल, तर आंतरराष्ट्रीय समुदाय त्याला असे अजिबात वागू देणार नाही. संयुक्त राष्ट्र संघाचे सदस्य असलेले देश, जे युरोपियन युनियन आणि महाशक्तींच्या प्रभावाखालील असलेले देशांचे लाभार्थी देश किंवा अविकसित देश असे सर्वच देश सुद्धा ही गोष्ट मान्य करत असतील तरच आणि तेव्हाच शांती निर्माण होऊ शकेल.

या पुढे जाऊन, जे देश संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परिषदेचे सदस्य असून त्यांना नकार अधिकार प्राप्त आहे, फक्त त्यांनाच त्यांच्या कृतीबद्दल जबाबदार धरण्यात असल्याच खऱ्या अर्थाने न्याय प्रस्थापित होईल. खरे तर या पुढे एक पाऊल जाऊन मी असे सांगू इच्छितो की, नकार अधिकार

कधीच शांती प्रस्थापनेला उपयुक्त ठरणार नाही, कारण याबाबतीत सगळेच देश समपातळीवर नाहीत. हीच गोष्ट मी या वर्षाच्या सुरुवातीला जेव्हा अमेरिकेच्या कॅपिटॉल हिल येथे प्रमुख राजनितीतज्ञ आणि धोरणकारांसमोर बोलताना व्यक्त केली होती. जर का आपण संयुक्त राष्ट्र संघाला मतदानाचा इतिहास पाहिल्यास आपल्या लक्षात येईल की, नकार अधिकाराचा वापर नेहमीच जे अत्याचार ग्रस्त आहेत त्यांना सहाय्य करण्यासाठी किंवा जे योग्य पद्धतिने वागत आहेत त्यांना मदत करण्यासाठी करण्यात आलेला नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, काहीं वेळा नकार अधिकारचा गैरवापर क्रौर्याला रोखण्याऐवजी त्याला मदत आणि सहकार्य केले गेले आहे. ही गोष्ट कोणा पासूनही लपलेली किंवा अज्ञात नाही. अनेक समीक्षकांनी उघडपणे या विरोधात लिहले आणि बोलले आहे.

इस्लामने मांडलेले आणखीन एक सुंदर तत्त्व असे आहे की, समाजामध्ये शांती राखण्यासाठी स्वतःचा राग दाबून ठेवला पाहिजे आणि त्याला कधीही प्रामाणिकपणे आणि न्यायाच्या तत्त्वावर वर्चढ होऊ दिला नाही पाहिजे. इस्लामच्या सुरुवातीचा इतिहास याची साक्ष देतो की, खऱ्या मुस्लिमानांनी नेहमीच या तत्त्वाचे पालन केले असून ज्यांनी या तत्त्वाचे पालन केले नाही त्यांना पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तंबी दिली आहे. परंतु दुर्दैवाने आज नेहमीच असे घडत नाही. अशा अनेक घटना घडलेल्या आहेत की, जेव्हा सेना किंवा सैनिक शांती प्रस्थापनेसाठी पाठवले जातात तेव्हा ते स्वतःच आपल्या निर्धारित उद्देशांच्या विपरित वागताना दिसून येतात. उदाहरणार्थ काहीं देशांमध्ये परदेशी सैनिक तिथल्या मृत व्यक्तींच्या देहाची विटंबना करताना आणि क्रूरपणे वागताना दिसून येतात. अशा पद्धतिने शांती प्रस्थापित होऊ शकते का? अशा वागण्याचे प्रतिक्रिया त्या प्रभावित देशापर्यंत न राहता संपूर्ण जगभर व्यक्त होऊ शकते. निश्चितच मुसमलमांना जर चूकीची वागणूक देण्यात आली तर मुस्लिम अतिरेकी याचा गैरफायदा

घेतील आणि जगाची शांतता नष्ट करतील; जरी हे इस्लामच्या शिकवणूकी विरुद्ध असले तरी इस्लाम असे शिकवते की, शांती तेव्हाच प्रस्थापित होते जेव्हा अत्याचारी आणि अत्याचार ग्रस्त दोघांनाही निःपक्षपातीपणे कोणतेही हितसंबंध आणि शत्रुत्वाची भावना न ठेवता मदत केली जोईल. सर्व पक्षांना समान संधी आणि समान व्यासपीठ उपलब्ध केल्यानंतरच शांती प्रस्थापित होऊ शकते.

वेळ कमी असल्यामुळे मी फक्त आणखीन एकच मुद्दा मांडतो, तो म्हणजे, इस्लाम मला शिकवतो की, इतरांची संपत्ती आणि संसाधनांकडे लालसेने पाहू नये, जे इतरांचे आहेत ते आपण कधीही लालसेने बळकाऊ नये. कारण हे सुद्धा शांती भंग करण्यात कारणीभूत ठरते. जर संपन्न देश अविकसीत देशांची संपत्ती आणि संसाधने स्वतःच्या गरजापूर्ण करण्यासाठी वापरत असतील, स्वाभाविकपणे अस्वस्था पसरत जाईल. जर विकसीत देश योग्य प्रमाणात आपल्या सेवेचा मोबदला म्हणून अल्पप्रमाणात काहीं घेत असतील आणि संसाधानाचा मोठा भाग अविकसीत देशांचे जीवनमान उंचावण्यासाठी वापरत असतील तर ते योग्य मानले जाईल. त्यांना प्रगती करण्याची आणि विकसीत जगाच्या स्तरांपर्यंत आपला स्तर वाढवण्याची संधी दिली गेली आणि यासाठी त्यांना सहकार्य केले गेले तरच शांती प्रस्थापित होईल, जर त्या देशातील नेतृत्व प्रामाणिक नसेल, तर पाश्चात्य किंवा विकसीत देशांनी त्या देशांच्या विकासासाठी जी मदत दिली जाते त्याच्यावर स्वतः देख रेख ठेवावी आणि व्यवस्थापन करावे.

आणखीन अनेक असे मुद्दे आहेत जे मी नमूद करु शकतो; परंतु वेळे अभावी मी वर जे काही बोललो आहे तेवढयावरच थांबतो; निश्चितपणे मी जे काही बोललो आहे तीच इस्लामची खरी शिकवण आहे.

आणखीन एक प्रश्न तुमच्या मनात निर्माण होऊ शकतो त्याचे उत्तर देखील मी आधीच देऊन ठेवतो, तुम्ही असे म्हणाल की, जर हीच इस्लामची

खरी शिकवण असेल तर मुस्लिम जगामध्ये येवढी विभागणी आणि अराजकता का आहे? त्याचे उत्तर मी तेव्हाच दिले आहे जेव्हा मी म्हटले होते की, एका सुधारकाच्या प्रकटीकरणाची गरज आहे आणि आमचा असा विश्वास आहे की ते सुधारक अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापकच आहेत. आम्ही अहमदिया मुस्लिम जमाअत म्हणून ही इस्लामची खरी शिकवण जास्तीत जास्त लोकांपर्यंत कशी पोहोचवता येईल यासाठी प्रयत्न करत असतो. मी तुम्हा सर्वांना देखील अशी विनंती करतो की, तुम्ही सुद्धा तुमच्या प्रभाव क्षेत्रात यागोष्टी संदर्भात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करत रहावे की, जेणे करुन जगाच्या प्रत्येक भागामध्ये चीरंतनशांती प्रस्थापित होऊ शकेल. जर आम्ही हे कर्तव्य बजावण्यात असफल राहिलो तर, मग जगातला कोणताच विभाग युद्धाच्या विनाशकारी परिणामापासून सुरक्षित राहू शकणार नाही. मी अशी प्रार्थना करतो की, सर्वशक्तिमान अल्लाह जगातील सर्व लोकांना त्यांच्या व्यक्तिगत स्वार्थ आणि आकांक्षांच्यावर उठून जगाचे विनाशापासून रक्षण करण्यास प्रयत्नशील होण्याची बुद्धी देवो. पाश्चात्य विकसीत राष्ट्रे आजच्या जगात सर्वाधिक शक्तिशाली असल्यामुळे हे इतरांपेक्षा तुमचे अधिक कर्तव्य आहे की या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीकडे तुम्ही तातडीने लक्ष द्यावे.

शेवटी मी परत एकदा तुम्हां सर्वांचे आभार व्यक्त करतो, कारण तुम्ही आपला बहुमूल्य वेळ देऊन मला ऐकण्यसासाठी आलात आणि शांततेने माझे म्हणने ऐकून घेतले. तुम्हा सर्वांवर अल्लाहची कृपा होवो.

**धन्यवाद.**




# पाश्चात्य समाजाशी मुस्लिम एकात्म होऊ शकतात काय?

जर्मनी, २०१२







Ḥaḍrat Mirza Masroor Ahmad, Khalīfatul-Masīḥ V[aba] delivers the keynote address at Baitur-Rasheed Mosque




MUSLIME FÜR
FRIEDEN
FREIHEIT
LOYALITÄT



## प्रस्तावना

५ डिसेंबर २०१२ रोजी जर्मनीच्या हॅम्बर्ग येथील बैत-उर रशीद मशिदीत एक V.I.P सम्मेलन आयोजित करण्यात आले होते, ज्यात हज़रत मिर्ज़ा मसरूर अहमद, विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअतचे आध्यात्मिक गुरू, खलीफातुल-मसीह पंचम यांनी पाश्चात्य देशात मुस्लिमांच्या एकत्रीकरणाबाबत बीजभाषण दिले. उपस्थितांमध्ये हॅम्बर्गच्या द्वितीय लॉर्ड महापौर, ग्रीन पार्टीच्या सुश्री क्रिस्टा गोएस्टच, हॅम्बर्गमधील पोलिस अध्यक्ष वुल्फगँग कोपित्झ, हॅम्बर्गमधील सोशलिस्ट डेमोक्रॅटिक पार्टी फॉर इंटिग्रेशनचे अध्यक्ष, प्रांतीय विधानसभा सदस्य काझिम आबाची, राष्ट्रीय विधानसभाचे सदस्य सर्कान तोरेन आणि हॅम्बर्ग विद्यापीठातील डॉ. खलिफा तसेच इतर प्रमुख मान्यवर, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक उपस्थित होते. या प्रसंगी अहमदीया मुस्लिम जमाअतचे प्रमुख परमपूज्य हज़रत खलीफतुल मसीह पंचम यांनी दिलेला बीजभाषण येथे सादर केला आहे.

# पाश्चात्य समाजाशी मुस्लिम एकात्म होऊ शकतात काय?

बिस्लिमल्लाहीर्रहमानीर्रहीम-अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू आणि असीम कृपाळू आहे.

सर्व आदरणीय पाहूण्यांना अस्सलामु अलैकूम व रहमतुल्लाही व बरकाताहू.

सर्व प्रथम मी आपण सर्व पाहूण्यांची, आमंत्रण स्वीकारुन या प्रसंगी उपस्थित राहिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. तुमच्यापैकी अनेक जण अहमदी मुस्लिमांशी मित्रत्वाचे संबंध ठेऊन आहात आणि म्हणून मला खात्री आहे की, ज्यांचा अहमदिया समुदायांशी नुक्ताच परिचय झाला आहे त्यांच्या मनामध्ये या जमाअत बद्दल अधिक जाणून घेण्याची इच्छा निर्माण झाली असेल. तुमची उपस्थिती या गोष्टीचा पुरावा आहे की तुम्हाला अहमदिया मुस्लिमांशी संबंध ठेवण्यात आणि त्यांच्या मस्जिद मध्ये जाण्यास कुठलीही भीती वाटत नाही.

वास्तविक पाहता आजच्या वातावर्णात इस्लाम बद्दल बहुतेक बातम्या आणि अहवाल अतिशय नकारात्मक स्वरुपाच्या असतात आणि जे तुमच्यापैकी बिगर मुस्लिम आहेत त्यांच्या मनामध्ये अशी भावना सहज निर्माण होऊ शकते की, अहमदिया मस्जिद मध्ये जाण्याने तुम्हाला अनेक संकटांचा सामना करावा लागेल किंवा त्यामुळे तुम्हाला मोठे नुकसान सहन करावे

लागेल. तथापि जसे की मी आधीच म्हणालो की, तुम्हाला अहमदिया मुस्लिमांबद्दल कुठल्याही प्रकारची भीती वाटत नाही आणि त्यांना तुम्ही धोकादायक समजत नाही. याचा अर्थ असा होतो की, तुम्हाला विश्वास आहे की, अहमदी सुद्धा तुमच्या प्रमाणेच सुसभ्य लोक आहेत.

ज्या वेळेस मी हे म्हणतो, त्या वेळेस मी ही शक्यता देखील नकारत नाही की, तुमच्यापैकी काहीं लोकांच्या मनात आज इथे आल्यानंतर देखील काहीं शंका आणि काळजी नक्कीच असेल की या कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे काहीं नकारात्मक परिणाम तर भोगावे लागणार नाही; हे देखील शक्य आहे की, तुमच्या मनात असाही भयगंड असू शकतो की आपण अतिरेकी वृत्तीच्या किंवा मानसिकतेच्या लोकांसोबत तर बसलेलो नाही. जर तुमच्यापैकी कोणाच्या मनामध्ये असे भय असेल, तर त्यांनी ते आपल्या मनातून काढुन टाकावे. आम्ही या बाबतीत अतिशय सावध आहोत की, चुकून देखील एखादी अतिरेकी व्यक्ती या मस्जिद मध्ये किंवा या परिसरात दाखल होण्याचा प्रयत्न करत असेल, तर त्याला ताबडतोब या इमारतीतून बाहेर काढण्याची व्यवस्था आम्ही केली आहे. म्हणून तुम्ही निश्चिंत रहा, तुम्ही अतिशय सुरक्षित ठिकाणी आहात.

वास्तविक पाहता अहमदिया मुस्लिम जमाअत एक असा समुदाय आहे की, ज्यात एखादा सदस्य कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही ठिकाणी अतिरेकी प्रवृत्तीचे प्रदर्शन करत असेल किंवा कायदा मोडत असेल किंवा शांती भंग करत असेल तर त्याला लगेच जमाअत मधून निष्कासीत करण्यात येते. या बाबतीत आम्ही अतिशय कर्तव्यदक्ष आहोत आणि अशी कडक कार्यवाही करतो कारण आम्ही इस्लाम या शब्दाचा, ज्याचा शब्दशः अर्थ शांती आणि सुरक्षा असा होतो, अतिशय आदर करतो. आमच्या समुदायाद्वारे इस्लाम या शब्दाचे खरे प्रतिनिधीत्व केले जाते. इस्लामचे संस्थापक पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी १४०० वर्षांपूर्वी केलेली आहे. त्या

भविष्यवाणीमध्ये पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणाले होते की, ङ्गएक काळ असा येईल की मुसलमानातील बहुसंख्य लोक इस्लामची खरी आणि शुद्ध शिकवण विसरुन जातील.फया भविष्यवाणीनुसार अशा काळात अल्लाह एका व्यक्तीला एक मसीहा (सुधारक) आणि एक महदी म्हणून अवतरीत करेल, जेणे करुन तो खऱ्या इस्लामला जगामध्ये पुनर्स्थापित करेल.

आम्ही अहमदिया मुस्लिम जमाअतचे लोक अशी श्रद्धा ठेवतो की, आमच्या समुदायाचे संस्थापक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी (अ.स.) हेच ती व्यक्ती असून, त्यांच्याद्वारेच महान भविष्यवाणी पूर्ण झाली आहे. अल्लाहच्या कृपेने हा समुदाय जगातील २०२ देशांमध्ये प्रसारित होत असून त्याची भरभराट होत आहे. या सर्व देशांमध्ये, सर्व पार्श्वभूमीचे आणि सर्व वंशाचे स्थानिक लोक अहमदियत चा स्वीकार करत आहेत. अहमदिया मुस्लिम असतानाच ते त्यांच्या संबंधित देशाचे निष्ठावंत नागरिक म्हणून देखील आपली जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांना इस्लाम बद्दल प्रेम असण्यामध्ये आणि त्यांच्या देशाशी प्रेम असण्यामध्ये कोणताही विरोधाभास किंवा संघर्ष निर्माण होत नाही. खरे पाहिल्यास या दोन्ही निष्ठा एकमेकाशी निगडित आणि आपसात प्रतिबद्धित आहेत. अहमदिया मुस्लिम जेथे कोठे राहतात तेथे ते सर्वाधिक कायद्याचे पालन करणारे नागरिक म्हणून राहतात. मी कुठल्याही शंकेविना सांगू शकतो की जमाअतच्या बहुसंख्य सदस्यांमध्ये हे सद्‌गुण आढळून येतात.

वरील सद्‌गुणामुळेच अहमदी मुस्लिम जेव्हा केव्हा एका देशातून दुसऱ्या देशामध्ये स्थलांतरीत होतात किंवा जेथे कोठे स्थानिक लोक अहमदियत मध्ये दाखल होतात, तेव्हा अहमदींना तेथील स्थानिक समाजामध्ये एकरुप होण्यामध्ये कोणतीही अडचण भासत नाही. तसेच त्यांना अशी काळजी कधीही वाटत नाही की, नवीन राष्ट्रां मध्ये राष्ट्रीय हिताच्या संदर्भात त्यांच्या जबाबदाऱ्या ते कसे पार पाडू शकतील. जेथे जेथे अहमदी जातात तेथे ते

अन्य नागरिक प्रमाणेच त्या देशावर प्रेम करतात आणि त्या देशाच्या उन्नती आणि प्रगतीसाठी त्यांचे जीवन समर्पित करतात. आम्हाला अशाप्रकारे जीवन जगण्याची शिकवण इस्लामकडून मिळते आणि वास्तविक पाहता इस्लाम आम्हाला नुसता असा सौम्य सल्लाच देत नाही तर असा आदेश देते की, तुम्ही ज्या देशात राहता त्या देशाशी पूर्णपणे एकनिष्ठ आणि समर्पित रहायला हवे. वास्तविक पाहता पवित्र पैगंबर (स.) या गोष्टीवर खूप भर दिला आहे की, आपल्या देशावर प्रेम करणे खऱ्या मुस्लिमांच्या श्रद्धेचा भाग आहे. ज्या अर्थी देशावर प्रेम करणे हे इस्लामचे मूल तत्त्व आहे त्या परिस्थितीत खरा मुसलमान आपल्या देशाशी द्रोह आणि विश्वासघात कसा करु शकतो आणि तरी देखील आपली श्रद्धा कशी कायम ठेवू शकतो. अहमदी मुस्लिमां च्या बाबतीत बोलायचे झाल्यास आमच्या सर्वप्रमुख कार्यक्रमामध्ये आमचे सर्व सदस्य, मग ते पुरुष असोत, महिला असोत, मुले असोत किंवा वृद्ध असोत, ईश्वराला साक्षी ठेवून या बाबतीत शपथग्रहण करतात. या शपथ मध्ये ते प्रतिज्ञा करतात की, ते त्यांचे जीवन, संपत्ती, वेळ आणि त्यांची प्रतिष्ठा त्यांच्या धर्मासाठीच नव्हे, तर त्यांच्या राष्ट्रासाठी आणि देशासाठी अर्पण करतील. म्हणून त्यांच्यापेक्षा आणखीन मोठा प्रामाणिक नागरिक कोण असू शकतो, ज्याला सतत हे स्मरण करुन देण्यात येते की, आपल्या राष्ट्राची सेवा करावी की, ते आपल्या श्रद्धेसाठी देशासाठी आणि राष्ट्रासाठी सदैव सर्व प्रकारच्या त्यागासाठी तत्पर राहतील.

अनेक लोकांच्या मनामध्ये असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की, येथे जर्मनी मध्ये बहुसंख्य मुस्लिम पाकिस्तान, तुर्कीस्तान किंवा आशियाई देशातून आलेले आहेत आणि जेव्हा केव्हा त्यांना आपल्या राष्ट्रासाठी बलीदान करायची वेळ येईल त्यावेळी ते जर्मनीपेक्षा आपल्या मूळ देशाला प्राधान्य देतील, म्हणून मी हे स्पष्ट करु इच्छितो की, जेव्हा एक व्यक्ती जर्मन नागरीकत्व किंवा अन्य कोणत्याही देशाचे नागरीकत्व स्वीकारते, तेव्हा ती

पूर्णपणे त्याच देशाची नागरीक होते. मी हा मुद्दा, यापूर्वी जेव्हा मी जर्मन मिलिट्री मुख्यालय कोबलेन्ज़, येथे या वर्षाच्या सुरुतीला जेव्हा भाषण केले, तेव्हा सुद्धा स्पष्ट केला आहे. मी इस्लामच्या शिकवणूकीनुसार हे स्पष्ट केले की, जेव्हा केव्हा अशी परिस्थिती निर्माण होईल की, जर्मनीचे अशा देशाबरोबर, जो स्थलांतरीताचा मूळ देश आहे आणि जो आता जर्मनीचा नागरिक आहे, युद्ध छिडेल तेव्हा जर तो स्थालांतरीत आपल्या मूळ देशाबद्दल सहानूभूती बाळगत असेल आणि त्याला अशी भीती वाटत असेल की त्याची अशी भावना जर्मनीसाठी हानीकारक ठरेल, तर त्या व्यक्तीने ताबडतोब आपले नागरीकत्व आणि स्थलांतरीताचे स्थान त्याग करावे आणि आपल्या मूळ देशाला परत जावे. आणि जर तो तेथेच राहणे पसंत करत असेल तर इस्लाम त्याला कोणत्याही देशाशी, ज्याचा तो नागरिक आहे, विश्वासघात करण्याची परवानगी देत नाही. हीच इस्लामची निःसंदिग्ध आणि परिपूर्ण शिकवण आहे. इस्लाम कोणत्याही स्वरुपात बंडखोर वृत्तीला परवानगी देत नाही किंवा एखाद्या नागरिक त्यांच्या देश असो, तो त्या देशाचा घात करु शकत नाही, जर एखादी व्यक्ती आपल्या स्वेच्छेने सरकाराविरुद्ध कार्य करत असेल किंवा त्याला हानी पोहोचवत असेल तर तो त्या देशाचा शत्रू समजला जाईल आणि देशद्रोहाला, जी शिक्षा त्या देशाच्या कायद्याने वैध असेल, त्या शिक्षेस पात्र ठरेल.

यावरुन मुस्लिम स्थलांतरीतांची स्थिती स्पष्ट होते आणि जर स्थानिक जर्मन व्यक्ती किंवा कोणत्याही देशाची व्यक्ती इस्लाम धर्म स्वीकारते, तर त्या परिस्थितीत त्याची स्थिती अतिशय स्पष्ट आहे, त्याला आपल्या महान राष्ट्राप्रती निष्ठा बाळगण्याशिवाय अन्य पर्याय नाही. काहीं वेळा आणखीन एक प्रश्न विचारला जातो की, जर एखादी मुस्लिम व्यक्ती पाश्चात्य देशात राहत असेल आणि तो देश जर एखाद्या मुस्लिम राष्ट्राशी युद्ध छेडत असेल, तर त्या वेळेस त्याने कोणती भूमिका घ्यावी याचा उत्तर देताना सर्वप्रथम

अहमदिया मुस्लिम संप्रदायाचे संस्थापक हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी यांनी जे स्पष्ट केले आहे त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांनी म्हटले आहे की, आता काळ बदलेला असून धार्मिक युद्धांचा पूर्णपणे अंत झालेला आहे. इतिहासामध्ये काहीं वेळा मुस्लिम आणि इतर धर्मीयां मध्ये युद्ध झालेली आहे, त्यावेळी बिगर मुस्लिम लोकांचे उद्दिष्ट मुस्लिमांची कत्तल करुन इस्लाम धर्म संपवणे हे असे.

त्या काळातील बहुतेक युद्धांमध्ये बिगर मुस्लिमांनी आक्रमक पाऊले उचलल्यामुळे मुस्लिमांपुढे स्वतःचे आणि स्वतःच्या धर्माचे रक्षण करण्याला पर्याय नव्हता, तथापि अपेक्षित मसीहाने स्पष्ट केले की, आता ती परिस्थिती शिल्लक राहिलेली नाही, कारण आता आधुनिक काळातील सरकार इस्लामला संपविण्याच्या उद्देशाने युद्ध छेडत नाहीत; या उलट बहुसंख्य पाश्चात्य देशांमध्ये आणि बिगर मुस्लिम देशांमध्ये मोठया प्रमाणात धार्मिक स्वातंत्र्य दिले जाते. आमची जमाअत या संदर्भात अतिशय कृतज्ञ आहे, कारण ते अशा स्वातंत्र्यामुळे अहमदी मुस्लिमांना बिगर मुस्लिम देशांमध्ये इस्लामचा संदेश पोहोचविण्याची संधी मिळते. त्यामुळे आम्ही इस्लामची खरी आणि सुंदर शिकवण, जी शांती आणि सौहार्द आहे, तिचा परिचय पाश्चात्य जगाला करुन देण्यास सक्षम झालो आहोत. निश्चितच आज या धार्मिक स्वातंत्र्य आणि सहिष्णूतेमुळेच मी तुमच्या समोर उभा राहून खरा इस्लाम सादर करत आहे. त्यामुळे हे स्पष्ट आहे की, आज धार्मिक युद्धांचा प्रश्नच उत्पन्न होत नाही. आता फक्त दुसरी परिस्थिती उत्पन्न होऊ शकते ज्यामध्ये एक बहुसंख्य मुस्लिम असलेला देश आणि एक बहुसंख्य ख्रिस्ती असलेला देश किंवा अन्य कोणताही देश बिगर धार्मिक युद्धांमध्ये गुंतू शकतात. अशा परिस्थितीत ख्रिस्ती किंवा अन्य धर्मीय बहुसंख्य आलेल्या देशातील तेथील मुस्लिम नागरिकाने कोणती भूमिका द्यावी किंवा या परिस्थितीवर काय प्रतिक्रिया द्यावी, या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी इस्लामने एक स्वर्णीम तत्त्व

सांगितला आहे, ते म्हणजे कोणत्याही व्यक्तीने कधीही क्रौर्य आणि अत्याचाराला सहकार्य करु नये. म्हणून जर क्रौर्य किंवा अत्याचार एखाद्या मुस्लिम देशांकडून केला जात असेल तर तो थांबवलाच गेला पाहिजे, जर क्रौर्य ख्रिस्ती देशाकडून केला जात असेल तर तो सुद्धा थांबवलाच पाहिजे. एखादा नागरिक एकटयाने स्वतःच्या देशाला क्रौर्य आणि अत्याचारापासून कसा काय रोखू शकतो याचे उत्तर अतिशय सोपे आहे. आजच्या काळामध्ये संपूर्ण पाश्चात्य जगामध्ये लोकशाही व्यवस्थता कार्यरत आहे, जर एखादा सुज्ञ नागरिक पाहत असेल की त्याच्या देशातील सरकार अत्याचाराने वागत आहे, त्यावेळी त्याने त्या विरोधात आवाज उठवला पाहिजे आणि आपल्या देशाला रास्त मार्गावर आणण्याचा प्रयत्न करायला पाहिजे किंवा एखाद्या जनतेच्या गटाने सुद्धा त्या विरोधात भूमिका घ्यायला पाहिजे. जर एखादा नागरिक पाहत असेल की, त्याचा देश अन्य राष्ट्रांच्या प्रभूसत्तेचे उल्लंघन करत आहे, तर त्यावेळी त्याने आपल्या सरकारचे लक्ष वेधून घ्यायला पाहिजे आणि याबाबतीत आपली चिंता व्यक्त केली पाहिजे. शांततापूर्ण मार्गाने अशा पद्धतिने भूमिका घेऊन आपली चिंता व्यक्त करणे, ही कृती बंडखोरी किंवा बंडाळी नाही, खरे पाहिल्यास हे तर आपल्या देशाप्रती खऱ्या प्रेमाचे प्रदर्शन आहे. एक सच्चा नागरिक त्याच्या देशाची प्रतिष्ठा धुळीत मिळताना किंवा आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये त्याच्या देशाची नाचक्की होताना सहनच करु शकत नाही आणि म्हणून आपल्या देशाला जाब विचारुन तो आपल्या देशाप्रती प्रेम आणि निष्ठा प्रदर्शित करत असतो.

आंतरराष्ट्रीय समुदायाचा आणि तटसंबंधी संस्थांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास इस्लामची शिकवण अशी आहे की, जर एखाद्या देशावर अन्यायपूर्वक हल्ला केला गेला असेल, तर इतर देशांनी एकत्रीत येऊन आक्रमक देशाला विरोध केला पाहिजे, जर तो आक्रमक देश समजूतदारपणे माघार घेत असेल तर मग कठोर शिक्षा आणि अन्यायपूर्वक निर्णय त्या देशावर बदला घेण्याच्या भावनेने किंवा परिस्थितीचा लाभ घेण्याच्या हेतूने लादू नयेत. म्हणून इस्लाम

सर्व प्रकारच्या परिस्थितीला समर्पक शिकवणूकीचा सार शांतता प्रस्थापित करणे हा आहे आणि पवित्र पैगंबराने खऱ्या मुस्लिमंची व्याख्याच अशी दिली आहे की, त्याच्या वाणी आणि हातानी इतर शांततापूर्ण जीवन जगणारे लोक सुरक्षित रहायला हवेत. जसे की, यापूर्वीच म्हटले आहे की, इस्लामने शिकवले आहे की तुम्ही कधीही क्रौर्य आणि अत्याचाराला सहाय्य करु नये. हीच सुंदर आणि विद्वत्तापूर्ण शिकवण खऱ्या मुसलमानाला तो कोणतीही देशात राहात असली तरी आदर आणि प्रतिष्ठा मिळवून देते. यात कसलाही संदेह नाही की, सर्व सुसभ्य आणि प्रामाणिक लोकांना असे शांतीपूर्वक आणि विचारी लोक आपल्या समाजात असणे आवडेलच.

पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी मुस्लिमांना आणखीन एक जगण्याचा सुंदर मूलमंत्र दिला आहे, त्यांनी शिकवण दिली आहे की, खऱ्या श्रद्धावंताने उत्तम आणि शुद्ध गोष्टींचा शोध घेत राहिला पाहिजे. त्यांनी शिकविले आहे की, जेथे कोठे एखाद्या मुसलमानाला एखादी विवेकपूर्ण गोष्ट किंवा अन्य कोणतीही चांगली गोष्ट आढळून आली तर त्याने त्याला आपला वारसाहक्क समजून स्वीकारायला हवे. म्हणून ज्याप्रमाणे एखादी व्यक्ती आपला न्यायपूर्ण वारसाहक्क मिळविण्याचा प्रयत्न करते त्याच पद्धतिने मुस्लिमानांना अशी शिकवण देण्यात आली आहे की, त्यांनी सर्व प्रकारच्या विवेकपूर्ण सल्लयांचा आणि चांगल्या गोष्टींचा लाभ घेयायला पाहिजे मग ते कोठेही सापडोत. अशाकाळात जेव्हा स्थलांतरीतांच्या एकात्मतेबद्दल अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत हे तत्त्व त्यावेळी किती सुंदर आणि परिपूर्ण मार्गदर्शक आहे. मुस्लिमानांना अशी शिकवण देण्यात आली आहे की, स्थानिक समाजाशी एकरुप होण्यासाठी आणि आपसात आदरभाव निर्माण होण्यासाठी त्यांनी प्रत्येक समाजातील प्रत्येक भागातील प्रत्येक शहरातील आणि प्रत्येक देशातील चांगल्या गोष्टी आत्मसात करायला शिकले पाहिजे. आणि अशी मूल्ये फक्त आत्मसात करु नये तर आपल्या

वयैक्तिक जीवनामध्ये त्यांना पूर्ण रुपाने समावून घेतले पाहिजे. हे मार्गदर्शन खऱ्या अर्थाने एकरुपता आणि आपसातील विश्वास आणि प्रेमाची भावना निर्माण करण्यास कारणीभूत ठरते. वास्तविक पाहता एका खऱ्या निष्ठावंतापेक्षा कोण अधिक शांतीवर प्रेम करणारा असू शकतो जो आपल्या श्रद्धेची कर्तव्यपूर्ण करतानाच त्याच्या किंवा अन्य कोणत्याही समाजातील चांगल्या मूल्यांचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करतो त्याच्यापेक्षा अधिक शांती आणि सुरक्षा कोण प्रस्थापित करु शकतो?

आज उपलब्ध असलेल्या संपर्काच्या साधनांमुळे हे जग एक वैश्विक खेडे मानले जात आहे. ही तीच गोष्ट आहे ज्याची भविष्यवाणी पवित्र पैगंबरानी (स.) १४०० वर्षापूर्वी केली होती जेव्हा त्यांनी म्हटले होते की, असा काळ येईल की जग एकरुप होईल आणि आपसातील अंतर कमी झालेले दिसून येईल. त्यांनी म्हटले होते की, अत्याधुनिक संपर्क साधनांमुळे लोक संपूर्ण जगाला पाहू शकतील. वास्तविक पाहता ही भविष्यवाणी पवित्र कुरआनामध्ये अतिशय विस्ताराने नमूद केलेली आहे. या बाबतीत पवित्र पैगंबरानी अशी शिकवण दिली आहे की, अशा काळात लोकांनी एकमेकाकडून चांगल्या गोष्टी शिकल्या आणि आत्मसात केल्या पाहिजेत; जसे ते आपली एखादी हरवलेली मौल्यवान वस्तू शोधण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या शब्दात बोलायचे झाल्यास सर्व सकारात्मक गोष्टींचा स्वीकार करायला पाहिजे आणि सर्व नकारात्मक गोष्टींचा त्याग करायला पाहिजे. पवित्र कुरआन मध्ये हा आदेश अशा शब्दात वर्णिला आहे की, खऱ्या मुस्लिमाने सर्व चांगल्या गोष्टी धारण कराव्यात आणि वाईट गोष्टींपासून अलिप्त रहावेत. हे सर्व मनामध्ये धारण केल्यानंतर कोणता देश किंवा कोणता समाज असे म्हणू शकतो की, तो अशा शांततप्रेमी मुस्लिमांना किंवा इस्लामला त्यांच्यामध्ये सहन करू शकत नाहीत. गेल्या वर्षी मला बर्लीनच्या महापौरांशी भेटण्याची संधी मिळाली होती; तेव्हा मी त्यांच्याकडे स्पष्ट केले होते की इस्लाम अशी

शिकवण देतो की कुठल्याही राष्ट्रातील सर्व चांगल्या गोष्टी तुमची वयैक्तिक संपत्ती समजून तुम्ही स्वीकारल्या पाहिजेत. यावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, जग तुमच्या शिकवणीशी सहकार्य करायला आणि तुमच्या हातात हात दयायला तयार होईल याबद्दल मला कुठलाही संदेह नाही.

मला अतिशय आश्चर्य आणि दुःख वाटते जेव्हा मी ऐकतो की, जर्मनीच्या काहीं भागामध्ये लोक असे म्हणतात की मुस्लिमच नव्हे तर इस्लामदेखील जर्मन समाजाशी एकरुप होण्यासाठी सक्षम नाही. निश्चितच हे सत्य आहे की अतिरेकी आणि दहशतवादी, जो इस्लाम प्रसारित करतात तो फक्त जर्मनीच नव्हे तर कोणत्याच देशाशी किंवा समाजाशी एकरुप होण्याच्या पात्रतेचा नाही. खरोखरच एक काळ असा येईल की, अशा अतिरेकी विचारधारे विरुद्ध मुस्लिम देशात सुद्धा मोठया प्रमाणात आवाज उठवला जाईल तथापि खरा इस्लाम, जो पवित्र पैगंबरांनी शिकवला आहे, तो नक्कीच आणि नेहमीच सुसभ्य आणि प्रामाणिक लोकांना आपल्याकडे आकर्षित करत राहील. या युगामध्ये या मूळ शिकवणींना पुनर्स्थापित करण्यासाठी अपेक्षित मसीहाला पवित्र पैगंबरांचा सेवेकरी म्हणून पाठविले आहे आणि म्हणूनच त्याचा समुदाय इस्लाचा खरा संदेश प्रचारित आणि आचारित आहे.

ही गोष्ट अतिशय स्पष्ट असावी की, कोणीही असे म्हणू शकत नाही की खरा इस्लाम कोणत्याही समाजाशी एकरुप होऊ शकत नाही. खरा इस्लाम तो आहे जो सदाचार आणि सद्विचारांचा प्रसार करतो आणि दुराचार व दुर्विचारांना मज्जाव करतो. खरा इस्लाम मुसलमानांना शिकवण देतो की, जेथे कोठे क्रौर्य आणि दुराचार असेल त्याला ताबडतोब संपवावे म्हणून तो एकरुप होण्यात अयशस्वी ठरतो. हा प्रश्नच उत्पन्न होत नाही तर खरा इस्लाम समाजाला आपल्याकडे चुंबकाप्रमाणे आकर्षित करतो. खरा इसलाम शिकवण देतो की, एखाद्या व्यक्तीने फक्त स्वतःसाठीच शांतीची

इच्छा बाळगावी किंवा शांती स्थापन करावी; असे नसून त्याने सर्वच लोकांसाठी शांती आणि सद्भाव याचा प्रसार करावा आणि त्यासाठी तेवढेच उत्कट असावे जेवढे तो स्वतःसाठी असतो, ही निरपेक्षवृत्तीच जगामध्ये शांती स्थापन करण्याला सहाय्यभूत ठरते. मग असा कोणता समाज आहे की, ज्याला अशी शिकवण आवडणार नाही आणि तो अशा दृष्टीकोनास मान्य करणार नाही. निश्चितच कोणताही चांगला समाज अनैतिकता आणि दुराचार पसरावा, अशी इच्छा बाळगणार नाही आणि तो सदाचार आणि शांतीला प्रोत्साहन देण्यासा विरोध करणार नाही.

जेव्हा आपण सदाचारची व्याख्या करतो तेव्हा एका धार्मिक व्यक्तीच्या आणि एका निधर्मी व्यक्तीच्या व्याख्येमध्ये फरक पडण्याची शक्यता नकारता येत नाही. सदाचारांच्या पैलूंमध्ये आणि नैतिकतेच्या बाबतीत दोन सद्‌गुणांचा उल्लेख विशेषत्वाने इस्लाम करतो, ज्यांच्याद्वारे इतर प्रकारचे सदाचार उत्पन्न होतात; त्यापैकी एक म्हणजे सर्वशक्तिमान अल्लाहच्या प्रती असलेली कर्तव्य आणि दुसरे म्हणजे मानवजातीप्रती असलेली कर्तव्य. जरी एका निधर्मी व्यक्तीच्या आणि धार्मिक व्यक्तीच्या व्याख्येमध्ये एका पैलूबद्दल मतभिन्नता असू शकते; पण दुसऱ्या पैलूबद्दल जो मानवी अधिकारांच्या संदर्भात आहे मतभिन्नता असूच शकत नाही. अल्लाहप्रती असलेल्या कर्तव्यांचा संबंध उपसनेशी येतो आणि याबाबतीत सर्वच धर्म त्यांच्या अनुयायांना मार्गदर्शन करतात. मानवाप्रती असलेल्या कर्तव्यांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास ही अशी बाब आहे की, धार्मिक आणि निधर्मी दोन्हीही समाज याच शिकवण मानवजातीला देतात. इस्लाम आम्हाला याबाबतीत अतिशय सखोल आणि विस्तृत शिकवण देऊन मानवजातीप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव करुन देतो, जे सर्व गोष्टींचा समावेश करणारी शिकवण असल्यामुळे आजच्या काळातील अशक्य प्रायः वाटू शकते. तथापि मी यापैकी त्या कर्तव्यांचा, जो इस्लामने प्रस्थापित केले आहे आणि

समाजामध्ये शांती प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक आहे, त्यांचा उल्लेख करतो. इस्लाम तुम्हाला इतर व्यक्तींच्या भावनांचा आदर आणि काळजी घेण्याची शिकवण देतो. यामध्ये धार्मिक भावनांचाही आणि सर्व सामान्य सामाजिक भावनांचाही समावेश होतो. एका प्रसंगामध्ये जेव्हा एक मुस्लिम आणि एक ज़्यु व्यक्तीमध्ये वादविवाद चालू होता, पवित्र पैगंबराने (स.) ज़्यु व्यक्तीच्या धार्मिक भावनांच्या सन्मान करण्यासाठी त्याची बाजू घेतली. ज़्यु व्यक्तीच्या भावनांचा आदर करण्यासाठी पवित्र पैगंबराने मुस्लिम व्यक्तीला असा निर्देश दिला की, त्याने पवित्र पैगंबराना प्रेषीत मोज़ेज पेक्षा श्रेष्ठ ठरवू नये. जरी त्यांना याची जाणीव होती की, त्यांनी एक परिपूर्ण धर्मशास्त्र आणलेला आहे. अशा पद्धतीने पवित्र पैगंबर (स.) इतर लोकांच्या भावनांची काळजी घेत आणि समाजामध्ये शांती प्रस्थापित करत.

दुसरी इस्लामची महत्त्वाची शिकवण गरीब आणि वंचित लोकांच्या अधिकारांच्या पूर्तते संदर्भात आहे. याकरीता इस्लाम शिकवितो की, समाजातील वंचित घटकांच्या उत्थानाची संधी लोकांनी शोधत राहायला पाहिजे. आम्ही नेहमीच दुर्लक्षलेल्या समाज घटकांची मदत करण्यासाठी निःस्वार्थपणे प्रयत्न करायला पाहिजे आणि त्यांचे कधीही शोषण नाही केले पाहिजे. दुर्दैवाने आजच्या समाजामध्ये ज्या योजना किंवा सुविधा दृश्य स्वरुपात वंचित घटकांच्या मदतीसाठी निर्माण केल्या जातात, त्या बहुतेक वेळा कर्जाच्या स्वरुपात असतात आणि ते व्याजावर आधारित असते, उदाहरणार्थ विद्यार्थांना नेहमी त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कर्ज दिले जाते आणि त्याची परतफेड करण्यात त्यांना दशके लागतात. आणि परतफेडकेल्यावर एखाद्या आर्थिक संकटामुळे ते पूर्व पदावर येतात किंवा पहिल्यापेक्षा अधिक आर्थिक दुरावस्थेला पोहोचतात. आम्ही या संदर्भात अनेक उदाहरणे मागच्या काहीं वर्षात पाहिलेली आहेत किंवा ऐकलेली आहेत, जेव्हा जगाच्या अनेक भागांमध्ये आर्थिक संकटे उद्भवली आहेत.

संदर्भात अनेक उदाहरणे मागच्या काहीं वर्षात पाहिलेली आहेत किंवा ऐकलेली आहेत, जेव्हा जगाच्या अनेक भागांमध्ये आर्थिक संकटे उद्भवली आहेत.

आणखीन एक आरोप जो इस्लामविरुद्ध सर्वसाधारणपणे लावला जातो तो असा आहे की, इस्लाम, महिलांना समानतेची आणि योग्य वागणूक देत नाही. तथापि हा आरोप बिनबुडाचा आणि कोणत्याही पुराव्या शिवाय आहे. इस्लामने स्त्रीयांना प्रतिष्ठा आणि सन्मान दिलेला आहे. याचे एक दोन उदाहरण मी देतो; इस्लामने स्त्रीला तिच्या पतीला, तो चूकीची वागणूक करत असल्यास घटस्फोट देण्याचा अधिकार दिला आहे आणि अशा काळात दिला आहे जेव्हा स्त्रीला फक्त पुरुषांची मालमत्ता किंवा चीज़ वस्तू समजले जात होते. फार लांब कशाला, गेल्या शतकापर्यंत विकसित जगातदेखील स्त्रीयांना हा अधिकार मिळत नव्हता, त्यापुढे जाऊन इस्लाम ने महिलांना अशा वेळी जेव्हा त्यांना कुठलेही स्थान किंवा प्रतिष्ठा नव्हती वारसाहक्क प्रदान केला. हा अधिकारदेखील युरोपमधील महिलांना फार अलीकडच्या काळात देण्यात आला आहे. इस्लाम त्याच्या शेजारांच्या अधिकारांवरदेखील भर देतो.

पवित्र कुरआनामध्ये तुमच्या शेजारी कोण आणि त्याचे अधिकार कोणते याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले आहे. शेजाऱ्यांमध्ये ते सर्व सामील आहेत, जे तुमच्या बाजूला वसलेले आहेत किंवा शेजारच्या घरात राहतात, ते ज्यांना तुम्ही ओळखता किंवा ओळखत देखील नाही आणि वास्तविक पाहिल्यास त्यात तुमच्या शेजारीत चाळीस घरांमध्ये राहणाऱ्यांचा समावेश होतो. शेजाऱ्यांमध्ये त्यांचा देखील समावेश आहे जे तुमचे सहप्रवासी आहे आणि तुम्हाला त्यांच्या अधिकारांचेही रक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या अधिकाऱ्यांच्या बाबतीत इतका भर देण्यात आला की, पवित्र पैगंबरांनी म्हटले की, मला वाटले की जणू शेजाऱ्याला वारसाहक्कात

सुद्धा सामील केले जाईल. खरे पाहिल्यास पैगंबरांनी इतपर्यंत सांगितले की ज्याच्यापासून ज्याचा शेजारी सुरक्षित नाही त्याला श्रद्धावंत किंवा मुस्लिम मानले जाणार नाही.

आणखीन एक आदेश इस्लामने इतरांच्या भल्यासाठी जो दिला आहे तो असा की सर्वांनी कमकुवत आणि उपेक्षित वर्गाच्या उन्नतीसाठी आणि त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी एकमेकाला सर्वप्रकारे सहकार्य आणि मदत करायला हवी. म्हणून या आदेशाची परिपूर्ती करण्यासाठी आणि या शिकवणूकीची अंमलबजावणी करण्यासाठी अहमदिया मुस्लिम जमाअत जगातील अनेक भागामध्ये गरीब आणि वंचित वर्गाला प्रार्थमिक आणि उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देत आहे. आम्ही अनेक ठिकाणी शाळेंच्या इमारती बांधत आहोत आणि शाळा चालवत आहोत. वंचित वर्गातील विद्यार्थांना उच्च शिक्षण ग्रहण करण्यासाठी शिष्यवृत्ती आणि अनुदान देत आहोत, जेणे करुन त्यांची समाजामध्ये स्वतःचे स्थान निर्माण व्हावे आणि ते स्वतःच्या पायावर उभे रहावे.

आणखीन एक आदेश इस्लामने असा दिला आहे की, तुम्ही आपले करार आणि प्रतिज्ञा पूर्ण केल्या पाहिजे. यामध्ये अशा सर्व प्रतिज्ञा, ज्या तुम्ही एकमेकाशी करता त्या आणि एक मुस्लिम ज्यावेळी आपल्या देशाच्या नागरिक म्हणून देशाशी एकनिष्ठ राहण्याची जी प्रतिज्ञा करतो ती सुद्धा पूर्ण करण्याचा समावेश आहे. ही तीच गोष्ट आहे ज्याच्या यापूर्वी मी उल्लेख केला आहे.

हे काहीं थोडे मुद्दे आहेत जे मी आपणासमोर मांडले आहेत जेणे करुन आपल्या लक्षात यावे की इस्लाम किती प्रेमळ आणि सहिष्णू धर्म आहे. ही गोष्ट अतिशय दुःखदायक आहे की, जेवढया प्रकाशाने इस्लाम शांतीची शिकवण देतो आणि जगाला मार्गदर्शन करतो तेवढयाच जोरदारपणे इस्लामचे विरोधक किंवा असे लोक ज्यांना इस्लामची खरी शिकवण माहीत

नाही ते इस्लाम विरुद्ध गंभीर स्वरुपाचे बिनबुडाचे आरोप करत आहेत. जसे की मी म्हटले आहे की, या युगामध्ये अहमदिया मुस्लिम जमाअत इस्लामच्या खऱ्या संदेशाचा प्रचार आणि प्रसार करीत आहे. या स्पष्टीकरणानंतर मी अशा लोकांना जे काहीं थोडया मुस्लिमांच्या चूकीच्या वागण्यामुळे इस्लाम विरुद्ध तक्रारी करतात त्यांना विनंती करतो की त्या मुस्लिमांना व्यक्तीगत पातळीवर जरुर प्रश्न विचारावेत आणि जरुर त्यांच्या कृतीबद्दल जबाबदार धरावे. परंतु त्यांच्या या अयोग्य वागण्याला निमित्त करुन इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीला बदनाम आणि अपमानीत करण्याचा प्रयत्न करु नये.

तुम्ही कधीही असे गृहीत धरु नये की इस्लामची शिकवण जर्मनीसाठी किंवा कोणत्याही अन्य देशासाठी धोकादायक किंवा हानीकारक आहे. तुम्ही या बाबतीत कधीही चिंता करु नये की एखादा मुसलमान जर्मन समाजाशी एकरुप होतो किंवा नाही जसे की, मी आधीच सांगितले आहे की इस्लामचे हे वैशिष्ट आहे की त्याने मुस्लिमांना अशी शिकवण दिली आहे की त्यांनी सर्व चांगल्या गोष्टी आत्मसात कराव्यात आणि म्हणून एकरुप होण्यात त्यांना काहीही अडचण येत नाही. जर एखादी व्यक्ती या विपरीत कृती करत असेल तर ती फक्त नावाशेष मुस्लिम आहे; परंतु ती इस्लामच्या खऱ्या शिकवणीवर श्रद्धा ठेवणारी नाही. मात्र निश्चितपणे मुस्लिमांना जर असे काहीं करण्यास सांगितले की, जे अयोग्य आहे किंवा त्यांना सांगितले की पवित्र कुरआनाच्या नैतिकते संदर्भातील तत्त्वांचे धर्माच्या पावित्र्या संदर्भातले किंवा सदाचारांच्या विरुद्ध वागण्याची सूचना करण्यात आली, तर ते कदापिही त्याचे पालन करणार नाही. तथापि या बाबी एकात्मते संदर्भातील नसून त्या व्यक्तीगत धार्मिक स्वातंत्र्या संदर्भातील आहेत.

धार्मिक स्वातंत्राचे उल्लंघन करणे हा प्रश्न फक्त मुस्लिमांपुर्ताच मर्यादित नसून सर्वच प्रामाणिक आणि सभ्य लोकांनी त्याविरुद्ध उभे राहिले पाहिजे आणि उघडउघड सरकारला किंवा समाजाला बजावले पाहिजे की

व्यक्तीच्या धार्मिक अधिकारांमध्ये त्यांनी हस्तक्षेप करु नये. मी प्रार्थना करतो की, जर्मनी आणि खरे तर प्रत्येक देशाने, जे वेगवेगळया वंशाच्या, वेगवेगळया संस्कृतीच्या लोकांचे निवासस्थान झाले आहे, त्यांनी अत्योच्च पातळीवर इतर लोकांच्या भावना आणि श्रद्धांच्या बाबतीत सहनशीलता आणि आदरभावाचे प्रदर्शन करावे. अशा पद्धतीने ते अशा लोकांसाठी जे आपसात प्रेम, सौहार्द आणि शांतीचे प्रदर्शन करतात, आदर्श ठरतील. यामुळे जगाला स्थायी शांती आणि सुरक्षेची हमी मिळेल जेणे करुन जग आपसातील सहनशीलेच्या पूर्ण अभावामुळे ज्याविनाशाकडे मार्गक्रमण करत आहे त्यापासून सुरक्षित ठेवता येईल.

ज्या प्रकारच्या भयंकर विनाशाची छाया आमच्यावर पडत आहे त्या विनाशापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक देशाने आणि प्रत्येक व्यक्तीने, मग ती धार्मिक असो वा नसो अतिशय काळजीपूर्वक पाऊले उचलण्याची गरज आहे. जगातील प्रत्येक व्यक्तीला ही गोष्ट समजण्याची सदबुद्धी मिळो. सरतेशेवटी मी परत एकदा या ठिकाणी येऊन आणि आपला अमूल्य वेळ खर्च करुन मला ऐकण्याची तसदी घेतली त्याबद्दल आपणा सर्वांचे आभार मानतो. अल्लाह तुमच्यावर कृपा करो.

**धन्यवाद.**



# इस्लाम -
# शांती आणि करूणेचा धर्म

संसद गृहे लंडन,
यु.के, २०१३








The Deputy Prime Minister, Rt. Hon. Nick Clegg in discussion with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba], House of Commons, London, 11th June 2013



The Home Secretary, Rt. Hon. Theresa May MP with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



The Shadow Foreign Minister Rt. Hon. Douglas Alexander with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Rt. Hon. Ed Davey MP with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] received at the House of Commons by Rt. Hon. Ed Davey MP
London, 11th June 2013



Rt. Hon. Ed Davey MP escorts Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] through Westminster Hall, House of Commons, London, 11th June 2013



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] delivering his historic speech to Parliamentarians, VIPs and diplomats at the House of Commons, London, 11th June 2013

# प्रस्तावना

अहमदिया मुस्लिम जमाअत, यु.के मधील शतकवर्षानिमित्त लंडन संसद मध्ये ११ जून २०१३ रोजी, शताब्दी समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद, यांनी एक बीजभाषण दिले.

या शतब्दी समारोहामध्ये ६८ उच्च पदाधिकारी सामील होते. ज्यात ३० सांसद, १२ हॉऊज़ ऑफ लॉर्डस चे सदस्य ज्यामध्ये ६ केंद्रीय मंत्री आणि २ मंत्री उपस्थित होते. विविध टी.व्ही.चैनल्स जसे की, बी.बी.सी, स्काय टी.व्ही, आए.टी.व्ही चे प्रतिनिधी देखील या समारोहात उपस्थित होते. उपस्थित अतिथींमध्ये खालील उच्च पदाधिकारी देखील सामील होते. विद्युत व पर्यावरण मंत्रीचे सचीव आदरणीय एड. डेवी, उप पंतप्रधान आदरणीय निक क्लेग, गृहसचीव आदरणीय थेरेसा मे, परराष्ट्रमंत्री सचीव डग्लस एलेक्जेंडर, नियुक्त समिति चे अध्यक्ष आदरणीय कीथ वॅझ, मोर्डन आणि मिचॅम चे सांसद मेक्डोनाल्ड हे सर्व देखील या कार्यक्रमात उपस्थित होते.

## इस्लाम -
## शांती आणि करूणेचा धर्म

बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहीम-अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू व असीम कृपाळू आहे. मी आरंभ करतो.

सर्व पाहुण्यांना अस्सलामू अलैकूम व रहमतुल्लाही व बरकातहू.- परमेश्वराची दया व कृपा आपणा सर्वांवर होवो.

सर्वप्रथम मी अहमदिया मुस्लिम जमाअत च्या शुभ चिंताकांचे धन्यवाद करु इच्छितो ज्यांनी आमच्या सोबत असलेली घनिष्ठ मित्रत्वाचे प्रमाण देत यु.के. मध्ये आमचे शतकवर्षा निमित्त या शताब्दी समारोहाचे आयोजन पार्लिमेंट हाऊज़ मध्ये केले. तसेच मी त्या सर्व पाहूण्यांचे देखील आभार मानतो ज्यांनी येथे हजेरी लाऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवत यास सफल करण्यात हातभर लावला.

या आभार व्यक्त करण्यासोबतच, माझी अशी आशा व प्रार्थना आहे की, या सुंदर आणि भव्य इमारतीतील सर्व विभागात कार्यरत असलेले सर्व कार्यकर्त्यांनी आपल्या देशाच्या हितासाठी आपले कर्तव्य पार पाडणारे असोत. तसेच मी हे देखील आशा करतो की, तुम्ही सर्वांनी अन्य देशांशी असा प्रेमळ संबंध प्रस्थापित करावे आणि न्यायोचित निर्णय घ्यावेत, जे सर्व लोकांसाठी व सर्व पक्षांसाठी हितकारी राहील. जर ही भावना अंगीकारली गेली तर याद्वारे हे लाभकारी परिणाम अर्थात - प्रेम, सौहार्द आणि बंधुता निश्चितच उत्पन्न होईल. ज्याद्वारे संपूर्ण जग खऱ्या अर्थाने प्रेम आणि शांतीचा केंद्र होईल.

माझी ही इच्छा, ही संपूर्ण जगात वास्तव्य करणाऱ्या अहमदींचे प्रतिनिधित्व करते. कारण आमचा हा अटल विश्वास आहे की, आपल्या देशाशी आणि सामूहिक स्परूपात संपूर्ण मानवजातीशी प्रेम भावना बाळगणे, ही शाश्वत प्रेम आणि शांती कायम करण्यासाठी आवश्यक तत्त्व आहे. अहमदी मुसलमान निःसंशयपणे असा विश्वास बाळगतात की, आपल्या देशाशी प्रेम करणे हे श्रद्धेचा एक महत्त्वाचा भाग आहे. कारण की इस्लामचे संस्थापक हज़रत मुहम्मद (स.) यांनी असे करण्याचे आदेश दिले होते. म्हणून मी स्पष्टपणे हे सांगू इच्छितो की, प्रत्येक अहमदी, जो या देशात जन्मला आहे किंवा दुसऱ्या देशातून स्थालांतरित होऊन या देशाची नागरिकता स्वीकारून येथे वास्तव्य करत आहे, तो पूर्णतः या देशाशी एकनिष्ठ आहे आणि या देशाशी अपार प्रेम बाळगत आहे. आणि ते सर्व या महान देशाच्या उन्नती आणि समृध्दीची कामना करतात.

इतर देशातून स्थलांतरित होऊन येथे वास्तव्य करणाऱ्या लोकांची संख्या पुष्कळ आहे. आणि त्यांची संख्या यु.के.च्या एकूणजनसंख्येतील १४-१५ टक्के इतकी आहे. तरी ब्रिटेन च्या लोकांनी, ज्या उदारतेने आणि सहिष्णूतेने या परकीय लोकांचे स्वागत केले आहे याची प्रशंसा केल्याशिवाय मी माझे भाषण पुढे नेऊ शकणार नाही. असे लोक जे दुसऱ्या देशातून येथे राहण्यासाठी आलेले आहेत त्यांचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी देशाशी प्रामाणिक राहून प्रत्येक प्रकारच्या व्यवस्था आणि समस्यांच्या निरसनासाठी प्रशासनाच्या सर्व प्रयत्नांचे समर्थन करावे. आणि जिथे अहमदिया मुस्लिम जमाअत च्या सदस्यांचा प्रश्न आहे तर ते नेहमीच या स्वर्णीम सिद्धांताचाच पालन करतात.

जसे की आपण सर्व जाणता की, या ठिकाणी आपण सर्व यु.के. मध्ये अहमदिया मुस्लिम जमाअत चे १०० वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने शताब्दी समारोह साजरा करत आहोत. या गेल्या १०० वर्षांचा इतिहास या

गोष्टीचे प्रमाण आहे की, जमाअतच्या प्रत्येक सदस्याने या देशाशी प्रामाणिक संबंध प्रस्थापित केलेला आहे आणि प्रामाणिकपणेच्या प्रत्येक पातळीवर स्वतःला सिद्ध करुन दाखवलेला आहे, आणि प्रत्येक प्रकारच्या अतिरेकी, विद्रोह आणि अराजकतेपासून परावृत्त राहिले आहे. वास्तविक पाहता अहमदींमध्ये या प्रामाणिकपणा आणि देशाशी प्रेमभावना जागृत होण्याचे एकमेव कारण हे आहे की, अहमदिया मुस्लिम जमाअत ही एक प्रामाणिक आणि खरीखुरी इस्लामीक तत्त्वांचे पालन करणारी जमाअत आहे. आमची जमाअत इतरांपेक्षा वेगळी व विशेष आहे; कारण आम्ही सदैव इस्लामच्या वास्तविक आणि शांतीपूर्ण शिकवणींचा अवलंब करत जगभरातील लोकांपर्यंत त्याचा प्रचार-प्रसार करण्यात सदैव प्रयत्नशील आहोत. आमचा हा निरंतर प्रयत्न आहे की, या शिकवणींना पूर्ण जगात इस्लामच्या नावाखाली ख्याती प्राप्त व्हावे.

या प्रस्तावनेनंतर मी आता माझ्या मुख्य विषयाकडे वळतो. आमची जमाअत ही शांती, सौहार्द आणि समंजस्याची वाहक आहे, ज्यामुळे आमचे ब्रीदवाक्य ''प्रेमसर्वांसाठी घृणा कोणासाठीही नाही'' ह्याचे प्रदर्शन आपणास पहायला मिळते. जरी हे सत्य आहे की, काहीं बिगर मुस्लिमांचे आमच्यासोबत अतिशय चांगले संबंध आहेत तरी ते आश्‍चर्य करतात की अहमदिया मुस्लिम जमाअतचे सर्व शांती उपक्रम ते थेट इस्लामच्या शिकवणूकीशी का जोडतात. त्यांच्या या आश्चर्याच्या कारण की अहमदी लोकांव्यतिरिक्त इतर मुसलमान, ज्यामध्ये इस्लामीक तज्ज्ञ व मोठ मोठी संघटना सामील आहेत, त्यांचे कथन व वर्तन पूर्णपणे विरूद्ध आहेत, आणि त्यांचे ध्येय व त्यांचा संदेश एक वेगळीच भावना व्यक्त करतात. या मतभेदाचे कारण विशद करताना मी हे स्पष्ट करु इच्छितो की, अहमदी मुसलमान या गोष्टीवर विश्वास ठेवतात की, या वर्तमानयुगात 'तलवारीच्या द्वारे जिहाद करणे' ही विचारणधारा पूर्णतः चूकीची विचारधारा आहे. आणि याचे पूर्णतः निषेध

झाले पाहिजे. या उलट काहीं मुस्लिम विद्वान या चूकीच्या विचारधाराचे समर्थन करताना दिसतात किंबहुना याचे पालन देखील करतात. आणि त्यांच्या या समर्थनामुळे आज असंख्य मुस्लिम वसाहतीत दहशतवादी व अतिरेकी गटांची स्थापना होत आहे.

आणि एवढेच नव्हे तर या संघटांच्या स्थापने व्यतिरिक्त काहीं लोक वयैक्तिक पातळीवर सुद्धा या निरर्थक विचारधारेचा लाभ घेत आहेत. लंडनच्या रस्त्यावर एक निष्पाप सैनिकाची निर्मम हत्या, हे या चूकीच्या विचारधाराचेच परिणाम आहे. मी हे स्पष्टपणे सांगू इच्छितो की, अशा आक्रमणाचा इस्लामी शिकवणूकीशी काहीही संबंध नाही, किंबहुना या उलट अशी दुर्दैवी घटना इस्लामी शिकवणूकींच्या बिल्कूल उलट व विपरीत आहे. अशा प्रकारच्या घटनेतून इस्लामची मुलभूत शिकवण व नामशेष मुसलमांचे स्वार्थी ध्येय यातील फरक स्पष्टपणे दिसून येते. या सोबत मी हे देखील सांगू इच्छितो की, या प्रकरणामुळे काहीं स्थानिक समुदायांची प्रतिक्रिया देखील अनुचित होती आणि त्यांच्या अशा काहीं प्रतिक्रियेमुळे सामाजिक शांती विस्कळीत होण्याचा धोका देखील असतो.

इस्लामच्या शिकवणूकीच्या समर्थनात आम्ही जो युक्तीवाद प्रस्तूत करतो ते बरोबर आहे की नाही, याचा काय प्रमाण आहे? विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे की, इस्लाम मध्ये तलवारीची किंवा बलप्रयोगाची परवानगी तेव्हा देण्यात आली आहे जेव्हा इस्लामविरूद्ध धार्मिक पातळीवर त्याचा विरोध केला जात असेल. सांप्रतकाळात, मग ते एखादे देश असो वा धर्म, ते धर्माच्या आधारावर इस्लामविरूद्ध युद्ध करत नाहीत. म्हणून धर्माच्या नावाखाली मुसलमानांनी कोणत्याही गटावर हल्ला करणे कोणत्याही प्रकारे न्यायोचित नाही आहे. कारण त्यांचे असे करणे पूर्णतः पवित्र कुरआनाच्या शिकवणूकींविरूद्ध वर्तन ठरेल.

पवित्र कुरआन फक्त त्या लोकांविरूद्ध तलवार उगारण्याचे आदेश

देतो ज्यांनी इस्लामविरूद्ध युद्ध छेडले आहे. तसेच आणखीन एक तत्त्वपूर्ण शिकवण अशी देखील आहे की, जर एखादी व्यक्ती आपल्या देशाला किंवा देशवासींना त्रास देत असेल तर तो निश्‍चितच इस्लामच्या शिकवणींचा उल्लंघन करत आहे. पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) म्हणतात की, जो कोणी एका निर्पराधाचे रक्तपात करतो तो मुसलमान नाही. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या मते अशी व्यक्ती पापी आणि दुर्बळ श्रद्धेची असते.

आता पुढे मी इस्लामचे काहीं अन्य पैलू प्रस्तूत करेन ज्याद्वारे हे सिद्ध होईल की, इस्लामची शिकवण किती विशुद्ध आणि पवित्र आहे. या ठिकाणी मी हे स्पष्ट करु इच्छितो की, काहीं नाममात्र इस्लामीक संघटनांनी इस्लामचे जे चित्र सादर केले आहे ते गैर इस्लामीक आहे आणि कोणत्याही प्रकारे ते धर्माच्या वास्तविक शिकवणुकींचे प्रतिनिधित्व करत नाहीत. ते फक्त इस्लामच्या नावाखाली आपले स्वार्थ व घृणापूर्ण इच्छांची परिपूर्ती करु इच्छित आहेत.

इस्लामने धार्मिक सहिष्णूतेवर जितका भर दिलेला आहे तितका इतर कोणत्याही धर्मामध्ये आपणास पहायला मिळणार नाही. इतर लोकांचे असे मत आहे की, जोपर्यंत आपण दुसऱ्या धर्माला खोटे सिद्ध करत नाही तोपर्यंत आपल्या धर्माची सत्यता सिद्ध करणे असंभव आहे. पण या संदर्भात इस्लाम अशी शिकवण देतो की, जरी इस्लाम हा सत्य आहे आणि तो संपूर्ण मानवजातीच्या भल्यासाठी आलेला आहे तरी त्यापूर्वी परमेश्वराने प्रत्येक भूभागामध्ये आपले प्रेषीत व संदेष्टे पाठवले होते. पवित्र कुरआना मध्ये हे स्पष्टपणे सांगितले आहे की, अल्लाह म्हणतो, मी सर्व प्रेषीतांना स्नेह व प्रेमासह पाठविले होते म्हणून प्रत्येक मुसलमानांवर हे अनिवार्य आहे की त्यांनी त्या सर्वांचे स्वीकार करावे. म्हणून प्रत्येक मुसलमान कोणत्याही प्रेषीताचे अपमान, अनादर किंवा उपहास करु शकत नाही तसेच ते इतर धर्मांच्या अनुयायींचे भावना देखील दुखावत नाहीत.

तरी दुःखजनक परिस्थिती अशी आहे की, काहीं बिगर मुस्लिम लोकांचे वर्तन पूर्णपणे उलट आहे. ते लोक, इस्लामचे संस्थापक पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांची निंदा आणि तिरस्कार करण्याची कोणतीही संधी सोडत नाहीत. आणि त्यांच्या या वागणूकीमुळे मुसलमानांची मने जखमी होतात. परंतु आमच्या श्रद्धेनुसार आम्ही नेहमी धार्मिक सहिष्णूता आणि परस्पर समजूतीला प्रोत्साहन देत आहोत. दुर्दैवाने जेव्हा अशा दुष्कृत्यातून मुसलामनांची मने दुखावली जातात तेव्हा एखादी तथाकथित मुस्लिम संघटना आपल्या अज्ञानामुळे आपली प्रतिक्रिया जाहीर करते, जी पूर्णतः इस्लामच्या शिकवणूकींविरूद्ध आहे. तुम्हाला हे नक्कीच पहायला मिळेल की, अशा उत्तेजक परिस्थितीत सुद्धा अहमदी मुस्लिम कोणतीही अनुचित व अयोग्य प्रतिक्रिया देत नाही.

पुढे इस्लामचे संस्थापक पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर आणखीन एक आरोप असे लावले जाते की, त्यांनी अतिरेकीची शिक्षा दिली होती आणि इस्लामच्या प्रसारासाठी बळजबरीची ताकीद केली होती. या आरोपाचे खंडन करत पवित्र कुरआन मध्ये अल्लाह म्हणतोः

**आणि जर तुझ्या विधात्याने आपली इच्छा अंमलात आणली असती तर खचितच या धरतीवर जेवढे काही लोक आहेत त्या सर्वांनी श्रद्धा ठेवली असती. मग तू लोकांना विवश करु शकणार आहे का की त्यांनी श्रद्धावंत व्हावे? (१०:१००)**

पवित्र कुरआनातील ही आयत स्पष्टपणे दर्शवते की, सर्वशक्तीमान अल्लाह जो सर्व क्षमातांचा स्वामी आहे त्याने जर सर्वांना एका धर्मावर आणणे निश्चित केले असते तर असे करण्यात त्याला कोणतीही बाधा आली नसती; परंतु त्याने लोकांना स्वातंत्र प्रदान केले आहे की, तुम्ही चांगल्या व वाईटचा विचार व चिंतन करत आपल्या इच्छेनुसार त्यास नकारा किंवा स्वीकारा.

आणि जर परमेश्वराने मानवजातीला स्वतंत्रपणे जगण्याचा विकल्प दिलेला आहे मग हज़रत मुहम्मद पैगंबर (स.) किंवा त्यांचे कोणतेही अनुयायी एखाद्याला मुसलमान होण्यास कसे काय विवश करु शकता? सर्वशक्तीमान अल्लाह फरमावितोः

**सत्य तुमच्या विधात्याकडून प्रकट करण्यात आलेले आहे; म्हणून ज्यास वाटेल त्याने त्यावर विश्वास ठेवावा व ज्यास वाटेल त्याने त्यावर अविश्वास दाखवावा.... (१८ः३०)**

ही आहे इस्लामची खरीखुरी शिकवण आणि हा आहे खरा इस्लाम. जर एखादी व्यक्ती इस्लाम धर्म स्वीकारत असेल तर त्याबाबतीत ती स्वतंत्र आहे तसेच जर कोणी इस्लाम धर्म स्वीकारत नसेल तर त्याबाबतीत देखील त्याला पूर्ण स्वातंत्र प्राप्त आहे. म्हणून इस्लाम पूर्णतः बळजबरी आणि अतिरेकीविरूद्ध आहे. किंबहुना या उलट समाजाच्या प्रत्येक पातळीवर शांतता आणि सौहार्द प्रसारित करण्याच्या समर्थनात आहे. इस्लामसाठी हे असंभव आहे की, तो अतिरेकी व बळजबरीची शिकवण देईल कारण इस्लाम या शब्दाचे मूळ अर्थच शांततेने राहाणे व शांतता प्रदान करणे असे आहे. परंतु जेव्हा आमच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात तेव्हा आम्हाला अत्यंत दुःख व त्रास होतो. पैगंबर मुहम्मद (स.) विषयी जेव्हा अभद्र टिका केल्या जातात तेव्हा आमचे मन दुःखाने भरून जातात.

इस्लामचे संस्थापक हज़रत मुहम्मद (स.) यांनीच आमच्या हृदयात परमेश्वर व त्याच्या सृष्टीविषयी प्रेम व सद्भावना जागृत केली आहे. आणि त्यांनीच आमच्या काळजात संपूर्ण मानवजातीसाठी आणि सर्व धर्मांसाठी प्रेम आणि आदर निर्माण केले आहे. इस्लामची शिकवण शांतीपूर्ण आणि दयापूर्ण आहे; याचा एक मोठे प्रमाण असा आहे की, जेव्हा पवित्र पैगंबर (स.) इस्लामची सुंदर शिकवण आपल्या सभोवतालच्या लोकांपर्यंत प्रसारित करत होते तेव्हा ते लोक असे म्हणायचे की जर आम्ही हे स्वीकार केले तर

आमच्या भोवती राहणारे लोक आमचा नाश करतील. आता पहा की जर इस्लामची शिकवण अतिरेकीपूर्ण असती तर त्याच्या स्वीकारण्यात हा भय का राहीला असता की, जर आम्ही यास स्वीकारले तर आमचा नाश होईल. प्रेषीत मुहम्मद (स.) यांच्या जीवनात आढळून आलेला हा एक क्षुल्लक उदाहरण, इस्लामच्या शांतीपूर्ण व्यवहार व शिकवणूकीबद्दल पुरेसे आहे.

पवित्र कुरआनामध्ये परमेश्वराच्या अनेक गुणवैशिष्टांपैकी *'सलाम'* अर्थात ''शांततेचा स्त्रोत'' असा एक महत्त्वाचा गुण उल्लेखित आहे. यातून परमेश्वर फक्त एका विशेष समुदायासाठी नाही तर संपूर्ण सृष्टीसाठी शांततेचा स्त्रोत आहे असे अभिप्रेत आहे. आणि जर त्याची शांती व सुरक्षा फक्त काहीं विशेष लोकांपर्यंतच मर्यादित असली असती तर तो कधीच सर्व जगाचा परमेश्वर म्हणवला जाऊ शकला नसता. सर्वशक्तिमान अल्लाहने याचे उत्तर पवित्र कुरआना मध्ये असे दिले आहे कीः

**त्याने वारंवार पुकारलेल्या ङ्गहे माझ्या विधात्या!फ्या शब्दांची (शपथ घेऊन मी सांगतो) की हे लोक श्रद्धा बाळगणारे नाहीत. म्हणून त्यांच्यापासून दूर हो आणि म्हण की, ङ्गशांती लाभोफ; आणि लवकरच त्यांना कळून येईल. (४३:८९-९०)**

पवित्र कुरआन च्या या शब्दांपासून हे मतितार्थ निघतो की, हज़रत मुहम्मद (स.) यांनी लोकांसाठी अशी शिकवणूक घेऊन अवतरीत झाले होते जी सर्व लोकांसाठी शांती व दया प्रदान करणारी होती. सदरहू आयती मध्ये हे देखील ज्ञात होते की, हज़रत मुहम्मद पैगंबर (स.) यांच्या शांतीपूर्ण शिकवणीच्या विरूद्ध त्यांच्या विरोधकांनी फक्त त्यांच्या शिकवणींचा तिरस्कारच केला नाही तर त्यांच्या चरित्रावर देखील अभद्र टिका केल्या. आणि त्या पुढे जाऊन त्यांनी (श्रद्धाहीनांनी) प्रत्येक प्रकारचा त्रास त्यांना (पैगंबर मुहम्मद स.) दिला आणि एक अशांतीपूर्ण व भीतीपूर्ण वातावरण त्यांच्यासाठी निर्माण केला गेला. विरोधींचे असे गैरवर्तन पाहून पैगंबरांनी

परमेश्वरासमीप अशी प्रार्थना केली की, *मी त्यांना शांतता बहाल करु इच्छितो पण ते मला शांती बहाल करत नाही. आणि त्याहून अधिक ते मला जास्तीत जास्त कष्ट व दुःख देऊ इच्छितात.*

अशा दुःखजन्य परिस्थितीत प्रेषीत मुहम्मद (स.) यांना सहानुभूती देत परमेश्वराने असे सांगितले की, *ते जे काही करतात त्यापासून तू दूर राहा. तुझा एकमात्र कर्तव्य संसारामध्ये शांतता प्रसारित करणे व त्याला भक्कम करणे एवढेच आहे. विरोधकांच्या अत्याचाराविरूद्ध तू त्यांना फक्त एवढेच सांग, 'तुम्हांवर अल्लाहची कृपा असो.' तसेच असेही म्हण,''मी तुमच्यासाठी शांतता बहाल करण्यासाठी आलो आहे.''*

या उद्देशाची परिपूर्ती करत पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आपल्या संपूर्ण जीवनात शांतता प्रस्थापित व प्रसारित करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आणि हाच त्यांच्या जीवनाचा प्रमुख उद्देश होता. आम्हाला खात्री आहे की, एक दिवस नक्कीच असा येईल जेव्हा संपूर्ण विश्व या सत्यस्थितीचा स्वीकार करेल. आणि हे मान्य करेल की इस्लामच्या संस्थापकाने कधीही अतिरेकीची शिक्षा आपल्या अनुयायींना दिली नाही. आणि सर्वांना ज्ञात होईल की, इस्लामचे संस्थापक पैगंबर मुहम्मद (स.) हे फक्त शांती, प्रेम आणि दयेचा संदेश घेऊन जगात आले होते. आणि जर त्यांच्या अनुयायींनी या शिकवणूचे काटेकोर पालन करत अतिरेकी व उग्रवादी हल्लांविरूद्ध प्रेम आणि शांततेला अवंलबून आपले मत प्रदर्शित करतील, तर इस्लामच्या भव्य शिकवणींविरूद्ध आक्षेप घेणाऱ्यांना एक दिवस सत्य आणि सौंदर्य शिकवणींची खात्री होईल.

अहमदिया मुस्लिम जमाअत याच शिकवणूकीचे पालन करत आहे. सहानुभूति, सहिष्णूता आणि दया या स्वर्णीम शिकवणींचा प्रचार-प्रसार आम्ही जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत करण्यात प्रयत्नशील आहोत. आम्ही त्याच दया आणि उदारतेचे पालन करत आहोत, ज्याचे पालन करत आमचे

प्रेषीत पैगंबर मुहम्मद (स.) मक्केच्या कष्टप्रद काळानंतर परत मक्का शहरात विजयी परतले. अनेक वर्षे मक्केच्या मुस्लिम लोकांनी विरोधींचे छळ सहन केले. बहुसंख्य मुस्लिमांना शारीरिक वेदना दिल्या गेल्या तर अनेकांची निर्दयपणे हत्या केली गेली. ज्यामध्ये वयोवृद्ध, लहान मुले व गरोदर महिलांचा देखील समावेश होता. आणि या अप्रतीम श्रद्धावंत लोकांनी आपला जीवार्पण करताना सुद्धा कोणताही अयोग्य वर्तन दर्शवला नाही. तरी इस्लामचे प्रर्वतक हज़रत मुहम्मद (स.) मक्केमध्ये विजयी होऊन पुन्हा संपूर्ण सन्मानाने प्रविष्ट झाले; तेव्हा त्यांनी त्या विरोधकांशी, त्यांनी केलेल्या अत्याचाराचा बदला घेतला नाही, तर दयेचा दूत बनून त्यांच्यासमोर अशी घोषणा केली की, *तुमच्या अत्याचाराविषयी आजच्या दिवशी तुमच्यावर कोणताही दोषारोप असणार नाही. मी तुम्हां सर्वांना माफ करतो. आणि मी प्रेम आणि 'शांततेचा दूत आहे.' आणि या गुणाविषयी मला परमेश्वराने सर्वाधिक ज्ञान दिले आहे की, तो शांततेचा स्त्रोत आहे. म्हणजे तोच आहे जो शांतता प्रदान करतो आणि शांतता व सुरक्षिततेची जमानत देखील देतो. तुम्ही स्वतंत्रपणे मक्का मध्ये राहू शकता आणि आपापल्या धर्माचे पालन करु शकता. कोणत्याही व्यक्तीवर कसलीही बळजबरी होणार नाही.*

मक्का शहरातून बरेच विरोधक मक्केतून शिक्षेच्या भीतीमुळे पळून गेले होते, कारण त्यांना ही जाणीव होती की त्यांनी श्रद्धावंतावर अतिशय क्रूरपणे अत्याचार केला होता आणि या अत्याचाराची सर्व सीमा त्यांनी ओलांडली होती; पण प्रेषीत मुहम्मद (स.) यांची अनन्यसाधारण कृपा व दयेचा रूप पाहून त्या अत्याचाऱ्यांच्या नातेवाईकांनी त्यांना परतरण्याचा संदेश पाठवला. त्यांना असे सांगण्यात आले की, प्रेषीत मुहम्मद (स.) यांनी क्षमा व सुरक्षेची हमी देत सर्वांना येथे राहण्याचे व स्वतंत्रपणे आपले धर्म पालन करण्याची मुभा दिली आहे. हे ऐकून ते लोक मक्काशहरात परतले. ते लोक जे इस्लाम चे कठोर विरोधी होते, पवित्र पैगंबरा च्या या उदारतेने प्रभावित

होऊन स्वेच्छेने इस्लाम धर्म स्वीकारला.

मी येथे जे काही बोललो आहे ते इतिहासात नमूद आहे आणि असंख्य इतिहासकारांनी व अभ्यासकांनी त्याचे सत्य प्रमाणित केले आहे. ही आहे इस्लाम ची खरी शिकवण आणि हे आहे प्रेषीत मुहम्मद (स.) चे उदात्त चरित्रचित्रण. आणि तरी इस्लाम आणि त्याच्या संस्थापकाविषयी असे निरर्थक आरोप लावणे हे खरंच कठोर अन्याय आहे. यात काहीच शंका नाही जेव्हा असे निर्रथक आरोप लावले जातात तेव्हा आमची मने दुःखी होतात.

मी पुन्हा एकदा हे स्पष्टपणे जाहीर करु इच्छितो की, आज केवळ आमची जमाअत, म्हणजे अहमदिया मुस्लिम जमाअत ही इस्लामच्या मूलभूत आणि शांतीपूर्ण शिकवणींची काटोकोरपणे पालन करत आहे.
मी पुन्हा एकदा सांगतो की, द्वेषपूर्ण कृत्य आणि दुष्टवर्तन, जी अतिरेकी संघटनाद्वारे किंवा वयैक्तिकपणे अंमलात आणली जात आहेत, त्यांचा इस्लामच्या शिकवणीपासून काहीच संबंध नाही.

खऱ्या न्यायासाठी व्यक्ती किंवा गट यांच्या हितसंबंधांना एखाद्या धर्माच्या शिकवणुकीशी जोडले जाऊ नये. अशा कृतींचा वापर कोणत्याही धर्म किंवा संस्थापकावर अन्यायकारक पातळीवर टीका करण्यासाठी निमित्त म्हणून होऊ नये. ही काळाची नितांत गरज आहे की, जागतिक शांती व सौहार्द प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात सर्व लोकांनी एकमेकांचा आणि सर्व धर्मांचा आदर करणे आवश्यक आहे; नाहीतर याउलट जी परिस्थिती निर्माण होईल ती अतिशय भयानक निर्माण होईल.

आज जग एक जागतिक गाव बनले आहे आणि म्हणूनच परस्पर आदराचा अभाव आणि शांततेसाठी एकत्र येण्यास अपयश प्राप्त होणे, हे केवळ एका ठराविक क्षेत्राचे किंवा शहराचेच नुकसान करणार नाही, तर शेवटी संपूर्ण जगाचा नाश करण्यास पायाभूत ठरेल. गेल्या दोन विश्वयुद्धांमुळे

झालेल्या भयंकर विध्वंसापासून आपण सर्वजण परिचित आहात. काहीं देशांच्या अनुचित कृत्यांमुळे जगाच्या क्षितीजावर आणखीन एका महायुद्धाचे चिन्ह दिसत आहे.

आणि जर एखादा महायुद्ध सुरू झाला तर पाश्चात्य जगावरही त्याच्या दूरगामी आणि विनाशकारी परिणामांचा गंभीर परिणाम होईल. म्हणून अशा विध्वंसक विनाशापासून स्वतःला सुरक्षित ठेवण्याचे प्रयत्न करा. चला आपल्या भावी पिढयांना युद्धाच्या दयनीय आणि विध्वंसक परिणामापासून वाचवू या. अर्थात सर्वात भयंकर प्रकारचे युद्ध हे अणुयुद्ध असेल आणि जग ज्यामार्गने जात आहे त्या मार्गाने अणुयुद्ध होण्याचा खरोखर धोका आहे. अशा भयानक अनर्थावह परिस्थिला थांबवण्यासाठी आपण न्याय, सचोटी आणि प्रामाणिकपणाचा अवलंब करणे आवश्यक आहे आणि द्वेष पसरवू इच्छित असलेल्या आणि जगाची शांतता नष्ट करु इच्छित असलेल्या गटांना दडपण्यासाठी आणि थांबवण्यासाठी एकत्रितपणे यायला हवे.

माझी अशी आशा आणि प्रार्थना आहे की परमेश्वर जगातील महानशक्तींना, त्यांची जबाबदारी व कर्तव्ये न्यायोचित पद्धतीने पार पाडण्याचे सामर्थ्य देवो.

समारोप करण्यापूर्वी मी परत एकदा तुम्हां सर्वांचे आभार मानतो की तुम्ही आपल्या व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून येथे हजर राहिलात. अल्लाहची कृपा आपणा सर्वांवर असो.

**धन्यवाद.**



# जागतिक शांतता-
# काळाची गंभीर आवश्यकता

राष्ट्रीय संसद न्युझीलंड
वेलिंगटन, न्युझीलंड, २०१३







Hon. Kanwaljit Singh Bakshi (MP) receiving the HolyQur'an from Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Iranian ambassador Seyed Majid Tafreshi Khameneh meeting Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Det. Rakesh Naidoo meeting Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] in representation of the Commissioner of Police New Zealand



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] leading silent prayers at the conclusion of the official function in the Grand Hall, New Zealand Parliament



Dr. Cam Calder MP meeting Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] delivering the keynote address at the Grand Hall, in the New Zealand Parliament. 4th Nov 2013



Hon. Kanwaljit Singh Bakshi (MP) with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] and his entourage in front of the New Zealand Parliament

## प्रस्तावना

अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद मसीहाचे पंचम ख़लीफा यांनी न्यूझीलंडचे राष्ट्रीय संसद विलींगटन येथे ४ नोव्हेंबर २०१३, रोजी एक ऐतिहासिक भाषण दिले, श्रोत्यांमध्ये संसद सदस्य वेगवेगळया राष्ट्राचे राजदूत, विचारवंत आणि वेगवेगळया क्षेत्रातील अनेक पाहूणे सामील होते. मसीहाचे ख़लीफा यांनी या सर्वांसमोर जगाच्या विविध भागामध्ये वाढत चाललेल्या तणाव आणि संघर्षपूर्ण स्थितीला समोर ठेवून जागतिक शांततेसाठी न्यायपूर्ण व्यवहाराची तातडीची गरज असल्याचे प्रतिपादन केले. या बीजभाषणानंतर इतर मान्यवरांनीही आपले विचार व्यक्त केले. संसद सदस्य कंवजलजीत सिंह बक्शी म्हणाले की, ''हे आमचे भाग्य आहे की, आज अहमदिया मुसिलम जमाअतचे सर्वोच्च नेते, हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद, न्यूझीलंडच्या संसदेमध्ये आले आहेत आणि आम्हाला त्यांचे बहुमूल्य विचार ऐकण्याची संधी मिळत आहे.'' संसद सदस्य डॉ.राजेंद्र प्रसाद म्हणाले की, ''आज न्यूझीलंडच्या संसदेमध्ये हज़रत साहेबांचे स्वागत करण्याचे आम्हाला सौभाग्य प्राप्त होत आहे. मी नेहमीच अहमदी या राष्ट्राचे नागरिक म्हणून किती उत्तम प्रकारे राहतात आणि त्यांचा शांतीचा संदेश प्रसारित करतात यामुळे प्रभावित राहिलो आहे.'' या कार्यक्रमाचा समारोप करताना हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी अनेक प्रतिष्ठीत लोकांच्या भेटी घेतल्या ज्या मध्ये ईरान आणि इस्त्राईलचे राजदूत देखील सामील होते. त्या नंतर संसद सदस्य कंवलजीत सिंह यांनी हज़रत साहेबांना संसद भवनाचा अवलोकन करविले.

# जागतिक शांतता-
# काळाची गंभीर आवश्यकता.

बिस्मिल्लहीर्रहमानीर्रहीम-अल्लाहच्या नावाने जा परम दयाळू आणि असीम कृपाळू आहे.
सर्व प्रतिष्ठीत अथितींना अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहू.- अल्लाहची कृपा, आशीर्वाद आणि सलामती तुम्हा सर्वांना लाभो.

सर्व प्रथम मी त्या सर्वांचे आभार मानतो ज्यांनी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विशेषतः संसद सदस्य कंवलजीत सिंह बक्शी, ज्यांनी आज मला आपल्या समोर माझ्या विचार व्यक्त करण्याची संधी दिली. त्यानंतर मी आपणा सर्वांचेही आभार व्यक्त करतो की तुम्ही माझे विचार ऐकण्यासाठी येथे येण्याची तसदी घेतली.

या संसदभवनामध्ये वेगवेगळे राजनीतीतज्ज्ञ आणि संसद सदस्य निश्चितच नियमितपणे भेटत असतात आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठी धोरणे आणि कायदे बनवत असतात आणि मला खात्री आहे की याशिवाय येथे जागतिक पातळीवरचे अनेक नेते येथे येऊन त्यांच्या बुद्धिमत्ता, भूतकाळातील अनुभव यावर आधारित तुम्हाला तज्ज्ञ मार्गदर्शन केले असेल. परंतु कदाचित तुम्हाला पहिल्यांदाच एका धार्मिक समुदायाच्या आणि त्याही मुस्लिम समुदायाच्या नेत्याच्या विचार ऐकण्याचा प्रसंग आला असेल. म्हणून तुम्ही मला, जो की अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख आहे आणि ही जमाअत शुद्ध इस्लामिक संघटन असून, तिच्या स्थापनेचा उद्देश जगभर इस्लामची खरी शिकवण प्रसारित करणे आहे, या ठिकाणी विचार व्यक्त करण्याची

संधी देऊन आपल्या विशाल हृदयाने आणि उच्चकोटीच्या सहिष्णूतेचे प्रमाण दिले आहे. म्हणून मी तुमच्या या भावनेचा आदर करतो.

या आभार प्रदर्शनानंतर मी आपल्या मूळ विषयाकडे वळतो आणि इस्लामच्या सुंदर शिकवणूकीबद्दल संक्षेपात काहीं बोलू इच्छितो. मी त्या विषयावर बोलणार आहे जो माझ्या दृष्टिने जागतिक शांती प्रस्थापनेसाठी अतिशय गंभीर आणि अत्यावश्यक आहे. तुमच्यापैकी बहुतेक जण, जे वयैक्तिक पातळीवर राजकारणी आहेत आणि सामुदायिक पातळीवर तुमचे सरकार देखील निष्पक्षपणे शांती प्रस्थापनेसाठी प्रयत्न करत असतात. तुम्ही तुमच्या प्रयत्नामध्ये अनेक वेळा काहीं चांगल्या परिणामामुळे प्रोत्साहितही झाला असाल आणि काहीं प्रमाणात यशाचा अनुभवही घेतला असेल तसेच अनेक वर्षांपासून तुमच्या सरकारने देखील जगातील महाशक्तिंना या जगाला शांतीमय आणि समंजस्य जग बनविण्यासाठी सल्लेही दिले असतील.

जगाची सध्या परिस्थिती पाहिल्यास नक्कीच असे दिसून येईल की ती अतिशय अनिश्चितता आणि अतिशय चिंताजनक आहे. जरी आज अरब जगतामध्ये मोठया प्रमाणात संघर्ष चालू आहे तरी कोणताही बुद्धिमान माणूस समजू शकतो की ही संघर्षपूर्ण स्थिती त्या भागातच मर्यादित राहणार नाही. अशा प्रकारचे एखाद्या सरकार आणि तिथल्या जनतेमध्ये उद्भवणारे संघर्ष निश्चितच आंतरराष्ट्रीय पातळीच्या संघर्षात परावर्तीत होऊ शकतात. आताच आपण पाहत आहोत की, जगाच्या महाशक्तींचे दोन गट स्थापन होत आहेत. एक गट सिरियाच्या सरकारला समर्थन देत आहे आणि दुसरा गट तेथील बंडखोरांचा समर्थन करत आहे आणि ही परिस्थिती फक्त मुस्लिम देशासाठीच धोकादायक नसून बाकी जगासाठी सुद्धा अतिशय खतरनाक आहे.

आपणाला मागच्या शतकातील दोन जागतिक महायुद्धांच्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या अनुभवाला कदापिही विसरून चालणार नाही. या

युद्धांमुळे विशेषतः दुसऱ्या महायुद्धामुळे जो विनाश झाला तो अभूतपूर्व असा होता. फक्त पारंपरिक शस्त्रांच्या वापराने देखील मोठमोठी शहरे आणि वसत्या विनाश पावले आणि लाखो लोक मृत्युमुखी पडले. तसेच दुसऱ्या महायुद्धामध्ये आपण पाहिले की, जापान विरूद्ध अणू बॉम्बच्या वापरामुळे जो विध्वंस झाला तो किती विनाशकारी होता त्याबद्दल नुसते ऐकूण देखील माणसाचा थरकाप उठतो. हिरोशिमा आणि नागासाकी बद्दल असलेली संग्राहलय या भयंकर अशा विनाशाची आठवण करुन देण्यासाठी पर्याप्त आहे.

दुसऱ्या महायुद्धामध्ये जवळपास सत्तर दशलक्ष माणसे मारले गेले. आणि असे म्हणता त्यांच्यापैकी चाळीस दशलक्ष हे सामान्य नागरिक होते. म्हणजेच सैनिकापेक्षा नागरिकांचीच प्राणहानी अधिक झाली. त्याचप्रमाणे या युद्धाचे दूरगामी परिणाम अतिशय भयंकर होते आणि अशा प्रकारे युद्धोत्तर मरणाऱ्यांची संख्या सुद्धा लक्षावधी मध्ये मोजली जाते. अनेक वर्षापर्यंत अणू बॉम्बामुळे प्रसारित झालेल्या किरणोत्सर्गाच्या परिणामामुळे नवजात बालकांमध्ये भयानक असे जन्मजात दोष उत्पन्न झाले. आजच्या जगामध्ये छोटया राष्ट्रांकडे सुद्धा अणवस्त्रे आहेत आणि तिथले नेते अतिशय बेजबाबदार असे आहेत, असे वाटते की त्यांना त्यांच्या कृत्यांचे किती विनाशकारी परिणाम होतील याची जरा देखील चिंता नाही.

आणि जर आपण अशा परिस्थिती मध्ये अणु युद्धाची कल्पना केली तर जे चित्र आपल्या समोर उभे राहिले ते अतिशय भयानक असेल. आज ज्या छोटया राष्ट्रांकडे अणू बॉम्ब आहेत ते दुसऱ्या महायुद्धात वापरलेल्या अणू बॉम्ब पेक्षा अधिक शक्तिशाली आहे आणि म्हणून हे संघर्षाचे वातावरण आणि अस्थिरता त्या लोकांसाठी जे जगात शांतता प्रस्थापित करु इच्छितात आणि त्या दृष्टिने प्रयत्नशील आहेत, यांच्यासाठी अतिशय चिंताजनक आहे.

जगातील आजची परिस्थिती करुणाजनक आहे, कारण एकीकडे लोक जगात शांतता प्रस्थापनेची भाषा करतात आणि दुसरीकडे ते आपल्या अहंकार आणि स्वार्थ आणि घमेंड मध्ये गुरफटलेले आहेत. स्वतःचे वर्चस्व आणि शक्ती प्रदर्शन करण्यासाठी प्रत्येक शक्तिशाली देश सर्व प्रकारचे प्रयत्न करताना दिसतात.

दुसऱ्या महायुद्धानंतर दीर्घकालीन शांती प्रस्थापित करण्याच्या हेतूने आणि युद्ध टाळता यावे म्हणून सर्व राष्ट्रांनी मिळून एक संघटना स्थापित केली ज्याला ते संयुक्त राष्ट्र संघ म्हणतात. तसे पाहिल्यास ज्या प्रमाणे ङ्गलीग ऑफ नेशन्सफ त्याच्या स्थापनेच्या उद्दीष्टांमध्ये अपयशी झाली, त्याच पद्धतीने संयुक्त राष्ट्र संघाची प्रतिष्ठा देखील दिवसेंदिवस कमी होताना दिसते. जर का न्यायाची परिपूर्ती केली नाही तर कितीही संघटना स्थापन केल्या तरी शांती स्थापनेसाठी फलदायी ठरणार नाही.

मी आताच लीग ऑफ नेशन्स च्या अपयशाबद्दल बोललोय. ही संघटना पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांतीच्या हेतूने स्थापने करण्यात आली होती. परंतु ते दुसरे महायुद्ध टाळू शकले नाही, जे मी आताच सांगितल्याप्रमाणे अतिशय विनाशकारी आणि हानीकारक होते. त्या युद्धाच्या परिणामी न्यूझीलंड मध्ये सुद्धा अनेक जण मृत्युमुखी पडले. असे म्हणतात की, जवळपास ११ हजार व्यक्ती, ज्या सेनेशी संबंधीत होत्या, मृत्युमुखी पडल्या. न्यूझीलंड हा देश मूळ युद्धभूमि पासून खूप अंतरावर असल्यामुळे येथे नागरिकांची हत्या झाली नाही; परंतु जसे मी आधीच म्हटले की, युद्धात मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये ऐकूण व्यक्तींपैकी सैनिकांपेक्षा नागरिकांचीच संख्या अधिक होती, जरा कल्पना करा सामान्य निरपराध नागरिक, ज्यात महिलां आणि बालकांचाही समावेश आहे, ज्यांनी कुठलाही अपराध केला नव्हता त्यांना सरसकटपणे ठार करण्यात आले.

याच कारणामुळे आपण पाहू शकतो की, ज्या देशांनी या महायुध्दांचा

थेट अनुभव घेतला तिथल्या जनतेच्या मनामध्ये युद्धा बद्दल कमालीचा तिरस्कार आढळून येतो. हे तर निश्चितपणे सांगितले पाहिजे की, जो आपल्या देशावर प्रेम करतो त्या व्यक्तीचे कर्तव्यच आहे की, जेव्हा त्याच्या देशावर आक्रमण केले जाते तेव्हा त्याने राष्ट्राच्या रक्षणासाठी सर्व प्रकारच्या बलीदानासाठी सदैव तयार असायला हवे. परंतु जर सर्व प्रकारचे संघर्ष शांततापूर्ण वाटाघाटीच्या माध्यमातून सौहार्दाच्या वातावरणात आणि मुतसद्देगिरीने मिटवले जात असतील, तर मग मृत्यु आणि कत्तलीला आमंत्रण देण्याची काय गरज आहे. पूर्वीच्या काळी जेव्हा युद्धे होत त्यावेळी फक्त सैनिकांचाच बळी जात असे आणि अतिशय कमी प्रमाणात नागरिकांवर त्याचा परिणाम होत असे. परंतु आजच्या युद्धाचे जे शस्त्र आहेत त्यात हवाई बॉम्ब हल्लांचा समावेश आहे, तसेच विषारी वायु आणि रासायनिक शस्त्रे देखील आहेत. आणि जसे की मी म्हणालो आहे की, भयानक अशा अणु बॉम्बच्या वापराचेही खूप शक्यता आहे. म्हणून आजची युद्धे ही भूतकाळातील युद्धांपेक्षा पूर्णपणे भिन्न आहेत. कारण आजच्या युद्धामध्ये मानवजातीचा पृथ्वीतळावरून पूर्णपणे विनाश होणे देखील संभव आहे. या प्रसंगी मी पवित्र कुरआनातील एका अतिशय सुंदर अशा शिकवणीचा, जी शांतता प्रस्थापनेसाठी दिलेली आहे, उल्लेख करण्याची संधी घेतो. पवित्र कुरआनामध्ये म्हटले आहेः

**आणि चांगले आणि वाईट हे एक समान नसते. (वाईटाचे) उत्तर सर्वात चांगले असेल त्याने द्या. आणि पहा ज्याच्या व तुमच्यामध्ये शत्रुत्व होते तो जाणूकाही (तुमचा) जिवलग मित्र असल्यासारखा होईल. (४१ः३५)**

म्हणून कुरआन अशी शिकवण देतो की, जितके होईल तितके प्रयत्न करत सर्व प्रकारचे शत्रुत्व किंवा मतभेद नेहमीच चर्चा आणि आपसातील संवादाच्या माध्यमातून सोडविले पाहिजे. ही गोष्ट नक्कीच सांगता येईल की, एखादी व्यक्ती आपल्या दयाभावाने आणि बुद्धिमत्तेच्या आधारे शत्रूंच्या ह्दयावर अतिशय सकारात्मक असा प्रभाव निर्माण करु शकते आणि त्याद्वारे द्वेष

आणि मतभेद संपुष्टात आणू शकते.

आजच्या काळात आपण नक्कीच स्वतःला अतिशय प्रगत आणि सुसंस्कृत समजतो. आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक सेवा भावी संस्था आणि प्रतिष्ठान स्थापन केले आहेत. ज्यांच्या माध्यमातून लहान बालकांच्या आरोग्याची आणि शिक्षणाची काळजी घेतो किंवा त्यांच्या मातांच्याही आरोग्यांची काळजी घेतो, त्याचप्रमाणे अगण्य अशा सेवा भावी संस्था, ज्या मानवा प्रती सहानुभूती आणि दयाभाव व्यक्त करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहेत. आम्ही, ज्यांनी हे सर्व केलेले आहे त्यांनी स्वतःला आणि इतरांना भयानक अशा विनाशापासून सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीने लक्ष देणे ही काळाची गरज आहे. आपण ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, मागच्या ६० वर्षापेक्षा जग आज अधिक जवळ आलेले आहे, साठ सत्तर वर्षापूर्वी न्यूझीलंड हा देश आशिया आणि युरोप पासून खूपच लांबचा देश मानला जात होता परंतू आज तो जागतिक समुदायाचा एक अविभाज्य भाग झाले आहे. म्हणून युद्धजन्य परिस्थिती मध्ये कोणताही देश आणि कोणताही विभाग सुरक्षित राहू शकणार नाही.

तुमचे नेते आणि तुमचे राजनीतीतज्ञ तुमच्या राष्ट्राचे पालक आहेत. तुमच्या देशाच्या सुरक्षिततेसाठी, निरंतर प्रगती आणि उन्नतीसाठी तेच जबाबदार आहेत म्हणून त्यांनी या गोष्टीकडे नेहमीच लक्ष देणे आवश्यक आहे की एखादे स्थानिक युद्ध सुद्धा अतिशय व्यापक अशा विनाश आणि विध्वंसास कारणीभूत ठरु शकते. आपण या बाबतीत परमेश्वराचे आभार मानले पाहिजे की, त्यानी नुक्तेच जगातील काहीं महाशक्तींना या गोष्टीची जाणीव आणि सुबुद्धि दिली आहे की, त्यांनी युद्ध थांबवण्यासाठी पाऊले उचलण्याची आवश्यकता समजून घेतली आहे, जेणे करुन मोठया प्रमाणात होऊ घातलेला विनाश टाळला जाऊ शकेल विशेषतः रशियाच्या अध्यक्षांनी काहीं महाशक्तींना सिरियावर हल्ला करण्यापासून परावृत्त केले आहे. त्यांनी अतिशय स्पष्टपणे

म्हटले आहे की, सर्व देशांना, मग ते मोठे असोत की लहान, समान वागणूक मिळायला पाहिजे. त्याने असे ही म्हटले आहे की, न्यायाची जर पूर्तता केली गेली नाही आणि काहीं राष्ट्रे स्वातंत्रपणे युद्ध छेडायला लागेल तर संयुक्त राष्ट्र संघाचाही दुर्दैवी अंत ''लीग ऑफ नेशन्स'' सारखाच होईल. मी असे मानतो की, त्यांचे विशलेषण पूर्णपणे योग्य आहे. जरी मी त्यांच्या सर्वच धोरणांचे समर्थन करु शकत नाही तरी जी विवेकपूर्ण गोष्ट त्यांनी म्हटली आहे ते मान्यच करावे लागेल. माझी अशी इच्छा आहे की, त्यांनी आणखीन एक पाऊल पुढे टाकून अशी देखील मागणी केली पाहिजे की, ज्या पाच राष्ट्रांना, जे संयुक्त राष्ट्र संघाच्या परिषदेचे कायम सदस्य आहेत, त्यांना असलेला नकाराधिकार पूर्णपणे काढून घेतला पाहिजे जेणे करुन सर्व राष्ट्रांमध्ये खरा न्याय आणि समता प्रस्थापित होईल.

गेल्या वर्षी मला वाशिंग्टन डी.सी. मधील कॅपिटॉल हिल, येथे माझे विचार मांडण्याची संधी देण्यात आली होती. श्रोत्यांमध्ये अनेक सिनेटर्स, काँग्रेसमेन, विचारवंत आणि अनेक शैक्षणिक व अन्य क्षेत्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. मी त्यांच्या समोर स्पष्टपणे म्हटले होते की, खऱ्या खुऱ्या न्यायाची परिपूर्तता तेव्हाच होऊ शकते जेव्हा सर्व घटकांना आणि लोकांना समानतेची वागणूक दिली जाईल. मी त्यांना असेही म्हटले की, जर तुम्ही मोठया आणि छोटया देशातील तसेच सधन आणि गरीब राष्ट्रांतील मतभेद अधोरेखित करु इच्छित असाल आणि जर तुम्ही नकाराधिकारा सारखा अन्यायकारक अधिकार स्वतःकडे ठेवू इच्छित असाल तर तणावपूर्ण स्थिती नक्कीच वाढेल. आणि अशा स्वरूपाचा तणाव आताच जगावर वावरत आहे.

म्हणून एका विश्वव्यापी मुस्लिम संघटनेचा प्रमुख, या नात्याने हे माझे कर्तव्यच आहे की मी जगाला शांतता प्रस्थापनेकडे लक्ष देण्या संदर्भात सचेत करावे. मी ही माझी जबाबदारीच समजतो कारण इस्लामचा अर्थच

शांती आणि सुरक्षितता असा होतो; जरी काही मुस्लिम देश घृणेचा प्रसार करतात आणि दहशतवादाला प्रोत्साहन देतात, तरी त्याचा अर्थ असा अजिबात घेण्यात येऊ नये की इस्लामी शिकवण अस्वस्था आणि संघर्षाला समर्थन देते. मी आताच पवित्र कुरआनातील वचनाचा उल्लेख केला आहे ज्या मध्ये आम्हाला शांतता कशी प्रस्थापित करावी याची शिकवण देण्यात आली आहे.

या पुढे जाऊन इस्लामचे संस्थापक पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांनी आपल्या अनुयायींना नेहमीच सलाम करण्याची शिकवण दिली आहे, ज्याचा अर्थ नेहमी शांतीचा संदेश पसरवत जा, असा होतो. आपण त्यांच्या उदात्त कृतींचे उदाहरण घेऊ शकतो की, त्यांनी नेहमीच बिगर मुस्लिमांना, मग ज्यु असोत ख्रिस्ती असोत किंवा इतर धर्मांचे लोक असोत, त्यांना शांती प्रदान केली आहे. त्यांनी ही भूमिका घेतली कारण ते हे मानत होते की, सर्व लोक ही परमेश्वराची संतान आहे म्हणून परमेश्वराचे एक नाव शांतीदाता असेही आणि म्हणून तो सर्व मानवजातीसाठी शांती आणि सुरक्षेचा अभिलाषी आहे.

मी शांतीच्या संदर्भात काहीं इस्लामी शिकवणींचा उल्लेख केला आहे; परंतु हे मला स्पष्ट करावे लागेल की, वेळेच्या अभावामुळे काहीं मोजक्याच घटकांचा उल्लेख केला. खरे पाहता इस्लाम सर्व सामान्यांसाठी शांती आणि सुरक्षा प्रदान करण्याच्या शिकवणूकी आणि आदेशांनी भरलेला आहे, त्याचप्रमाणे न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने कुरआनचा आदेश काय आहे ते ही पाहू. अल्लाह म्हणतो की,

**हे श्रद्धावंत लोकहो ! तुम्ही न्यायपूर्वक साक्ष देत असताना, अल्लाहच्या कार्यात मन स्थिर करा, आणि लोकांचे वैमनस्य, न्यायपूर्वक असेल त्याव्यतिरिक्त अन्य कृत्य करण्यास तुम्हाला प्रवृत्त न करो, सदैव न्यायपूर्ण व्यवहारा करा, ती गोष्ट सदाचरणाच्या निकटतम आहे, आणि अल्लहाचे भय बाळगा, तुम्ही**

**जे काही करता ते अल्लाह निश्चितच जाणतो. (५:९)**

म्हणून कुरआनाच्या त्या वचनामध्ये न्यायाच्या अत्योच्च आदर्शाला अधोरेखित करण्यात आले आहे. ही आज्ञा, जे लोक स्वतःला मुस्लिम म्हणतात, त्यांच्यासाठी अत्याचार आणि निर्दयता दाखवण्यासाठी कोणताच मार्ग शिल्लक ठेवत नाही. तसेच ती अशा लोकांसाठी, जो इस्लामवर टिका करताना इस्लामला एक हिंसक आणि अतिरेकी धर्म ठरु इच्छितात, त्यांनाही कोणतीही जागा ठेवत नाही. या पुढे जाऊन पवित्र कुरआन ने न्याय आणि सद्व्यवहारच्या अनुकरणीय आदर्श स्थापन केले आहे, त्याने फक्त न्यायी रहा असेच म्हटले नसून इतक्यां मर्यादेपर्यंत न्यायपूर्ण व्यवहार करण्याची शिकवण दिली आहे की ते म्हणते,

**हे श्रद्धावंत लोकहो! न्याय करण्याच्या बाबत अतिशय काटेकोर रहा आणि अल्लाहसाठी साक्ष द्या, मग ती तुमच्या विरूद्ध असो किंवा नातलागांच्या विरूद्ध असो किंवा गरीबाच्या विरूद्ध असो, अल्लाह त्यांच्या प्रती तुमच्यापेखा जास्त संदवेदनशील आहे. म्हणून तुम्ही आपल्या तुच्छ आकांक्षाचे अनुकरण करु नका, तर तुम्ही न्यायबुद्धिने वागू शकाल.फ्फ़जर का तुम्ही सत्य लपविले किंवा त्यात हस्तक्षेप केला, तर हे जाणीव ठेव की अल्लाह जे काहीं तुम्ही करता ते पूर्णपणे जागृत असतो. (४:१३६)**

म्हणून जगात शांती प्रस्थापनेसाठी हे एक तात्त्विक आदर्श आहे जे आंतरराष्ट्रीय अखाडयामधील समाजाच्या एका महत्त्वपूर्ण घटकासाठी अनिवार्य ठरविले गेले आहे. इतिहास साक्षी आहे की, इस्लामचे संस्थापक पवित्र प्रेषित मुहम्मद (स.) यांनी या शिकवणूकीवर पूर्ण अंमलबजावणी केली आणि तिचा प्रसार जगाच्या प्रत्येक सीमेपर्यंत केला आणि सध्याच्या काळामध्ये पवित्र प्रेषितांचे खरे अनुयायी, ज्यांनी अहमदिया मुस्लिम जमाअतची स्थापना केली ते हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद कादियानी यांनी ही शिकवण प्रसारित करण्याची आणि त्यात पुढाकार घेण्याची सूचना त्यांच्या अनुयायींना देऊन

शांती पसरवण्यास आदेशित केले आहे. त्याच प्रमाणे त्यांनी आपल्या अनुयायींना मानवजातीचे लक्ष या गोष्टीकडे वेधण्यास की, त्यांनी अल्लाह प्रती असलेले कर्तव्य आणि अल्लाहच्या निर्मिती प्रती असलेले कर्तव्य परिपूर्ण करण्यासाठी बजावले आहे. याच साठी अहमदिया मुस्लिम जमाअत सर्व लोकांना अल्लाह प्रती कर्तव्य आणि त्याच्या निर्मिती प्रती कर्तव्य परिपूर्ण करण्याची तातडीची गरज अधोरेखित करुन अत्योच्च कोटीच्या न्याय प्रस्थापनेसाठी जोर देत असते. माझी प्रार्थना आहे की, आपल्यापैकी प्रत्येक जण, मग त्याचा धर्म काहींही असो किंवा त्याची श्रद्धा काहींही असो, त्याने एकमेकांच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी तत्पर रहावे, जेणे करुन हे जग शांती आणि सौहार्दाचे स्वर्ग बनो.

या थोडया शब्दासह मी माझ्या भाषणाचा समारोप करतो आणि मला या ठिकाणी निमंत्रीत केल्या बद्दल आणि येथे येऊन माझे मनोगत ऐकल्याबद्दल आपल्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार व्यक्त करतो.

**धन्यवाद.**



# जागतिक शांती आणि सुरक्षा
# सद्य:कालीन गंभीर मुद्दे

डच राष्ट्रीय संसद,

बिन्नेनहोफ, द हॅग, नेदरलैंड्स,२०१५





Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] at a special session of the Standing Committee for Foreign Affairs at the Netherlands National Parliament.



Members of the Standing Committee for Foreign Affairs at the Netherlands National Parliament with Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba]



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] delivering his historic address at a special session of the Standing Committee for Foreign Affairs at the Netherlands National Parliament.


Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] answering a question about a range of political and religious issues.

## प्रस्तावना

दि.६ ऑक्टोबर २०१५ रोजी अहमदिया मुस्लिम जमाअत चे सर्वोच्च जागतिक प्रमुख पाचवे ख़लीफा हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी, नेदरलैंडच्या राष्ट्रीय संसदमध्ये परराष्ट्र मंत्रालयाच्या स्थायी समिती समोर एक ऐतिहासिक भाषण त्या देशाच्या राजधानी, द हॅग येथे दिले. श्रोत्यांमध्ये १०० पेक्षा अधिक प्रतिष्ठीत लोक आणि पाहूणे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री वेन बोमेल, यांनी माननीय ख़लीफा महोदयांचे स्वागत करुन, सर्व उपस्थितांचा परिचय करुन दिला. त्याचप्रमाणे त्यांनी अनेक देशांचे प्रतिनिधी, सांसद सदस्य, राजदूत तसेच अन्य प्रतिष्ठीत व्यक्ती, ज्यात अलबानिया, क्रोएशिया, आयर्लेंड, मोंटेनेगरो, स्पेन आणि स्वीडन या देशाशी संबंधीत होत्या त्यांचेही स्वागत केले.

# जागतिक शांती आणि सुरक्षा-
# सद्यःकालीन गंभीर मुद्दे

मसीहाचे पाचवे ख़लीफा हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी बिस्मिल्लाहीर्रहमानीर्रहीम अर्थात अल्लाहच्या नावाने जो परम दयाळू आणि असीम कृपाळू आहे, या वचनाने भाषणाचे सुरुवात केली. ते म्हणालेः

सर्व प्रतिष्ठीत पाहूण्यांवर अल्लाहची कृपा आणि आशीर्वाद असो. सर्वप्रथम मी, मला आज बोलण्याची संधी दिल्याबद्दल आयोजाकांचे आभार मानतो.

आजच्या जगामध्ये आपण पाहत आहोत की, काहीं बाबींवर सातत्याने भर दिले जात आहे आणि आजच्या काळात याच सर्वात मोठया समस्या आहेत असे दर्शविले जात आहे. उदाहरणार्थ, काहीं लोक पर्यावरण बद्दल आणि जागतिक तापमानवाढ याच्यावर भर देत आहेत. काहीं इतर लोक जगातील वाढत्या संघर्षाबद्दल तसेच जगाच्या दोलायमान परिस्थितीचे वास्तववादी विश्लेषण केल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, जागतिक शांतता आणि सुरक्षितता हीच खऱ्या अर्थाने आजची सर्वात मोठी गंभीर समस्या आहे. निःसंशयपणे असे म्हटले जाऊ शकते की, प्रत्येक दिवस या जगाला अधिक अस्थिर आणि धोकादायक परिस्थितीकडे घेऊन जात आहे. आणि यासाठी अनेक संभाव्य कारणेही आहेत. उदाहरणार्थ, आर्थिक अस्थिरतेमुळे जगातील अनेक देश प्रभावित आहेत, ही जगाची एक मोठी समस्या असू शकते.

दुसरे संभाव्य मुळभूत कारण म्हणजे न्यायपूर्ण व्यवहाराचा अभाव, जो काहीं जागतिक नेते त्यांच्या स्वतःच्या जनतेविरुद्ध आणि इतर लोकांच्या

विरुद्ध प्रदर्शित करत आहेत. आणखीन एक कारण म्हणजे काहीं धार्मिक नेते त्यांच्या स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थाला सार्वजनिक स्वार्थापेक्षा अधिक महत्त्व देऊन त्यांची जबाबदारी प्रामाणिकपणे निभावत नाहीत. जागतिक संबंधाच्या संदर्भात पाहिल्यास जगातील गरीब आणि श्रीमंत राष्ट्रांमध्ये वाढणारी दरी सुद्धा संघर्षाचे मोठे कारण दिसून येते.

शक्तिशाली देश नेहमीच गरीब देशांच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा लाभ उठवताना त्या देशांचा योग्य वाटा देत नाहीत हे स्पष्टपणे दिसून येत आहे. म्हणून जागतिक शांततेला बाधा आणणाऱ्या अशा बऱ्याच समस्या आहेत, त्यापैकी काहीं थोडया समस्यांचा मी येथे उल्लेख केला आहे. कारणे काहीही असोत माझ्या दृष्टीने जागतिक शांततेचा अभाव हीच या पिढीसाठी सर्वात धोकादायक समस्या आहे.

हे ऐकल्यानंतर तुमच्यापैकी अनेक जणांची प्रतिक्रिया अशी असू शकते की, मुस्लिम देशांमध्ये सर्वाधिक अस्थिरता आपण पाहत आहोत आणि जगाच्या शांततेला मुस्लिम जगातील हीच अराजकता जागतिक शांततेसाठी सर्वाधिक त्रासदायक आहे.

खरंच मी एका वैश्विक मुस्लिम जमाअत, अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख असल्याने या पैकी काहीं जबाबदारी माझ्यावर देखील येते. तुम्ही असेही म्हणू शकता की, अतिरेकी गटांचा उदय आणि दहशतवादाचा उदय होण्यास इस्लामची शिकवण कारणीभूत आहे; परंतु अशा अराजकतेसाठी आणि तिरस्कर्णीय परिस्थितीशी इस्लामचा संबंध जोडणे पूर्णपणे अन्यायकारक आहे.

तूर्तास, धर्माच्या इतिहासाबद्दल सविस्तर चर्चा करण्याची आवश्यकता नाही, परंतु असे म्हणणे पर्याप्त आहे की, जर आपण सर्व धर्माच्या इतिहासाकडे वास्तववादी दृष्टीने पाहिल्यास आपणास दिसून येईल की कालमानाप्रमाणे प्रत्येक धर्माचे अनुयायी त्या त्या धर्माच्या मूळ शिकवणीपासून दुरावत

गेलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये आपसातील मतभेद आणि संघर्ष वाढत आहे. मोठया प्रमाणात लोकांची हत्या केली जात आहे आणि क्रौर्याला प्रोत्साहन मिळत आहे.

ही गोष्ट नजरेसमोर ठेवल्यानंतर मी मनापासून स्वीकार करतो की कालमानाप्रमाणे मुस्लिम सुद्धा इस्लामच्या शिकवणींपासून दुरावले आहेत, यामुळे नैराश्य आणि वैर्यभावना वाढत आहे, ज्यामुळे फुटीरतावाद हिंसा आणि अन्यायाकडे वाटचाल होत आहे. परंतु एका सच्चा मुस्लिमच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास इस्लामवरील माझा विश्वास आणि निष्ठा अजिबात ढासळलेली नाही.

याचे कारण १४०० वर्षापूर्वीच इस्लामचे संस्थापक, पवित्र पैगंबर मुहम्मद (स.) यांनी भविष्यावाणी केली होती की, हळूहळू इस्लामची मूळ शिकवण प्रक्षिप्त होत जाईल आणि मुसलमान नैतिक दृष्टया अधःपतीत होत जातील. परंतु त्यांनी असेही सांगितले होते की, अशा आध्यात्मिक अंधकाराच्या परिस्थितीमध्ये सर्वशक्तिमान अल्लाहकडून सुधारक पाठवला जाईल जो अपेक्षित मसीहा आणि ईमाम महदी असेल, जो मानवजातीला इस्लामच्या मूळ शांततामय शिकवणीकडे मार्गदर्शन करेल.

ज्याप्रमाणे पवित्र पैगंबर (स.) यांनी भविष्यवाणी केली होती त्याप्रमाणे अपेक्षित मसीहा यांनी आम्हाला इस्लामच्या मूळभूत आणि शांततामय शिकवणूकीकडे मार्गदर्शन केले म्हणून आम्ही अहमदी मुस्लिम आजच्या अशा लोकांत सामील नाहीत, जे अराजकता आणि अस्थिरता निर्माण करत आहेत. याउलट आम्ही असे लोक आहोत, जे या जगात शांतता नांदावी अशी इच्छा बाळगतो.

आम्ही असे लोक आहोत जे, या जगाची परिस्थिती सुधारावी यासाठी प्रयत्नरत आहोत. आम्ही असे लोक आहोत, जे मानवजातीत ऐक्य निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत आहोत. आम्ही असे लोक आहोत, जे घृणा

आणि वैर्यभावनेला प्रेम आणि ममते मध्ये परावर्तीत करण्यासाठी प्रयत्नरत आहोत. आणि निश्चितपणे आम्ही असे लोक आहोत, जे जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करण्यासाठी सदैव सिद्ध आहोत. एक धार्मिक नेता म्हणून मी असे सांगू इच्छितो की, एकमेकांना दोष देण्याऐवजी आणि भडकावण्याऐवजी आमचे लक्ष्य जगात खरी आणि चिरकाळ टिकाऊ शांतता प्रस्थापित करणे हे असावे.

या संदर्भात अहमदिया मुस्लिम जमाअतचे संस्थापक यांनी आम्हाला एका मूळभूत सिद्धांताकडे मार्गदर्शन केले आहे. ते म्हणाले की, शांतता प्रस्थापित करण्यासाठी मानवजातीने सर्वशक्तिमान अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांचा आपल्या सामर्थ्यानुसार अंगीकार करणे आणि त्यावर कार्यरत होणे अत्यावश्यक आहे. ते पुढे म्हणतात की, हे मानवजातीच्या दीर्घकालीन कल्याणासाठी आवश्यक आहे. खरोखरच ते पुढे असे स्पष्ट करतात की, मानवजातीच्या भौतिक आणि आध्यात्मिक कल्याणाचा, सर्वशक्तिमान अल्लाहच्या गुणवैशिष्टयांचा अंगीकार करण्याशी थेट संबंध आहे. कारण त्याच्या गुणवैशिष्टयांतूनच सर्व प्रकारची शांती उत्पन्न झालेली आहे.

पवित्र कुरआनाच्या पहिल्याच वचनातून ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते ज्यात, असे म्हटले आहे की, अल्लाह तो आहे जो सर्व सृष्टींचा विधाता आहे. याचा अर्थ असा होतो की, तो सर्व मानवाचा तसेच प्रत्येक प्रकारच्या प्राणीमात्रांचा विधाता, अन्नदाता आणि स्वामी आहे. तो फक्त मुसलमानांचा विधाता नसून तो ख्रिस्ती लोकांचाही, यहूदींचाही आणि हिन्दू लोकांचाही आणि खरे पाहिल्यास सर्व प्राणीमात्रांचा - मग त्यांचा धर्म आणि पंथ काहीही असो सर्वांचाच विधाता आहे.

परमेश्वराचे प्रेम आणि त्याचा कृपाशीर्वाद त्याच्या सर्वच निर्मिती प्रती अतुल्य आणि असाधारण आहे. तो अतिशय कृपावंत आणि दयावंत आहे. तोच शांतीचा उगम आहे, म्हणून जेव्हा इस्लाम मुसलमानांकडून

अशी अपेक्षा करतो की त्यांनी सर्वशक्तिमान अल्लाहची गुणवैशिष्ट्ये अंगीकारावीत, त्यावेळी खरा मुसलमान इतरांसाठी घातक ठरेल हे अशक्य होऊन जाते. या उलट सच्च्या मुसलमानाची निष्ठा त्याला संपूर्ण मानवजातीवर प्रेम करण्यास आणि प्रत्येकाचा आदर करण्यास त्यांच्याशी सहानुभूती पूर्ण व्यवहार करण्यास बाध्य करते. हा प्रश्न नेहमीच विचारला जातो की, ज्या अर्थी इस्लाम शांतीचा धर्म आहे, तर मग पवित्र कुरआनामध्ये युद्ध करण्याची परवानगी का देण्यात आली आहे? परंतु ही परवानगी कुठल्या संदर्भात आणि कुठल्या परिस्थितीत देण्यात आली आहे हे समजून घेणे अत्यावश्यक आहे. चिरकाळ टिकाऊ शांतता प्रस्थापित करणे हे सर्वात महत्त्वाचे आणि बहुमूल्य कार्य आहे. आणि काहीं परिस्थिती मध्ये दीर्घकालीन शांततेच्या प्रस्थापनेसाठी शिक्षा किंवा ताकीद देणे अनिवार्य ठरते.

त्याच प्रमाणे सर्वशक्तिमान अल्लाहकडून ज्यावेळी युद्धाची परवानगी देण्यात आली त्यावेळी ती शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि स्वसंरक्षणासाठी देण्यात आली होती. म्हणून काही व्यक्ती आणि घटकांद्वारे पवित्र कुरआनाचा आणि पवित्र पैगबरांचा (स.) हिंसे आणि क्रौर्याशी संबंध जोडणे अतिशय अन्यायकारक आहे. जर आपण पवित्र कुरआन आणि पवित्र पैगबरांच्या जीवन चरित्राचे निष्पक्षपणे अध्ययन केल्यास आपल्याला दिसून येईल की इस्लाम अतिरेकवादाच्या आणि रक्तपाताच्या पूर्णपणे विरुद्ध आहे.

वेळेच्या बंधनामुळे मी फार विस्ताराने बोलू शकत नाही; परंतु मी काहीं मूळभूत अशा इस्लामच्या शिकवणूकींकडे, ज्या निःसंदिग्धपणे इस्लामला शांतीचा धर्म ठरवतात, निर्देश करणे आवश्यक समजतो. जसे की, मी आताच बोललो की, सर्वसामान्यपणे जो आरोप इस्लामवर लावला जातो की, हा धर्म अतिरेकवाद आणि युद्धखोरीला प्रोत्साहन देतो पण यापेक्षा मोठा असत्य दुसरे असूच शकत नाही.

म्हणून पवित्र कुरआनाच्या अध्याय २ वचन १९१ मध्ये अल्लाहने आदेशित केले आहे की, युद्ध फक्त आणि फक्त स्वसंरक्षणासाठीच करणे वैध आहे. हाच मुद्दा अध्याय २२ वचन ४० मध्ये सुद्धा अधोरेखित करण्यात आला आहे. ज्यामध्ये अतिशय सुस्पष्ट म्हटले आहे की, युद्ध करण्याची परवानगी फक्त अशा लोकांना देण्यात येत आहे ज्याच्यावर हल्ला झाला असून युद्ध लादले गेले आहे. पुढे जाऊन सर्वशक्तिमान अल्लाहने मुस्लिम राज्य शासनांना युद्ध करण्याची परवानगी फक्त धार्मिक स्वातंत्र्याच्या आणि श्रद्धेच्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दिलेली आहे. म्हणून अध्याय २ वचन १९४ मध्ये अल्लाहने आज्ञा दिली आहे की, मुसलमानांना अशा परिस्थितीत जेथे धार्मिक स्वातंत्र्यपूर्वीपासून बहाल आहे, तेथे युद्ध करण्यास अजिबात परवानगी नाही.

म्हणून कोणत्याही मुस्लिम देशास, गटास किंवा व्यक्तीस, कुठल्याही प्रकारच्या हिंसेत, युद्धखोरीत आणि अराजकतेत, मग ती राज्य शासनाच्या विरुद्ध असो किंवा जनतेच्या विरुद्ध असो, गुंतण्याचा अजिबात अधिकार नाही. साधारणपणे युरोप आणि पाश्चात्य देशांमध्ये धर्मनिरपेक्ष सरकारे आहेत. आणि म्हणून मुसलमानांना त्या देशातील कायदा मोडण्याचा, शासनाचा हिंसात्मक विरोध करण्याचा किंवा कुठल्याही प्रकारच्या बंडखोरीला आणि विद्रोहाला चिथावणी देण्याचा अजिबात अधिकार नाही.

वास्तविक पाहता इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीनुसार जर एखादी व्यक्ती असे समजते की त्याला बिगर मुस्लिम देशामध्ये खऱ्या अर्थाने धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त नाही तरी त्याने कुठल्याही प्रकारचा विरोध किंवा बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतवू नये. त्यापेक्षा त्यानी त्या देशाचा त्याग करुन अन्य ठिकाणी जेथे त्याला अनुकूल वातावरण मिळेल अशा ठिकाणी स्थलांतरित व्हावे.

पवित्र कुरआनाच्या अध्याय १६ वचन १२७ मध्ये मुस्लिम शासनांना

आज्ञा देण्यात आली आहे की, जर त्यांच्यावर हल्ला झाल्यास त्या प्रमाणतच त्यांनी प्रतिकार करावा आणि तो फक्त स्वसंरक्षणापूर्ताच मर्यादित ठेवावा. म्हणून पवित्र कुरआन याबाबतीत अतिशय स्पष्टपणे निर्देश देतो की, शिक्षा ही मर्यादित आणि अपराधाशी प्रमाणबद्ध असावी. पवित्र कुरआनाच्या अध्याय ८ वचन ६२ मध्ये अल्लाह स्पष्ट करतो की, जरी तुमच्या विरोधकांचे इरादे आणि योजना तुमचा घात करण्याचे असले पण त्यानंतर जर त्यांनी माघार घेतली आणि समेट करण्याची इच्छा व्यक्त केली तर तुम्ही विनाविलंब त्यांच्या या प्रस्तावाला अनुकूल प्रतिसाद देऊन शांततापूर्ण समेटासाठी तयारी दर्शवावी. मग त्यांचे अंतर्गत हेतू काहीही असोत. पवित्र कुरआनाची शिकवण हीच जागतिक शांतता आणि सुरक्षितता राखण्याचे मूल तत्त्व आहे. आजच्या जगात अनेक उदाहरणे असे आहेत की, अनेक देशांनी अतिशय उग्र स्वरुपाच्या योजना अन्य देशांच्या कथित शत्रुत्वाच्या प्रतिकारासाठी तयार केले आहेत. त्यांना असे दिसून येते की ते अशा सिद्धांतावर कार्यरत आहेत की, त्यांनी आपल्या नष्ट करण्यापूर्वी आपणच त्यांना नष्ट केलेले बरे.

म्हणून इस्लाम अशी शिकवण देतो की, शांतता प्रस्थापित करण्याची कुठलीही संधी वाया जाऊ देऊ नये आणि जरी त्यासाठी आशेचा छोटाशा किरण दिसत असेल तरी तुम्ही प्रयत्नपूर्वक त्या संधीचा लाभ घ्यावा. अध्याय ५ वचन ९ मध्ये सर्वशक्तिमान अल्लाहने असे घोषित केले आहे की, एखाद्या राष्ट्राचे किंवा लोकांचे शत्रुत्व तुम्हाला न्यायपूर्ण आणि उत्तम व्यवहार करण्यापासून परावृत्त करु नये. इस्लाम अशी शिकवण देतो की, सर्व प्रकाराच्या परिस्थितीमध्ये, मग ती कितीही कठीण असो तुम्ही अतिशय दृढपणे न्याय आणि प्रामाणिकपणाशी प्रतिबद्ध रहावे. म्हणून अगदी युद्धाच्या परिस्थितीमध्ये सुद्धा न्याय आणि प्रामाणिकपणा अतिशय महत्त्वाचा आहे. आणि जेव्हा युद्ध सामप्त होते तेव्हा विजेत्याने नेहमीच योग्य मार्गाचाच अवलंब करावा आणि कदापिही अतिरिक्त क्रौर्याचे प्रदर्शन करु नये.

म्हणून आजच्या जगामध्ये आपण इतक्या उच्चकोटीच्या नैतिक मानकांचा आणि उच्च प्रतीच्या प्रामाणिकपणेचा प्रत्यय दिसून येत नाही, उलट युद्ध संपल्यानंतर पराजितावर असे दंड आणि प्रतिबंध लावले जातात की ज्यामुळे पराजित देशांच्या विकास कुंठीत होऊन त्या देशांचे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य किंवा सार्वभौमत्व शिल्लक राहत नाही. अशा धोराणांमुळे जागतिक संबंध बाधित होत आहेत आणि त्यामुळे फक्त नैराश्य निर्माण होऊन त्याचा नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

वास्तव हे आहे की, चिरस्थायी शांतता कदापिही प्रस्थापित होऊ शकत नाही जोपर्यंत समाजाच्या प्रत्येक स्तरावर न्यायाचा अवलंब केला जात नाही. इस्लामची आणखीन एक महत्त्वाची शिकवण, जिचा उल्लेख पवित्र कुरआनाच्या अध्याय ८ वचन ६८ मध्ये आहे की, मुसलामानांनी युद्ध कैद्यांशिवाय अन्य कोणालाही कैदी बनवू नये. म्हणून अतिरेकवादी आणि दहशतवादी गट, जे कोणालाही निष्कारण कैदी बनवत आहेत ते पूर्णतः इस्लामच्या शिकवणूकींविरुद्ध वागत आहेत. खरे तर त्या सूचना मिळत आहेत त्यानुसार ते फक्त कैदीच बनवित नसून त्यांच्या कैद्यांना अतिशय अमानवीय अशा क्रौर्याने वागत आहेत. हे दहशतवादी गट जे काहीं करत आहेत त्याचा अतिशय कठोरतम शब्दांमध्ये धिक्कार केला पाहिजे. याउलट पवित्र कुरआन अशी शिकवण देतो की, जरी योग्य कारणांसाठी कोणाला कैद केली असेल तरी त्यांच्या प्रती अतिशय सहानुभूतीचे प्रदर्शन करत शक्य असल्यास त्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न अतिशय स्वर्णीम असा सिद्धांत दिलेला आहे. त्यात म्हटले आहे की, जर राष्ट्रांमध्ये किंवा गटांमध्ये काहीं मतभेद निर्माण झाले असतील तर तृतीय पक्षाने मध्यस्थी करुन त्या मतभेदांचे शांतीपूर्ण समाधान निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.

अशा प्रकारे करारनामा झाल्यानंतर जर एखादा पक्ष अयोग्यपणे दुसऱ्या पक्षाला अंकित करण्याचा प्रयत्न करत असेल आणि करारनामा

मोडत असेल तर इतर राष्ट्रांनी एकत्रितपणे आवश्यक असेल तर शक्तिचा वापर करुन त्याचे हे आक्रमण थांबवायला पाहिजे; परंतु जेव्हा आक्रमक पक्ष माघार घेत असेल तर त्याला अपमानित किंवा अयोग्यपणे प्रतिबंधित करु नये, त्या उलट त्यांना स्वतंत्र राष्ट्र आणि स्वतंत्र समाज म्हणून विकसित होण्यासाठी संधी द्यावी. हा सिद्धांताच्या परिस्थितीमध्ये अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आणि विशेषतः प्रमुख महाशक्ति आणि आंतरराष्ट्रीय संघटना जसे की, संयुक्त राष्ट्र यानी यावर अंमलबजावणी करावी. पवित्र कुराआनाच्या अध्याय २२ वचन ४१ मध्ये जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी अतिशय संस्मृरणीय सिद्धांत म्हणून वैश्विक धार्मिक स्वातंत्र्याप्रती प्रतिबद्धता हे सांगितले आहे. पवित्र कुरआनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, जर युद्धाची परवानगी देण्यात आली नसती तर मशिदी, चर्च, मठ आणि मंदिरे तसेच अन्य सर्व धर्मीय उपासना स्थळे सुरक्षित राहिली नसती. म्हणून ज्या ठिकाणी सर्वशक्तिमान अल्लाह ने शक्तिचा वापर करण्याची परवानगी दिली आहे तिथे ती फक्त इस्लामच्या संरक्षणासाठी नसून ती धर्माच्या संरक्षणासाठी दिली आहे. वस्तुतः इस्लाम सर्वच धर्मांच्या लोकांसाठी स्वातंत्र्य, मुक्ताचरण आणि सुरक्षिततेची हमी देते. इस्लाम प्रत्येक व्यक्तिच्या त्याच्या आवडीच्या मार्गाचे किंवा श्रद्धेचे पालन करण्याच्या त्याच्या अधिकाराचे संरक्षण करतो. मी पवित्र कुरआनातील काहीं थोडयाच मुद्दांचे आपणासमोर विवेचन केले आहे, जे मुद्दे जगाच्या प्रत्येक भागात आणि प्रत्येक समाजात एकातमता निर्माण करण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन पुरवतात. पवित्र कुरआन ने जागतिक समुदायासमोर शांतता स्थापन करण्यासाठी ही स्वर्णीम मूळ तत्त्वे सांगितली आहेत.

या शिकवणी आहेत ज्याच्यावर पवित्र प्रेषीत मुहम्मद (स.) आणि त्यांच्या खऱ्या अनुयायांनी काटेकोरपणे अमंलबजावणी केली होती. म्हणून समारोप करताना मी परत एकदा असे म्हणू इच्छितो की, आज जगाला

शांती आणि सुरक्षतितेची अत्यंत आवश्यकता आहे. ही अतिशय तातडीचे आणि गंभीर समस्या आमच्या पुढे आहे.

सर्व राष्ट्र आणि सर्व लोकांनी या महान कार्यासाठी एकत्रित येऊन संघटितपणे प्रयत्न करुन सर्व प्रकारच्या क्रौर्य, अत्याचार आणि अन्याय, जो धर्माच्या नावावर किंवा अन्य एखाद्या कारणाने केल्या जात आहेत, त्याला पूर्णपणे थांबवायला पाहिजे. त्यामध्ये एखाद्या धर्माची टर उडवणे, ज्याच्यामुळे भावना दुखावतील आणि अशांतता पसरेल, या गोष्टींचाही समावेश आहे. आणि त्याचबरोबर अतिरेकी गटांच्या घृणास्पद कार्यवाह्या ज्यांचे ते चूकीच्या पद्धतिने धर्माच्या नावावर समर्थन करत आहेत, याचा सुद्धा समावेश आहे.

त्यापुढे जाऊन आम्हाला प्रामाणिकपणे असे प्रयत्न सुद्धा करावे लागतील की, आम्ही सर्व राष्ट्रांना अशाप्रकारे सहकार्य करावे की, जेणे करुन प्रत्येक देश प्रगती पथावर जाईल आणि त्यांना आपल्या सामर्थ्याचा प्रत्यय येईल. आम्ही सद्या जी वैर भावना आणि आकस बुद्धी पाहत आहोत त्याचे एकमेव कारण संपत्तीची भूक हे आहे. या संदर्भात पवित्र कुरआनने स्वर्ण मंत्र दिले आहे की, एखाद्याने दुसऱ्याच्या संपत्तीकडे आसक्तीने पाहू नयेफ्फ या शिकवणीवर अंमल करुन आम्ही जगात शांतता स्थापन्यास प्रवृत्त करु शकतो.

धर्म, वर्ण या सर्वांच्या पुढे जाऊन निरपेक्षपणे करावा लागेल, जेणे करुन प्रत्येक व्यक्ती, मग तो स्त्री असो की पुरुष स्वतःच्या पायावर सन्मानाने आणि स्वाभिमानाने उभा राहू शकेल. आज आपण पाहत आहोत की, अनेक पहिल्या जगातील देश गरीब आणि विकसनशील देशांमध्ये मोठया प्रमाणात गुंतवणूक करत आहेत. त्यांनी संपूर्ण न्यायासह त्या देशांना सहकार्य करणे अत्यावश्यक आहे, त्याऐवजी जर ते फक्त त्यादेशातील नैसर्गिक साधन-संपत्ती आणि स्वस्थ श्रम शक्तीचा वापर स्वतःच्या देशाच्या फायद्यासाठी आणि लाभासाठी करत असतील तर ते अन्याय आहे. त्यांनी

त्याच देशांमध्ये मोठया प्रमाणात त्यांनी कमावलेला लाभांची पुनर्गुंतवणूक करायला पाहिजे आणि त्या देशातील कमावलेली धनसंपत्तीचा वापर स्थानिक लोकांच्या विकासासाठी आणि उन्नतीसाठी करायला पाहिजे.

जर विकसीत देशांनी अशा पद्धतीने कार्य केल्यास ते फक्त गरीब देशांचाच फायदा होणार नसून दोघांचाही फायदा ठरेल. त्यामुळे एकमेकाप्रती विश्वास आणि भरवसा निर्माण होऊन जी नैराशय भावना होत आहे ती दूर होईल.

त्यामुळे गरीब देशांच्या मनामध्ये अशी भावना, जी त्यात निर्माण होत आहे की, श्रीमंत देश फक्त स्वतःच्या फायद्यासाठीच आमच्या साधन संपत्तीचा अन्यायपणे वापर करत आहे, ती नष्ट होईल. त्यापुढे जाऊन त्या देशांच्या स्थानिक अर्थ शक्तीमध्ये उन्नती होईल आणि परिणामस्वरुप जगाची आर्थिक आणि सांपत्तिक स्थिती सुधरेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यामुळे जागतिक समुदायाची निर्मिती प्रेम आणि मानवतेच्या भावनेने स्थापन होईल. आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यामुळे जागतिक शांततेचा पाया रचला जाईल. जर का आपण याकडे वेळीच लक्ष दिले नाही तर जागतिक शांतता नष्ट होऊन अतिशय विध्वंसक अशा जागतिक युद्धाचा भडका उडेल जो पिढयांपिढयापर्यंत भोगावा लागेल आणि परिणामस्वरुप आमच्या पुढच्या पिढया आम्हाला कधीच माफ करणार नाही.

या शब्दांसह मी तुमची रजा घेतो. अल्लाह करो जगातील सर्व लोक खऱ्या अर्थाने शांततेत नांदो.

**धन्यवाद.**




# जागतिक अस्थिरतेच्या काळात शांतता प्रस्थापनेची गुरु किल्ली

टोकियो, जापान,२०१५




Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] leading silent prayer at a special reception in Tokyo, Japan.





Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] watering a plant at a special reception in Tokyo, Japan.



Ḥaḍrat Khalīfatul-Masīḥ V[aba] delivering keynote address at a special reception in Tokyo, Japan.

## प्रस्तावना

जागतिक अहमदिया मुस्लिम जमाअतचे सर्वोच्च नेते आणि मसीहाचे पाचवे ख़लीफा, हज़रत मिर्ज़ा मसरुर अहमद यांनी २३ नोव्हेंबर २०१५ रोजी, हिल्टन हॉटेल ओडेबा, टोकिया येथे त्यांच्या सन्मानासाठी आयोजित विशेष स्वागत सभारंभामध्ये पुढील बीजभाषण दिले. जवळपास ६० पेक्षा जास्त पाहूणे या कार्यक्रमात उपस्थित होते. या प्रसंगी माननीय महोदयानी सत्तर वर्षापूर्वी हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर झालेल्या अणु हल्लांचाही उल्लेख केला. तत्पूर्वी दोन अतिथी वक्ते डॉ. माई साता यासुहिको (पि.एच.डी, अध्यक्ष टोकियो ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज) आणि टोहोकू येथील मा. इंडो शिनिची ज्यांचा विभाग २०११ या भूकंप आणि सुनामीमध्ये सर्वाधिक प्रभावित झालेला होता, हे देखील बोलले.

# जागतिक अस्थिरतेच्या काळात शांतता प्रस्थापनेची गुरु किल्ली

तशह्हूद, तआवुज आणि बिस्मिल्लाह च्या पठनानंतर मसीहाचे पाचवे ख़लीफा म्हणाले की, सर्व प्रतिष्ठीत पाहूणे मंडळी अस्सलामू अलैकूम व रहमतुल्लाही व बरकातहू. अल्लाहची कृपा आणि अर्शीवाद आपणा सर्वांना लाभो.

सर्व प्रथम मी ज्या पाहूण्यांनी या कार्यक्रमाचे निमंत्रण स्वीकरले आहे, त्यांना धन्यवाद देतो. सद्या आपण अतिशय गंभीर आणि संकटाच्या काळातून जात आहोत ज्यासाठी जागाची सद्यपरिस्थिती मोठया प्रमाणात कारणीभूत आहे. आपसातील संघर्ष आणि अव्यवस्थेमुळे जागतिक शांतता आणि सुव्यवस्थता धोक्यात आली आहे.

जर आपण मुस्लिम जगाकडे पाहिल्यास आपणास दिसून येईल की, अनेक देशातील सरकार त्यांच्याच जनतेच्या विरुद्धात भयानक अशा युद्धात गुंतलेले आहेत. विवेकहीन हिंसा आणि रक्तपात त्या देशाचे अतोनात नुकसान करत आहेत. आणि त्यामुळे निर्माण झालेल्या ओकळीचा गैरफायदा दहशतवादी गट घेत असून ते देशाच्या काहीं भागांवर ताबा मिळवून त्यांच्या स्वतःचे तथाकथित सरकार आणि कायदे लागू करत आहेत. ते अतिशय घृणास्पद पद्धतीने कल्पनेपलीकडे जाऊन क्रौर्याचे प्रदर्शन करत आहेत जे फक्त त्यांच्या देशापूर्तेच मर्यादित राहिलेले नसून आता ते युरोपमध्येही प्रविष्ट झालेले आहेत ज्याचे ताजे उदाहरण म्हणजे पॅरिसमध्ये झालेला हल्ला हे

आहे.

पूर्व युरोपमध्ये रशिया आणि युक्रेन मध्ये तसेच अन्य युरोपीय देशामध्ये दिवसेंदिवस शत्रुत्त्व भावना वाढत आहे तसेच अमेरिका आणि चायनामध्ये दक्षिण चायना समुद्रात अमेरिकन युद्धनौकांच्या प्रवेशामुळे तनाव निर्माण झाला आहे. आपण सर्व जाणतो की, चायना आणि जापान मध्ये सुद्धा काहीं वादग्रस्त बेटांच्या हक्कांवरुन संघर्ष जारी आहे.

भारत आणि पाकिस्तान मध्ये काश्मीर समस्या ही सततच्या संघर्षाच्या आणि शत्रुत्त्वाचे कारण ठरले आहे. तसेच पॅलिस्टीन आणि इस्त्राईल मधील तनावपूर्ण स्थितीने त्या भागातील शांतता संपुष्टात आणली आहे.

अफ्रीकन देशांमध्ये दहशतवादी गटांनी काहीं भागांवर ताबा मिळविला असून तेथे ते मोठया प्रमाणात विध्वंस आणि विनाश पसरवत आहेत. मी फक्त सद्या जगासमोर असलेल्या काहीं मोजक्याच समस्यांचा या ठिकाणी उल्लेख केला असून आणखीन अनेक उदाहरणे अराजकता आणि अशांततेची देता येतील.

म्हणून संक्षेपात म्हणयचे झाल्यास आज संपूर्ण जग अहिंसा आणि अराजकतेमध्ये गुरफटत चालले आहे. आजच्या आधुनिक जगामध्ये युद्धाचे परीघ पूर्वीच्या काळापेक्षा अतिशय विस्तृत झालेले आहेत. जगाच्या एखाद्या भागातील संघर्ष त्याच भागापूर्ता मर्यादित न राहता इतर अनेक भागावर देखील त्याचे परिणाम दिसून येऊ शकतात.

समाज माध्यमे आणि दळणवळणाच्या अतिशय तीव्रगती साधनांमुळे हे जग एक जागतिक खेडे बनले आहे. पूर्वीच्या काळामध्ये ज्या दोन शक्तींमध्ये युद्ध छेडले जात असे ते त्यांच्या पुर्तेच मर्यादित राहणे शक्य होते; परंतु आता प्रत्येक संघर्ष आणि युद्धाचे परिणाम खऱ्या अर्थाने संपूर्ण जगाला प्रभावित करु शकतात. खरे पाहिल्यास गेल्या अनेक वर्षापासून मी या बाबतीत चेतावणी देत आहे, आणि जगाने ही गोष्ट समजून घ्यावी की,

एका भागातील युद्धाचे परिणाम संपूर्ण जगाच्या शांतता आणि सौहार्दाला प्रभावित करु शकते.

जर आपण इतिहासातील महायुद्धाकडे पाहिल्यास जे २० व्या शतकात आपण अनुभवल्या आहेत, तर आपणाला दिसून येईल की त्या काळात उपलब्ध असलेली शस्त्रास्त्रे आताच्या अतिशय सुधारित आणि घातक शस्त्रांस्त्रांपुढे काहीच नव्हती. तरी असे म्हटले जाते की, जवळपास ७० दशलक्ष लोक या दोन महायुद्धांमध्ये मृत्युमुखी पडले होते आणि त्यातील बहुसंख्ये निष्पाप नागरिक होते. म्हणून आज जो विध्वंस आणि विनाश होईल त्याची कल्पना करणे देखील अशक्य आहे.

त्या वेळेच्या दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेकडे जी अणवस्त्रे होती ती अतिशय विनाशकारी होती; परंतु आजच्या आधुनिक अण्वस्त्रांपुढे ती काहीच नव्हती तसेच आता सद्या फक्त प्रमुख जागतिक शक्तीकडेच अणू बॉम्ब नाहीत तर अनेक छोटया छोटया देशांकडे सुद्धा अणू बॉम्ब आहेत.

जरी प्रमुख जागतिक शक्ती आपली अण्वस्त्रे प्रतिबंधक म्हणूनच बाळगत असली तरी बाकीचे छोटे देश सुद्धा अशाच पद्धतीने जबाबदारीने वागतील याची कोण हमी देऊ शकेल. आपण असे अजिबात ग्रहीत धरु शकत नाही की, ते देश अण्वस्त्राचा वापर करणारच नाहीत. म्हणून हे अगदी स्पष्ट आहे की, जग आता विनाशाच्या काठावर उभे आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर तुमच्या राष्ट्राला अतिशय भयानक अशा विनाशाला आणि कल्पनेपलीकडील वेदनादायी परिस्थितीला, जी तुमच्या हजारो नागरिकांनी भोगली होती आणि शेकडो हजार नागरिक निर्दयपणे मारले गेले होते आणि तुमची दोन शहरे पूर्णपणे, मानवतेला लाजवेल अशा अणूबॉम्ब हल्लांमुळे उध्वस्त झाली होती.

जापानी जनतेने अशा भयंकर परिस्थितीचा स्वतःअनुभव घेतला असल्यामुळे आणि अशाच परिस्थितीमध्ये त्यांचा जन्म झाला असल्यामुळे

जापानवरच काय तर जगातील कोणत्याही भागावर असा भयानक हल्ला व्हावा अशी ते कदापीही अपेक्षा बाळगणार नाही. तुम्ही लोकच अणु युद्धाच्या भयानक विध्वंसकारी परिणामांची खऱ्या अर्थाने कल्पना करु शकता. तुम्ही लोकच जाणता की अशा अण्वस्त्रांच्या हल्ल्यानंतरच्या दूरगामी आणि अप्रत्यक्ष परिणाम काय असतात. आणि म्हणून इतर कोणताही देश किंवा लोक शांती आणि सुरक्षेचे महत्त्व काय आहे ते जापानी लोकांपेक्षा अधिक जाणू शकत नाही.

सुदैवाने जापान या परिस्थितीतून पूर्णपणे बाहेर पडले असून तो सध्या एक अतिशय विकसीत राष्ट्र आहे आणि म्हणून तुमच्या पूर्व इतिहासाला दृष्टीपथात ठेवून जागतिक शांतता निर्माण करण्याच्या कामी जापानने प्रमुख भूमिका बजावायला हवी.

दुर्दैवाने दुसऱ्या महायुद्धाच्या समापतीनंतर जापानवर अनेक प्रकारचे प्रतिबंध आणि दंड लादण्यात आलेले आहेत त्यामुळे जगाच्या दिशा दर्शनात मोठी भूमिका बजावणे कठीन जाईल.

तरी देखील जगाच्या समस्या आणि रजकीय व्यवहारांमध्ये तुमचा देश मोठी भूमिका बजावू शकतो आणि तुम्ही आपल्या या प्रभावाचा योग्य आणि भरपूर वापर, वेगवेगळया राष्ट्रांमध्ये आणि लोकांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी करायला हवा.

हे वर्ष हिरोशिमा आणि नागासाकीवर भयंकर अशा अणु बॉम्ब हल्ल्याचे, की ज्यामुळे अतिशय भयानक असा विध्वंस, वेदना आणि यातना तुमच्या राष्ट्राला भोगाव्या लागल्या होत्या त्या ऐतिहासिक दिवसाचे ७० वे वर्ष आहे.

जसे तुम्ही त्या विध्वंस आणि रक्तपाताच्या चित्रांचे संग्राहलय निर्माण करुन ठेवले आहे तसेच ज्या अर्थी त्या अणू बॉम्ब हल्ल्याचे दुष्परिणाम आजदेखील दिसून येत असतात म्हणून जापानी लोक बऱ्यापैकी

जाणतात की युद्धाचे आणि संघर्षाचे किती भयंकर परिणाम होवू शकतात.

जसे की मी आताच बोललो आहे की, तुम्ही त्या त्रासदीनंतर देखील अनेक क्रूर आणि पूर्णपणे अनावश्यक युद्धोत्तर प्रतिबंधात्मक कार्यवाह्या करुन जापानच्या वेदनांमध्ये अधिक भर घालण्यात आली आहे. जसे दशकावर दशक होऊन गेले त्या विध्वंसकारी युद्धाचे परिणामाचे स्मरण तुम्हाला होत राहिले आहे.

ज्यावेळी जापानवर अणु बॉम्ब टाकण्यात आले होते, त्यावेळी देखील अहमदिया मुस्लिम जमाअतचे तत्कालीन जागतिक प्रमुख, जे दुसरे ख़लीफा होते, त्यांनी अतिशय तीव्र शब्दात त्या हल्लाचा धिक्कार केला होता. ते म्हणाले होतेः

''आमच्या धर्माच्या आणि नैतिकतेच्या शिकवणुकी आमच्याकडून अपेक्षा करतात की, आम्ही या अतिशय भयंकर अशा कृतीचा आणि रक्तपाताचा कुठल्याही प्रकारे आणि कुठल्याही परिस्थितीत समर्थन करु नये. हे आम्ही जगासमोर स्पष्ट करु इच्छितो. माझे हे म्हणणे अनेक देशांच्या सरकारांना आवडणार नाही याची मी अजिबात परवा करत नाही.''

पुढे जाऊन दुसरे ख़लीफा असेही म्हणाले की, भविष्यात देखील युद्ध थांबेल असे त्यांना वाटत नाही उलट त्यांना हिंसा आणि संघर्ष अधिकाधिक वाढत जाताना निदर्शनास येत आहे.

आज त्यांनी दिलेली चेतावणी पूर्ण होताना दिसून येत आहे. जरी तिसरे जागतिक महायुद्ध अधिकृतपणे घोषित झालेले नसले तरी वस्तूस्थिती अशी आहे की, जागतिक युद्ध होताना दिसून येत आहे. संपूर्ण जगामध्ये पुरुष, स्त्रीया आणि लहान मुलांची कत्तल केली जात आहे. त्यांचा छळ केला जात आहे आणि अतिशय हृदयद्रावक अशा क्रौर्याचे ते बळी ठरत आहेत.

आमच्या संदर्भात बोलायचे तर, अहमदिया मुस्लिम जमाअत नेहमीच

सर्व प्रकारच्या क्रौर्य आणि दमननितीचा धिक्कार करत आली आहे. मग ते जगातल्या कुठल्याही भागामध्ये घडत असले तरी; कारण इस्लामची शिकवण आमच्याकडून अपेक्षा करते की, आम्ही सर्वप्रकारच्या अन्यायाविरुद्ध बोललेच पाहिजे आणि ज्यांना आमच्या मदतीची गरज आहे किंवा ज्यांना अयोग्य वागणूक मिळत आहे त्यांची मदत आम्ही केलीच पाहिजे. मी आधीच म्हटले आहे की, अहमदिया मुस्लिम जमाअतचे तत्कालीन जागतिक प्रमुख यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जापानवर अणु बॉम्बचा वापर केल्याच्या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला होता.

तसेच एक अतिशय प्रभावी आणि ख्यातकीर्त अहमदी मुस्लिम, ज्यांचा जागतिक राजकारणावर मोठा प्रभाव होता त्यांनी जापान आणि जापानी लोकांची बाजू मांडण्याचे दायित्व स्वतःहून स्वतःकडे घेतले होते. मी चौधरी सर जफरुल्लाह खान यांच्या बद्दल बोलत आहे, ज्यांच्याकडे जगातील अनेक महत्त्वांची आंतरराष्ट्रीय अधिकारपदे तर होतीच पण ते पाकिस्तानचे पाहिले परराष्ट्रमंत्री होते आणि नंतर ते संयुक्त राष्ट्रसंघाचा आम सभेचे अध्यक्ष नियुक्त झाले होते. दुसरे महायुद्ध संपुष्टात आल्यानंतर काहीं महाशक्तिंकडून जापानवर अयोग्य असे निर्बंध लादल्या जाण्याच्या विरुद्ध त्यांनी आपला निषेध नोंदला होता.

१९५१ साली सॅन फ्रान्सिस्को शांतता परिषदेमध्ये पाकिस्तानी शिष्टमंडळाचे अध्यक्ष या नात्याने भाषण देताना चौधरी सर जफरुल्लाह खान म्हणालेः

''*जापान बरोबर शांती स्थापन करताना न्याय आणि समंजस्याच्या आधारावर करण्यात यावी, बदला आणि दमनकारी भूमिकेतून करण्यात येऊ नये. भविष्यात जापानला ज्या राजकीय आणि सामाजिक संरचनेमध्ये सुधारणा सुचवण्यात आलेले आहेत त्यात जापानची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. जे प्रखर अशा विकासाच्या आणि शांतता प्रिय राष्ट्रांच्या एका समकक्ष*

*सदस्याच्या रुपाने जापानला स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.''*

त्यांच्या वक्तव्याचा आधार पवित्र कुरआन आणि इस्लामचे पवित्र प्रेषीत यांची शिकवण होती. इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीच्या आधारावर ते म्हणाले की, कुठल्याही युद्धातील विजेयत्याने कधीही अन्यायी भूमिका घेऊ नये आणि कधीही अनावश्यक निर्बंध लादून पराजितपक्षाच्या भविष्यातील विकास आणि समृद्धीच्या मार्गात अडथळे निर्माण करु नये.

सर जफरुल्लाह खान यांनी त्यांचे हे ऐतिहासिक निवेदन जापानच्या समर्थनात दिले कारण, ते फक्त पाकिस्तानचेच प्रतिनिधित्व करत नव्हते तर प्रथम आणि प्रामुख्याने ते इस्लामच्या अत्योच्च अशा शिकवणूकीचेही प्रतिनिधित्व करत होते.

जसे की, मी यापूर्वी म्हटले आहे की, तुम्हीच ते लोक आहात जे युद्ध आणि हिंसाचाराच्या परिणामांचे गांभिऱ्य इतर कोणापेक्षाही अधिक समजू शकता. म्हणून प्रत्येक स्तरावर आणि प्रत्येक शक्य असलेल्या मार्गाने, जापानी सरकारने सर्व प्रकारच्या अमानवीय कृत्यांचा, अत्याचारांचा आणि अन्यायांचा, विरोध केला पाहिजे. त्यांनी या गोष्टीची खातर तमा केली पाहिजे की, ज्या प्रकारचा अश्लाघ्य हल्ला त्यांना सहन करावा लागला तसा भविष्यात जगात कोठेही कोणालाही सहन करावा लागू नये.

ज्या ज्या ठिकाणी युद्धाच्या ज्वाला भडकत आहेत त्या सर्व ठिकाणी जापानच्या नेत्यांनी तनाव कमी करण्यासाठी आणि शांती प्रस्थापनेसाठी त्यांची भूमिका बजावलीच पाहिजे. इस्लाम च्या संदर्भात बोलायचे तर काहीं लोक त्याला रानटी आणि हिंसक धर्म मानतात त्यांच्या या धारणेच्या समर्थनात ते दहशतवाद आणि मुस्लिम जगात उफाळलेल्या युद्ध ज्वाराचा उल्लेख करतात.

खरे पाहता, त्यांचीही धारणा संपूर्णपणे चूकीची आहे. वास्तविक पाहता इस्लामची शांती संदर्भातील शिकवणूक जगाच्या इतिहासात अतुलनीय

आहे. म्हणूनच आमचे दुसरे ख़लीफा आणि चौधरी जफरुल्लाह खान यांनी तुमच्या राष्ट्राच्या विरोधात झालेल्या अत्याचाराविरुद्ध जोरकसपणे आपले मत मांडले. आता थोडक्यात मी इस्लामची शिकवण काय आहे हे स्पष्ट करु इच्छितो.

एक मूलभूत तत्त्व म्हणून इस्लामचे म्हणणे आहे की, कुठलेही युद्ध मग ते भौगोलिक, राजकीय किंवा आर्थिक लाभासाठी किंवा नैसर्गिक संसाधानावर ताबा मिळविण्यासाठी लढले जाते, ते असमर्थनीय आहे. पुढे पवित्र कुरआनाच्या अध्याय १६ वचन १२७ मध्ये सर्वशक्तिमान अल्लाहने म्हटले आहे की, ''युद्धजन्य परिस्थितीमध्ये कोणतीही शिक्षा अपराधाच्या योग्य प्रमाणातच दिली गेली पाहिजे आणि ती कधीही अमर्याद असू नये.'' पुढे पवित्र कुरआनात म्हटले आहे की, ''युद्ध संपुष्टात आल्यानंतर क्षमा करणे आणि सहनशीलतेचे प्रदर्शन करणेच योग्य असते.''

त्याचप्रमाणे पवित्र कुरआनाच्या अध्याय ८ वचन ६२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, ''जेव्हा दोन पक्षांमध्ये संबंध संपुष्टात येतात आणि ते युद्धाच्या तयारीला लागतात; अशा परिस्थितीत जर विरोधीपक्ष समेटासाठी उद्युक्त असेल तर अन्य पक्षाने सुद्धा त्यांचा तो प्रस्ताव स्वीकारणे अनिवार्य ठरते आणि त्यांनी आपला विश्वास अल्लाहवर ठेवला पाहिजे.'' पवित्र कुरआनात म्हटले आहे की, ''एखाद्याने आपल्या विरोधी पक्षाच्या प्रामाणिकपणावर आणि अंतःस्थ हेतू बद्दल विनाकारण पूर्वग्रह दूषित होऊ नये. त्याउलट त्यांनी नेहमीच शांततापूर्ण समेटासाठी प्रयत्नशील राहिलं पाहिजे.''पवित्र कुरआनाची ही शिकवण आंतरराष्ट्रीय पातळीवरील शांतता आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने कळीचे तत्त्व आहे.

पवित्र कुरआनाच्या अध्याय ५ वचन ९ मध्ये सर्वशक्तिमान अल्लाहने घोषित केले आहे की, ''एखाद्या राष्ट्राचे किंवा लोकांचे शत्रुत्त्व तुम्हाला न्याय आणि वास्तववादी भूमिकेपासून परावृत्त न करो.''

उलट इस्लाम अशी शिकवण देतो की, कुठल्याही परिस्थितीत, मग ती कितीही आव्हानात्मक असो, तुम्ही न्याय आणि एकात्मतेच्या तत्त्वाशी निर्धारपूर्वक प्रतिबद्ध राहिला पाहिजे. खरे पाहता न्यायच असा मार्ग आहे ज्यामुळे संबंधात सुधारणा येते. नैराश्याचा नाश होतो आणि युद्धाची कारणे संपुष्टात येतात. पवित्र कुरआनाच्या अध्याय २४ वचन ३४ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की, ''एखाद्या यशस्वी युद्धानंतर जेव्हा तुम्ही युद्धकैद्यांना काही मावेजा करुन मुक्त करु इच्छिता, त्यावेळी तुमच्या अटी आणि शर्ती व्यवहार्य असल्या पाहिजेत, जेणे करुन त्यांची पूर्तता करणे त्यांना सहज शक्य होईल. आणि जर तुम्ही त्यांना तो मावेजा हफत्या हफत्याने देण्याची मुभा दिली तर ते अतिशय उत्तम आहे.''

पवित्र कुरआनाच्या अध्याय ४९ वचन १० मध्ये शांतता प्रस्थापनेसाठी एक स्वर्णीम तत्त्व सांगण्यात आले आहे त्यात म्हटले आहे की, ''जर का दोन राष्ट्रांमध्ये किंवा गटांमध्ये मतभेद निर्माण होत असतील तर तिसऱ्या पक्षाने मध्यस्थी करुन शांततापूर्ण समाधान निर्माण करण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.''

आणि असा करार झाल्यानंतर कोणताही पक्ष अयोग्य पद्धतीने ठरलेल्या अटीं च्या विरुद्धात वागत असेल तर इतर राष्ट्रांनी एकत्रितपणे आणि आवश्यक तेवढया बळाचा वापर करुन आक्रमकाला थोपवले पाहिजे. परंतु जेव्हा आक्रमक पक्ष माघार घेत असेल तेव्हा त्याच्यावर अनावश्यक निर्बंध लादू नयेत; उलट त्यांना एक स्वतंत्र राष्ट्र आणि एक स्वतंत्र समाज म्हणून पुढे जाण्याची संधी द्यायला पाहिजे.

हे तत्त्व आजच्या जगामध्ये खूपच महत्त्वाचे ठरते आणि विशेषतः ज्या महाशक्ती आहेत आणि ज्या आंतरराष्ट्रीय संघटना आहेत, जसे संयुक्त राष्ट्रे त्यांच्यासाठी देखील. जर त्यांनी या मूल्यांचा अवलंब केला तर खऱ्या अर्थाने शांतता आणि न्याय जगामध्ये प्रस्थापित होईल आणि अनावश्यक

अशा नैराश्यभावना आपोआप लोप पावतील.

अशाच प्रमाणे पवित्र कुरआनामध्ये अनेक ठिकाणी जागतिक शांतता प्रस्थापनेसाठी आणि सर्वप्रकारची युद्धे संपुष्टात आणण्यासाठी मार्गतत्त्वे दिले आहेत. आमचा दयाळू आणि परम कृपाळू विधात्याने आम्हाला शांतता स्थापनेच्या गुरुकिल्ल्या दिले आहेत, कारण त्याची इच्छा आहे की, त्याची लेकरे आपसात सलोख्याने आणि सर्व प्रकारच्या घृणा आणि वितुष्टापासून मुक्त होऊन जगावीत.

म्हणून मी या शब्दांसह तुम्हा सर्वांना अशी विनंती करतो की, तुमच्या प्रभावाचा वापर जगामध्ये शांतता आणि सलोखा निर्माण करण्यासाठी करावा. जगामध्ये कोठेही जर अशांतता आणि संघर्ष दिसून येत असेल तर आपल्या सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे की, आपण न्याय आणि शांततेच्या प्रस्थापनेसाठी अभे राहिला हवे जेणे करुन आपण ७० वर्षापूर्वी होऊन गेलेल्या भयानक युद्धाची पुनरावृत्ती रोखू शकू, ज्याचे विनाशकारी दूषपरिणाम अनेक दशाकानंतर सुद्धा दिसून येत आहेत आणि खरे पाहिल्यास आज देखील ते जारी आहेत.

ज्या अर्थी छोटया प्रमाणात का असेना जागतिक युद्ध आधीच छेडले जात आहेत, यापूर्वी की परिस्थिती हाताबाहेर जाऊन हे युद्ध संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेवून आणि अतिशय भयंकर अशा संहारक अस्त्रांचा वापर सुरु होऊन आपल्या भावी पिढयांचा विनाश करण्यापूर्वी आपण आपल्या कर्तव्यांची पूर्तता करुन शांती प्रस्थापनेच्या प्रयत्नाला सुरुवात करायला पाहिजे.

म्हणून आपण एकत्रित येऊन आपल्या जबाबदाऱ्या पूर्ण करुया. वेगवेगळया विरोधी गटांमध्ये विभागल्या जाण्याऐवजी आपण सर्वांनी एकत्रित येऊन एकमेकाला सहकार्य करणे अनिवार्य आहे. आपल्याकडे कुठलाही अन्य टिकाऊ असा पर्याय शिल्लक नाही; कारण जर का एक सर्वव्यापी

तिसरे जागतिक युद्ध छेडले गेले तर जो विध्वंस आणि विनाश घडेल त्याची कल्पनाही करता येणार नाही.

त्यावेळी भूतकाळातील युद्धे आजच्या युद्धाच्या तुलनेत अतिशय छोटी वाटतील यात शंकाच नाही.

मी प्रार्थना करतो की, खूप उशीर होण्यापूर्वी या जगाने एकत्रित येऊन परिस्थितीचे गांभिर्य ओळखायला हवे आणि सर्वशक्तिमान अल्लाह पुढे नतमस्तक होऊन त्याच्या प्रती आणि एकमेकांच्या प्रती आपली कर्तव्ये परिपूर्ण करावीत.

अल्लाह त्या लोकांना जे धर्माच्या नावाने संघर्ष निर्माण करत आहेत, किंवा जे भूराजकीय आणि आर्थिक लाभासाठी युद्ध छेडत आहेत, त्यांना सुद्‌बुद्धी आणि विवेक प्रदान करो. त्यांना या वास्तवाचे भान येवो की, त्यांचे हेतू किती निरर्थक आणि विध्वंसक आहेत.

आणि अल्लाह जगाच्या सर्व भागांवर खरी आणि चिरकाळ टिकाऊ शांती प्रस्थापन करो. आमीन

या शब्दासह मी पुन्हा एकदा तुम्हां सर्वांचे आजच्या या कार्यक्रमात उपस्थितीत राहिल्याबद्दल आभार मानतो.

**धन्यवाद.**

# जागतिक नेत्यांना
# लिहिलेले पत्र

# आदरणीय श्री पोप बेनीडीक्ट १४
# यांना पत्र

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهُ وَ نُصَلِّي عَلَى رَسُوْلِهِ الْكَرِيْمِ
وعلى عبده المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هو الناصر

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय श्री पोप बेनीडीक्ट १४,

मी सर्वशक्तिमान अल्लाहकडे प्रार्थना करतो की, त्याची कृपा व आशीर्वाद तुमच्यावर होवो.

विश्वव्यापी अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख म्हणून मी आदरणीय श्री पोप यांना पवित्र कुरआन चा हा संदेश पोहोचवत आहे. अल्लाह पवित्र कुरआनात म्हणतो, **'(तु त्यांना असे) म्हण (की), हे ग्रंथ असणारे लोकहो! आमच्या व तुमच्यामध्ये जी गोष्ट समान आहे (त्या) गोष्टीकडे तरी या आणि ती ही आहे की, आपण इतर कोणाची नव्हे तर अल्लाहचीच उपासना करावी आणि आपण त्याच्याबरोबर कोणालाही भागीदार ठरवू नये आणि आपल्यातील काहींनी अल्लाह व्यतिरिक्त विधाता बनवू नये.'**

सध्या इस्लाम जगाच्या डोळयात खूपतो आहे आणि वारंवार अतिशय खालच्या दर्जाच्या आरोपांचे लक्ष्य ठरत आहे. तथापि जे असे आरोप करत आहेत, त्यांनी इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीचा अभ्यास न करता हे चालवलेले आहे. दुर्दैवाने काहीं मुस्लिम संघटनांनी त्यांच्या स्वार्थी हितसंबंधासाठी इस्लामचे चित्र पूर्णतः चूकीच्या पद्धतीने रेखाटले आहे. परिणामस्वरुप पाश्चात्य आणि बिगर मुस्लिम देशातील लोकांच्या मनामध्ये अविश्वास निर्माण झाला असून तो इथपर्यंत वाढला आहे की, अत्योच्च शिक्षण घेतलेले लोक देखील इस्लामचे संस्थापक पवित्र पैगंबर मंहमद (स.) यांच्या विरोधात

बिनबुडाचे आरोप करत आहेत.

प्रत्येक धर्माचा मुख्य उद्देश मानवाला ईश्वराच्या समीप आणने आणि मानवी मूल्यांची स्थापना करणे हाच राहिला आहे. कोणत्याही धर्माच्या संस्थापकाने कधीही त्यांच्या अनुयायींना इतरांचे अधिकार बळकावण्याची किंवा क्रूरपणे वागण्याची शिकवण दिलेली नाही. म्हणून अतिशय अल्पसंख्येत असलेल्या मार्गभ्रष्ट मुस्लिमांच्या कृत्यांना निमित्त करुन इस्लामवर आणि त्याच्या पवित्र पैगंबरावर हल्ला केला जाऊ नये. इस्लाम आम्हाला सर्व धर्मांच्या प्रेषितांचा सम्मान करण्याची शिकवण देतो आणि म्हणूनच सर्व मुस्लिमांनी येशू ख्रिस्ती पूर्वीच्या प्रेषितांवर, ज्यांचा उल्लेख पवित्र बाईबल किंवा पवित्र कुरआनामध्ये करण्यात आला आहे, श्रद्धा ठेवणे अनिवार्य आहे. आम्ही पवित्र महंमद (स.) यांचे अतिशय विनम्र सेवक आहोत आणि म्हणून जेव्हा त्यांच्यावर हल्ला केला जातो, तेव्हा आमच्या हृदयाला खोल वेदना होते आणि खूप दुःख होते; परंतु आम्ही याचा प्रतिवाद म्हणून त्यांच्या उच्च सद्गुणांचा जगामध्ये प्रसार करीत राहतो आणि पवित्र कुरआनातील जास्तीत जास्त सुंदर शिकवणीचा उल्लेख करत राहतो.

जर एखादी व्यक्ती एका विशिष्ठ शिकवणूकीचा स्वतःला अनुयायी समजत असेल; परंतु त्याचे आचरण त्या शिकवणीप्रमाणे नसेल, तर तो त्याचा दोष असून इस्लामचा संदेश शांती, प्रेम आणि सलामती असा आहे. श्रद्धेच्याबाबतीत कोणत्याही प्रकारची बळजबरी योग्य नाही, असा स्पष्ट आदेश पवित्र कुरआन ने दिला आहे. पवित्र कुरआनामध्ये सुरुवातीपासून शेवटपर्यंत प्रेम, सौहार्द, शांती, सहिष्णूता आणि त्यागची भावना हीच शिकवण दिली आहे. पवित्र कुरआन नमूद करतो की, जो कोणी सदाचरणाचा स्वीकार करत नाही तो अल्लाहपासून विभक्त होतो. आणि म्हणून इस्लामच्या शिकवणीपासून देखील खूप दुरावतो. म्हणून जर कोणी इस्लामला अतिरेकी आणि हिंसक धर्म, ज्यात रक्तपाताची शिकवण दिली आहे, असे चित्रीत

करत असेल, तर अशा चित्रीकरणाचा खऱ्या इस्लामशी काहीही संबंध नाही.

अहमदिया मुस्लिम जमाअत फक्त खऱ्या इस्लामचे अनुसरण करते आणि फक्त सर्वशक्तिमान अल्लाहला संतुष्ट करण्यासाठी कार्यरत असते. जर एखाद्या चर्च किंवा अन्य उपासना स्थळाला सुरक्षेची गरज असेल, तर ते आम्हाला त्यांच्या खांदयाला खांदा लावून उभे असलेले पाहतील. जर आमच्या मशिदीमधून एखादा संदेश जर ऐकू येत असेल तर तो फक्त ''अल्लाह महान आहे आणि आम्ही साक्ष देतो की, त्याच्याशिवाय अन्य कोणीही उपासनेस पात्र नाही आणि महंमद (स.) हे अल्लाहचे संदेष्टे आहेत,'' हाच असेल.

एक महत्त्वाचा घटक जो जगाची शांतता भंग करण्यास कारणीभूत ठरत आहे तो असा आहे की, काहीं लोकांचा, जे अतिशय बुद्धिमान आहेत, उच्चशिक्षित आहेत आणि स्वतंत्र वृत्तीचे आहेत, त्यांचा असा समज झाला आहे की, ते कोणत्याही धर्माच्या संस्थापकास अपमानीत करण्याचे आणि त्यांची खिल्ली उडवण्याची त्यांना स्वातंत्र्य आहे. समाजामध्ये शांती कायम ठेवण्यासाठी प्रत्येकाला आपल्या मनातून शत्रुत्वाची भावना नष्ट करुन स्वतःच्या सहनशीलतेचा स्तर उंचावणे अत्यावश्यक आहे. प्रत्येकाने एकमेकाच्या प्रेषितांचे आदर आणि सन्मानाचे रक्षण करण्यासाठी तत्पर राहण्याची आवश्यकता आहे. जग सध्या अशांतता आणि अस्वस्थतेच्या अवस्थेतून जात आहे आणि ही अस्वस्था आणि भयग्रस्तता दूर करण्यासाठी प्रेम आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. आणि प्रेम आणि शांतीचा संदेश सर्वत्र पसरविणे आवश्यक आहे. तसेच आपण पूर्वीपेक्षा जास्त चांगल्या पद्धतीने आणि अधिक सौहार्दाने जगायला शिकले पाहिजे आणि आपण मानवी मूल्यांना ओळखले पाहिजे.

आज जगामध्ये काहीं ठिकाणी छोटया स्वरुपात युद्धे छिडत आहेत

आणि काहीं ठिकाणी महाशक्ती शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा करत आहेत. आता ही गोष्ट लपून राहिलेली नाही की, वरुन आम्हाला एक गोष्ट सांगितली जाते; परंतु पडद्यामागे त्यांच्या छुप्या धोरणांची पूर्तता करणे हीच त्यांची प्राथमिकता असते. अशा परिस्थितीत जगामध्ये शांतता प्रस्थापित होईल का, असा प्रश्न निर्माण होतो. हे अतिशय दुःखाने नमूद करावे लागते की, सध्याच्या जागतिक वातावरणात आणखीन एका महायुद्धाचा पाया रचण्याची सुरुवात झाली असल्याचे दिसून येत आहे. जर दुसऱ्या महायुद्धानंतर समतेवर आधारित न्यायाचा मार्ग अनुसरला असता तर जग आज ज्या अवस्थेत आहे तसे आपल्याला दिसले नसते. जसे की, ते परत एकदा युद्धाच्या ज्वालांनी वेढला जात असलेला दिसत आहे. परिणामस्वरुप असे अनेक देश, ज्यांच्याकडे अण्वस्त्र आहेत त्यांच्यामध्ये आपसात शत्रुत्त्व आणि द्वेष भावना वाढत आहे आणि जग विनाशाच्या काठावर बसले आहे. जर ह्या महाविनाशकारी शस्त्रांचा विस्फोट झाला तर पुढच्या अनेक पिढया आम्हाला, त्यांना कायमस्वरुपी विकलांगतेत लोटल्या बद्दल, कधीही क्षमा करणार नाहीत. अजूनसुद्धा जगाकडे वेळ आहे की, त्यांनी निर्मात्याचे आणि त्याच्या सृष्टीचे अधिकारांकडे लक्ष द्यावे.


मला असा विश्वास आहे की, सध्या आपण जगाच्या विकासापेक्षा त्याला या विनाशापासून सुरक्षित ठेवण्यासाठी तातडीणे प्रयत्न करणे जास्त महत्त्वाचे किंबहुना आवश्यक आहे. मानवाने आपल्या निर्मात्याला तातडीने ओळखणे अत्यावश्यक आहे, कारण मानवतेच्या अस्तित्वासाठी हीच खरीखुरी हमी आहे. अन्यतः हे जग अतिशय वेगाने स्वतःच्या विनाशाकडे वळत आहे. आज मानवशांती प्रस्थापित करण्यात यशस्वी होवू इच्छित असेल तर त्याने इतरांचे दोष हुडकण्यापेक्षा आपल्या अंतरमनातील सैतानावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करायला हवा. स्वतःचे दोष दूर करुन, एक व्यक्ति न्यायाचे अद्भूत असे उदाहरण सादर करु शकते. मी वारंवार जगाचे या

गोष्टीकडे लक्ष वेधत असतो की इतरांप्रती वाढत चाललेली शत्रुवाची भावना मानवी मूल्यांचा पूर्णपणे ऱ्हास करत आहे आणि त्यामुळे जगाला विलुप्ततेकडे लोटत आहे.

जसे की, जगामध्ये तुमच्या आवाजाचा खूप प्रभाव आहे, मी तुम्हाला आग्रह करतो की, जगाला विस्तृतपणे तुम्ही सुचित करावे की, ईश्वराने प्रस्थापित केलेले नैसर्गिक संतुलनाच्या मार्गात अडथळे निर्माण करुन ते जगाला वेगाने नष्ट करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. हा संदेश अधिक व्यापकपणे आणि पूर्वीपेक्षा अधिक जोरदारपणे पोहचविणे आज आवश्यक आहे.

जगातील सर्व धर्मांना धार्मिक सौहार्दाची अत्यंत गरज असून जगातील सर्व लोकांमध्ये प्रेम, सौहार्द आणि बंधुतेची भावना निर्माण करणे आवश्यक आहे. मी अशी प्रार्थना करतो की, आपण सर्वांनी आपली जबाबदारी ओळखावी आणि शांती आणि प्रेम प्रस्थापित करण्यात आपली भूमिका बजावावी आणि जगामध्ये आपल्या निर्मात्याला ओळखण्यासाठी प्रयत्न करावे. आम्ही आमच्या परीने नेहमीच प्रार्थना करतो आणि सतत अल्लाहकडे मागणी करतो की, हा जागाचा विनाश टाळला जावावा. मी प्रार्थना करतो की, जो विनाश आपली वाट पाहत आहे त्यापासून आम्हाला वाचविले जावे.

तुमचा स्नेही,



मिर्जा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# इस्त्राईल च्या पंतप्रधानांना पत्र

وَاجْعَل لِّي مِن لَّدُنكَ سُلْطَانًا نَّصِيرًا
إِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحًا مُّبِينًا
وَلَقَدْ نَصَرَكُمُ اللَّهُ بِبَدْرٍ وَأَنتُمْ أَذِلَّةٌ
KHALIFA-TUL-MASIH
MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهُ وَ نُصَلِّى عَلَى رَسُوْلِهِ الكَرِيْمِ
وعلى عبدهِ المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هوالنّاصـــر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय श्री. बेन्जामिन नेतनयाहू,
प्रधानमंत्री इस्त्राईल ,
जेरुसलेम.
२६ फरवरी,२०१२.

प्रिय प्रधानमंत्री,

मी तुक्तेच एक पत्र इस्त्राईलचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय शेम्यून पेरेस, यांना जगाच्या भीतीदायक परिस्थितीच्या संदर्भात पाठविले आहे. ज्या शीघ्रगतीने परिस्थिती बदलत आहे, त्यामुळे मला माझा संदेश तुम्हालाही पाठविणे अत्यावश्यक वाटले, कारण तुम्ही तुमच्या देशाच्या सरकारचे प्रमुख आहात.

तुमच्या देशाचा इतिहास प्रेषितत्वाशी आणि दैवी संदेशाशी जोडलेला आहे. खरे पाहिल्यास इस्त्राईलच्या संततीकडे अवतरलेल्या प्रेषितांनी तुमच्या राष्ट्राच्या भवितव्याबद्दल अतिशय सुस्पष्ट असे भविष्य कथने केलेले आहेत. प्रेषितांच्या शिकवणीची अवज्ञा केल्यामुळे आणि त्यांचे भविष्यवाणींकडे दुर्लक्ष केल्यामुळे इस्त्राईलच्या संततीने खूप त्रास आणि कष्ट सोसले आहे. जर तुमच्या राष्ट्राचे नेते प्रेषितांचे आज्ञाधारक राहिले असते, तर त्यांनी तुमच्या राष्ट्राला अनेक दुर्दैवी आणि कठीण परिस्थितीपासून सुरक्षित ठेवले असते, म्हणून तुमचे कर्तव्य आहे आणि खरे तर अन्य कोणापेक्षाही तुम्ही प्रेषितांची भविष्य कथनांकडे आणि सुचनांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

मी अपेक्षित मसीहा आणि इमाम महदी (अल्लाहची त्यांच्यावर कृपा असो) यांचा खलीफा, या नात्याने आपणास संबोधित करत आहे, ज्यांना पवित्र महंमद पैगंबर यांच्या सेवकाच्या रुपाने पाठविण्यात आले आणि पवित्र पैगंबर यांना इस्त्राईलच्या संततीच्या बांधवांमध्ये हजरत मुसा यांचा सदृश्य म्हणून सर्व मानवजातीसाठी कृपावंत म्हणून पाठविण्यात आले होते. (डयुटरनॉमी १८:१८); म्हणून अल्लाहच्या संदेशाची आपणाला आठवण करुन देणे हे माझे कर्तव्य ठरते. मला आशा आहे की, तुम्हाला आपला समावेश अशा लोकांमध्ये झालेला आवडेल, जे अल्लाहच्या संदेशाकडे लक्ष देतात आणि त्यामुळे सन्मार्ग प्राप्त करतात, तो सन्मार्ग जो सर्वशक्तिमान अल्लाह, जो या पृथ्वीचा आणि आकाशांचा स्वामी आहे, त्याच्या मार्गदर्शनाच्या अनुरुप आहे.

आम्ही आजकाल अशा बातम्या ऐकतो की, तुम्ही ईरानवर हल्ला करण्याच्या तयारीत आहात. अशा परिस्थितीत की जेव्हा जागतिक महायुद्धाचे भयानक परिणाम तुमच्या समोर आहेत. मागच्या महायुद्धात लक्षावधी इतर लोकांच्या बरोबरीने हजारो हजार यहूदी लोकांचे देखील जीवन नष्ट झाले होते. प्रधानमंत्री म्हणून तुमच्या राष्ट्रांच्या प्राणांचे रक्षण करणे तुमची जबाबदारी आहे. सध्याची परिस्थिती निदर्शक आहे की, पुढील महायुद्ध फक्त दोन देशातच लढले जाणार नसून दोन गट तयार होणार आहेत. महायुद्ध छेडले जाणाऱ्याची भीती फारच गंभीर आहे. मुस्लिमस, ख्रिस्ती आणि ज्यूस या सर्वांचे प्राण संकटात आहेत. जर का असे युद्ध छेडले गेले तर त्याच्या परिणामस्वरुप मानवी विनाशाची एक श्रृंखला तयार होईल. या विनाशाचे परिणाम भविष्यात जन्मणाऱ्या अनेक पिढयांना भोगावे लागतील; ते विकलांग किंवा विकृत जन्माला येतील. कारण असे महायुद्ध आण्विक युद्ध असेल, याबद्दल शंकाच नाही. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही या जगाला एका महायुद्धाच्या संकटात लोटण्याऐवजी, जगाला या सार्वत्रिक

विनाशापासून वाचविण्यासाठी तुम्हाला शक्य असतील तेवढे प्रयत्न करावेत. आपसातील मतभेदांना बळाचा वापर करुन सोडविण्याऐवजी तुम्ही ते आपसातील चर्चे द्वारे सोडविण्याचा प्रयत्न करावा, जेणे करुन आपण आपल्या भावी पिढयांना विकृत आणि विकलांगतेची भेट देण्याऐवजी एका तेजस्वी भविष्याची भेट द्यावी.

मी माझ्या या विचारांना तुमच्या ग्रंथातील शिकवणीमधून खालील अवतरणे उद्धृत करुन अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणार आहे. पहिले अवतरण जबूर मधले आहेः

'दुराचारींमुळे प्रक्षुब्ध होऊ नका. जे दुराचारी आहेत त्यांच्याशी शत्रुत्व करु नका. कारण ते लवकरच गवताप्रमाणे कापले जातील आणि हिरव्या गवताप्रमाणे कोमेझून जातील, अल्लाहवर विश्वास ठेवा आणि सत्कर्मे करा. जमिनीवर रहा आणि सुरक्षित कुरणांचा लाभ घ्या. तसेच परमेश्वराची मर्जी संपादन करा आणि तो तुमच्या मनातील आकांक्षा पूर्ण करेल. तुमचा मार्ग ईश्वराकडे ठेवा. त्याच्यावर विश्वास ठेवा की तो तुमच्यासाठी हे हे करेल. तो तुम्हाला पहाटेच्या प्रकाशाप्रमाणे सदाचरणी बनवेल आणि तुमचा न्याय दुपारच्या प्रखर सुर्याप्रमाणे करेल. अल्लाहवर विसंबून रहा आणि धैर्याने त्याची प्रतिक्षा करा. अशा माणसापासून, जो कपट कारस्तान करुन प्रगती करतो, प्रक्षुब्ध होऊ नका. क्रोध, अवरा आणि शापमुक्त व्हा. प्रक्षुब्ध होऊ नका कारण त्यामुळे दुराचारी व्हाल. दुराचाऱ्यांना नष्ट केले जाईल आणि परमेश्वराच्या भूमीचे वारस त्याची प्रतिक्षा करणारे ठरतील. अल्पकाळ पहा दुराचारी कोठेही दिसणार नाही. होय तुम्ही त्याला शोधाल, परंतु तो कोठेही नसेल; परंतु जे विनम्र आहेत, ते भूमीचे वारस ठरतील आणि अमाप शांतीमुळे आनंदीत होतील.' (ज़बूर,३१:१-११)

तसेच आम्ही तोराह मध्येच पाहतोः

''तुमच्या पिश्वीमध्ये लहान किंवा मोठे असे विविध भार भरु नका, जरी

तुम्हाला तुमच्या घरामध्ये लहान किंवा मोठी विविध साधने उपलब्ध नसतील. परंतु तुमच्याकडे सुयोग्य आणि पर्याप्त भारच प्रदीर्घ होतील, जो तुमचा स्वामी दान करेल. कारण जे असे करतात ते सर्वजण चूकीच्या पद्धतीने करतात आणि ते तुमच्या स्वामीच्या तिरस्काराला पात्र ठरतात.''

(डयुटरनॉमी २५:१३/१६)

म्हणून जागतिक नेत्यांनी आणि विशेषतः तुम्ही बळाच्या आधारे शासन करण्याची कल्पना सोडून द्यावी आणि दुबळया लोकांना दाबवण्याचा प्रयत्न सोडून द्यावा. त्याऐवजी न्याय आणि शांतीला प्रसारित करण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे तुम्ही स्वतःशांतीपूर्ण जीवन जगाल आणि शक्ति प्राप्त कराल तसेच जगामध्ये देखील शांतता प्रस्थापित होईल.

मी प्रार्थना करतो की तुम्ही आणि जगातील सर्व नेते माझ्या संदेशाचा अर्थ समजून घेतील, स्वतःचे स्थान आणि जबाबदारी ओळखतील आणि आपल्या कर्तव्यांचे पालन करतील.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,

खलीफतुल मसीह पाचवा.

अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# इस्लामीक प्रजासत्ताक
# ईरान च्या राष्ट्राध्यक्ष
# यांना पत्र

بسم الله الرحمن الرحيم
نحمده و نصلي على رسوله الكريم
وعلى عبده المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هو الناصر

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK


आदरणीय राष्ट्राध्यक्ष इस्लामीक प्रजासत्ताक ईरान,
महंमद अहमदीनजाद, तेहरान.
७ मार्च, २०१२.

प्रिय श्री राष्ट्राध्यक्ष,

अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहू,

जगात सध्या ज्या भयानक घटना घडत आहेत, त्याच्या परीप्रेक्षात तुम्हाला पत्र लिहणे मला आवश्यक वाटले, कारण तुम्ही ईरानचे राष्ट्रध्यक्ष आहात आणि त्यामुळे तुम्हाला असे निर्णय घेण्याचा अधिकार आहे की, ज्यामुळे फक्त तुमच्या राष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण जगाच्या भवितव्यावर परिणाम होईल. सध्य परिस्थितीत जगामध्ये खूपच अस्वस्थता आणि गोंधळ आहे. काहीं भागांमध्ये छोटी छोटी युध्दे छेडली गेली आहेत, तर इतर भागामध्ये शांतता प्रस्थापनेच्या बनावट हेतूने महाशक्ती सक्रीय झाले आहेत. प्रत्येक देश दुसऱ्या देशाला मदत किंवा विरोध करण्यासाठी कार्यरत झालेला आहे. परंतु न्यायाची उद्दीष्टे पूर्ण होताना दिसत नाहीत. अतिशय खेदाने नमूद करावे लागते की जगाची सध्याची स्थिती पाहिल्यानंतर असे वाटते की आणखीन एका महायुद्धयाची तयारी पूर्ण झालेली आहे. तसे पाहिल्यास अनेक लहान मोठया देशांकडे आण्विक शस्त्रे आहेत आणि वैर भावना आणि तक्रारी वाढत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर तिसऱ्या जागतिक महायुद्धाचे संकट

प्रत्यक्ष आपल्या समोर उभे राहिले आहे. जसे की, तुम्हाला जाणीव आहे हे तिसरे महायुद्ध आण्विक शस्त्रांच्या उपलब्धतेमुळे अणुयुद्ध होईल. त्याचा शेवटचा परिणाम भयंकर विनाश असेल आणि अशा युद्धाचा दीर्घकाळीन परिणाम भविष्यातील पिढया विकलांग आणि विकृत जन्मण्यात येईल.

माझा विश्वास आहे की, तुम्ही पवित्र पैगंबर महंमद (स.) ज्यांना जगात शांती प्रस्थापनेसाठी पाठविले गेले होते आणि जे (रहमतुल्लील आलमीन) सर्व मानवजातीसाठी कृपावंत होते, त्यांचे अनुयायी असल्यामुळे जगाचा असा अंत होणे आपल्याला कधीही अपेक्षित असा नाही. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की, ईरान जगामध्ये एक प्रभावी शक्ती आहे, त्याने तिसरे महायुद्ध रोखण्यासाठी आपली भूमिका बजावावी. ही गोष्ट निःसंदिग्ध आणि सत्य आहे की, महत्त्वाच्या महाशक्ती दुतोंडीपणी वागतात. त्यांच्या अन्यायपूर्ण वागणे संपूर्ण जगामध्ये अस्वस्थता आणि अराजकता पसरविण्यास कारणीभूत ठरत आहे. तथापि आपण ही गोष्ट अजिबात नकारु शकत नाही की, मुसलमानांतील काहीं घटक अयोग्य पद्धतीने आणि इस्लामच्या शिकवणीविरुद्ध वागत आहेत. त्यामुळेच माझी तुम्हाला परत एकदा विनंती आहे की, तुम्ही तुमच्या सर्व क्षमता आणि शक्तीचा पूर्ण वापर करुन जगाला या तिसऱ्या महायद्धापासून रोखण्याकडे आपले लक्ष केंद्रीत करावे. पवित्र कुरआन मुस्लिमानाला अशी शिकवण देतो की, एखाद्या राष्ट्राशी असलेले शत्रुत्व त्यांना न्यायपूर्ण वागण्यापसून परावृत्त करु नये. सुरह अलःमाईदः मध्ये सर्वशक्तीमान अल्लाहने आम्हाला निर्देश दिला आहे कीः

**ज्या लोकांनी तुम्हाला पवित्र मशिदीस जाण्यास प्रतिबंध केला होता, हे त्यांचे वैमनस्य तुम्हाला अनाचार करण्यास प्रवृत्त न करो; आणि तुम्ही सदाचरण आणि धर्म परायणतेच्या बाबतीत एकमेकाला सहाय्य करा; परंतु पाप आणि अनाचार याबाबतीत एकमेकांना सहाय्य करु नका आणि अल्लाहचे भय बाळगा; कारण अल्लाह शिक्षेच्या बाबतीत फारच कठोर आहे.** (५:३)

त्याचप्रमाणे या अध्यायामध्ये मुस्लिमांना दिलेला खालील प्रमाणे आदेश देखील आढळतो.ः


**हे श्रद्धावंत लोकहो, तुम्ही न्यायपूर्ण साक्ष देत असताना, अल्लाहच्या कार्यात**

**मन स्थिर करा आणि लोकांचे वैमनस्य न्यायपूर्ण असेल त्या व्यतिरिक्त अन्य कृत करण्यास तुम्हाला प्रवृत्त न करो, सदैव न्यायपूर्ण व्यवहार करा, ती गोष्ट सदाचरणाच्या निकटतम आहे; आणि अल्लाहचे भय बाळगा; तुम्ही जे काहीं करता ते अल्लाह निश्चितच जाणतो.** (५:९)

म्हणून तुम्ही इतर राष्ट्रांना त्यांच्याशी असलेल्या शत्रुत्व आणि घृणेमुळे विरोध करु नये. मी हे मान्य करतो की, इस्त्राईल त्याच्या मर्यादांचे उल्लंघन करतो आणि त्याचा डोळा ईरानवर आहे. वास्तविक पाहता, जर एखादा देश तुमच्या देशाविरुद्ध अतिक्रमण करत असेल तर स्वाभावीकपणेच तुम्हाला स्वतःचे रक्षण करण्याचा अधिकार प्राप्त आहे. परंतु शक्यतोवर मतभेदाना मुतसद्देगिरी आणि चर्चे द्वारेच सोडवायचा प्रयत्न करायला हवा. म्हणून माझी तुम्हाला अतिशय कळकळीची विनंती आहे की, बळाचा वापर करण्यापेक्षा वाटाघाटीच्या माध्यमातूनच मतभेदांचे समाधान शोधावे. ही विनंती मी अशासाठी करत आहे, कारण मी एका अशा व्यक्तीचा अनुयायी आहे, ज्याला अल्लाहने या युगासाठी निवडले होते. जो पवित्र पैगंबर महंमद (स.) यांचा खरा दास होता आणि त्याने अपेक्षित मसीहा आणि इमाम महदी असण्याचा दावा केला होता. त्यांचे वैशिष्टपूर्ण कार्य मानवजातीला अल्लाहच्या निकटतम आणने आणि आमचे पवित्र स्वामी 'रहमतुल्लील आलमीन' अर्थात संपूर्ण मानवजातीप्रती कृपावंत, पवित्र पैगंबर यांनी जसे मार्गदर्शन आम्हाला केले आहे, त्यानुसार लोकांचे अधिकार प्रस्थापन करणे हे होते. अल्लाह करो संपूर्ण मुस्लिम उम्माह या सुंदर शिकवणीला समजून घेवो.

वस्सलाम,

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,

खलीफतुल मसीह पाचवा.

अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# अमेरिका संयुक्त राज्यांचे राष्ट्राध्यक्ष यांना पत्र

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نحمده و نصلي على رسوله الكريم
وعلى عبده المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هو الناصر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK


राष्ट्राध्यक्ष बाराक ओबामा,
अमेरिकन संयुक्त राज्यांचे प्रमुख,
वाईट हाऊज़, १६ पेनसीलवेनिया एवेन्यू,
न्युयार्क.
वाशिंग्टन डी.सी. ८ मार्च २०१२.

प्रिय श्री. राष्ट्राध्यक्ष,

सध्या ज्या प्रक्षोभक घटना जगभर घडत आहेत, त्याच्या परिप्रेक्षात मला आवश्यक वाटले की, या संदर्भात तुम्हाला पत्र लिहावे. कारण तुम्ही अमेरिकन संयुक्त राज्यांचे प्रमुख आहात, जो एक देश जागतिक महाशक्ती आहे आणि तुम्हाला असे निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त आहे की, ज्यांचा परिणाम तुमच्या राष्ट्राच्या भवितव्यावर आणि संपूर्ण जगावर होऊ शकतो. सध्या जगामध्ये भयंकर अस्वस्थता आणि गोंधळ माजला आहे. काहीं भागांमध्ये छोटी छोटी युद्धे चालू आहेत. दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, जगातील महाशक्तींना अशा संघर्षरत भागांमध्ये जशी त्यांच्याकडून अपेक्षा होती, तेवढे यश शांतता प्रस्थापित करण्यात त्यांना आलेले नाही. जगभर आपण पाहतो की, प्रत्येक देश दुसऱ्या देशांना सहाय्य किंवा विरोध करण्याच्या कार्यात गुंतलेला आहे, परंतु न्यायाच्या अपेक्षा पूर्ण केल्या जात नाहीत. अतिशय खेदाने नमूद करावे लागते की, जर आपण जगाची सध्या परिस्थिती पाहिल्यास आपल्याला दिसून येईल की, आणखीन एका महायुद्धाचा पाया आधीच रचला गेला आहे. जसे की, आपण जाणतो, अनेक लहान मोठया


देशांकडे आण्विक शस्त्रे आहेत, तसेच अनेक राष्ट्रांमध्ये तक्रारी आणि शत्रुत्त्व वाढत चालली आहे. अशा बिकट परिस्थिती मध्ये तिसऱ्या महायुद्धाचा धोका आपणा समोर उभा आहे. असे युद्ध नक्कीच आण्विक युद्ध ठरेल आणि म्हणून आपण या जगाला अतिशय भयानक अशा विनाशाकडे वाटचाल करताना पाहत आहोत. जर का दुसऱ्या महायुद्धानंतर समतेचा आणि न्यायाचा मार्ग अवलंबिला गेला असता तर जगाची जी सद्यपरिस्थिती आपण पाहत आहोत की ज्यात परत जग एकदा युद्धांच्या ज्वालांमध्ये गुरफटत आहे, ही परिस्थिती, दिसून आली नसती.

जसे की, आपण सर्वजण जाणतो की, दुसऱ्या महायुद्धाला लीग ऑफ नेशन्स चे अपयश आणि १९३२ ला सुरु झालेली आर्थिक मंदी कारणीभूत ठरली होती. आज अनेक प्रमुख अर्थशास्त्रज्ञ आजच्या आर्थिक संकटाची तुलना अनेक बाबतीत १९३२ च्या आर्थिक संकटाशी करत आहेत. आपण छोटया छोटया राष्ट्रांमध्ये राजकीय आणि आर्थिक समस्यामुळे परत एकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण होताना पाहत आहोत, आणि अंतर्गत मतभेद आणि असमाधान या देशांमध्ये संघर्षाचे कारण ठरत आहे. ही परिस्थिती निश्चितपणे काहीं महाशक्तींना अशा सरकारांमध्ये हस्तक्षेप करण्याची संधी देत असून ते जागतिक युद्धास कारणीभूत ठरत आहे. जर का अशा छोटया देशांमधील संघर्ष राजकीय आणि मुतसद्देगिरीच्या माध्यतमातून शमवण्यात अपयश आले, तर जगामध्ये नवीन गटांची स्थापना होण्यास सुरुवात होईल आणि तिसऱ्या महायुद्धाचा विस्फोट होण्यास सुचकचिन्ह ठरेल. म्हणून मला असे वाटते की, आता जगाच्या विकासाकडे लक्ष न देता या जगाला येऊ घातलेल्या विनाशापासून सुरक्षित ठेवण्याचे तातडीचे प्रयत्न करण्यास अधिक महत्त्व देणे अत्यावश्यक आहे. मानवजातीला अतिशय शीघ्रतेने आपल्या एकमेव परमेश्वराला जो आमचा निर्मिक आहे, ओळखणे आवश्यक आहे. हीच एकमेव मानवजातीच्या अस्तित्वासाठी हमी आहे, अन्यतःहे जग अतिशय वेगाने स्वतःच्या विनाशाकडे मार्गक्रमण करत राहील.

माझी तुम्हाला विनंती आहे की, खरे तर जगातील सर्वच नेत्यांना विनंती आहे की, दुसऱ्या राष्ट्रांना बळाचा वापर करुन दडपून टाकण्याऐवजी मुतसद्दगिरी, वाटाघाटी आणि विवेकाचा वापर करावा. जगातील महत्त्वाच्या महाशक्तींनी जसे की, संयुक्त राज्ये, यांनी शांती प्रस्थापनेसाठी आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावावी, त्यांनी काहीं छोटया देशांच्या कृतींना निमित्त करुन जगातील सौहार्द नष्ट करण्याचा प्रयत्न करु नये. सध्याच्या परिस्थिती मध्ये अमेरिकेची संयुक्त राज्येच आणि इतर महाशक्तीच आण्विक शस्त्रे धारण केलेली राष्ट्रे नसून, काहीं तुलनेने छोटया देशाकडे सुद्धा अशी महाविनाशकारी शस्त्रे आहेत आणि अशा देशामध्ये असे युद्धखोर नेते सत्तेवर आहेत की, ज्यांना विचार आणि विवेकाशी काहीच देणे घेणे नाही.

म्हणून माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, तुम्ही आपल्या सर्व क्षमतांचा वापर छोटया मोठया राष्ट्रांना तिसरे महायुद्ध छेडण्यापासून रोखण्यासाठी करावा. आपल्या सर्व जणांच्या मनामध्ये या बाबतीत कुठलीही शंका असू नये की, जर आपण या प्रयत्नात अपयशी ठरलो, तर अशा युद्धाचे दृश्य आणि दूरगामी परिणाम आशियातील गरीब देश, युरोपियन देश आणि अमेरिकन देश इतपर्यंतच मर्यादित राहणार नाहीत, तर आपल्या भविष्यातील अनेक पिढयाचे अतिशय भयानक परिणाम भोगत राहतील आणि जगामध्ये सर्वत्र विकलांग आणि विकृत मुले जन्माला येतील. ते आपल्या वडीलधाऱ्यांना जगाला या सार्वत्रिक विनाशाकडे लोटल्याबद्दल कधीही क्षमा करणार नाहीत. आम्ही फक्त आपल्या स्वार्थी हेतूंचा विचार न करता येणाऱ्या पिढयांसाठी एक प्रकाशमान भविष्य निर्माण करण्याकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्याला हवे. सर्वोच्च अल्लाह तुम्हाला आणि सर्व जागतिक नेत्यांना हा संदेश समजून घेण्याची क्षमता देवो.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# कॅनेडाच्या पंतप्रधानांना पत्र

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نحمده و نصلي على رسوله الكريم
وعلى عبده المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هو الناصر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

श्री स्टीफन हारपर,
प्रधानमंत्री कॅनेडा, ओटावा, ओंटारिओ.
८ मार्च, २०१२.

प्रिय प्रधानमंत्री,

जगात घडत असलेल्या अप्रिय घटनांच्या परिप्रेक्षात मला आवश्यक वाटले की तुम्हाला हे पत्र लिहू, कारण तुम्ही कॅनेडाचे प्रधानमंत्री असल्यामुळे तुम्हाला असे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत की, ज्याचे परिणाम तुमच्या राष्ट्राच्या भवितव्यावरच पडणार नसून संपूर्ण जगाच्या भवितव्यावर पडू शकतात. आजच्या घडीला जगामध्ये मोठया प्रमाणात असंतोष आणि अस्वस्थता आहे, काहीं भागांमध्ये छोटी छोटी युद्धे सुरु आहेत. दुर्दैवाने महाशक्तींकडून जशी अपेक्षा होती, त्याप्रमाणात अशा युद्धजन्य भागांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात त्यांना यश आलेले नाही. जगभर पाहता प्रत्येक देश अशा कृत्यांमध्ये गुंतलेला आहे की, ज्यातून अन्य देशांना मदत तरी होते किंवा विरोध तरी होतो; तथापि न्यायाची परिपूर्तता होऊ शेकलेली नाही. अतिशय खेदाने नमूद करावे लागते की जगाची सद्यपरिस्थिती पाहिल्यानंतर आपणाला दिसून येईल की, आणखीन एका महायुद्धाचा पाया आधीच रचला गेला आहे, जसे की, आपणास माहित आहे की अनेक देशांकडे, मग ती छोटी असोत किंवा मोठी, आण्विक हत्यारे उपलब्ध आहेत. अनेक राष्ट्रांमध्ये तक्रारी आणि शत्रुत्व वाढताना दिसत आहे. अशा चिंताजनक

स्थितीमध्ये आपल्या डोळयासमोर तिसऱ्या महायुद्धाचे संकट वाढून ठेवले आहे. असे युद्ध नक्कीच आण्विक युद्ध असेल आणि म्हणून आपण पाहत आहोत की, हे जग भयंकर विनाशाकडे वाटचाल करत आहे. जर का दुसऱ्या महायुद्धानंतर समता आणि न्यायाचा मार्ग अवलंबला गेला असता तर आजची परिस्थिती आपल्या समोर निर्माण झाली नसती, ज्यात आपण पाहतो की आज हे जग युद्धांच्या ज्वालांमध्ये गुरफटला जात आहे.

जसे की, आपण सर्वजण जाणतो की, दुसऱ्या महायुद्धाला लीग ऑफ नेशन्सचे अपयश आणि १९३२ ला सुरु झालेली आर्थिक मंदी कारणीभूत ठरली होती. आज अनेक प्रमुख अर्थशास्त्रज्ज्ञ आजच्या आर्थिक संकटाची तुलना अनेक बाबतीत १९३२ च्या आर्थिक संकटाशी करत आहेत. आपण छोटया छोटया राष्ट्रांमध्ये राजकीय आणि आर्थिक समस्यामुळे परत एकदा युद्धजन्य परिस्थिती निर्माण होताना पाहत आहोत, आणि अंतर्गत मतभेद आणि असमाधान या देशांमध्ये संघर्षाचे कारण ठरत आहे. ही परिस्थिती निश्चितपणे काहीं महाशक्तींना अशा सरकारांमध्ये हस्तक्षेप करण्याची संधी देत असून ते जागतिक युद्धास कारणीभूत ठरत आहे. जर का अशा छोटया देशांमधील संघर्ष राजकीय आणि मुतसद्देगिरीच्या माध्यतमातून शमवण्यात अपयश आले, तर जगामध्ये नवीन गटांची स्थापना होण्यास सुरुवात होईल आणि तिसऱ्या महायुद्धाचा विस्फोट होण्यास सुचकचिन्ह ठरेल. म्हणून मला असे वाटते की, आता जगाच्या विकासाकडे लक्ष न देता या जगाला येऊ घातलेल्या विनाशापासून सुरक्षित ठेवण्याचे तातडीचे प्रयत्न करण्यास अधिक महत्त्व देणे अत्यावश्यक आहे. मानवजातीला अतिशय शीघ्रतेने आपल्या एकमेव परमेश्वराला जो आमचा निर्मिक आहे, ओळखणे आवश्यक आहे. हीच एकमेव मानवजातीच्या अस्तित्वासाठी हमी आहे, अन्यतः हे जग अतिशय वेगाने स्वतःच्या विनाशाकडे मार्गक्रमण करत राहील.

कॅनेडा हा जगामध्ये सर्वाधिक न्याय प्रिय देश समजला जातो. तुमचे राष्ट्र सर्वसाधारणपणे इतर देशांच्या अंतर्गत समस्यांमध्ये हस्तक्षेप करत नाही, त्याचप्रमाणे आम्ही अहमदिया मुस्लिम समुदाय कॅनेडाच्या जनतेबरोबर विशेष प्रकारचे मैत्री संबंध बाळगूण आहोत. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही आपल्या सर्व क्षमतांचा वापर करुन सर्व लहान-मोठया शक्तींना जगाला तिसऱ्या महायुद्धेच्या विनाशापासून परावृत्त करावे.

माझी तुम्हाला विनंती आहे की, खरे तर जगातील सर्वच नेत्यांना विनंती आहे की, दुसऱ्या राष्ट्रांना बळाचा वापर करुन दडपून टाकण्याऐवजी मुतसद्देगिरी, वाटाघाटी आणि विवेकाचा वापर करावा. जगातील महत्त्वाच्या महाशक्तींनी जसे की, संयुक्त राज्ये, यांनी शांती प्रस्थापनेसाठी आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावावी, त्यांनी काहीं छोटया देशांच्या कृतींना निमित्त करुन जगातील सौहार्द नष्ट करण्याचा प्रयत्न करु नये. सध्याच्या परिस्थिती मध्ये अमेरिकेची संयुक्त राज्येच आणि इतर महाशक्तीच आण्विक शस्त्रे धारण केलेली राष्ट्रे नसून, काहीं तुलनेने छोटया देशाकडे सुद्धा अशी महाविनाशकारी शस्त्रे आहेत आणि अशा देशामध्ये असे युद्धखोर नेते सत्तेवर आहेत की, ज्यांना विचार आणि विवेकाशी काहीच देणे घेणे नाही.

म्हणून माझी तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, तुम्ही आपल्या सर्व क्षमतांचा वापर छोटया मोठया राष्ट्रांना तिसरे महायुद्ध छेडण्यापासून रोखण्यासाठी करावा. आपल्या सर्व जणांच्या मनामध्ये याबाबतीत कुठलीही शंका असू नये की, जर आपण या प्रयत्नात अपयशी ठरलो, तर अशा युद्धाचे दृश्य आणि दूरगामी परिणाम आशियातील गरीब देश, युरोपियन देश आणि अमेरिकन देश इतपर्यंतच मर्यादित राहणार नाहीत, तर आपल्या भविष्यातील अनेक पिढयाचे अतिशय भयानक परिणाम भोगत राहतील आणि जगामध्ये सर्वत्र विकलांग आणि विकृत मुले जन्माला येतील. ते आपल्या वडीलधाऱ्यांना जगाला या सार्वत्रिक विनाशाकडे लोटल्याबद्दल

कधीही क्षमा करणार नाही. आम्ही फक्त आपल्या स्वार्थी हेतूंचा विचार न करता येणाऱ्या पिढयांसाठी एक प्रकाशमान भविष्य निर्माण करण्याकडे अधिक काळजीपूर्वक लक्ष द्याला हवे.

सर्वोच्च अल्लाह तुम्हाला आणि सर्व जागतिक नेत्यांना हा संदेश समजून घेण्याची क्षमता देवो.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# दोन्ही पवित्र स्थळांचे संरक्षक
# सौऊदी अरब राज्याचे राजे
# यांना पत्र

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نحمده و نصلی علی رسوله الکریم
وعلی عبده المسیح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هو الناصر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

दोन्ही पवित्र स्थळांचे संरक्षक,
सौऊदी अरब राज्याचे राजे,
अब्दुल्लाह बिन अब्दुल अजीज अल सऊद,
रियाद, सौऊदी अरेबिया.
२८ मार्च, २०१२.

आदरणीय राजा अब्दुल्लाह,

अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहू

आज मी काहीं महत्त्वाचे मुद्दे तुमच्यासमोर उपस्थित करण्याच्या हेतूने हे पत्र लिहीत आहे, कारण तुम्ही दोन्ही पवित्र स्थळांचे संरक्षक आणि सौऊदी अरेबियाचे राजा आहात. त्यामुळे तुम्हाला मुस्लिम उम्माहमध्ये अतिशय उच्चास्थान प्राप्त आहे. तुमच्या देशामध्ये इस्लामचे अतिशय पवित्र असे दोन्ही स्थळे - मक्का मुकर्रमा आणि मदिना मुनव्वरा, ज्यांच्यावर प्रेम करणे मुसलमानांच्या श्रद्धेचा भाग आहे. तसेच ही दोन्ही स्थळे आध्यात्मिक प्रगतीची केंद्रे असून मुसलमांनांसाठी खूपच आदरणीय आहेत. याच कारणांमुळे सर्व मुसलमान आणि मुस्लिम देश तुम्हाला एकविशिष्ठ दर्जा देतात. हे तुमचे आदरणीय स्थान तुमच्याकडून एकीकडे मुस्लिम उम्माहला योग्य मार्गदर्शन करण्याची आणि दुसरीकडे संपूर्ण मुस्लिम देशांमध्ये शांती आणि सौहार्दाचे वातावरण निर्माण करण्याची प्रयत्न करावा, अशी अपेक्षा करते. तुम्ही

मुस्लिम समुदायामध्ये आपसातील प्रेम आणि सहानुभूती वाढत जावी यासाठी हे प्रयत्न करावे. आणि त्यांना त्यांचे या पवित्र आयतीकडेही लक्ष वेधावे. '**रोहमाऊ बैनहूम**' अर्थात आपसात दयापूर्ण आहेत.

सरते शेवटी सर्वमानव जातीच्या कल्याणासाठी संपूर्ण जगामध्ये शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आपण करावा. अहमदिया मुस्लिम समुदायाचा प्रमुख आणि अपेक्षित मसीहा व इमाम महदीचा खलीफा या नात्याने मी आपल्याला विनंती करतो की, अहमदिया मुस्लिम जमाअत आणि इतर इस्लामी पंथांमध्ये जरी काही तात्त्वीक मतभेद असले तरी त्यांना बाजूला ठेवून आपण सर्वांनी जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करायला हवे. आपण आपल्या परीने या जगाला इस्लामच्या खऱ्या शिकवणूकीच्या, जी प्रेम आणि शांती वर आधारित आहे, चा परिचय करुन देण्यासाठी प्रयत्न करायला हवे. असे केल्याने सर्व साधारणपणे पाश्चात्य देशांच्या लोकांच्या मनामध्ये इस्लामबद्दल जे गैररसमज पसरलेले आहे ते दूर करण्यात आपणाला यश येईल. इतर राष्ट्रांच्या किंवा गटांच्या विरुद्ध असलेले शत्रुत्त्व आपणाला न्याय मार्गाचा अवंलब करण्यापासून परावृत्त न करो. सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुरआनाच्या सुरह अलःमाईदः च्या तिसऱ्या आयतमध्ये म्हणतो.

**या लोकांनी तुम्हाला पवित्र मशिदीत जाण्यात प्रतिबंध केला होता त्यांचे वैमनस्य तुम्हाला अनाचार करण्यास प्रवृत्त न करो आणि तुम्ही सदाचरण व धर्मपरायणता याबाबतीत एकमेकांना सहाय्य करा; परंतु पाप आणि अनाचार याबाबतीत एकमेकांना सहाय्य करु नका. आणि अल्लाहचे भय बाळगा कारण अल्लाह शिक्षेच्याबाबतीत फारच कठोर आहे.**

जगासमोर इस्लामची सुंदर छवी सादर करण्याचे आपले कर्तव्य बजावण्यासाठी हे मार्गदर्शक तत्त्व नेहमीच आपल्या डोळयासमोर ठेवायला हवे. जगभरातील सर्व मुस्लिमांच्या प्रती असलेल्या हार्दिक प्रेमभावने आणि

सहानुभूतीमुळे मी आपणाला ही विनंती करत आहे की, याबाबतीत तुम्ही आपली भूमिका ठेवावी.

आज आपण पाहत आहोत की, जगामध्ये काहीं राजनीतीतज्ञ आणि तथाकथित विद्वान लोक इस्लामविरुद्ध द्वेषाची बिजे पेरत आहेत, जेणे करुन त्यांना पवित्र पैगंबर (स.) यांना बदनाम करण्याची संधी मिळाली. ते पवित्र कुरआनाच्या शिकवणीचा पूर्णपणे विकृत असा अन्वयार्थ लाऊन त्यांचे उद्दीष्टे साध्य करु इच्छितात. त्याचप्रमाणे पॅलिस्टीन आणि इस्त्राईल यांच्या मधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत जात असून इस्त्राईल आणि ईरान मध्ये शत्रुत्त्वाची भावना इतक्या मोठया प्रमाणात वाढली आहे की, त्यांचे आपसातील संबंध पूर्णपणे नष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत मुस्लिम उम्माहचे एक अतिशय महत्त्वपूर्ण नेते म्हणून आपण न्याय आणि समतेच्या आधारे हे संघर्ष संपविण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करावेत. अहमदिया मुस्लिम जमाअत जेथे जेथे आणि जेव्हा जेव्हा इस्लामविरुद्ध घृणेची भावना पसरविण्याचा प्रयत्न आढळून येतो, तथे शक्य असेल तेवढे प्रयत्न करुन ते नष्ट करण्याचा प्रयत्न करते; परंतु जोपर्यंत संपूर्ण मुस्लिम उम्माह एक संघ होऊन प्रयत्न करत नाही तोपर्यंत शांती कदापिही प्रस्थापित होऊ शक्त नाही.

म्हणून आपणाला माझी विनंती आहे की, या संदर्भात आपणाला जे शक्य आहे ते सर्व करावे; जर का तिसरे महायुद्ध खरोखरच उद्भवणार असेल तर किमानते मुस्लिम देशातून उद्भवणार नाही ऐवढा तरी आपण प्रयत्न करावा. जगातील कोणताही मुस्लिम देश किंवा कोणतीही मुस्लिम व्यक्ती आज किंवा भविष्यात कधीही अशा जागतिक विनाशाला कारणीभूत ठरल्याचा आरोप आपल्या खांद्यावर घेणे पसंत करणार नाही, ज्याचे दूरगामी परिणाम भविष्यातील अनेक पिढयांमध्ये विकलांग आणि विकृत मुले जन्मण्यात दिसतील, कारण जर एखादे महायुद्ध आता पेटलेच तर ते नक्कीच आण्विक शस्त्रांद्वारेच लढले जाईल. आणि आपण आधीच दुसऱ्या महायुद्धाच्या

काळात जापानच्या दोन शहरावर अणु बॉम्ब टाकल्यानंतर जे विनाशकारी परिणाम निर्माण झाले त्याची एक झलक अनुभवलेली आहे.

म्हणून हे सौउदी अरेबियाचे राजे तुम्ही आपली संपूर्ण शक्ती आणि प्रभाव, या जगाला संपूर्णपणे नष्ट होण्यापासून वाचविण्यासाठी वापरा. सर्वशक्तिमान अल्लाह आपणाला सहाय्य करो आणि क्षमता प्रदान करो. आमीन.तुमच्यासाठी आणि संपूर्ण मुस्लिम उम्माहसाठी माझी प्रार्थना आहे

इहदिनस्सीरातल मुस्तकीम

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# स्टेट कौंनसील ऑफ पीपल्स रिपब्लिक ऑफ चाईना चे प्रधान यांना पत्र

وَاجْعَلْ لِىْ مِنْ لَّدُنْكَ سُلْطٰناً نَّصِيْراً
اِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحاً مُّبِيناً
وَلَقَدْ نَصَرَكُمُ اللّٰهُ بِبَدْرٍ وَّاَنْتُمْ اَذِلَّةٌ
KHALIFA-TUL-MASIH
MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوْلِهِ الْكَرِيْمِ
وعلٰی عبدهِ المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هوالنّاصــــر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय श्री मुख्य प्रधान,
स्टेट कौंनसील ऑफ पीपल्स रिपब्लिक ऑफ चाईना.
मिस्टर बेन जीया बाओ,
झोंगना हाई, चाईना.
९ अप्रैल २०१२.

प्रिय, मुख्य प्रधान,

मी तुम्हाला हे पत्र आमच्या अहमदिया मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधी मार्फत पाठवत आहे, ते कबाबीर इस्त्राईल येथे समुदायाचे अध्यक्ष आहेत आणि त्यांना चाईनाचे अल्प संख्यांक खात्याचे मंत्री यांनी आमंत्रित केले आहे. आमच्या प्रतिनिधिचा परिचय जेव्हा चाईनाचे प्रतिनिधी मंडळ ज्यामध्ये अल्पसंख्यांक खात्याचे उपमंत्री देखील सामील होते, आमच्या कबाबीर येथील मिशन हाऊज़ला भेट देण्यासाठी आले होते, त्यावेळी चाईनाच्या अधिकारांशी संपर्क झाला होता.

अहमदिया मुस्लिम समुदाय हा इस्लाम मधील एक पंथ असून त्यांची श्रद्धा आहे की, जो मसीहा आणि सुधारक या काळासाठी मुसलमानांचा मार्गदर्शक म्हणून महदी, ख्रिस्तींच्या मार्गदर्शकासाठी मसीहा आणि सर्व मानवजातीसाठी सुधारक म्हणून येणे अपेक्षित होते, ते पवित्र पैगंबर महंमद (स.) यांच्या भविष्यवाणीनुसार प्रकट झाले आहे आणि त्यांच्यावर आम्ही निष्ठा धारण केली आहे. त्यांचे नाव हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी

(अ.स.) ऑफ इंडिया होते. त्यांनी सर्वशक्तिमान अल्लाहच्या आदेशाने १८८९ साली अहमदिया मुस्लिम जमाअत ची स्थापना केली. १९०८ साली त्यांचे निधन होईपर्यंत हजारो लोक त्यांच्या समुदायामध्ये सामील झाले होते. त्यांच्या निधनानंतर खिलाफतच्या परंपरेची स्थापना करण्यात आली. सध्या आम्ही पाचव्या खलीफाच्या कालावधीमध्ये आहोत आणि मी अपेक्षित मसीहांचा पाचवा खलीफा आहे.

आमच्या शिकवणीतील अतिशय महत्त्वाचे आणि मूलभूत असे घटक म्हणजे या काळात सर्व प्रकारच्या धार्मिक युद्धांचा अंत झाला पाहिजे. त्यापुढे जाऊन आमची श्रद्धा आहे की ज्याला कोणाला आपल्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करायचा आहे, त्यांनी तो प्रेम, सद्भावना आणि बंधुतेच्या भावनेने करावा जेणे करुन त्यामुळे शांती, सौहार्द आणि सद्भावनेची प्रस्थापना होईल. या इस्लामी शिकवणीवर आधारलेल्या दृष्टीकोनाचे प्रचार आणि प्रसार अहमदिया मुस्लिम जमाअत जगभर करत आहे. सध्या हा समुदाय जगातील २०० पेक्षा अधिक देशांमध्ये पसरलेला असून त्याचे कोटयावधी अनुयायी आहेत.

मी आपणाला खालील संदेश देऊ इच्छितो, 'सध्या हे जग अतिशय भयानक आणि कठीण परिस्थितीतून जात आहे. वास्तविक पाहता आपण फार वेगाने एका महायुद्धाकडे वाटचाल करत आहोत. तुम्ही एका महाशक्तीचे प्रमुख आहोत, त्याशिवाय जगाच्या लोकसंख्येपैकी एक मोठा भाग आपल्या अधीपत्याखाली आहे; तसेच तुम्हाला संयुक्त राष्ट्रसंघात गरज पडल्यास नकार अधिकार वापरण्याचा अधिकार प्राप्त आहे. या सर्व गोष्टींना समोर ठेवून मी आपणाला विनंती करतो की, या जगाला विनाशापासून जे आपल्या पुढया उभे आहेत, रक्षण करण्यासाठी तुम्ही आपली भूमिका योग्य पद्धतीने बजावावी. आपण मानवतेच्या रक्षणासाठी वंशभेद, धर्मभेद, जात किंवा जमाअत भेद सर्व विसरुन निकारचे प्रयत्न करायला हवेत.

चाईनामध्ये क्रांतीनंतर मोठा बदल आणि विकास झाला आहे. आदरणीय माओझेडांग, जे तुमच्या राष्ट्राचे महान नेते होते, यांनी नैतिकतेच्या अत्योच्च मूल्यांची स्थापना केली आहे, ज्याचे वर्णन दुसऱ्या शब्दात उत्कृष्ट अशा मानवी मूल्ये असे करता येईल. जरी तुम्ही परमेश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धा ठेवत नाही आणि फक्त नैतिक तत्वांवरच तुमचा विश्वास आहे तरी देखील, मी अतिशय स्पष्ट शब्दात सांगू इच्छतो की, इस्लामने ज्या परमेश्वराची संकल्पना मांडलेली आहे त्याने मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी पवित्र कुरआन अवतरविले आणि त्या पवित्र कुरआन मध्ये त्या सर्व नैतिक मार्गदर्शन उपलब्ध आहेत. त्यामध्ये अतिशय सुंदर अशा मानवतेच्या आणि मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेच्या संदर्भात शिकवणीचा समावेश आहे. जर हे जग विशेषतः मुस्लिम जग, पवित्र कुरआनाच्या शिकवणीचा अंगीकार करेल तर सर्व प्रकारच्या समस्यांचा आणि संघर्षांचा अंत होईल आणि शांती आणि सौहार्दाच्या वातावरणात वृद्धी होईल.'

आज अहमदिया मुस्लिम जमाअतने जगाच्या सर्व भागामध्ये या उद्देशाला प्राप्त करण्यासाठी प्रयत्न चालवलेले आहे, आम्ही आमच्या शांती चर्चासत्रातून आणि अनेक बैठकातून, ज्या आम्ही जीवनाच्या विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यक्तींबरोबर आयोजित करतो, त्यामधून मी हे उद्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने मी आपले विचार मांडत असतो, माझी प्रार्थना आहे की, जागतिक नेत्यांनी विवेकाने वागावे आणि आपसातील वांशिक आणि मानवी शत्रुत्त्वाच्या छोटया छोटया घटनांना जागतिक संघर्षात परिवर्तित होऊ देऊ नये. माझी तुम्हाला ही देखील विनंती आहे की, एक जागतिक महासत्ता म्हणून जगात शांती प्रस्थानेसाठी तुम्ही आपली भूमिका बजावावी. जागतिक महायुद्ध जर का पेटले तर त्याचे जे भयानक परिणाम होणार आहेत, त्यापासून या जगाचे रक्षण करा, कारण अशा युद्धाचा शेवट आण्विक शस्त्रांच्या उपयोगच होईल. याच्या परिणामस्वरुप जगाच्या नकाश्यावरुन

जगाचे अनेक विभाग आणि अनेक देशांचे विभाग पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता नकारता येत नाही. अशा आण्विक युद्धाचा प्रभाव आणि परिणाम फक्त ताबडतोबिच्या विनाशापर्यंतच मर्यादित राहणार नसून त्याच्या दूरगामी परिणामामुळे भविष्यातील अनेक पिढया विकलांग आणि विकृत जन्माला येतील. म्हणून तुम्ही आपल्या सर्व शक्तींचा, क्षमतांचा आणि संसाधनांचा वापर करुन मानवतेला या भयानक परिणामांपासून वाचविण्याचा प्रयत्न करावा. सरतेशेवटी तुमच्या या कृतीचा फायदा तुमच्या राष्ट्राला देखील होणार आहे. माझी प्रर्थना आहे की, जगातील सर्व लहान मोठे देश माझा हा संदेश समजून घेतील.

अनेक शुभेच्छा आणि आर्शीवादासह,

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# ब्रिटेन संयुक्त राज्याच्या पंतप्रधानांना पत्र

وَاجْعَلْ لِّيْ مِنْ لَّدُنْكَ سُلْطٰنًا نَّصِيْرًا
اِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحًا مُّبِيْنًا
وَلَقَدْ نَصَرَكُمُ اللّٰهُ بِبَدْرٍ وَّاَنْتُمْ اَذِلَّةٌ
MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهٗ وَ نُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِهِ الْكَرِيْمِ
وعلٰی عبدہِ المسیح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
ھوالنّاصــــر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

प्रधानमंत्री ग्रेट ब्रिटेन आणि उत्तरीय
आयरलेंडची संयुक्त राज्ये.
आदरणीय श्री डेवीड कॅमेरुन,
१०, डॉऊनींग स्ट्रीट, लंडन
**SW1A2AA**, युनाईटेड किंग्डम,
१५ अप्रैल, २०१२.

प्रिय प्रधानमंत्री,

सध्या जगामध्ये असलेल्या भयानक आणि चिंताजनक परिस्थितीला दृष्टीसमोर ठेवून मला आवश्यक वाटले की, आपणाला हे पत्र लिहावे. संयुक्त राज्यांचे प्रधानमंत्री म्हणून आपणाला असे निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त आहे, ज्याचा परिणाम आपल्या देशाच्या भवितव्याबरोबरच जगाच्या भवितव्यावरही होऊ शकतो. सध्या जगाला शांतीची अतिशय आवश्यकता आहे, कारण जगामध्ये सर्वत्र युद्धाच्या ठिंगण्या पडत आहेत. देश-देशांमध्ये उद्भवणारे लहान प्रमाणावरील संघर्ष जागतिक संघर्षात परावर्तित होण्याची भिती दिसत आहे. आपण पाहू शकतो की, जगाची सध्याची स्थिती, मग ती आर्थिक दृष्ट्या असोत की राजकीय दृष्ट्या, १९३२ च्या परिस्थिती सारखीच आहे. याशिवाय इतर अनेक बाबीमध्ये साधर्म्य दिसत असून या सगळयांना एकत्रित केल्यास दुसऱ्या जागतिक महायुद्धेच्या पूर्वी जशी परिस्थिती होती तशीच परिस्थिती आज दिसत आहे. जर का या ठिणग्यांने खरोखरच पेट

घेतला तर आपणासमोर तिसरे जागतिक महायुद्ध भयानक स्वरुपात उभा राहिलेले दिसेल. ज्या अर्थी अनेक लहान मोठे देश आण्विक शस्त्रे इतकी विघातक आहेत की, त्यांच्या वापराने पिढया पिढयांतील मुले जैविक आणि शारीरिक व्यंगासह जन्माला येतील. जापान हा एक असा देश आहे ज्याने आण्विक युद्धाचा भयानक परिणामाचा अनुभव घेतलेला आहे जेव्हा जेव्हा दुसऱ्या महायुद्धा मध्ये त्याच्यावर न्युक्लियर बॉम्बचा वर्षाव करण्यात आला होता, तेव्हा त्याची दोन शहरे पूर्णपणे नष्ट झाली होती. आणि जे न्युक्लियर बॉम्ब त्यावेळी वापरण्यात आले होते, आणि त्यांनी जो भयंकर विनाश घडविला होता ते आज अनेक छोटया देशांकडे सुद्धा असलेल्या आण्विक शस्त्रापेक्षा खूपच कमी शक्तीशाली होती. म्हणून महाशक्तींचे हे कर्तव्य आहे की, त्यांनी एकत्रित बसून मानवतेला या विनाशापासून वाचवण्याचे मार्ग शोधावे.

ज्या गोष्टीची जास्त काळजी वाटते ती ही की आपण जाणतो की, आण्विक शस्त्रे असलेले लहान देश अशा युद्धखोर लोकांच्या हातात जाऊ शकतात, ज्याच्यामध्ये त्यांच्या कृतीच्या परिणामांची काळजी करण्याची क्षमता नाही किंवा त्यांना ती करायची तरी नाही. जर महत्त्वाची महाशक्तींना न्यायपूर्ण कृती केली नाही आणि छोटया राष्ट्रांचे नैराश्य दूर करण्याचे प्रयत्न केले नाही आणि विवेकपूर्ण धोरण आखली नाही तर परिस्थिती सर्वांच्या नियंत्रणाबाहेर जाण्यास वेळ लागणार नाही आणि जो विनाश होईल तो आपल्या समजूती आणि कल्पनेच्या पलीकडे असेल. जगातील मोठया प्रमाणातील लोकसंख्या ज्यांना शांतीने जगण्याची इच्छा आहे ते सुद्धा या विनाशाचे बळी ठरतील. म्हणून माझी अतिशय कळकळीची इच्छा आणि विनंती आहे की, तुम्ही आणि सर्व महत्त्वाच्या राष्ट्रांचे नेते यांनी परिस्थितीचे गांभीर्य समजून घ्यावे आणि आक्रमक धोरण आणि बळाचा वापर करण्याऐवजी आपली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी न्यायाचा मार्ग अवलंबणारी धोरणे

स्वीकारावीत.

जर आपण निकट भुतकाळाकडे पाहिल्यास आपल्याला दिसून येईल की, ब्रिटेन ने अनेक देशांवर राज केले असून त्यांनी अतिशय उच्चदर्जाच्या न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्याची परंपरा विशेषतः भारत-पाकिस्तान या उपखंडामध्ये मागे ठेवली आहे. जेव्हा अहमदिया मुस्लिम जमाअतच्या संस्थापकांनी महारानी विक्टोरिया यांना त्यांच्या हिरक महोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा देऊन त्यांना इस्लामचा संदेश पोहचविला त्यावेळी त्यांनी विशेषत्त्वाने ब्रिटीश सरकारने ज्या न्याय आणि समतेच्या मार्गने राज केले त्या बद्दल परमेश्वराकडे त्यांना योग्य मोबदला मिळण्याबद्दल प्रार्थना केली होती. ते नेहमीच ब्रिटीश सरकारचे, त्यांच्या न्यायधोरण बद्दल आणि धर्म स्वातंत्र बहाल केल्या बद्दल प्रशंसा करत असत. जरी आजच्या जगावर ब्रिटीशांचे अधिपत्य नसले तरी धार्मिक स्वातंत्र्याचे तत्त्व ब्रिटीश समाजामध्ये खोल रुजलेले आहे. आणि त्या कायद्याचा आधारे आज देखील प्रत्येक व्यक्तीला धार्मिक स्वातंत्र्य आणि समान अधिकार प्राप्त होतात. या वर्षी महारानी इलिजाबेत द्वितीय यांचा हिरक महोत्सव साजरा केला जात आहे. या प्रसंगी ब्रिटीश सरकारला जगापुढे आपल्या न्याय आणि प्रामाणिकपणाचा आदर्श प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध आहे. अहमदिया मुस्लिम जमाअतचा इतिहास दर्शवतो की, आम्ही नेहमीच, जेव्हा जेव्हा ब्रिटन ने न्याय मार्गाचा अवलंब केला आहे तेव्हा त्याचा आदरच केला आहे. आणि आम्हाला आशा आहे की, भविष्यात देखील न्याय हीच ब्रिटीश सरकारची ओळख राहील आणि ती फक्त धार्मिक बाबतीतच नव्हे तर प्रत्येक बाबतीत तुम्ही तुमच्या राष्ट्राच्या उच्च परंपरांना कधीही विसरणार नाहीत आणि जगाच्या सध्यपरिस्थिती देखील जागतिक पातळीवर शांती प्रस्थापित करण्यासाठी ब्रिटेन आपली योग्य भूमिका बजावतील.

माझी विनंती आहे की, प्रत्येक स्तरावर आणि सर्व दिशांनी आपण

आपल्या क्षमतेप्रमाणे तिरस्काराच्या ज्वाला थंड करण्याचा प्रयत्न करत रहावे, जर आपण आपल्या या प्रयत्नात यशस्वी ठरलो तरच आपण आपल्या येणाऱ्या पिढयांना उज्वल भवितव्याची हमी देऊ शकतो. तथापि जर आपण आपल्या या प्रयत्नात अयशस्वी ठरलो तर आपल्या मनामध्ये जरा सुद्धा शंका असायला नको की आण्विक युद्धामुळे जे वैश्विक विनाशाकडे आपण या जगाला लोटत आहोत त्याचे जे भयानक दुष्परिणाम आपल्या भावी पिढयांना भोगावे लागणार आहे त्याबद्दल ते आपल्याला कधीही क्षमा करणार नाहीत.

मी परत एकदा तुम्हाला आठवण करु देऊ इच्छितो की ब्रिटन सुद्धा अशा देशांपैकी एक आहे की, ज्याचा प्रभाव विकसित जगावर तसेच विकसनशील देशांवर सुद्धा आहे. तुम्ही जर तुमची इच्छा असेल तर समता आणि न्यायाची आवश्यकता पूर्ण करुन या जगाला योग्य मार्गदर्शन करु शकता. म्हणून ब्रिटन आणि इतर महाशक्तींनी जगात शांती प्रस्थापित करण्यासंदर्भात त्यांची जी भूमिका आहे ती योग्य रीतीने बजावावी. सर्व शक्तीमान अल्लाह तुम्हाला आणि अन्य जागतिक नेत्यांना हा संदेश समजून घेण्याची सद्‌बुद्धी देवो.

अनेक शुभेच्छा आणि आशीर्वादास

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# जर्मनी च्या पंतप्रधानांना
# पत्र

بسم الله الرحمن الرحيم
نحمده و نصلي على رسوله الكريم
وعلى عبده المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هوالناصر

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय चांस्लर ऑफ जर्मनी.
अंजेल मॉकैल,
विली ब्रॉट, स्ट्रीट न-१,
१०४४७ बर्लिन,
१५ अप्रैल, २०१२.

प्रिय चांसलर,

जगाच्या आजच्या अतिशय भयप्रद आणि चिंताजनक परिस्थितीकडे पाहिल्यानंतर आपणास हे पत्र लिहणे मला आवश्यक वाटले. जर्मनी सारखा देश, जो जगात एक शक्तीशाली आणि प्रभावशाली आहे त्याचे चांसलर म्हणून आपणास असे निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त आहे, ज्याचा प्रभाव तुमच्या देशावरच नव्हे तर संपूर्ण जगावर पडू शकते. आज जेव्हा हे जग वेगवेगळया गटात विभागलेले आहे, अतिरेकवाद वाढत चालला आहे आणि आर्थिक राजकीय आणि सांपत्तीक परिस्थिती बिघडत चालली आहे. अशा परिस्थितीत सर्व प्रकारच्या तिरस्कारसला संपवूण शांतीची प्रस्थापना करणे ही काळाची तातडीची गरज आहे. हे आपण प्रत्येक व्यक्तींच्या भावनांचा आदर करुनच प्राप्त करु शकतो. तथापि हे योग्य आणि प्रामाणिकपणे अंमलात येत नसल्यामुळे जगाची परिस्थिती अतिशय वेगाने नियंत्रणाबाहेर जात आहे. आपण पाहत आहोत की, अनेक देश न्यायाची परिपूर्ततः करत नाहीत परिणामस्वरुप आणखीन एका जागतिक महायुद्धाचा पाया आधीच

रचला गेला आहे. अनेक लहान मोठे देश सध्या आण्विक शस्त्रे बाळगूण आहेत; म्हणून जर का जागतिक युद्ध पेटले तर ते नक्कीच पारंपरिक शस्त्रांनी लढले जाणार नाहीत; तर ते आण्विक शस्त्रांनी लढले जाईल. आणि अशा आण्विक संघर्षांतून जो विध्वंस होईल तो अतिशय विनाशकारी असेल. त्याचे परिणाम सध्याच्या जगापूर्ते मर्यादित राहणार नसून भावी पिढया त्याच्या दूरगामी परिणाम अधिक प्रभावित होतील आणि जन्मणारी मूले गंभीर अशा वैधकीय आणि जैविक विकृतीसह जन्माला येतील.

म्हणून माझा विश्वास आहे की, जगात शांती प्रस्थापित करायची असेल तर खराखुरा न्याय झाला पाहिजे आणि प्रत्येकाच्या धार्मिक भावनांचा आणि परंपरांचा योग्य तो आदर केला गेला पाहिजे. अनेक पाश्चात्य देशांनी अतिशय सहृदयतेने अविकसित देशातील आणि गरीब देशातील लोकांना त्यांच्या देशांमध्ये वास्तव्य करण्याची परवानगी दिली आहे; त्यात मुसलमानांचाही समावेश आहे या गोष्टीचा मी खूप आदर करतो. निश्चितपणे मुसलमान म्हणवणाऱ्या लोकांपैकी फार थोडे जण अतिशय अयोग्य पद्धतीने वागत असून ते पाश्चात्य राष्ट्रांतील लोकांच्या मनामध्ये अविश्वासाची भावना निर्माण करीत आहे. तथापि ही गोष्ट अतिशय स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे की त्यांच्या अशा कृत्यांचा इस्लामशी काहीही संबंध नाही. असे अतिरेकी, पवित्र पैगंबर महंमद (स.) ज्यांनी शांती, प्रेम आणि सौहार्दाचा संदेश जगाला दिला, त्यांच्यावर खरे प्रेम करत नाहीत. म्हणून अशा मुठभर मार्गभ्रष्ट लोकांच्या कृत्यांचे निमित्त करुन आमच्या धर्माविरुद्ध आक्षेप घेण्यात येऊ नयेत आणि बहुसंख्य असलेल्या विशुद्ध आणि निष्पाप मुस्लिमांच्या भावना दुखवण्यात येऊ नयेत. समाजामध्ये शांती ही द्विमार्गी असते आणि ती तेव्हा प्रस्थापित होते जेव्हा सर्वच जण एकत्रीतपणे आणि आपसातील सौहार्दाच्या मार्गाने त्यासाठी प्रयत्न करतात. पाश्चात्य लोकांच्या मनामध्ये असलेल्या अविश्वासामुळे राष्ट्रात आणि जनतेत संबंध सुधारण्याऐवजी काहीं

बिगर मुस्लिमांच्या अतिशय वाईट प्रतिक्रिया उमटत आहेत आणि दिवसेंदिवस मुस्लिम आणि बिगर मुस्लिम जगामध्ये दूरी वाढत जात आहे.

आपण पाहत आहोत की काहीं मुस्लिम गटांच्या आणि राष्ट्रांच्या मार्गभ्रष्ट कृत्यांचे निमित्त करुन काहीं महाशक्तीं प्रामाणिकपणा आणि न्यायावर आपल्या स्वार्थी हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले आहे. जगातील काहीं शक्तीशाली देशांची इच्छा आहे की, काहीं देशांच्या संपत्ती आणि संसाधनांवर त्यांना ताबा मिळावा तसेच त्यांची ही देखील इच्छा आहे की त्यांचे स्पर्धक देश या संसाधनापर्यंत पोहचू नयेत, त्यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की सध्याच्या जागतिक राजकीय परिस्थितीला आर्थिक मंदी ही सुद्धा एक महत्त्वाचा घटक असून ती आपणाला आणखीन एका जागतिक युद्धाकडे लोटत आहे. जर का खऱ्या अर्थाने योग्य मार्गांचा अवलंब केला गेला असता तर या देशांनी एकमेकाशी योग्य पद्धतीने औद्योगिक आर्थिक करार करुन अधिक लाभ मिळवला असता. त्यांनी गैर मार्गाने एकमेकांच्या संसाधनांचा लाभ उठवण्याऐवजी एकत्र येऊन एकमेकाशी सहकार्य करायला हवे. थोडक्यात सांगायचे झाल्यास जगामध्ये जी अव्यवस्था पसरत जात आहे त्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे न्यायाचा संपूर्ण अभाव ज्याच्यामुळे चिंताजनक आणि अशांततेची परिस्थिती निर्माण होत आहे.

म्हणून माझी आपणाला अशी विनंती आहे की, जागतिक युद्धाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी तुम्ही सर्वतोपरीने प्रयत्न करावे. तुम्ही तुमची सर्वशक्ती, सर्व संसाधने आणि सर्व प्रभावाचा वापर करुन या जगाला जो भयानक विनाश आपल्या समोर दिसत आहे त्यापासून वाचवावे. काहीं बातम्यानुसार जर्मनी, इस्त्राईलला तीन अत्याधुनिक पानबुडया, ज्या आण्विक शस्त्रांनी सज्ज केल्या जाऊ शकतात देणार आहे. एका जर्मन प्राध्यपकाने म्हटले आहे की, जर असा निर्णय झाला तर तो फक्त इस्त्राईल आणि ईरान मध्ये जो अत्योच्च कोटीचा तनाव आधीच निर्माण झालेला

आहे तो अधिक वाढविण्यास कारणीभूत ठरेल. आपण ही गोष्ट लक्षात ठेवायला हवी की, आण्विक शस्त्रे फक्त जगातील महाशक्तींकडेच नाहीत तर तुलनेने लहान देशांकडे सुद्धा आण्विक शस्त्रास्त्रे आहेत. मोठी काळजी या गोष्टीची आहे की, अशा लहान देशांमध्ये युद्धखोर वृत्तीचे नेते सत्तेवर आहेत आणि त्यांना अशा शस्त्रांच्या वापराचे दुष्परिणाम काय होतील याची अजिबात चिंता दिसून येत नाही. म्हणून माझी आपणाला परत एकदा विनंती आहे की, जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी तुम्ही सर्वपरीने प्रयत्न करावेत. जर आपण या प्रयत्नात अयशस्वी ठरलो तर आपल्या मनामध्ये अजिबात शंका असू नये की, असे आण्विक संघर्ष मोठया विनाशाला कारणीभूत ठरेल आणि तो पिढयांपिढया विकृत मुलांना जन्म देण्यास कारणीभूत ठरेल आणि ते कदापि आपल्या वाडवडीलांना, त्यांना या जागतिक विनाशाकडे लोटण्याबद्दल क्षमा करणार नाही. सर्वशक्तीमान अल्लाह तुम्हाला आणि जगातील सर्व नेत्यांना हा संदेश समजून घेण्याची सद्बुद्धी देवो.

अनेक शुभेद्धा आणि आशीर्वादा सह.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,

खलीफतुल मसीह पाचवा.

अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# राष्ट्राध्यक्ष फ्रेंच प्रजासत्ताक
# यांना पत्र

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY IN ISLAM

نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ
وعلی عبدہ المسیح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
ھوالناصر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

राष्ट्राध्यक्ष फ्रेंच प्रजासत्ताक ,
आदरणीय फ्रास्कव्हॉस हौलांडे,
पालाइस दे इलीसे,
५५, रुदू फॉबोर्ग संत-हॉनर,
७५००८, पॅरिस, फ्रांस.

श्री राष्ट्राध्यक्ष,

या वेळी मी आपणास सर्व प्रथम फ्रांसचे नवीन अध्यक्ष म्हणून निवडून आल्याबद्दल अभिनंदन करण्याची संधी घेत आहे. ही खरोखरच फार मोठी जबाबदारी आपणावर टाकण्यात आली आहे आणि मला आशा आहे आणि माझी प्रार्थना आहे की, फ्रांसची जनता आणि त्याचबरोबर संपूर्ण जग देखील तुमच्या नेतृत्त्वाचा लाभ घेईल. सध्या ज्या शीघ्र गतीने जगामध्ये परिस्थिती बिघडत चालली आहे त्याच्या परिप्रेक्षात मी नुक्तेच एक पत्र तुमच्या पूर्वीच्या राष्ट्राध्यक्ष 'निकोलस सारकोझी' यांना लिहले होते. त्या पत्रामध्ये मी राष्ट्रायक्ष सारकोझी यांना जगातील एक महत्त्वपूर्ण नेते म्हणून न्याय प्रस्थापित करण्या संदर्भात त्यांची जबाबदारी पूर्ण करण्याची विनंती केली होती आणि त्यांना विनंती केली होती की त्यांनी त्यांच्या सर्व शक्ती आणि क्षमतांचा वापर करुन जागतिक युद्ध भडकणार नाही यासाठी प्रयत्न करावेत. नवीन निवडून आलेले फ्रांसचे राष्ट्राध्क्ष म्हणून तोच संदेश तुम्हाला देखील लिहणे मला आवश्यक वाटले; कारण आता तुम्हाला असे

सर्व निर्णय घेण्याचे अधिकार प्राप्त आहेत, जे तुमच्या राष्ट्रावर आणि संपूर्ण जगावर सुद्धा परिणामकारक ठरतील. माझा असा विश्वास आहे की, जगातील सर्व सत्ताधारकांनी जगाच्या सध्यपरिस्थिती बद्दल अतिशय चिंता करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रां-राष्ट्रांमध्ये वाढत जाणारा अन्याय आणि वैरभाव जागतिक संघर्ष भडकविण्यास कारणीभूत ठरण्याची भीती आहे. गेल्या शतकामध्ये दोन जागतिक महायुद्धे लढली गेली आहेत. पहिल्या महायुद्धानंतर लीग ऑफ नेशन्स ची स्थापना करण्यात आली होती, तथापि न्यायाच्या गरजा परिपूर्ण करता न आल्यामुळे दुसरे महायुद्ध पेटण्यास कारणीभूत ठरले, ज्यामध्ये अणु बॉम्बचा वापर सुद्धा करण्यात आला. तद्नंतर संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना करण्यात आली, ज्याचा उद्देश मानवी अधिकारांचे रक्षण आणि जागतिक शांतता कायम ठेवणे हा होता. म्हणून युद्धे टाळण्याची प्रयोजने शोधण्यात आली परंतु आज आपण पाहत आहोत की तिसऱ्या महायुद्धाचा पाया आधीच रचला गेला आहे अनेक लहान मोठे देश अणु बॉम्ब बाळगुण आहेत, जी गोष्ट अधिक काळजी करण्यासारखी आहे ती म्हणजे अणु शक्ती असलेले काहीं छोटे देश बेजबाबदार आहे आणि अशा घातक शस्त्रांच्या विनाशकारी परिणामांपासून अनभिज्ञ आहेत. जर का आण्विक शस्त्रांचा वापर झाला तर त्याचे परिणाम किती भयानक होतील याची कल्पना सुद्धा करत नाहीत, तो जगाचा अंततेचा दिवसासारखा असेल. ही अण्वस्त्रे इतकी घातक आहेत की, त्यांच्या परिणामस्वरुप पिढयांपिढया जन्मणारी मूले भयानक जैविक किंवा शारीरिक व्यंगासह जन्माला येतील. असे म्हटले जाते की, जापान, ज्या देशाने आण्विक युद्धाच्या घातक विध्वंसाचा अनुभव घेतला आहे, आज सात दशके लोटल्यानंतर देखील अणु बॉम्ब चे परिणाम नवीन जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये अजून देखली दिसून येत आहे.

म्हणून माझी अतिशय नम्र विनंती आहे की, तुम्ही, मुस्लिम आणि बिगर मुस्लिम जगामध्ये जो शत्रुभाव आणि अविश्वास आढळून येत आहे,

तो संपवण्यासाठी शक्यते सर्वप्रयत्न करावे, काहीं युरोपियन देशांच्या मनामध्ये इस्लामी शिकवणी आणि परंपराबद्दल काहीं संदेह आढळून येतो आणि त्यांनी काहीं गोष्टी व प्रतिबंध लादले आहे. तर अन्य देश हे प्रतिबंध कसे लादावे याचा विचार करत आहे. काहीं अतिरेकी तथाकथित मुस्लिमांच्या मना मधला पाश्चात्यात लोकांच्या बद्दल आधीच असलेला वैरभाव त्यांना यामुळे काहीं अवांच्छित पद्धतीच्या प्रतिक्रिया देण्यास प्रवृत्त करु शकतो ज्यामुळे धार्मिक तेढ आणि असहिष्णूता वाढण्याची शक्यता आहे. खरे पाहिल्यास इस्लाम हा शांती प्रिय धर्म आहे. तो आम्हाला एखाद्या चुकीच्या गोष्टीला थांबवण्यासाठी चुकीच्या पद्धतींचा अवलंब करण्याची शिकवण देत नाही. आम्ही अहमदिया मुस्लिम समुदाय याच तत्त्वांचे अनुसरण करतो आणि विश्वास ठेवतो की सर्वच गोष्टींचे शांततेच्या मार्गाने समाधान निघू शकते.

दुर्दैवाने काहीं थोडे मुसलमान इस्लामची अतिशय विकृत प्रतिमा निर्माण करताना आणि त्यांच्या पूर्णतः चुकीच्या श्रद्धांनुसार कार्यरत असल्याचे आपण पाहतो. पवित्र पैगंबर (स.) 'जे सर्व मानवजातीसाठी दयाघन होते', यांच्या प्रेमापोटी सांगू इच्छितो की, आपण, हाच खरा इस्लाम आहे, असा विश्वास ठेवू नये आणि या लोकांच्या दुष्कृत्यांना इतर शांती प्रिय बहुसंख्य मुसलमानांच्या भावना दुखावण्याचा परवाना समजू नये. नुक्तेच एका निर्दय आणि पाषाण हृदयी व्यक्तीने काहीं फ्रेंच सैनिकांवर दक्षिण फ्रांसमध्ये गोळीबार करुन त्यांना विनाकारण ठार मारले आणि नंतर तो काहीं दिवसानंतर एका शाळेत घुसला आणि त्याने तीन निष्पाप ज्यु बालकांना आणि त्यांच्या एका शिक्षकाला ठार मारले. अशाच काहीं क्रौर्याच्या घटना नियमितपणे काहीं मुस्लिम देशांमध्ये घडत असतात आणि अशा घटनांच्या परिणामस्वरुप इस्लाम शत्रुंना त्यांची द्वेष भावना व्यक्त करण्याचे ध्येय मोठया प्रमाणात गाठण्यास त्यांना संधी देतात. एक मुसलमान म्हणून मी आपणाला अतिशय

सुस्पष्टपणे सांगू इच्छितो की, इस्लाम कुठल्याही प्रकारच्या क्रौर्याला किंवा अत्याचाराला, मग तो कुठल्याही स्वरुपात असो, परवानगी देत नाही. पवित्र कुरआनामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, एखाद्या निष्पाप व्यक्तीची हत्या संपूर्ण मानवजातीच्या हत्ये समान आहे. हे अतिशय निःसंदिग्ध आणि शाश्वत आणि विना अपवाद आहे. पवित्र कुरआन या पुढे जाऊन असे ही म्हणतो की, जर एखादा देश किंवा लोक तुमच्याशी शत्रुत्त्व बाळगत असले तरी त्यांच्याशी व्यवहार करताना तुम्हाला संपूर्ण न्याय आणि योग्य पद्धतीने व्यवहार करण्यापासून प्रवृत्त न करो. शत्रुत्व किंवा वैरभाव तुम्हाला बदला घेण्यास किंवा त्यांच्याशी दुर्व्यवहार करण्यास प्रवृत्त न करो, जर तुमची इच्छा सर्व संघर्ष चांगल्या मार्गाने संपवण्याची असेल तर त्यासाठी काहीं सलोख्यांचे मार्ग शोधण्याचा प्रयत्न करावा. मी या गोष्टीचा खूपच आदर करतो की, अनेक पाश्चात्य देशांनी गरीब आणि अविकसित देशातील लोकांना, ज्यात मुस्लिमही सामील आहेत, त्यांच्या त्यांच्या देशात वास्तव्य करण्याची सहृदयतेने परवानगी दिलेली आहे. वास्तविक पाहता तुमच्या देशात अनेक मुस्लिम राहतात आणि ते तुमचे नागरिक देखील आहेत. त्यापैकी बहुसंख्य कायद्याचे पालन करणारे आणि प्रामाणिक आहेत. इस्लाम तर या पुढे जाऊन स्पष्टपणे असे देखील म्हणतो की, स्वतःच्या देशावर प्रेम करणे श्रद्धेचाच भाग आहे. अहमदिया मुस्लिम समुदाय या संदेशाचा प्रचार आणि प्रसार जगभर करत असून त्यानुसारच ते वागत आहेत. माझा संदेश तुम्हाला आहे की, जर इस्लामची ही खरी शिकवण सर्वत्र पसरली तर स्वतःच्या देशावर प्रेम व्यक्त करणे आणि शांतीने राहणे प्रत्येक देशामध्ये आणि जगभर प्रस्थापित होईल.

माझी आपणाला आणि सर्व जागतिक नेत्यांना अतिशय नम्र विनंती आहे की, इतर देशांना ताब्यात ठेवण्यासाठी बळाचा वापर न करता मुतसद्देगिरी चर्चा आणि विवेकाचा वापर करावा. जागतील सर्व महाशक्तींनी जसे की,

फ्रांस शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांची भूमिका योग्य पद्धतीने बजावावी. त्यांनी काहीं लहान देशांच्या दुष्कर्मांना निमित्त करुन जगातील सौहार्द नष्ट करु नये. म्हणून मी परत एकदा तुम्हाला सांगू इच्छितो की, तुम्ही तुमच्या सर्व क्षमतांचा वापर करुन लहान आणि मोठया शक्तींना तिसरे महायुद्ध भडकवण्यापासून परावृत्त करावे. जर का आपण आपल्या या प्रयत्नात अपयशी ठरलो, तर अशा युद्धाचे निकट आणि दूरगामी परिणाम फक्त आशियांतील, युरोपातील आणि अमेरिकेतील गरीब देशांपुर्तेच मर्यादित राहतील, असा संशय आपल्या मनात असू नये. तर आपल्या भावी पिढयांना देखील आपल्या या कृत्यांचे अतिशय भयानक परिणाम भोगावे लागतील आणि जगात सर्वत्र जी मूले जन्माला येतील ती विकृतीसह जन्माला येतील. माझी प्रार्थना आहे की, जागतिक नेत्यांनी विवेकाने वागावे आणि वेगवेगळ्या राष्ट्रातील आणि लोकांतील आपसातील शत्रुत्त्वाला जागतिक संघर्षात परिवर्तित करु नये. सर्व शक्तीमान अल्लाह आपणाला आणि सर्व जागतिक नेत्यांना हा संदेश समजून घेण्याचे सुबुद्धी देवो.

खूप शुभेच्छा आणि आशीर्वादासह.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

**युनाईटेड किंग्डंम आणि कॉमनवेल्थ
च्या समराज्ञी आदरणीय महारानी
यांना पत्र**

وَاجْعَلْ لِیْ مِنْ لَّدُنْكَ سُلْطٰنًا نَّصِیْرًا
اِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحًا مُّبِیْنًا
وَلَقَدْ نَصَرَكُمُ اللّٰهُ بِبَدْرٍ وَّاَنْتُمْ اَذِلَّةٌ

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم اللہ الرحمن الرحیم
نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ
وعلٰی عبدہِ المسیح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
ھوالنّاصــــر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय महारानी,
एलीजाबेथ द्वितीय,
युनाईटेड किंग्डंम आणि कॉमनवेल्थ च्या समराज्ञी,
बंकिंग्घम पॅलेस, लंडन.
SW1A1AA U.K.
१९ अप्रैल, २०१२.

आदरणीय समराज्ञी,

अहमदिया मुस्लिम जमाअतचा प्रमुख म्हणून आणि जगभर पसरलेल्या कोटयावधी अहमदिया मुस्लिम जमाअतच्या सदस्यांच्या वतीने मी महारानीला त्यांच्या हिरक महोत्सवाच्या आनंद सोहळयाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा व्यक्त करतो. आम्ही सर्वशक्तीमान अल्लाहचे अतिशय आभारी आहोत की त्यांनी आम्हाला अशा वैभवपूर्ण सोहळयात सामील होण्याची संधी दिली आहे. विशेषतः जे अहमदी मुस्लिम युनाईटेड किंग्डम चे नागरिक आहेत, त्यांना या हिरक महोत्सवाच्या समारंभाबद्दल अतिशय आनंद आणि अभिमान आहे. म्हणून त्यांच्या वतीने मी महारानीला हार्दिक शुभेच्छा व्यक्त करीत आहे. अल्लाह आमच्या उच्च पदस्त आणि सह्रदय महारानीला नेहमीच सुखी आणि समाधानी ठेवो.

मी महान अल्लाहकडे, ज्याने ही धरती आणि आकाश निर्माण केले आहे आणि त्यांना आमच्या अस्तित्वासाठी अनेक देणग्या दिलेले

आहेत, याचना करतो की, त्याने आमच्या महारानीला जिच्या उदार अधिपत्याखाली अनेक सार्वभौम राज्य आणि कॉमनवेल्थ राष्ट्रे आहेत त्याने शांती स्थैर्य आणि सुरक्षा कायमची प्रदान करावी. ज्या पद्धतीने महारानीवर त्याचे जुने आणि नवीन प्रजाजण प्रेम करतात आणि आदर बाळगतात त्याच प्रमाणे आमची प्रार्थना आहे की, देवदूताने देखील महारानीवर प्रेम वर्षाव करावा. सर्वशक्तीमान अल्लाह आमच्या महारानीवर उदारपणे त्याच्या अगणित आशीर्वादाचा आणि आध्यात्मिक बक्षीसांचा वर्षाव करावा, ज्याप्रकारे त्याने तिच्यावर भौतिक समृद्धीचा अमाप वर्षाव केला आहे. या प्रार्थनेसह मी अपेक्षा करतो की या महान राष्ट्राचे सर्व नागरिक आपल्या सर्वोच्च परमेश्वराला ओळखतील आणि आपसात प्रेम आणि सौहार्दाच्या वातावरणात जीवन जगतील. वर्ण, वंश, राष्ट्रीयत्व किंवा धर्माच्या भेदभावाशिवाय युनाईटेड किंग्डमचे सर्व नागरिक एकमेकाचा आदर आणि सम्मान करत अशा पद्धतीने बंधुभावासह राहो की ज्याचा सकारात्मक परिणाम आणि प्रभाव या देशाच्या सीमांच्या पलीकडे जाऊन जगभराच्या अन्य देशापर्यंत पोहचेल. जग जसे की आज अनेक प्रकारच्या युद्धांमुळे अस्वस्थतेमुळे आणि शत्रुत्वामुळे संघर्षमय झाले आहे, त्याऐवजी ते प्रेम, बंधुत्व, शांती आणि मैत्रीचे स्वर्ग होवो. मला विश्वास आहे की, आमच्या महारानीची दूरदृष्टी आणि प्रयत्न हे महान उद्दीष्ट साध्य करण्याच्या कामी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

गेल्या शतकात दोन महायुद्धे, ज्यात कोटयावधी लोकांनी आपला जीव गमावला, लढली गेली. आज जर वेगवेगळया राष्ट्रातील संघर्ष वाढत राहिले तर परिणामस्वरुप आणखीन एक महायुद्धाचा उद्रेक होईल. या महायुद्धात अपेक्षितपणे आण्विक शस्त्रांचा वापर झाल्यास हे जग अतिशय भयानक आणि कल्पनातीत विनाश अनुभवेल. महान अल्लाह या भयंकर विनाशापासून आमचे रक्षण करो आणि जगातील सर्वलोक विवेक आणि सन्मती धारण करोत. माझी महारानीला कळकळीची विनंती आहे की,

त्यांनी या हिरक महोत्सवाच्या आनंद सोहळयाचा वापर मानवजातीच्या कल्याणासाठी करावा आणि सर्व राष्ट्रांच्या, मग ते लहान असोत की मोठे, जनतेला आपसात प्रेम आणि शांती आणि सौहार्दाच्या वातावरणात जगण्याची प्रेरणा द्यावी.

या संदर्भात हिरक महोत्सवाच्या आनंद सोहळयाच्या निमित्ताने मी अतिशय विनम्रपणे महारानीला अशी विनंती करतो की, कोणत्याही धर्माचे अनुयायी किंवा असेही लोक ज्यांचा ईश्वरावार विश्वास नाही त्या सर्वांना असा संदेश द्यावा की त्यांनी नेहमीच अन्य धर्माच्या लोकांच्या भावनांचा आदर करावा. आज जगामध्ये इस्लामबद्दल अनेक गैरसमज पसरलेले आहे, यामुळे एकीकडे शांती प्रिय मुस्लिमांच्या भावना आहत होतात, तर दुसरीकडे बिगर मुस्लिमांच्या मनामध्ये वैरभाव आणि अविश्वास निर्माण होतो. म्हणून ही महारानीची खूपच कृपा असेल की, त्यांनी सर्व धर्माच्या अनुयायींना किंबहुना संपूर्ण जगाला महारानीने असा सल्ला द्यावा की सर्व लोकांनी सर्वधर्मांचा आणि त्यांच्या अनुयायींचा आदर करावा. महान अल्लाह आमच्या महारानीला हे उद्दीष्टे साध्य करण्यासाठी सर्व प्रकारे सहाय्य आणि सहकार्य करो.

जसे की मी या पत्राच्या सुरुवातीलाच उल्लेख केला आहे की, मी अहमदिया मुस्लिम समुदायाचा वैश्विक प्रमुख आहे या संदर्भात मी आमच्या समुदायाचा थोडक्यात परिचय करुन देऊ इच्छितो. अहमदिया मुस्लिम समुदाय अशी दृढ श्रद्धा बाळगतो की, पवित्र पैगंबर महंमद (स.) यांच्या आणि भूतकाळातील अनेक प्रेषीतांच्या भविष्यवाणीनुसार या युगासाठी जो अपेक्षित मसीहा येणार होता तो मिर्जा गुलाम अहमद कादियानी यांच्याशिवाय अन्य कोणी नाही. त्यांनी १८८९ साली एक शुद्ध आणि सन्मार्गी जमाअत-अहमदिया मुस्लिम जमाअतची स्थापना केली. या जमाअतच्या स्थापने मागे त्यांचा उद्देश मानव आणि परमेश्वरामध्ये दृढ संबंध प्रस्थापित करणे

आणि जनसामान्यांना एकमेकाच्या अधिकारांची परिपूर्तता करत आपसात आदरभाव आणि चांगूलपणाने जगण्यासाठी प्रवृत्त करावे हा होता. जेव्हा हज़रत मिर्ज़ा ग़ुलाम अहमद यांचे १९०८ साली निधन झाले त्यावेळी जवळ जवळ ४ लाख त्यांचे अनुयायी होते. त्यांच्या निधनानंतर दैवी इच्छेनुसार खिलाफत ची स्थापना करण्यात आली आणि सध्या अल्लाहचा हा विनम्र सेवक अपेक्षित मसीहाचा पाचवा खलीफा आहे. म्हणून अहमदिया मुस्लिम जमाअत आपल्या संस्थापकाच्या दैवी कार्याला संपूर्ण जगभर प्रसारित करण्यासाठी प्रयत्नशील आहे. आमचा संदेश प्रेम, सद्भावना आणि बंधुत्त्वाचा आहे. आणि आमचे बोधवाक्य ''प्रेम सर्वांसाठी घृणा कोणासाठीही नाही'' हे आहे. वास्तविक पाहता हाच इस्लामच्या सुंदर शिकवणुकीचा मथितार्थ आहे.

याप्रसंगी या गोष्टीचा उल्लेख करणे उचित राहील की, योगायोगाने अहमदिया मुस्लिम जमाअतच्या संस्थापकांच्या काळामध्ये महारानी विक्टोरिया यांचा हिरक महोत्सव साजरा केला गेला होता. त्यावेळी अहमदिया जमाअतच्या संस्थापकाने एक ग्रंथ ज्याचे शिर्षक ''महारानीसाठी एक भेट'' असे होते ते महारानीला शुभेच्छा देण्यासाठी एका संदेशाच्या रुपात लिहले होते. या संदेशामध्ये हज़रत मिर्ज़ा ग़ुलाम अहमद क़ादियानी यांनी महारानीचे, तिच्या हिरक महोत्सवाबद्दल आणि ज्या पद्धतीने ती आपल्या प्रजेवर, ज्यामध्ये भारतीय उपखंडाच्या जनतेचाही समावेश होता, यांना सर्व प्रकारे न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्य बहाल करुन शांतीने जगण्याची संधी दिली होती, त्याबद्दल अभिनंदन केले होते. त्यांनी इस्लामच्या सुंदर शिकवणूकीची देखील भेट दिली होती आणि त्यांच्या आग्मनाचा हेतू स्पष्ट केला होता. जरी आज उपखंडातील जनतेला ब्रिटीश सरकारने वेगवेगळया पार्श्वभूमीच्या आणि धर्मांच्या लोकांना येथे सर्व प्रकारचे समानाधिकार, धार्मिक स्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य तसेच त्यांच्या धर्मांच्या प्रचाराचे स्वातंत्र्य बहाल

केले आहे आणि हाच ब्रिटीश सरकारच्या उच्चकोटीच्या सहिष्णूतेचा मोठा पुरावा आहे.

आज हजारो अहमदी मुस्लिम, युनाईटेड किंग्डम मध्ये वास्तव्य करतात त्यांच्यापैकी अनेक जण आपल्या देशातील अत्याचारापासून मुक्त होण्यासाठी या ठिकाणी आश्रयासाठी स्थलांतरित झाल्या आहेत. महारानीच्या उदार अधिपत्याखाली त्यांना येथे शांतीपूर्ण जीवन जगण्याची संधी मिळालेली असून त्यांना सर्व प्रकारे न्याय आणि धार्मिक स्वातंत्र्याचा उपभोग घेता येत आहे, या उदारतेसाठी मी परत एकदा आमच्या महारानीप्रती माझा हार्दिक आदरभाव व्यक्त करतो.

मी माझे हे पत्र महारानीसाठी खालीलप्रमाणे प्रार्थनेसह, जी प्रार्थना अहमदिया मुस्लिम समुदायाच्या संस्थापकानी महारानी विक्टोरियासाठी केली होती त्याच शब्दात आहे, समाप्त करतो.

*हे सर्वशक्तीमान आणि महान अल्लाह! आमच्या आदरणीय महारानीवर तुझ्या कृपेचा आणि अनुग्रहाचा वर्षाव कर आणि तिला तसेच आनंददायी जीवन प्रदान कर जसे आनंददायी जीवन आम्ही तिच्या उदार साम्राज्यात उपभोगत आहोत. हे सर्व शक्तिमान अल्लाह! तिच्यावर तुझी कृपा आणि प्रेम असू दे ज्या पद्धतीने आम्ही तिच्या उदार आणि कृपावंत राज्यात शांती आणि समृद्धीने जगत आहोत.*

त्यापुढे जाऊन मी अल्लाहकडे अशीही प्रार्थना करतो की, त्याने आमच्या आदरणीय महारानीला, जो मार्ग त्याला आवडतो त्याकडे मार्गदर्शन करावे. सर्वशक्तिमान अल्लाह महारानीच्या वारसांना देखील सत्य प्रस्थापित करणारे आणि इतरांना सत्याचा मार्ग दाखवणारे बनवो. न्याय आणि स्वातंत्र्य हेच या ब्रिटीश राजघराण्याचे मार्गदर्शक तत्त्व नेहमीच राहो. मी परत एकदा महारानीला या महोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा देतो. मी माझ्या हार्दिक आणि प्रामाणिक शुभेच्छा महारानीला सादर करतो.

सर्वोत्तम शुभेच्छा आणि आशीर्वादासह.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,

खलीफतुल मसीह पाचवा.

अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# इस्लामिक प्रजासत्ताक ईरान चे सर्वोच्च नेते यांना पत्र

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهٗ وَ نُصَلِّی عَلٰی رَسُوْلِهِ الْكَرِيْم
وعلی عبدہ المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
ھوالناصر

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

इस्लामिक प्रजासत्ताक ईरान चे सर्वोच्च नेते
आयतुल्लाह सय्यद अली हुसैनी खामीनाई,
तेहरान, ईरान.
१४ मे २०१२.

आदरणीय आयतुल्ला साहेब,

अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाही व बरकातहू.

सर्वशक्तिमान अल्लाहने आपणाला ईरान मध्ये सेवा करण्याची संधी दिलेली असून सध्या ईरान मधील सरकार देखील आपल्याच नेतृत्वात कार्यरत आहे, त्यामुळे ही आपली जबाबदारी आहे की, आपण संपूर्ण जगाला इस्लामच्या खऱ्या खुऱ्या आणि योग्य शिकवणीचा परिचय करुन देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे. मुसलमान म्हणून आपण या जगाला शांती, प्रेम आणि सौहार्दपूर्ण जीवन जगण्याची शिकवण देण्याचा प्रयत्न करायला हवा. विशेषतः मुस्लिम नेतृत्वाने या गोष्टीकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. याच कारणासाठी मी तुम्हाला विनंती करतो की, तुम्ही आपल्या सरकारला जगामध्ये शांती प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या जबाबदारी बद्दल लक्ष वेधावे. जर ईरान वर आक्रमण झाले तर त्याला स्वतःचे रक्षण करुन आपल्या देशाला सुरक्षित ठेवण्याचा अधिकार प्राप्त आहे. परंतु त्याने स्वतः होऊन आक्रमक भूमिका घेऊ नये आणि संघर्षाकडे पहिले पाऊल टाकू नये.

त्याच्याऐवजी धार्मिक मतभेदाना बाजूला ठेवून सर्वमान्य तत्त्वांच्या आधारे संघटित होण्याचा प्रयत्न करावा. हाच मार्ग इस्लामच्या इतिहासात धारण केला गेला होता. हे आपणास माहित आहे.

हे पत्र मी आपणास या कारणासाठी लिहीत आहे की, मी पवित्र पैगंबर महंमद (स.) यांच्या भविष्यवाणीनुसार या युगासाठी प्रकट झालेल्या अपेक्षित मसीहा आणि इमाम महदी यांचा अनुयायी, उत्तराधिकारी आणि खलीफा आहे. जमाअतची स्थापना केली ती अहमदिया मुस्लिम जमाअत म्हणून ओळखली जाते. अल्लाहच्या कृपेने ही जमाअत आता जगातील २०० हून अधिक देशांमध्ये स्थापित झालेली असून जगभर याचे कोटयावधी निष्ठावान अनुयायी आहेत. आमची ही हार्दिक इच्छा आहे की, या जगाला प्रेम आणि शांतीने जगण्यासाठी मार्गदर्शन करावे याचसाठी मी सातत्याने सर्व क्षेत्रातील लोकांचे लक्ष वेधत असतो. म्हणून मी नुक्तेच इस्त्राईलचे प्रधानमंत्री, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि जगातील इतर नेत्यांना पत्रे लिहले आहे. मी पोप बेनीडीक्ट १४ यांना देखील या संदर्भात लिहले आहे.

एका महान इस्लाम राष्ट्राचे आध्यात्मिक नेते म्हणून मी आशा करतो की आपण माझ्याशी या बाबतीत सहमत व्हाल की जर संपूर्ण मुस्लिम उम्माह एकसंघ होऊन एकत्रीत कार्यरत झाली तर जगात सहज शांती प्रस्थापित होईल. आम्ही शत्रुत्व आणि मतभेदांच्या मुद्यांना भडेकावण्याऐवजी, शांती आणि स्वस्थता प्रस्थापित करण्याची संधी शोधत रहायला हवे. त्यापुढे जाऊन शत्रुत्व किंवा इतरांशी असलेला विरोद्ध सुद्धा न्यायापासून मुक्त नसायला हवा. हेच आपल्याला पवित्र कुरआनातून शिकविले गेले आहे.

**हे श्रद्धावंत लोकहो! (तुम्ही) न्यायपूर्वक साक्ष देत असताना अल्लाहच्या कार्यात (मन) स्थिर करा आणि लोकांचे वैमनस्य, न्यायपूर्वक असेल त्या व्यतिरिक्त अन्य कृत्य करण्यास तुम्हाला प्रवृत्त न करो, (सदैव) न्यायपूर्ण**

**व्यवहार करा, ती (गोष्ट) सदाचरणाच्या निकटतम आहे, आणि अल्लहाचे भय बाळगा, तुम्ही जे काही करता ते अल्लाह निश्चितच जाणतो.**

(५:९)

अल्लाह संपूर्ण मुस्लिम उम्माह आणि सर्व मुस्लिम शासन कर्त्यांना माझा हा संदेश समजून घेण्याची सुबुद्धी देवो, जेणे करुन जगात शांती प्रस्थापित करण्यासाठी त्यांच्या निर्धारित भूमिकेनुसार त्यांची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी ते स्वतःला तयार करु शकावे.

संपूर्ण मुस्लिम उम्माह बद्दल मला असलेल्या प्रेमातून, सर्व मानवजातीसाठी माझ्या हृदयात जो प्रेमभाव आहे तसे मी सर्व सृष्टीसाठी दयाघन असलेल्या (प्रेषीत) च्या उम्माहाचा मी ही एक सदस्य असल्यामुळे मी हे पत्र लिहीत आहे. अल्लाह सर्व जागतिक नेत्यांना माझ्या शब्दाच्या मागील भावना समजण्याची सुबुद्धी देवो आणि त्यांनी जागतिक शांती प्रस्थापनेसाठी त्यांची भूमिका ते तत्पर्तेने बजावेत, नसता जर एखाद्या राष्ट्रांच्या बेजबाबदारपणा मुळे आणि घाईने घेतलेल्या निर्णयामुळे जर दोन देशात युद्ध पेटले तर असा संघर्ष त्या दोन देशापूर्ताच मर्यादित राहणार नाही तर अशा युद्धाच्या ज्वाला संपूर्ण जगाला वेढून टाकतील. म्हणून जागतिक महायुद्ध पेटण्याची संपूर्ण शक्यता असल्यामुळे आणि हे युद्ध पारंपरिक शस्त्रांनी लढले जाणार नसून अशा युद्धात आण्विक शस्त्रांचा वापर केला जाईल अशा आण्विक युद्धाच्या परिणाम अतिशय भयानक आणि विनाशकारी असतील आणि त्याचे दूरगामी परिणाम त्या काळात जगात असलेल्या लोकांपूर्तेच मर्यादित राहणार नसून हे युद्ध भविष्यात जन्म घेणाऱ्या पिढयांना भयानक अशा विकृती आणि विकलांगतेचे पारितोषिक घेऊन येईल, याच कारणासाठी कोणत्याही देशाने आपण या विनाशापासून सुरक्षित राहू अशी कल्पना करणे उचित नाही.

म्हणून परत एकदा मी अल्लाह आणि त्याचे पवित्र प्रेषीत (स.) यांच्या नावाने आणि मानवतेच्या प्रेमापोटी मी तुम्हाला विनंती करत आहे की जगात शांती प्रस्थापनेसाठी ची तुमची भूमिका तुम्ही योग्य पद्धतीने पार पाडावी.

अनेक शुभेच्छा आणि आशीर्वादासह.

वस्सलाम,
तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

# राष्ट्राध्यक्ष रशीयन महासंघ

# यांना पत्र

وَاجْعَلْ لِيْ مِنْ لَدُنْكَ سُلْطٰنًا نَصِيْرًا
اِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحًا مُّبِيْنًا

MIRZA MASROOR AHMAD
HEAD OF THE AHMADIYYA COMMUNITY
IN ISLAM

بسم الله الرحمن الرحيم
نَحْمَدُهٗ وَ نُصَلِّيْ عَلٰى رَسُوْلِهِ الْكَرِيْمِ
وعلٰى عبدهِ المسيح الموعود
خدا کے فضل اور رحم کے ساتھ
هوالنّاصــــر

16 Gressenhall Road
Southfields, London
SW18 5QL, UK

आदरणीय श्री व्लादिमीर पूतीन,
राष्ट्राध्यक्ष रशीयन महासंघ,
द क्रेमीलीन, २३ ईलीयांका स्ट्रीट,
मास्को-१०३१३२
रशिया.
१७ सप्टेंबर,२०१२.

प्रिय श्री राष्ट्राध्यक्ष,

मी आपणास हे पत्र अहमदिया मुस्लिम जमाअत, जी संपूर्णपणे शांती प्रिय आणि शांतीचा प्रचार करणारी जगातील २१४ देशात पसरलेली जमाअत आहे, चा प्रमुख म्हणून लिहीत आहे.

जगात सध्या जे वातावरण निर्माण झाले आहे त्या अनुषंगाने मी सर्व जगातील लोकांना, माझ्या वेगवेगळया व्याख्यानातून आणि प्रवचनातून, त्यांची त्यांच्या निर्मात्याप्रती आणि त्यांच्या जगातील सर्व बंधुंप्रती असलेल्या जबाबदारीची आणि कर्तव्यांची जाणीव करुन देत असतो. मला खेद आहे की, मला तुमच्याशी थेट संवाद साधण्याची आजपर्यंत संधी मिळाली नाही, परंतु सध्या सिरीयामध्ये जी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे मी आपणास हे पत्र लिहण्यासाठी प्रवृत्त झालो आहे. आणि तुमच्या सर्व जागतिक नेत्यांना युद्धभूमिऐवजी एका चर्चेच्या टेबलावर बोलावण्याचे जे प्रयत्न आहे त्याबद्दल तुमचे अभिनंदन करण्यासाठी लिहीत आहे. या

विभागामध्ये होणारा एखादा हल्ला त्या विभागापूर्ताच राहणार नसून तो जागतिक युद्धास कारणीभूत ठरण्याचा धोका आहे आणि म्हणून मी एका प्रमुख पाश्चात्य वृत्तपत्रा मध्ये नुक्ताच प्रसिद्ध झालेला तुमचा लेख वाचून प्रसन्न झालो आहे, ज्या लेखात तुम्ही अशा कृतींचा परिणाम अतिशय भयानक आणि युद्ध पसरविण्यास कारणीभूत होईल हे अधोरेखित केले आहे. तुमच्या या भूमिकेमुळे जगातील महत्त्वाच्या महाशक्तींनी मार्गबदलत समंजस्याची भूमिका स्वीकारलेली दिसून येत आहे. आणि ते मुतसद्देगिरीच्या माध्यमातून ही समस्या सोडविण्यासाठी तयार होत असलेले दिसत आहेत. माझा विश्वास आहे की, निश्चितच यामुळे हे जग महाभयंकर विनाशापासून सुरक्षित झाले आहे. मी तुमच्या या मताशी पूर्णपणे सहमत आहे की, जर सर्व देशांनी स्वतंत्रपणे कृती करण्याचे आणि एकतर्फी निर्णय घेण्याचे ठरविल्यास संयुक्त राष्ट्रसंघाचाही अंत लीग ऑफ नेशन्स सारखाच होऊन ते अपयशी ठरेल. निश्चितच अलीकडे युद्धाच्या ठिंणग्या पडल्या होत्या परंतु सुदैवाने त्याकाही प्रमाणात ठंड झाल्याचे दिसून येत आहे. सर्वशक्तीमान अल्लाह तुम्ही उचललेल्या सकारत्मक पावलांमुळे युद्धाचा धोका कायमचा नष्ट करो. जगातील महाशक्ती छोटया राष्ट्रांची काळजी घेवोत आणि त्यांचा आदर करुन त्यांचे योग्य ते अधिकार त्यांना देण्यास प्रवृत्त होवोत. आणि फक्त स्वतःच्या नकाराधिकाराचाच विचार करत राहू नये.

काहीही असो तुमच्या शांती प्रस्थापित करण्याच्या प्रयत्यनामुळे मी प्रसन्न झालो असून तुमच्या आभार मानन्यासाठी हे पत्र मी तुम्हाला लिहीत आहे. माझी प्रार्थना आहे की तुमचे हे प्रयत्न तातपूर्ते राहू नये आणि मी आशा करतो आणि प्रार्थना करतो की तुम्ही नेहमी शांतीसाठी प्रयत्नरत रहावे. अल्लाह तुम्हाला हे साध्य करण्याचे सामर्थ्य देवो.

जगाच्या शांतीसाठी जेथे जेथे मला संधी मिळेल तेथे तेथे मी सर्व लोकांना न्यायाच्या मार्गाने शांती प्रस्थापित करण्यासाठी प्रवृत्त करत असतो.

माझी काहीं भाषणे ''जागतिक संघर्ष आणि शांततेचा मार्ग'' WORLD CRISIS AND PATHWAY TO PEACE या शिर्षकाने एका ग्रंथात प्रकाशित झाले आहे. मी हे पुस्तक भेट म्हणून या पत्रासोबत आपणास पाठवीत आहे.

अनेक शुभेच्छा आणि आशीर्वादासह.

तुमचा स्नेही,



मिर्ज़ा मसरुर अहमद,
खलीफतुल मसीह पाचवा.
अहमदिया मुस्लिम जमाअत चे जागतिक प्रमुख

## महत्त्वपूर्ण सूचना

पवित्र कुरआन च्या आयतींचे अनुवाद अहमदिया मुस्लिम जमाअत तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या मराठी कुरआनातून घेतले गेले आहे.

तसेच अहमदिया मुस्लिम जमाअत चे संस्थापक, हज़रत मिर्ज़ा ग़ुलाम अहमद क़ादियानी (अ.स) यांच्या शब्दांना ("") चिन्हा मध्ये दर्ज केले आहे.

तसेच या मराठी मजकूरात आलेल्या अरबीशब्दांचे संक्षिप्त अक्षरे दिलेले आहेत, त्यांचे अर्थ व स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहेतः-

**(स.)** - हे अक्षर ''सल्लल्लाहू अलैहिवसल्लम'' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ, अल्लाहची कृपा व शांती त्यांना लाभो, असा होतो. हे प्रार्थनात्मक शब्द विशेषकरून श्रेष्ठतम प्रेषित मुहम्मद (स.) यांचा साठी वापरले जाते.

**(अ.स.)** - ''अलैहिस्सलाम'' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या व्यतिरिक्त जगात प्रकट झालेल्या सर्व प्रेषितांचा नाव उच्चारल्यावर (अ.स.) म्हणतात. याचा अर्थ, त्यांच्यावर अल्लाहची कृपा असो, असा होतो.

**(र.जि.)** - हे अक्षर ''रजियल्लाहू अन्हू'' याचे संक्षिप्त रूप आहे. याचा अर्थ अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न झाला, असा होतो. हे शब्द प्रेषित मुहम्मद (स.) तसेच अपेक्षित मसीह व इमाम महदी यांच्या सोबतींच्या नावानंतर उच्चारले जातात.